टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत

इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी

सादर करण्यात आलेला संशोधन प्रबंध

''अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास :— कालखंड १९५० ते २०१०''

संशोधक

श्री. एकनाथ केरू मोटे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. किसन अंबाडे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
न्यु आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

फेब्रुवारी २०१६

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पति (पीएच.डी.) पदवीकरीता सादर केलेला **''अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास : कालखंड १९५० ते २०१०''** हा शोध प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. हा शोध प्रबंध मी इतर कुठल्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी किंवा अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण :— अहमदनगर **श्री. एकनाथ केरू मोटे**

दिनांक :—

प्रमाणपत्र

असे प्रमाणित करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखाअंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पति (पीएच.डी.) पदवीकरीता सादर केलेला **''अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास : कालखंड १९५० ते २०१०''** हा शोध प्रबंध श्री एकनाथ केरू मोटे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली लिहिलेले मुलभूत संशोधन कार्य आहे. माझ्या माहितीप्रमाणे तसेच देण्यात आलेल्या खात्रीने असे घोषित करतो की, सदर शोध प्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठास किंवा परीक्षण मंडळास सादर केलेला नाही.

ठिकाण : अहमदनगर

दिनांक :

प्रा.डॉ. किसन अंबाडे
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग प्रमुख,
न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स्
कॉलेज, अहमदनगर.

ऋणनिर्देश

अहमदनगर जिल्हा विविधतेने नटलेला आहे. अहमदनगर जिल्हा सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात अग्रेसर आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक चळवळी अहमदनगर जिल्हयात झाल्या आहेत. अहमदनगर जिल्हयात सहकारी संसाी मोठया प्रमाणावर स्थापन झाल्या. तालुक्यातुन बाजारपेठा व मार्केट कमिटया स्थापन झाल्या. तेथे मालाची चढउतार करण्यासाठी हमाल कामगारांची गरज भासू लागली. त्यातुन हमाल कामगार अतिशय कमी मोबदल्यात काम करत होते. व्यापाऱ्यांकडून मानसिक व आर्थिक शोषण वाढले होते. संघर्ष केल्याशिवाय अन्याय कमी होणार नव्हता. हमाल कामगारांनी संघर्ष करून एकत्र येऊन अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन केली. खूप कष्टाने या लढयाला यश मिळू शकले. समाजापासून उपेक्षित अशी माथाडी कामगार चळवळ समाजापुढे यावी हा उद्देश आहे. या जाणिवेतून **''अहमदनगर जिल्हा माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास – कालखंड १९५० ते २०१०''** हा विषय सूचला. या विषयावरील संशोधन कार्य पूर्णत्वास आले. अर्थात हे कार्य पूर्णत्वास येत असताना अनेकांचे मार्गदर्शन, आशिर्वाद, प्रेरणा, सहकार्य व शुभेच्छा मिळाल्या. त्या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत शोधन प्रबंधास पूर्णत्वास नेण्यासाठी न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगरचे इतिहास विभाग प्रमुख व माझे संशोधन **मार्गदर्शक प्रा.डॉ. किसन अंबाडे** यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यात येणारी प्रत्येक अडचणी त्यांनी अगदी कळकळीने सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच हे संशोधन कार्य पूर्णत्वास जाऊ शकले. त्यांच्या या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्रे विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकांत कार्लेकर, पीएच. डी. विभागप्रमुख डॉ. वाटे मॅडम, इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. नलिनी वाघमारे, प्रा.डॉ. संध्या पंडित यांनी

वेळोवेळी मार्गदर्शन करून माझ्या संशोधन कार्यास दिशा दिली. त्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

मी सेवेत असलेल्या बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष काकाशेठ नय्यर, उपाध्यक्ष आर.एम.पवार, सेक्रेटरी आंधळे बी.बी. यांच्या शुभाशिर्वादामुळेच मी संशोधन कार्य पूर्ण करू शकलो. त्यांची मी शतशः ऋणी आहे. दुर्गादेवी अमरचंद नय्यर विद्या मंदीर या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. हंडे एम.बी., श्रीमान बिंशभरदास माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री. पवार एस.आर यांचेही बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले, त्यांचा मी आभारी आहे.

मी सेवेत असलेल्या संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य व पांठिबा दिला त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

प्रस्तुत संशोधन करताना वेळोवेळी मार्गदर्शन व प्रेरणा देणारे पितृतूल्य बंधू प्रा.डॉ. मोटे डी. के., मेहूणे प्रा.डॉ. जयसिंगराव भोर यांचेही बहुमोल मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. प्रा.डॉ. येळवंडे सर, प्रा.डॉ. गोविंद कदम, प्रा.पाटोळे, प्रा.बोल्ली, प्रा.दरवडे, प्रा.लक्ष्मण जगताप यांचेही बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. त्यांचाही मी आभारी आहे.

याशिवाय संशोधन कार्यात हातभार लावणारे अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले, कार्ले, महापूरे, नंदू डहाणे, कॉ.बाबा आरगडे, मधुकर केकाण, लोंढे यांनी माथाडी कामगार चळवळीसंबंधीची कागदपत्रे, मासिके, वर्तमानपत्रे, स्मरणीका उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

या संशोधन कार्यास माझे वडिल केरू मोटे व अनुसया मोटे यांच्या शुभाशिर्वादामुळे हा प्रबंध पूर्ण करू शकलो. महादेव जाधव यांचा संपूर्ण परिवार, संतोष खांदवे व नरसाळे परिवार यांच्या संपूर्ण परिवाराच्या पाठिंब्यामुळे हा प्रबंध पूर्ण करू शकलो. त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे. प्रबंध लेखनाच्या वेळी बंधू जालिंदर मोटे व माझी पत्नी सुनंदा, मुलगी गायत्री, मुलगा सर्वेश

यांचे प्रेम, जिव्हाळा व खंबीर पांठिबा मिळाल्यामुळेच मी हे संशोधन कार्य पूर्ण करू शकलो. त्या सर्वांच्या ऋणातच राहणे मला आवडेल.

याशिवाय अनेक गुरूवर्य, सहकारी मित्र यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य लाभले आहे. ज्यांचा नामोल्लेख नजरचूकीने राहून गेला त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

एकनाथ केरू मोटे
संशोधक

अनुक्रमणिका

अ.नं.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्रमांक
	ऋणनिर्देश	I - III
१	संशोधन पध्दती	१ — १२
२	प्रस्तावना	१३ — ६७
३	माथाडी कामगार हक्कासाठी चळवळ	६८ — १०४
४	हमाल पंचायत आणि माथाडी कामगार चळवळ	१०५ — १३५
५	माथाडी कामगारांना मिळालेले संरक्षण व सुविधा	१३६ — १६०
६	माथाडी कामगार चळवळीतून उदयास आलेले साहित्यिक	१६१ —१९०
७	निष्कर्ष	१९१ — १९७
८	परिशिष्टे — १. माथाडी कामगार कायदा २. परिपत्रके ३. वर्तमानपत्र कात्रणे ४. आंदोलनाचे छायाचित्रे ५. हमाल कामगार यादी ६. मुलाखती	१९८ — २४०
९	संदर्भ ग्रंथसूची	२४१ — २४५

प्रकरण पहिले

संशोधन पध्दती

१) प्रस्तावना

२) विषय निवड

३) पूर्व संशोधनाचा आढावा

४) संशोधनाची उद्दिष्टे

५) संशोधनाची व्याप्ती

६) संशोधनाची मर्यादा

७) संशोधनाची गृहितके

८) संशोधनाची सैंध्दांतिक संकल्पना

९) संशोधन पध्दती

१०) संदर्भ साधने

११) प्रकरण नियोजन

१) प्रस्तावना :—

अहमदनगर जिल्हा विविधतेने नटलेला आहे. सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात अग्रेसर आहे. शैक्षणिक क्षेत्रातही जिल्हयाची प्रगती नेत्रदीपक आहे. भौगोलिक दृष्टया समृद्ध आहे. अहमदनगर जिल्हयातून वाहणाऱ्या नदयांमुळे शेतीचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते. ऊसाच्या उत्पादनामुळेच अहमदनगर जिल्हयात सर्वात जास्त साखर कारखाने आहेत. ऐतिहासिक दृष्टया अहमदनगर जिल्हयातील भुईकोट किल्ला प्रसिद्ध आहे. अहमदनगर जिल्हयातील मोठया प्रमाणात खेडीही समृद्ध बनली आहे. ग्रामीण लोकांच्या सहभागामुळे खेडयांची प्रगतीही मोठया प्रमाणात झाली आहे. समाजसेवक अण्णा हजारे व हिवरेबाजारचे सरपंच पोपटराव पवार यांच्या विचारातून व प्रयत्नातून आदर्श गावे तयार झाली आहेत. अहमदनगर जिल्हयातील लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन आजही शेती आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर खऱ्या अर्थाने सहकार चळवळीला सुरूवात झाली. सहकार चळवळीमुळे आज मोठया प्रमाणावर बँका, पतसंस्था, दूध संस्था उभ्या राहिल्या आहेत. आज ग्रामीण भागातील आर्थिक उलाढाली मोठया प्रमाणावर होत आहेत. सहकार चळवळीच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाने फार मोठे यश मिळविले आहे असे म्हणता येईल.

अहमदनगर जिल्हयात मोठया प्रमाणावर शहरीकरण वाढले. ग्रामीण माणूस कामाच्या माध्यमातून शहराकडे येऊ लागला. पर्यायाने तो शहरातच स्थायिक झाला. मोठमोठया बाजारपेठा अस्तित्वात आल्या. मालाची मोठया प्रमाणावर ने आण वाढली. माल गाडीतून खाली करण्यासाठी हमालांची गरज भासू लागली. बाजारसमित्या तालुक्यातून सुरू झाल्या. शेतकऱ्यांचा माल बाजार समितीत येऊ लागला. तेथेही हमाल कामगारांची गरज भासू लागली. त्यातून व्यापऱ्यांनी माल उचलण्यासाठी व गाडी भरण्यासाठी हमाल कामगारांना कामावर ठेवू लागले. हमाल कामगार रोज नियमितपणे बाजारात किंवा दुकानात हमाली करत होते. मात्र हमाल कामगारांना अतिशय कमी मजूरी मिळत होती.

त्या मजूरीत स्वत:चे पोट भरणे ही हमाल कामगारांना अवघड जात होते. खेडयातून कामगार शहरात आल्यामुळे रोज वेगवेगळया दुकानात काम करावे लागत होते. हमाल कामगारांचे मोठया प्रमाणावर आर्थिक व मानसिक शोषण होत होते. व्यापाऱ्यांच्या भितीमुळे हमाल कामगार मिळेल त्या मजूरीत काम करत होते. वेगवेगळया ठिकाणी काम करीत असल्याने हमाल कामगारांमध्ये एकीचा अभाव होता. हमाल कामगारात एकी नसल्यानेच अतिशय कमी हमाली मिळत होती. प्रत्येक विभागात वेगवेगळया युनियन होत्या. त्यामुळे कोणाचाच कोणाला मेळ नव्हता. त्याचाच गैरफायदा व्यापारी घेत होते. हमाल कामगारांना जागृत करण्याचे काम अवघड जात होते. हमाल कामगार निरक्षर असल्याने संघटनेचे महत्व पटत नव्हते.

अहमदनगर जिल्हयात खूप मोठया प्रमाणावर हमाल कामगार काम करत असूनही त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नव्हते. उपेक्षित अशा हमाल कामगारांना अन्याय सहन करावा लागत होता. अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड, भानुदास पोकळे, सूर्यभान पाटील यांनी पुढाकार घेऊन हमाल कामगारांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. हमालीत वाढ होण्यासाठी संप केला तरी व्यापारी संप यशस्वी होऊ देत नव्हते. दिवसभर हमाल कामगारांना उपासमारीला तोंड दयावे लागत होते. संपात सामिल झाल्यास व्यापारी हमाल कामगारांना कामावरून काढून टाकत होते. मार्केट कमिटीने हमालांना लायसन दिले होते. मात्र मिळेल त्या मजूरीत काम करावे लागत होते. आमदार कुटे यांनीही हमाल कामगारांच्या संप घडवून आणला. तरीही व्यापाऱ्यांनी संप यशस्वी होऊ दिला नाही. हमाल कामगारांनीही बापुसाहेब भापकर यांना ही युनियन चालविण्याची विनंती केली होती. मात्र तरीही हमाल कामगारांना न्याय मिळत नव्हता. हमाल कामगारांचे पुढारी न्याय मिळण्यासाठी अहोरात्र झटत होते. मात्र तरीही संघटना स्थापण्यात यश मिळत नव्हते. डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनातून जिल्हयातील सर्व संघटना बरखास्त करून एकच अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन करण्यात आली. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष म्हणून शंकरराव गायकवाड यांची नेमणूक करण्यात आली होती.

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन झाली तरी व्यापारी कामामध्ये अडचणी निर्माण करीत होते. त्यावर मात करण्यासाठी डॅशिंग नेतृत्व दयावे असा विचार पुढे आला. पैलवान शंकरराव घुले नामवंत पैलवान व अतिशय तरूण नगरसेवक होते. त्यांना हमाल पंचायतीचे नेतृत्व स्वीकारण्याची विनंती केली. त्या विनंतीस मान देऊन शंकरराव घुले जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष झाले. अतिशय जोमाने हमाल पंचायतीची प्रगती झाली. हमाल कामगारांतून अप्पा कोरपे, आनंदा साळवे, रंगनाथ राळेभात हे साहित्यीक उदयास आले. त्याच अनुषंगाने 'अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास कालखंड १९५० ते २०१०'' या शोध प्रबंधातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

२) विषय निवड :—

अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासात माथाडी कामगार चळवळीचे योगदान मोठे आहे. बाजारपेठा व मार्केटमध्ये काम करणाऱ्या हमाल कामगारावर खूप अन्याय, आर्थिक शोषण होत होते. हमाल कामगारावरील अन्याय दूर करण्याचे काम खऱ्या अर्थाने माथाडी कामगार चळवळीने केले. खूप कष्टाने व हालअपेष्टा सहन करून चळवळीला यश येऊ शकले. पंरतु आज या चळवळी काळाच्या पडदयाआड गेल्या आहेत. हमाल हा जगाचा भार वाहतो. मात्र समाजाला त्यांची थोडीशी दया वाटली नाही. तुटपुंज्या मजूरीवर अर्धपोटी राहावे लागत होते. व्यापाऱ्यांना त्याचे देणेघेणे नव्हते. खूप कष्टाने लढा यशस्वी होऊ शकला म्हणून आज माथाडी कामगारांना चांगले दिवस येऊ शकले. समाजापासून दुर्लक्षित असलेल्या घटकांचे आजच्या युवा पिढीला श्रमाचे महत्व कळावे व संघटना किती आवश्यक आहे हे समजावे हा त्या मागचा उद्देश आहे. माथाडी कामगार चळवळीचे कार्य समाजापुढे यावे म्हणून ''अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास कालखंड १९५० ते २०१०'' या विषयाची निवड केली आहे.

३) पूर्व संशोधनाचा आढावा

महाराष्ट्राच्या कामगार चळवळीत दुर्लक्षित राहिलेली कामगार चळवळ म्हणजे अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळ होय. माथाडी कामगारांची होणारी पिळवणूक व आर्थिक शोषण चालू होते. त्या विरूध्द माथाडी कामगारांनी आवाज उठवून संघटना स्थापन केली. आज पर्यंत औद्योगिक कामगार, असंघटित बिडी कामगार याविषयावर संशोधन झालेले असून वंचित माथाडी कामगार हा समाजातील घटक दुर्लक्षित राहिलेला आहे. म्हणून या घटकावर समाजाचे लक्ष केंद्रित करण्यासाठी या चळवळीकडे संशोधकाचे लक्ष वेधले आहे. अहमदनगर कम्युनिष्ट चळवळीवर सध्या काम चालू आहे.

४) संशोधनाची उद्दिष्टे :—

१. माथाडी कामगार चळवळीपूर्वीची परिस्थिती जाणून घेणे.
२. अहमदनगर जिल्हयातील कामगार चळवळीत माथाडी कामगारांचे योगदान अभ्यासणे.
३. अहमदनगर जिल्हयातील इतर कामगार चळवळीच्या विकासात माथाडी कामगारांचा सहभाग पाहणे.
४. अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात माथाडी कामगारांचा सहभाग जाणून घेणे.
५. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीच्या निर्मितीत माथाडी कामगार चळवळीचे योगदान अभ्यासणे.
६. कामगार चळवळीतून उदयास आलेल्या साहित्यिकांचा अभ्यास करणे.

५) संशोधनाची व्याप्ती :—

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अभ्यासासाठी अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा विचार केलेला आहे. या शोध प्रबंधात अहमदनगर जिल्हयातील भौगोलिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक जडणघडण, स्वांतत्र्यचळवळीतील योगदान, विविध कामगार चळवळी, माथाडी कामगार चळवळीचा उदय, माथाडी कामगार व व्यापारी संघर्ष, कामगारामध्ये असलेला

संघटनेचा अभाव, संप व आंदोलन करून अहमदनगर जिल्हा हमालपंचायत स्थापण, हमाल पंचायत स्थापन झाल्यावर माथाडी कामगारांच्या जीवनात झालेला बदल, माथाडी कामगार चळवळीतून उदयास आलेले साहित्यिकांचे कार्यही फार महत्वाचे आहे. माथाडी कामगारांच्या चळवळीमुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकला आहे.

६) संशोधनाची व्याप्ती :—

प्रस्तुत अभ्यासाला काही मर्यादा आहेत. या शोध प्रबंधात अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास केला आहे. माथाडी कामगार चळवळीपूर्वीची परिस्थिती, माथाडी कामगाराची आर्थिक परिस्थिती, शिक्षणाचा अभाव, हमाल कामगार व व्यापारी संघर्ष, संप, आंदोलने, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापना, हमाल पंचायतीमुळे हमाल कामगारांना झालेले फायदे इत्यादी करता अभ्यास मर्यादीत आहे. संशोधन अभ्यासाचा मुख्य उद्देश माथाडी कामगार चळवळी समाजापुढे आणणे हा असल्यामुळे माथाडी कामगार चळवळ १९५० ते २०१० पर्यंत अभ्यासण्यात आली आहे.

७) संशोधनाचे गृहितके :—

१. माथाडी कामगारांनी प्रतिकूल परिस्थितीत लढा कसा दिला?
२. माथाडी कामगार चळवळीचे कार्य समाजासाठी कसे उपयुक्त ठरले?
३. शेत मजूर, इतर कामगार चळवळी यांच्यासाठी माथाडी कामगारांनी दिलेल्या योगदानाची चिकित्सा करणे.
४. अहमदनगर जिल्हयाच्या जडणघडणीत माथाडी कामगार चळवळीमुळे कोणते बदल घडून आले?
५. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीच्या माध्यमातून केलेले कार्य हमालांसाठी कसे उपयुक्त ठरले?
६. माथाडी कामगारांच्या साहित्याने समाजजीवनावर कितपत प्रभाव पडला?

८) संशोधनाची सैध्दांतिक संकल्पना :—

अहमदनगर जिल्हयातील हमाल कामगारांची असणारी दयनिय अवस्था पाहवत नव्हती. हमालाला 'गडी' नावाने हाक मारली जात असे. समाजात कोणतीही पत नव्हती. समाज त्यांच्याकडे तिरस्कार भावनेने पाहत होता. त्यातच व्यापारीही हमाल कामगारांवर आर्थिक व मानसिक शोषण करीत होते. हमाल कामगार एकत्र आल्याशिवाय अन्याय बंद होणे शक्य नव्हते. हे हळूहळू कामगारांना समजू लागले. हमालीत वाढ होण्याासाठी संप केल्यास व्यापारी हा संप यशस्वी होऊ देत नव्हते. हमाल कामगारामध्ये अन्यायाविरूध्द जागृती करण्याचे काम अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड, भानुदास पोकळे यासारख्या अनेक साथीदारांनी केले. व्यापाऱ्यांची हमाल कामगारावर खूप दहशत होती. डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाने लढयाला योग्य दिशा मिळून एकच अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन झाली. हमाल पंचायत स्थापन झाल्याने माथाडी कामगार कायदा लागू झाला. हमाल कामगार सरकारी कर्मचाऱ्यासारखे बँकेतून पगार घेऊ लागला. हमाल कामगारामध्ये प्रामुख्याने नोकरीमध्ये स्थैर्य येऊ शकले. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले यांचे त्यात फार मोठे योगदान आहे. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीला लढाऊ नेतृत्व मिळाल्याने हमालांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली. उपेक्षित अशी हमाल कामगारांची चळवळ समाजासमोर येणे आवश्यक होते. अतिशय कष्टप्रद अनुभवातून हमाल कामगारांना न्याय मिळू शकला. हमाल कामगार चळवळीचे संशोधन व्हावे त्या अनुषंगाने संशोधन केले आहे.

'जगातील कामगारांनो एक व्हा' अशी हाक कार्ल मार्क्सने दिली होती. त्या हाकेला निश्चितच अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगारांनी 'ओ' दिली आहे. संघटित झाल्याशिवाय न्याय मिळणार नाही हे त्यांनी ओळखले होते. हमाल कामगारांच्या एकतेचे दर्शन झाल्यामुळेच संघटना स्थापन होऊ शकली. आज हमाल कामगारांना मिळणाऱ्या सोयीसुविधा त्या संघर्षाचेच फळ आहे असे म्हणावे लागेल.

९) संशोधन पध्दती :—

इतिहास हे सामाजिक शास्त्र असल्याने प्रचलित सर्व संशोधन पध्दती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. ''अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगारांच्या चिकित्सक अभ्यास कालखंड १९५० ते २०१०'' या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक' पध्दतीचा वापर करून प्रबंध कार्य करण्यात आलेले आहे.

१०) संदर्भ साधने :— ''अहमदनगर जिल्हा माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास कालखंड — १९५० ते २०१०'' या विषयावर संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनात माथाडी कामगार चळवळीतून तयार झालेले साहित्यिक अप्पा कोरपे, रंगनाथ राळेभात, आनंदा साळवे यांची पुस्तके, माथाडी कामगार चळवळीसंबंधीची वर्तमान पत्रे, बातम्या यासारख्या प्राथमिक साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. दुय्यम साधनामध्ये संदर्भ ग्रंथ, चरित्रे, मासिके, स्मरणिका, अहवाल इत्यादी साधनांचा उपयोग संशोधनासाठी केलेला आहे.

११) प्रकरण नियोजन :— 'अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा चिकित्सक अभ्यास कालखंड १९५० ते २०१०' या विषयाचे संशोधन करीत असताना प्रबंधाची प्रकरण मांडणी पुढिलप्रमाणे केली आहे.

प्रकरणे १ ले :— संशोधन पध्दती :— या प्रकरणात संशोधन करीत असताना कोणत्या पध्दतीचा अवलंब केला आहे. तसेच संशोधनाची पार्श्वभूमी काय आहे. यासारखे मुद्दे मांडलेले आहेत. प्रस्तावना, विषय निवड, उद्दिष्टे, व्याप्ती, मर्यादा, गृहितके, सैध्दांतिक संकल्पना, संशोधन पध्दती, प्रकरण नियोजन या घटकांचे विश्लेषण केले आहे.

प्रकरण २ रे :— प्रस्तावना — महाराष्ट्रात सर्वात मोठा जिल्हा म्हणून अहमदनगरला ओळखले जाते. अहमदनगर जिल्हयात पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. अहमदनगर जिल्हयात मुळा व भंडारदरा ही मोठी धरणे जिल्हयाला

वरदान ठरली आहे. या दोन धरणांमुळे शेतीसाठी, एम.आय.डी.सी.साठी पाणी पुरविले जाते. मात्र उर्वरित दुष्काळी तालुक्यात मोठे पाण्याचे स्त्रोत नसल्याने शेती मोठया प्रमाणावर पिकू शकत नाही. पावसाच्या पाण्यावरच तेथे शेती पिकली जाते. त्यामुळे उन्हाळयात या तालुक्यात पिण्याचा प्रश्न नेहमी निर्माण होतो. त्यासाठी कायम स्वरूपी, उपाययोजना करणे आवश्यक आहे. अहमदनगर जिल्हा स्वातंत्र्यपूर्वकाळापासून कम्युनिष्टांचा बालेकिल्ला होता. महाराष्ट्राच्या स्थापणेनंतर त्यात हळूहळू बदल होत गेला. ८ ऑगस्ट १९४२ ला 'चलेजाव' चळवळ सुरू झाली होती. गांधीजींनी 'करा अथवा मरा' या संदेशाचा क्रांतिकारकांनी वेगवेगळा अर्थ लावून भूमिगत झाले होते. अहमदनगर जिल्हयातही अकोले, संगमनेर तालुक्यात मोठया प्रमाणावर तरूणांनी या आंदोलनात उडी घेतली होती. अहमदनगर जिल्हयात शिर्डी, शनिशिंगणापूर, अवतार मेहेरबाबा, आनंदऋषीजी महाराज, संत निळोबाराय, विशाल गणपती यासारखी अनेक प्रसिध्द तीर्थस्थळे आहेत. शैक्षणिक क्षेत्रातही अहमदनगर जिल्हा अग्रेसर आहे. अहमदनगर जिल्हयात विडी कामगार चळवळ, कोतवाल चळवळ, लोकलबोर्ड, युनियन, शेतमजूर चळवळ इत्यादी कामगार चळवळी मोठया प्रमाणावर झाल्या. अहमदनगर जिल्हयात तालुक्या—तालुक्यात बाजार समित्या, बाजारपेठा वाढल्या. तेथे येणाऱ्या मालाची चढउतार करण्यासाठी हमाल कामगारांची गरज भासू लागली. खेडयातून आलेला कामगार हमाली करू लागला. परंतु त्याला अतिशय कमी हमाली मिळत होती. त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची होती. त्यामुळे हमाल कामगारात एकजुटता नव्हती. त्यामुळे मजूरीत वाढ होत नव्हती.

प्रकरण ३ रे :— माथाडी कामगारांच्या हक्कासाठी चळवळ :— माथाडी कामगारांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने दुसरे काम मिळणे अशक्य होते. गावात काम रोज मिळत नसल्यानेच शहराकडे हे कामगार आलेले पहावयास मिळतो. कामावरून श्रेष्ठ कनिष्ठपणा ठरतो. आपल्याकडे परंपरागत जातीव्यवस्था व्यवसायभिमुख बनली आले. शिक्षण नसल्याने चोरी करण्यापेक्षा हमाली केलेली बरी हा विचार ठेवून हमाल कामगार कष्ट करीत होता. त्यामुळे

हमाल व व्यापारी संघर्ष वाढत चालला होता. व्यापारी हमाल कामगारांचे शारीरिक व मानसिक शोषण करीत होते. हमाल कामगार वेगवेगळया ठिकाणी काम करीत असल्याने त्यांच्यात संघटन अजिबात नव्हते. त्याचाच गैरफायदा व्यापारी घेत होते. हमाली वाढविण्यासाठी संप केला तरी संप यशस्वी होऊ देत नव्हते.

प्रकरण ४ थे :— हमाल पंचायत आणि माथाडी कामगार चळवळ :—

हमाल कामगारांची होणारी आर्थिक पिळवणूक हीच कामगार चळवळीस कारणीभूत ठरली. त्याविरूध्द आवाज उठविण्यास कामावरून काढून टाकले जात होते. त्यामुळे कामातही अस्थैर्य निर्माण झाले होते. हमाल कामगार एकत्र येऊ लागले होते. मात्र व्यापारी त्यांना चूकीचे मार्गदर्शन करीत होते. हमाल एकत्र आल्यास हमाली वाढवून दयावी लागेल ही भीती व्यापाऱ्यांना होती. पोटासाठी दोन वेळेची भाकरी मिळवण्यासाठी खूप धडपड करावी लागत होती. हमाल कामगार संघटनेचे महत्व पटवू लागले होते. चोविस तासाच्या गुलामीला हमाल कामगार कंटाळला होता. माथाडी कामगार चळवळ यशस्वी होण्यासाठी संघटन कौशल्य असणे महत्वाचे होते. त्यासाठी प्रभावी नेतृत्व मिळाल्यानेच हमाल पंचायत स्थापण होऊ शकली. हमाल कामगारांचे आरोग्य सुधारले. त्याचबरोबर आर्थिक परिस्थिती सुधारली.

प्रकरण ५ वे :— माथाडी कामगारांना मिळालेले संरक्षण व सुविधा :—

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापण झाल्यामुळे हमाल कामगारांच्या कामात स्थैर्य आले. त्याचबरोबर सुरक्षितता ही आली होती. डॉ. बाबा आढावांनी हमाल कामगारांचे जीवन जवळून पाहिले होते. हमाल कामगारांच्या अन्यायावर त्यांनी बोट ठेवले होते. राज्यस्तरावर हमाल कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य माथाडी महामंडळ स्थापना केली. वर्षानुवर्षे हमाल कामगार काम करत असूनही माथाडी कायदयाचे संरक्षण मिळत नव्हते. त्यामुळेच आंदोलन मोर्चे काढून माथाडी कामगार कायदा लागू झाला. माथाडी कायदयामुळे कामाचे तास, विश्रांती, पगारी सुट्टी,

प्रॉव्हिडंड फंड, वैद्याकिय खर्च इत्यादी कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू लागला. मिळणाऱ्या हमालीवर व्यापाऱ्यांकडून ३२ टक्के लेव्ही मिळू लागली.

प्रकरण ६ वे माथाडी कामगारांतून उदयास आलेले साहित्यीक :—

आयुष्यभर हमाली काम करून अन्यायाविरूध्द लढत राहिले. कधी उपाशी राहून तर कधी अर्धपोटी राहून जीवन जगले. मात्र अप्पा कोरपे परिश्रमाने, धडपडीने, प्रामाणिकपणे दुसऱ्यांना जागविण्याच्या दृष्टीने सेवा करीत राहिले. आपल्यावर झालेल्या अन्यायाला ते कोणालाही दोष देत नाहीत. आयुष्यभर भारवाही हमाल म्हणून जीवन जगले. मात्र त्यांच्या आयुष्यातील जीवनानुभव समाजासमोर आणण्याचे काम डॉ. गंगाधार मोरजे सरांनी केले. त्यांचे अनुभव सांगिवाचे लिखित टेप करून, मी तो हमाल हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यानंतर भारवाही, भाकर, जाई, अरे माणसा माणसा अशी एकूणच पाच पुस्तके प्रकाशित झाली. त्यानंतर दुसरे साहित्यीक उदयास आले ते म्हणजे रंगनाथ राळेभात होय. आयुष्यभर ओझे उचलून तर कधी भाऊबंदाशी संघर्ष करण्यात जीवन गेले. जामखेड तालुक्यात हमाली काम करीत होते. मात्र काम करीत असताना वाचनाची आवड जपली होती. त्याशिवाय समाज ही त्यांनी जवळून पाहिला होता. शेवटी हमाल कामातून मुक्त झाल्यावर 'पहाटची चांदणी' ही कथा संग्रह लिहिला आहे. हमाली काम करून तिसरे साहित्यिक उदयास आले ते म्हणजे आनंदा साळवे होय. श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव येथील आहेत. घरात अठरा विश्व दारिद्रय असल्यामुळे फारसे शिकता आले नाही. भीक मागून जगून जगण्यापेक्षा हमाली व्यवसाय स्वीकारून त्यावर मात केले. वाचनाची व समाज निरीक्षणाची आवड होती. त्यातून समाजातील जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यावर त्यांनी आपल्या कवितातून कोरडे ओढले आहेत. 'वेशीबाहेरचं जगणं' व 'टिचभर पोटासाठी' हे दोन कविता संग्रह प्रसिध्द झाले आहे.

प्रकरण ७ वे :— **निष्कर्ष** — या प्रकरणात माथाडी कामगार चळवळ खूप कष्टाने उभी राहिली आहे. उपेक्षित माथाडी कामगार अहमदनगर जिल्हयात तीन

दशके लढून संघटना करू शकेल. त्या माथाडी कामगार चळवळीस नवसंजीवनी देण्याचे काम डॉ. बाबा आढाव यांनी केले. दुर्लक्षित अशा माथाडी कामगारांना न्याय देण्याचे फार महत्वाचे काम जिल्हा हमाल पंचायतीने केले. दोन वेळेची भाकरी पोटाला मिळणे ही हमाल कामगारांना अवघड होते. स्वत:चे पोट भरणे शक्य नव्हते तर कुटुंब चालविणे दिव्यस्वप्न होते. एवढया प्रतिकूल परिस्थितीतून माथाडी कामगार उभा राहिल्याचे समाधान कामगारांचा संघर्षमय प्रवास वाचकांना व अभ्यासकांना निश्चितच प्रेरणात्मक आहे असे वाटते. एकंदरित माथाडी कामगार चळवळीतून हमाल कामगार समर्थपणे उभा राहू शकला. संघटना स्थापन झाल्याने हमालीत वाढ झाली, कामाचे ठराविक तास, साप्ताहिक सुट्टी मिळू लागली, हमाल कामगारास रोज घरी जाता येऊ लागले. स्वत:च्या कुटुंबाकडे लक्ष देतो येऊ लागले. रोज घरी हमाल जाऊ लागल्याने स्वच्छ कपडे घालू लागला. पर्यायाने आरोग्य सुधारण्यास मदत झाली. मुलांना चांगले शिक्षण देता येऊ लागले. त्यामुळेच आज हमाल कामगारांची मुले शिक्षक, पोलिस, क्लार्क, इंजिनिअर, डॉक्टर होऊ शकले.

प्रकरण दुसरे

प्रस्तावना

२.१ अहमदनगर जिल्हयाची पार्श्वभूमी

२.२ अहमदनगर जिल्हयातील भौगोलिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक जडणघडण

२.३ स्वांतत्र्यचळवळीत अहमदनगर जिल्हयाचे योगदान

२.४ अहमदनगर जिल्हयातील विविध कामगार चळवळी

२.५ अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा उदय

२.६ माथाडी कामगारांची आर्थिक परिस्थिती

प्रकरण दुसरे

प्रस्तावना

२.१ अहमदनगर जिल्हयाची पार्श्वभूमी :— अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ५.६६ टक्के भाग अहमदनगर जिल्हयाने व्यापलेला आहे. अहमदनगर जिल्हा दख्खन पठारावर आहे. अहमदनगर जिल्हा दक्षिणेस पुणे, सोलापूर, पश्चिमेस ठाणे, उत्तरेस नाशिक तर पूर्वेस औरंगाबाद, बीड यांनी वेढलेला आहे. ''कळसूबाई'' हे सहयाद्री पर्वतरांगातील सर्वात उंच शिखर अकोला, संगमनेर तालुक्यात पसरलेले असून प्रवरा, मुळा, गोदावरी, भीमा या महत्त्वाच्या नदया आहेत. अहमदनगर जिल्हयात चौदा तालुके आहेत. महाराष्ट्रातील सहकार चळवळीत अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्हयात साखर चळवळीची सुरूवात झाली. महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील महत्त्वाचे साखर केंद्र म्हणून अहमदनगर जिल्हयाला ओळखले जाते.

अहमदनगर शहर अहमद निजामशहा याने इ.स. १४९० मध्ये स्थापन केले. ''तेव्हापासून थेट मराठी राज्याचे संस्थापक शककर्ते छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जन्मसालापर्यंत म्हणजे १६३० पर्यंत अहमदनगर शहरानेच दक्षिणेतील राजकारणाची सूत्रे सांभाळली होती.''[१] या शहराने तेव्हापासून निजामशाही, मुघल, पेशवे आणि ब्रिटीशांचा काळ पाहिला. मराठयांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी म्हणून प्रथम अहमदनगरच्या निजामशाहीचा इतिहासाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अहमदनगरच्या इतिहासाचे हिंदू मुसलमानांचे ऐक्य हे बंधुभावयुक्त ऐक्य हे या शहराचे आणखी एक वैशिष्टये आहे. अहमदनगर शहरास ऐतिहासिक महत्त्व आहे. अहमदनगरचे भूषण चाँदबिबी, प्रजाहितदक्ष, वजीर मलीकंबर, इतिहासकार फेरिस्ता, मुलुख मैदान तोफेचा जनक रूमीखान अशा नामवंत ऐतिहासिक रत्नांची खाण आहे.

स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी राजे भोसले, वडिल शहाजी राजे, मातुल वंशकालीन जाधवराव, पेशवाईतील साडेतीन

शहाण्यांपैकी विठ्ठल सुंदर त्रिंबकजी डेंगळे वगैरे मराठी इतिहासामधील नवरत्ने ही अहमदनगर भागामध्ये तयार झाले. अहमदनगर प्रांत हा अनेक संताची कर्मभूमी असल्याने संतानी केलेल्या समाजसेवेचे संस्काराकडून तो पुण्यभूमी बनला आहे. महाराष्ट्रीय संतानी केवळ धर्मप्रसाराचे काम केले नसून विस्कळीत झालेल्या समाजात संघटना निर्माण केल्या. प्रभावी मातृभाषेच्याद्वारे त्यांनी हे संस्कार व संघटना घडविली ती भाषा म्हणजेच नागरी मराठी होय. मराठी भाषा हे संस्कृत भाषेचे अपत्य आहे. परंतु नगरी मराठी महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. नागरी मराठी बोली प्रचारात आणण्याचे श्रेय महाराष्ट्रातील आणि त्यातल्या त्यात अहमदनगर जिल्हयातील नाथपंथीय संत वर्गास दयावे लागेल. पुणतांब्याचे चांगदेव, मुंगीचे विसोबा खेचर, राशीन येथील केशरीनाथ, मांडवगणचे जयरामस्वामी, देवदैठणच निंबराज महाराज, श्रीगोंदा येथील शेख महमंद, रामदास परंपरेतील दिनकर स्वामी, पिंपळनेरचे निळोबा राय, सुप्रसिध्द संत चरित्रकार महिपतीबुवा ताहराबादकर, जयराम नाना देशमुख, बाळाजीबुवा शिर्डीचे साईबाबा, उपासनी महाराज, मेहेरबाबा, आधुनिक संतकवी दासगणू अशी अनेक प्रकारची संत परंपरा अहमदनगर जिल्हयास लाभली आहे.

आधुनिक भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आझाद, शंकरदेव इ. पुढाऱ्यांना इ. स. १९४२ च्या चळवळीनंतर अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यात राजकीय स्थानबध्द म्हणून राहावे लागले. ''पंडित नेहरू यांनी जगविख्यात 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ किल्ल्यातच लिहिला.''[२] ही गोष्ट अहमदनगरच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी आहे. त्यानंतर भारत स्वतंत्र झाल्यावर ही म्हणजे इ.स. १९५३ साली नेहरू यांनी दुष्काळग्रस्त अहमदनगर शहरास भेट दिली होती. या ठिकाणी असलेल्या अनेक ऐतिहासिक वास्तू म्हणजे पर्यटकांना पर्वणीच आहे. रेल्वे स्टेशनला जोडणारा लोखंडी पूल १०० वर्षापेक्षा जूना आहे. त्या काळातील अनेक मंदिरे, मशिदी तसेच चर्च इतिहासाची साक्ष देतात. अहमदनगर शहराचे ग्रामदैवत माळीवाडयातील विशाल गणपतीच्या आशिर्वादाने अनेकांच्या मनोकामना पूर्ण करतो. अशी सर्वांची

भावना झाली आहे. ऐतिहासिक वारसा असलेले अहमदनगर येथील भारतीय स्थलसेनेचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. व्ही.आर.डी.ई., एम.आय.आर.सी., एसीसी या नामवंत संस्था नगर शहरामध्ये आहेत.

अहमदनगर जिल्हयातील मानवी जीवन आजही परंपरागत पध्दतीवर अवलंबून असल्याचे जाणवते. अनेक तालुक्यांचे आजही शेती हेच महत्त्वाचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. अहमदनगर जिल्हयातील उत्तरेचा भाग अनेक सिंचन प्रकल्पांनी समृध्द बनला आहे. तर दक्षिणेकडील बराचसा भाग पावसावर अवलंबून आहे. खेडोपाडी फेरफटका मारला तर दक्षिणेकडे पाण्यासाठी भांडे घेऊन, फिरणाऱ्या स्त्रिया, बैलगाडीतील वाहतुक, शेत नांगरणारे शेतकरी असे चित्र दिसते. उत्तरेकडील बाजूस गहू, ऊस, फळे इ. पिके मोठया प्रमाणावर घेत असल्याचे दिसते. अहमदनगर जिल्हयात पश्चिमेस डोंगराळ भागात वने असून तेथे वेगवेगळया प्रकारचे झाडे आढळतात. जिल्हयातील कर्जत तालुक्यात रेहेकुरी येथे काळविटांसाठी अभयारण्य आहे. तसेच कर्जत, नेवासा, श्रीगोंदा तालुक्यात माळढोक पक्षी आढळतात. अहमदनगर जिल्हयामध्ये काही तालुक्यात विहीरीद्वारे जलसिंचन शेतीसाठी होते तर दुसऱ्या काही तालुक्यात पाटाचे पाणी शेतीसाठी मिळते. अकोले तालुक्यात प्रवरा नदीवर भंडारदरा हे मोठे धरण बांधलेले आहे. या धरणामुळे राहाता, श्रीरामपूर, राहूरी, संगमनेर तालुक्यांना शेतीसाठी फार उपयोग झाला. ''राहूरी तालुक्यात मुळेवरचे बारागाव नांदूर येथील धरणाने राहूरी, नेवासे, शेवगाव या तालुक्यांना फायदा झाला आहे.''[३] पाथर्डी येथे घाटशील धरण तसेच पारनेर तालुक्यातील मांडओहळ या धरणांनी कमी अधिक प्रमाणात शेतीसाठी उपयोग झाला आहे. पारनेर तालुका दुष्काळी भाग म्हणून गणला जातो. या तालुक्याच्या बरोबरीने झालेले जलसिंचन प्रकल्प इतर तालुक्याच्या बरोबरीने झालेले नसल्याने शेती म्हणावी तशी मोठया प्रमाणावर पिकत नाही. पर्यायाने लोकांचे जीवनमान व राहणीमानात फरक जाणवतो. पर्यायाने विकास कमी झाल्याचे जाणवते.

अहमदनगर हे शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने अनेक लहान मोठे उद्योग अलिकडच्या काळात आले आहेत. ''आशिया खंडातील पहिला साखर

कारखाना प्रवरानगर येथे सुरू झाला.''[४] सहकार चळवळीची जोमदार सुरूवात अहमदनगर जिल्हयापासून झाली. आज अहमदनगर जिल्हयात सर्वात जास्त साखर कारखाने असून हे सहकारी चळवळीचे यश म्हणता येईल. आता मात्र मोठया उद्योगधंद्यासाठी ओळखले जाऊ लागले. अहमदनगर जिल्हा हे साखरेचे कोठार म्हणून ओळखू लागले आहे. त्याचे श्रेय साहजिकच नगर जिल्हयातील सहकारी चळवळीला दयावे लागेल. त्याचबरोबर अहमदनगर जिल्हयातील बाजापेठा प्रसिध्द आहेत. त्या बाजारपेठामध्ये दुसऱ्या जिल्हयातील व्यापारी मोठया प्रमाणावर खरेदीविक्री करताना दिसत आहे. अहमदनगर शहर चारही बाजूंनी वाढत असल्याने व्यापाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. अहमदनगर जिल्हयात दळणवळण सुविधा वाढल्याने झपाटयाने प्रगती होताना जाणवते.

२.२ अहमदनगर जिल्हयातील भौगोलिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक जडणघडण :—

महाराष्ट्रातील अग्रेसर असलेला जिल्हा म्हणून अहमदनगरला ओळखले जाते. हा जिल्हा विविधतेने नटलेला आहे. एकीकडे समृद्ध भाग तर दुसरीकडे दुष्काळ अशा दुहेरी दुष्टचक्रात जिल्हा सापडलेला आहे. म्हणूनच अहमदनगर जिल्हयाचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे.

अ) भौगोलिक जडणघडण :—अहमदनगर जिल्हयाची विभागणी केली तर आपल्याला तीन भागामध्ये करता येईल. १) पश्चिमेला डोंगराळ प्रदेश, अकोले, संगमनेर व पश्चिम भाग येतो. या भागात अनेक उंच शिखरे आहेत. २) मध्य भागामध्ये पारनेर, नगर, संगमनेर, श्रीगोंदे, कर्जत या तालुक्यांचा समावेश होता. ३) उत्तर व दक्षिणेचा विचार केल्यास कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहूरी, नेवासे, शेवगाव व पाथर्डी या तालुक्यांचा समावेश होतो. अहमदनगर जिल्हयामध्ये श्रीरामपूर, पाथर्डी, पारनेर, कर्जत, नगर, कोपरगाव, राहाता, संगमनेर या तालुक्यांमध्ये विहीरी जास्त आहेत. अहमदनगर जिल्हयाच्या पश्चिमेस डोंगराळ भागात वने असून साग, बाभूळ, धावडा, कडुनिंब इ. मोठया

प्रमाणात झाडे आहेत. या वनामध्ये ससे, हरणे, वाघ, लांडगे, बिबटया असे वेगवेगळया प्रकारचे प्राणी आहेत.

पारनेर तालुका समुद्रसपाटीपासून सुमारे ६०० ते ९०० मीटर उंच आहे. या परिसरात डोंगररांगा मोठया प्रमाणात पाहावयास मिळतात. या तालुक्यात नेहमीच पाण्याची टंचाई या भागात जाणवते. त्याचबरोबर अकोला तालुका चारही बाजूंनी पर्वतरांगानी वेढलेला असल्याने नैसर्गिक सौदर्यांसाठी प्रसिध्द आहे. हा तालुका पर्यटनाच्यादृष्टीने महत्वाचा तालुका ठरतो. ''सहयाद्री पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर कळसुबाई याच अहमदनगर जिल्हयात मोडते.''[५] महाराष्ट्रातील सर्वात जास्त पावसाचे ठिकाण घाटघर अकोले तालुक्यात आहे. अहमदनगर जिल्हयातील गोदावरी, प्रवरा, मुळा, सीना या नदयांमुळे शेती मोठया प्रमाणावर केली जाते. गोदावरी ही महाराष्ट्रातील एक महत्वाची नदी असून अहमदनगर जिल्हयातील कोपरगाव, पुणतांबा या परिसरातून वाहते. अहमदनगर जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे आहे. पश्चिमेकडील सहयाद्री पर्वतीय प्रदेशात हवामान थंड असते. अहमदनगर जिल्हयाच्या पश्चिमेकडील पर्वतीय भागात पश्चिमेकडून येणारे वारे अडवले जाते. समुद्रावरून आलेल्या वाऱ्यांमुळे या भागात मोठया प्रमाणात पाऊस पडतो.

ब) सामाजिक जीवन :– अहमदनगर जिल्हयातील लोक वेगवेगळे व्यवसाय करतात. यात प्रामुख्याने शेती, पशुपालन, मासेमारी, खाणकाम, उद्योग, व्यापार, वाहतुक आणि मनोरंजन इ. चा समावेश होतो. अहमदनगर जिल्हयातील मराठा, मुस्लिम, कुणबी, सुतार, वंजारी, महार, मांग, कोळी, भिल्ल, ठाकर इ. जातीचे लोक मोठया प्रमाणावर राहतात. आदिवासींच्या वस्तीला पाडा म्हणतात. आदिवासी समाजातील स्त्रिया व पुरूष त्यांच्या बोली भाषेत गाणी नृत्ये करतात. भिल्ल, कोरकू, गोंड कातकरी, ठाकर, महादेव कोळी अशा विविध जमाती आढळतात.

पाथर्डी, शेवगाव या तालुक्यात वंजारी समाज मोठया प्रमाणावर आढळतो. हे लोक ऊस तोडणीचे काम मोठया प्रमाणावर करताना आढळतात.

त्याचबरोबर हमाल, गवंडीकाम यामध्येही मोठया प्रमाणात आढळतात. तलाव, नदया, धरणे या भागात मासेमारी व्यवसाय हा शेतीला जोड व्यवसाय म्हणून करतात. व्यापारी तत्वावरील दुग्धव्यवसायासाठी जिल्हा प्रसिध्द आहे. अहमदनगर जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन झाल्यामुळे शेतमालाची खरेदी—विक्री मोठया प्रमाणावर केली जाते. फुलांचा बाजार ही अहमदनगर जिल्हयात प्रसिध्द आहे. अहमदनगर शहराच्या फुलांच्या बाजारात व्यापारी वेगवेगळया राज्यातील येतात. त्यामुळे खूप मोठया प्रमाणावर उलाढाल होते. त्याचबरोबर घोडेगाव, लोणी, वाळकी, भाळवणी अशा विविध ठिकाणी जनावरांचेही बाजार भरतात.

क) राजकीय जडणघडण :—अहमदनगर जिल्हयात १४ तालुके आहेत. या जिल्हयात १२ विधान सभा मतदार संघ आहेत. तर दोन लोकसभा मतदार संघात येतात. अहमदनगर जिल्हा हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून कम्युनिष्टांचा बालेकिल्ला होता. महाराष्ट्राच्या स्थापणेनंतर राजकारणाने घेतलेल्या. प्रत्येक वळणाचे साक्षीदार कॉ. गोविंद पानसरे आहेत. महाराष्ट्राच्या सर्व पक्षीय नेतृत्वात, मातब्बर राजकारण्यांमध्ये आणि अगदी नव्या प्रस्थपित व्यवस्थेविरूध्द लढणाऱ्या तरूण नेतृत्वात हे गुण पाहावायास मिळतात. त्यामध्ये पारनेरचे कॉ. भास्करराव औटी, कॉ. बाबासाहेब ठुबे, तसेच कॉ. चंद्रभान आठरे पाटील, लक्ष्मणराव पालवे, कॉ. विनायकराव ताकटे, कॉ. राम रत्नाकर, कॉ.पी.बी. कडू पाटील असे अनेक डाव्या चळवळीने भारावून गेलेले होते. त्यातल्या अनेकांनी केलेल्या त्यागाची आजच्या सर्वार्थाने भ्रष्ट असलेल्या राजकारणात समाजकारणात आपण कल्पनाही करू शकत नाही.

८ ऑगस्ट १९४२ साली महात्मा गांधींजींनी 'चले जाव' चळवळ सुरू केली होती. त्यावेळी देशातील अनेक पुढाऱ्यांना अटक झाली होती. गांधीजीच्या 'करा अथवा मरा' या संदेशाचा क्रांतिकारकांनी वेगवेगळा अर्थ लावून भूमिगत झाले. त्यामध्ये अहमदनगर जिल्हयातील अकोले, संगमनेर, तालुक्यातील दुर्वे नाना, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, पी.बी. कडू पाटील, धर्मा पोखरकर, राम नागरे, धर्मा भांगरे अशा असंख्य तरूणांनी अर्धवट

शिक्षण सोडून या आंदोलनात उडी घेतली. ''इ.स. १९४१ साली कॉ. राम नागरेंनी त्यांच्या राजापूर तालुका संगमनेर गावात आणि इ.स. १९४४ साली कॉ. बुवासाहेब नवले यांनी अकोल्यात पार्टी युनिट सुरू केले.''[६] कॉ. चंद्रभान आठरे पाटील संघटक म्हणून जिल्हयाचे काम पाहत असताना ठिकठिकाणच्या विडी कारखान्यांना भेटी देऊन कामगारांना संघटित करण्यास प्रवृत्त करीत.

इ.स.१९५७ साली संयुक्त महाराष्ट्र आंदोलनांच्या वेळी ज्या निवडणूका होणार होत्या त्यावेळी विधानसभेची उमेदवारी मिळविण्यासाठी अनेक कम्युनिष्ट कार्यकर्त्यांचा आग्रह होता. संगमनेर तालुक्यातून १९५२, १९५७ या दोन्हीही पंचवार्षिक निवडणूकीत कॉ. दत्ता देशमुखांनी बाजी मारली होती. धर्म ही अफूची गोळी आहे. या विचारावरही ठाम होते. गोरगरिबांच्या समस्यांची जाणीव आणि आकलन तसेच सर्व सामान्यांच्या जीवनाची माहिती या कार्यामुळे कार्यकर्त्यांना झाली होती. इ.स. १९५७ साली जिल्हयातील एकूण १२ आमदारांपैकी ११ आमदार कम्युनिष्ट, लालनिशाण व रिपब्लिकन पक्षाचे होते. डाव्या समविचारी पक्षाच्या विचाराने जिल्हा ढवळून निघाला होता. कम्युनिस्ट चळवळीचे मूल्यमापन करताना अण्णासाहेब शिंदे यांनी म्हटले. ''भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राजकीय चुका झाल्या नसत्या तर राष्ट्रीय चळवळीपासून भारतातील साम्यवादी चळवळ अलग पडल नसती.''[७] अण्णासाहेब शिंदे आणि चंद्रभान आठरे पाटील यांनी अहमदनगर जिल्हयात प्रागतिक धोरणांना येथील कम्युनिष्टांनी पाठिंबा देण्यास सुरूवात केली. त्यातून पक्षाचे सारे कार्यकर्ते हिसंक मार्गाचा त्याग करून जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देत होते. त्यामुळे देशात पुरोगामी विचाराचे वातावरण तयार झाले होते.

इ.स. १९६२ च्या निवडणुकीपासून अहमदनगर जिल्हयात कम्युनिष्टांचे वर्चस्व कमीकमी होऊन कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व वाढलेले आपणास पाहावयास मिळते. १९६२ च्या निवडणूकीपासून विचार केला तर कॉंग्रेसला मानणारे कार्यकर्ते तालुक्यात निर्माण झाले. त्याला कारणे ही अनेक आहेत. सर्व समाजाला बरोबर घेऊन कार्यकर्त्यांनी सहकाराच्या माध्यमातून आपापल्या तालुक्यात वर्चस्व निर्माण केल्याचे दिसते. सहकारी चळवळ अहमदनगर

जिल्हयात पूर्णपणे फोफावल्यामुळे राजकीय व्यासपीठ निर्माण करण्यास वेळ लागला नाही. म्हणून तर आजही साखरसम्राट म्हणून काँग्रेसची नेतेमंडळी सहकाराच्या माध्यमातून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नगर जिल्हयात वर्चस्व टिकवून ठेवले आहे. त्यासाठी पारनेरमधून शंकरराव काळे असो किंवा राहूरीतून प्रसाद तनपूरे असो किंवा कोपरगांवमधून शंकरराव कोल्हे, संगमनेरमधून भाऊसाहेब थोरात, अकोल्यातून मधुकरराव पिचड, पाथर्डीतून अप्पासाहेब राजळे, सोनई नेवासा येथून यशवंतराव गडाख पाटील असो, लोणी प्रवरा परिसरातून सहकाराच्या पाया रोवलेले विठ्ठलराव विखे पाटील, बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुढाकारामुळे व सहकारी चळवळीमुळे आजही सत्ता एकहाती टिकवून आहे हे नमुद करावेसे वाटते. अगदी अलिकडच्या काळात शिवसेना, भाजपासारखे पक्ष अहमदनगर जिल्हयात वाढू लागले आहेत. परंतु त्यांचा प्रभाव काँग्रेसच्या पुढे टिकाव धरू शकत नाही. सर्व सत्तास्थाने ताब्यात असल्याने जनतेसमोर प्रभावी ठरत असल्यानेच सत्ता आजही एक हाती टिकवून ठेवली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यापासून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या निवडणूकीत राष्ट्रवादीने जिल्हयामध्ये विधानसभेच्या सर्वाधिक जागा जिंकून काँग्रेसला अडचणीत आणले आहे. सध्या जिल्हयात राष्ट्रवादी काँग्रेस सर्वात ताकदवान पक्ष म्हणून गणला जात आहे. त्या खालोखाल भाजप – शिवसेना व काँग्रेस आहे. अशा प्रकारे अहमदनगर जिल्हा हा राजकीयदृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

ड) धार्मिक जडणघडण :–

शिर्डी :– अहमदनगर जिल्हा धार्मिक ठिकाणांसाठी महाराष्ट्रात नव्हे तर देशात प्रसिध्द आहे. शिर्डीचे साईबाबा भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे लोकप्रिय धार्मिक स्थळ आहे. साईबाबांनी आपल्या कार्यानंतर इ. १९१८ साली शिर्डी येथे समाधी घेतली. शिर्डी हे नगर शहरापासून सुमारे ८२ कि.मी. अंतरावर उत्तर–पश्चिमेस आहे. संपूर्ण विश्वाला श्रध्दा सबुरीचा मंत्र दिला. म्हाळसापती व काशिनाथ शिंपी हे साईबाबांचे प्रथम भक्त. त्यांनी बाबांना पडक्या मशिदीत राहण्यासाठी

जागा दिली. त्या मशिदीलाच बाबा द्वारकामाई म्हणत. साईबाबांनी सर्वजाती धर्माच्या लोकांना एकच शिकवण दिली. 'सबका मालिक एक' शिर्डीमध्ये खंडोबा मंदीर, साईबाबांची समाधी म्हसोबा मंदीर, अशी अनेक ठिकाणे पाहावयास मिळतात.

शनिशिंगणापूर —

शनिमंदीरामुळे पवित्र झालेले शनिशिंगणापूर हे ठिकाण नगरच्या ईशान्य दिशेला आहे. नगर—औरंगाबाद रस्त्यावर नगर शहरापासून ३५ कि.मी. अंतरावर घोडेगावनजीक आहे. यागावाचे वैशिष्टये म्हणजे येथे घराला दरवाजे नाही. शनिमंदीरदेखील कोणत्याही छत्राविना उघडयावरच आहे. दर शनिवारी, शनि अमावस्येला शिंगणापूर येथे खूप भाविक येत असतात. आज हे ठिकाण आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्द आहे. १८ जुलै १९६३ साली शनेश्वर देवस्थान ट्रस्टची स्थापना करण्यात आली. दोनशेहून अधिक वर्षापूर्वी सोनई गावाजवळील पानस नाल्याला पूर आला होता. त्यात ही मोठी दगडाची शिळा वाहून आली होती. पुराचे पाणी कमी झाल्यानंतर गुराखी मुलांना ती शिळा काटेरी झुडपात दिसली. त्यांनी त्या शिळेला काठीने टोचताच त्यातून रक्त वाहू लागले. या प्रकारने गुराखी मुले घाबरून गावात धावत गेली व तेथे गावकऱ्यांना झालेला सर्व प्रकार सांगितला. ''त्यानंतर गावकऱ्यांनाच तो साधा दगड नसून शनिदेव आहे. असा दृष्टांतं झाला.''[८] उदासी महाराजांच्या भक्तीस प्रसन्न होऊन महाराजांनी शिंगणापूरातच वास्तव्य करण्यासाठी आज्ञा केली. आयुष्याची ३५ वर्षे त्यांनी शनिदेवाची सेवा केली व शेवटी शनी चरणीस विलीन झाले.

सिध्दटेकचा अष्टविनायक :—

अहमदनगर जिल्हयाला लाभलेले एकमेव अष्टविनायकाचे स्थान असून त्याचे नाव सिध्दटेक. सिध्दटेकला भीमानदी दक्षिण वाहिनी आहे. सिध्दीविनायकाचे मंदीर उंच टेकडीवर आहे. मंदिराचा गाभारा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेला असून देवळासमोर महाद्वार व फरशी हरिपंत फडके यांनी बांधलेली आहे. सिध्दटेक हे कर्जत तालुक्यात मोडते. सिध्दीविनायकाच्या दोन्ही बाजूने जय व विजय यांच्या मुर्ती आहेत. स्वयंभु

अशी सिध्दीविनायकाची सुमारे ३ फुट मुर्ती उंच आहे. प्रदक्षिणेसाठी सुमारे पाच कि.मी. टेकडीभोवती चालावे लागते.

अहमदनगर शहरातील विशाल गणपती :—

अहमदनगर शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखला जाणारा माळीवाडयातील विशाल गणपती शहरात प्रसिध्द आहे. विशाल गणपतीची मूर्ती सुमारे ११ फुट भव्य आहे. शहरातील सर्व भाविक विशाल गणपतीची मनोभावे पूजा करतात. अतिशय जागृत असे पवित्र ठिकाण म्हणून ओळखले जाते. गणपती चरणी नमल्याने आपल्या सर्व इच्छा पूर्ण होतात अशी अख्यायिका आहे. अलिकडे विशाल गणपती मंदीराचा जीर्णोद्धार झाला आहे.

अवतार मेहेरबाबा —

मेहेरवान शेरियार इराणी यांचा जन्म पुण्यात २ फेब्रुवारी १८९४ रोजी पहाटे पाच वाजता एक पुत्र रत्न प्राप्त झाले. मेहेरबाबांचे शिक्षण पुण्यातील डेक्कन कॉलेजला झाले. शिर्डी साईबाबांसोबत त्यांची जेव्हा भेट झाली. तेव्हा साईबाबांनी त्यांचे सामर्थ्य ओळखले. आपले भक्त रूस्तुम इराणी यांच्या विवाहानिमित्ताने मेहेरबान १९२३ साली अहमदनगरला आले. अहमदनगर हीच त्यांची कर्मभूमी ठरली. अहमदनगर शहरापासून १० कि.मी. अंतरावरील अरणागावातील एक टेकडी मेहेरबाबाने निवडली व तेथे वास्तव्य करू लागले. पुढे हाच परिसर मेहेराबाद म्हणून ओळखला जाऊ लागला. मेहेरबाबांनी आत्मजागृतीने कार्य हाती घेतले. आपल्या देहत्यागापर्यंतच्या ४४ वर्षाच्या कालखंडात बाबांनी अखंड मौन पाळले. रोम लिपीतील आदयाक्षरे १ ते ९ पर्यंत अंक असलेला वर्णाक्षरांचा फलक हा त्यांची वाणी बनला. ३१ जानेवारी १९६९ रोजी गुरूचे पुनर्वसन नक्षत्र चालु असताना बाबांनी देहत्याग केला.

आनंदऋषीजी महाराज :—

पाथर्डी तालुक्यातील चिंचोडी शिराळ या खेडेगावात माता हुसाबाई व पिता देवीचंदजी गुगळे या कुटुंबात २७ जुलै १९०० रोजी पुत्ररत्न जन्मास आले. त्यांनी त्याचे नाव नेमीचंद ठेवले होते. घरातील धार्मिक वातावरणात नेमीचंद लहानचे मोठे झाले. नेमीचंद वयाच्या १२ वर्षापर्यंत न चुकता भजनाला

जात. वयाच्या १३ व्या वर्षी ते जैन संत स्व. रतनऋषीजी महाराज यांच्या सानिध्यात आले व त्यांना वैराग्यप्राप्ती झाली. त्यांनी मिरी या गावी जैन धर्माची दिक्षा घेतली व आनंदऋषीजी नाव धारण केले. त्यांनी प्रेम, अहिंसा व सहिष्णुतेची शिकवण समाजात रूजवली. त्यांना नऊ भाषेचे ज्ञान होते. त्यांना इ.स. १९६५ मध्ये आचार्य ही पदवी बहाल करण्यात आली. त्यांनी १९९२ मध्ये जगाचा निरोप घेतला.

संत निळोबाराय :— पारनेर तालुक्यातील पिंपळनेर गावी १७१३ च्या दरम्यान मुंकुदपंत मकासरे नावाचे देशस्थ ब्राम्हण गावचे कुलकर्णी पद सांभाळत. ईश्वरी कृपेने त्यांना पुत्र झाला. त्यांनी त्याचे नाव निळकंठ ठेवले. बालपणीच त्यांना त्याचे निळकंठ ठेवले. बालपणीच त्यांना संत साहित्याची आवड होती. दिवसेंदिवस निळोबा ईश्वर भक्तीत तल्लीन झाले होते. निळोबांनी पुढे देहूस जाऊन तुकोबांच्या समाधीचे दर्शन घेतले व तुकारामांच्या मुलाची भेट घेतली. तुकोबांचे सगुण दर्शन व्हावे म्हणून व्याकुळ झाले. निळोबारायांच्या अवस्था पाहून पांडुरंगाला दया आली तेच त्यांना भेटायला आले असे सांगितले जाते. निळोबारायांना मिळालेली सर्व दानपत्रे वाटून टाकली. संपूर्ण आयुष्य त्यागी वृत्तीने जोपासले. पिंपळनेरवासियांच्या साथीने निळोबाराय पांडुरंगाची कायमचे लीन झाले.

मिरावली पहाड, साकुरी येथील उपासनी बाबा मंदीर, पुणतांबा येथील चांगदेव, वाकडी येथील खंडोबा मंदीर, मोहटादेवी मंदीर, राशीन येथिल जगदंबा मंदीर इ. अनेक धार्मिक स्थळे अहमदनगर जिल्हयात आहेत. या धार्मिक स्थळामुळे अहमदनगर हे ऐतिहासिक ठिकाण म्हणून नावारूपास आले आहे. अशाप्रकारे अहमदनगर जिल्हयात धार्मिक क्षेत्रात देशातील अनेक प्रसिध्द तीर्थस्थळे असल्याने या जिल्हयाला अनण्यसाधारण महत्त्व आहे.

ई) शैक्षणिक क्षेत्रातील जडणघडण —

अहमदनगर जिल्हा हा सहकार क्षेत्रात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. सर्वात जास्त साखर कारखाने या जिल्हयात आहेत. परंतु शिक्षणक्षेत्रातही इतिहास समृद्ध आहे. ''अहमदनगर शहरामध्ये अमेरिकन मराठी मिशन यांनी इ.स.

१८३८ मध्ये मुलींची पहिला शाळा सुरू केली.''[९] त्या शाळेलाच आज क्लेरा ब्रुस हायस्कूल नावाने ओळखले जाते. त्यानंतर हळूहळू शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. खेडयातून शिक्षणासाठी लोक शहराकडे येऊ लागले. परंतु शिक्षणाचा प्रसार अत्यल्प होता. अमेरिकन मिशन यांनी १३ ऑक्टोबर १८८२ रोजी मुलांसाठी अमेरिकन बॉईज हायस्कूल ही शाळा सुरू केली. मिशन यांनी हळूहळू खेडयाकडे जाण्यास सुरूवात केली. जिल्हयात मिशनऱ्यांनी अनेक ठिकाणी शाळा सुरू केल्या. पुढे त्या जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आल्या. आजही जिल्हयात अनेक शाळा मिशनरी चालवित आहे. खऱ्या अर्थाने शिक्षण प्रसार मिशनऱ्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केला असे म्हणावे लागेल.

अहमदनगर एज्युकेशन — १८४८ मध्ये अहमदनगर शहरामधील नव्या पेठेतील अँग्लो स्कूल व सन १८६८ मध्ये आनंदी बाजारातील इंग्रजी हायस्कूल स्थापना झाली. १ ऑक्टोबर १८८७ रोजी अहमदनगर एज्युकेशन सोसायटी ही संस्था रजिस्टर झाल्यानंतर सिटीस्कूल संस्थेकडे देण्यात आले. १ एप्रिल १८८९ रोजी इंग्रजी हायस्कूल अहमदनगर एज्युकेशन सोसायटीकडे आले. या एज्युकेशन सोसायटीचा प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्रात सिंहाचा वाटा आहे. या संस्थेने इंग्रजी शाळेबरोबर १९८२ मध्ये रात्रशाळा सुरू केल्या आहेत.

हिंद सेवा मंडळ :— अहमदनगर जिल्हयात हिंद सेवा मंडळाने ही शिक्षण क्षेत्रात झेप घेतलेली आहे. १९६० साली हिंद सेवा मंडळाने सीताराम सारडा हायस्कूल, बागडपट्टी सुरू केले. आर्थिक दृष्टया दुर्बल वर्गाला त्यामुळे शिक्षण घेता येऊ लागले. या संस्थेच्या १४ शाळा तसेच महाविद्यालयाचे चालविले जातात. शहर व परिसरातील मजूर, विडी कामगार, विणकर आणि आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील मुलां—मुलींना शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. गरजूंसाठी वस्तीगृह, तंत्रशिक्षण, कॉम्प्युटर यासारखे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

मराठा विद्या प्रसारक समाज :— अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर या संस्थेची स्थापना एका छोटया वसतिगृहाच्या स्वरूपात १९१८ साली झाली. ब्रिटीश सत्तेची शंभरी त्याकाळी भरत आली होती. त्या

काळातील लोकांनाही ब्रिटीश राज्य यानंतर कालवश होईल असे वाटत होते. या संस्थेची स्थापनेसाठी प्रेरणा होती. ''श्रीमंत छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या हौतात्म्याची''[१०] सुरूवातीला अनंत अडचणीचा सामना करावा लागला. कार्यकर्त्यांनी गोरगरिबांकडून पैसा गोळा करून वसतीगृह चालू ठेवले. संस्था स्थापनेच्या पूर्वी बहुजन समाज शैक्षणिकदृष्टया अत्यंत मागासलेला होता. शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले यांनी उभ्या केलेल्या सामाजिक चळवळीचा फायदा बहुजन समाजाला झाला. शाहू महाराजांनी ही रयत सुजाण व्हावी म्हणून शिक्षणाची अन्नछत्रे ठिकठिकाणी उघडली. खेडयापाडयातून राजकीय आणि सामाजिक जागृती करण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी केला होता. त्यांनी सामान्य माणसाला हक्काची जाणीव करून दिली होती. बलिष्ठाकडून होणारी पिळवणूक थांबवायची असेल तर त्याला शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे त्यांनी लोकांना पटवून दिले होते. १९४० मध्ये माध्यमिक विद्यालये सुरू करण्यात आले. त्याकाळी सरकारचा विरोध, आर्थिक पाठबळ नाही असे असताना जनता जनार्दनाच्या पैशावर विद्यालये उभी राहिली. आज अहमदनगर जिल्हयात १० तालुक्यामध्ये संस्थेचा शिक्षण प्रसार झालेला आहे. प्राथमिक, माध्यमिक, आश्रमशाळा, वरिष्ठ महाविद्यालये असे संस्थेचे ७५ पेक्षा जास्त शाखा कार्यरत आहेत. संस्थेत सुमारे ६० हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. बहुजन समाजातील विद्यार्थी शेती पिकून शिक्षण घेत आहेत. खेडयापाडयात माध्यमिक शिक्षणाची सोय झाली नसती तर विद्याथी, विद्यार्थ्यींनी शिक्षणापासून वंचित राहिले असते. या संस्थेच्या विस्ताराचे श्रेय सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, खेडयापाडयातील पालक आणि विद्यार्थी यांना आहे.

इतिहास हा नेहमी भूतकाळात लपण्याचा प्रयत्न करीत असतो. अनेक ग्रह—पूर्वग्रह निर्माण करतो. त्याचे निखळ स्वरूपात दर्शन घडणे दुरापास्त होत जाते. त्यामुळेच संस्थेचे स्वरूप पुढे येणे गरजेचे आहे. या ग्रामीण भागातील विद्यालयातून पुढे आलेल्या विद्यार्थ्यांचे श्रेय मनाला भुरळ पाडणारे आहे. मातीतून बाहेर आलेली रत्ने पाहून डोळे दिपतात, पाणावतात. ग्रामीण भागात या शैक्षणिक शाखा उभ्या राहिल्या नसत्या तर ही सर्व रत्ने मातीमोल झाली

असती, या रत्नांचा प्रकाश महाराष्ट्राला एक नवा दिलासा देत आहे. या संस्था स्थापन करण्यात कै. राव बहादूर नवले, कै. सरदार थोरात, कै. वामनराव तोडमल, कै. रामचंद्र अकोलकर, शंकरराव पाटील, कृष्णाजी काळे, अमृते फौजदार, विठ्ठलराव डोंगरे, सहादू काळे, पंढरीनाथ पंदरकर, भाऊ बाळाजी जाधव, डॉ. मोहिते, ब.भि.काळे, माधवराव लंवाडे ही मंडळी त्याकाळी एकत्र आली होती.

रयत शिक्षण संस्था :—

भाऊराव पाटील हे सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते होते. गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाच्या उन्नतीकरिता एक संस्था असावी असे येथील कार्यकर्त्यांना व भाऊरावांना वाटत होते. त्याच हेतूने सातारा जिल्हयातील कराड तालुक्यातील काले या ठिकाणी ५ सप्टेंबर १९१९ रोजी दूधगांव शिक्षण प्रसारक मंडळाची परिषद भरली होती. त्याच परिषदेतील ठरावानुसार ४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर रयत शिक्षण संस्थेची स्थापना काले येथे करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी ही संस्था स्थापन करण्यात आल्यामुळे रयत शिक्षण संस्था असे नाव देण्यात आले. पुढे कार्यालय कालेहून सातारा येथे आणले. रयत शिक्षणसंस्थेची काले गावाजवळील धोडेंवाडी ही पहिली प्राथमिक शाळा होय. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्थेने पाय रोवले आहेत. अहमदनगर जिल्हा हा उत्तर विभागात येतो. अहमदनगर येथे उत्तर विभागाचे कार्यालय आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी १९८९ साली तत्कालीन चेअरमन दिवंगत शंकरराव काळे यांनी महाराष्ट्रामध्ये एकाच वेळी चार महिला महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यातील अहमदनगर शहरातील राधाबाई काळे महाविद्यालय होय. ग्रामीण भागातील नव्हे तर नगर शहरातील मुलींचे आधारस्तंभ ठरले. आर्थिकदृष्टया दुर्बल असल्यामुळेही पूर्वी मुली उच्चशिक्षणापासून दुर्लक्षित होत्या. राधाबाई काळे महाविद्यालय हे पूर्वी कापड बाजारात भरत होते. शंकरराव काळे यांनी तारकपूर परिसरात नवीन इमारत उभारून आज दोन ते तीन हजार मुली शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयात

मुलींसाठी वसतिगृह असल्याने ग्रामीण भागातील मुलींच्या राहण्याची सोय झाली आहे.

विखे फौंडेशन :— पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे ग्रामीण भागात उच्च दर्जाचे आरोग्यविषयक, तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम गरीब व होतकरू मुलांना मिळावे यासाठी १९८३ साली पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौडेंशन अंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. या अभियांत्रिकी महाविद्यालयात सिव्हील, मेकॅनिकल, इलेक्ट्रानिक्स्, कम्युनिकेशन, इलेक्ट्रीकल, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी इ. कोर्सेस चालविले जातात. तांत्रिक शिक्षणाबरोबर व्यवस्थापन क्षेत्राचे शिक्षण उपलब्ध व्हावे आणि यासाठी १९८६ साली आय.आी.एम.आर.डी. इन्स्टिटयुटची स्थापना केली. १९९४ साली संस्थेमार्फत औषणनिर्मितीशास्त्र महाविद्यालय संस्थेने सुरू केले आहे. आरोग्यविषयक ज्ञान देण्यासाठी नगर जिल्हयातील दुसऱ्या वैद्यकिय महाविद्यालयाची स्थापना २००४ मध्ये विखे फौंडेशनने केली. त्याचबरोबर नर्सिंग कॉलेज, पब्लिक स्कूल सुरू केले आहेत. लोणी, प्रवरानगर परिसरात त्याचा फार मोठा विस्तार झाला आहे.

डॉ.पी.बी.हिवाळे एज्युकेशन :—

अहमदनगरमध्ये सर्वात प्रथम १८८७ साली अमेरिकन मराठी मिशन यांनी महाविद्यालय सुरू करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो प्रयत्न यशस्वी ठरला नाही. स्वातंत्र्यपूर्व काळामुळेच नगर येथील डॉ.बी.पी.हिवाळे मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत होते. या परिषदेमध्ये नगरचे काही प्रतिनिधी सहभागी झाले होते. मात्र प्रथम त्यांना इंग्रजी भाषेची अडचण येत होती. त्यावेळी प्रतिनिधींनी डॉ. हिवाळे यांना नगरमध्ये महाविद्यालय सुरू करण्याची विनंती केली होती. महाविद्यालय सुरू करण्यासाठी जागेची आवश्यकता होती. १९३० साली डॉ. हिवाळे यांच्या महाविद्यालय सुरू करण्याच्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळाला नाही. ''जून १९४७ मध्ये अहमदनगर महाविद्यालय सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला.''[११] अहमदनगर शहरातील सर्वात जुने महाविद्यालय आहे. १९६२ साली

स्वंयमूल्यमापन परिसर ५५ एकरामध्ये महाविद्यालय आहे. महाविद्यालयाचा परिसर ५५ एकरामध्ये आहे. महाविद्यालय सुरू झाले. तेव्हा ३०० विद्यार्थी होते मात्र आज सात हजारापेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. डॉ. हिवाळे यांच्याकडून प्रेरणा मिळाल्याने अनेकांनी त्याकाळी शिक्षण क्षेत्रात हिरीरीने भाग घेतला. त्याचाच परिणाम म्हणून डॉ. एस.के.हबळे यांनी शहरात ग्रामीण विकास केंद्र ही संस्था सुरू केली. या संस्थेने संपूर्ण देशाला 'राष्ट्रीय सेवा योजने' सारखा उपक्रम दिला. पुणे विद्यापीठाने बनवलेला एम.एस.डब्ल्यु हा अभ्यासक्रम सर्वात प्रथम 'सी.एस.आर.डी' या संस्थेत सुरू करण्यात आला आहे.

संगमनेर तालुक्यातील भाऊसाहेब थोरात यांनी सुरू केलेली सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज ही जिल्हयातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते. या संस्थेतर्फे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालये चालविली जात आहेत. त्याचबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रमही राबविले जात आहेत. त्याचबरोबर अकोला तालुक्यातील अगस्ती ऋषींच्या नावानेही प्राथमिक, माध्यमिक शाळा चालविल्या जातात. तसेच अकोला तालुका एज्युकेशन सोसायटीची संस्था ही नावारूपाला आलेली आहे.

नेवासा तालुक्यातील मुळा एज्युकेशन सोसायटी ही संस्था मा.खा. यशवंतराव गडाख पाटील यांनी स्थापन केली. या संस्थेमुळे ग्रामीण भागात शिक्षणाचे द्वार उपलब्ध झाले. या संस्थेतर्फे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालये ही चालविले जातात. त्याचबरोबर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमही संस्था राबवित आहे. शेवगाव तालुक्यामध्ये मा. मारूतीराव घुले पाटील यांनी जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगावने या नावाने सुरू केली आहे. या संस्थेमुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झपाटयाने होण्यास मदत झाली. पाथर्डी तालुक्यात मा. बबनराव ढाकणे यांच्या ही शिक्षण प्रसारक मंडळामुळे ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा मिळण्यास मदत झाली तसेच बाबूजी आव्हाड ही संस्था ही ग्रामीण भागात फार मोठया प्रमाणावर शिक्षणक्षेत्रात काम करीत असल्याने ग्रामीण भागापर्यंत शिक्षण प्रसार होण्यास खूप मदत झाली.

अशाप्रकारे जिल्हयात शिक्षणक्षेत्रात फार मोठया प्रमाणावर शिक्षण संस्थांनी आपल्या शाखांचा विस्तार केलयामुळेच खऱ्या अर्थाने ग्रामीण भागापर्यंत महाविद्यालये पोहचली आहेत. त्यामुळेच अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रातही मागे नाही. प्रत्येक तालुक्यातील पुढाऱ्यांनी व शिक्षणप्रेमी कार्यकर्त्यांनी सुरू केलेल्या संस्थांमुळे, गावापर्यंत शिक्षण पोहचू शकते. जिल्हा परिषदेतर्फे प्राथमिक शाळा चालविल्या जात असल्या तरी त्या पुरेशा ठरत नाहीत. म्हणून या संस्थानी पुढाकार घेतल्यामुळे एक शिक्षण चळवळ होऊ शकली. आज ग्रामीण भागापर्यंत व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्था पोहचल्या आहेत. आज शहराइतके ग्रामीण विद्यार्थीही इंग्रजी माध्यमाच्या शाळातून शिकत आहेत. त्याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटायला हवा.

२.३ स्वातंत्र्य चळवळीत अहमदनगर जिल्हयाचे योगदान :—

अहमदनगर जिल्हयाने स्वातंत्र्यचळवळीत फार महत्वाची भूमिका बजावली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जनता झपाटलेली होती. अन्यायाचा सर्वशक्तींशी प्रतिकार करणे व जुलुमाविरूध्द प्राणपणाने लढणे हा जिल्हयातील जनतेचा स्थायी भाव होता. रामजी भांगरे, राधोजी भांगरे, रामा किरवा, गोविंदराव खाडे या कोळी नेत्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी डोंगराळ भागात आश्रय घेऊन ब्रिटिशांच्या विरोधात रणशिंग फुंकले होते. जॅक्सनचा वध करणारा अनंत कान्हेरेचा एक सहकारी वीर वामनराव जोशी हा समशेरपूरचा होता.

ब्रिटीशांच्या जुलुमशाहीच्या विरोधात लोकांमध्ये एकजूट निर्माण झाली होती. दडपशाहीला लोक भीक घालत नव्हते. ''इ.स.१९३९ साली फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते.''[१२] अहमदनगर जिल्हयातून या अधिवेशनासाठी पायी गेलेल्या शेतकऱ्यांचा मोर्चा संगमनेरमधून गेला होता. त्या अधिवेशनासाठी कॉ. लालूजी पेंडसे, कॉ. डी.बी. कुलकर्णी, कॉ. भाई सथ्था, कॉ. विनायकराव भुस्कुटे उपस्थित होते. लोकांचे प्रश्न घेऊन कम्युनिष्ट संघर्ष करीत असल्याचे त्याकाळातील चित्र होते. याउलट कॉग्रेस पुढाऱ्यांविषयी सहानुभुती फारशी

जनतेत दिसत नव्हती. देशाच्या स्वातंत्र्यासाठी भारावलेले अनेक शेतकरी, आदिवासी तरूण बाहेर आले कम्युनिष्ट होऊनच त्याबाबत भाऊसाहेब थोरात म्हणतात, ''तुरूगातून आम्ही बाहेर पडलो ते साम्यवादी विचारसरणी स्वीकारूनच बाहेर जाताच. कम्युनिष्ट पक्षाचे कार्य करायचे, श्रमजीवी कामगार, कष्टकरी शेतकरी, गरीब, आदिवासी पद दलित हरिजन यांच्या संघटना बांधायच्या, त्यांच्या चळवळी उभारायच्या हा दृढ संकल्प आम्ही सर्वांनी मनाशी केलेला होता.''[१३]

बापूसाहेब भापकर हे अहमदनगर जिल्हयातील शेतकरी कामगार व सामान्य जनतेचे झुंजार नेते होते. दुष्काळी तालुक्यातील शेतकरी व विशेषत: कूळ शेतकरी त्यांच्याकडे केसेस घेऊन येत असे. बापूसाहेब भापकर कूळांच्या शेतकरी चळवळीचे नेते बनले. काही व्यक्तींचा जन्म दुसऱ्यासाठी आजन्म झटण्यासाठी झालेला असतो. पारनेर तालुक्याच्या गावी जन्म झालेल्या सेनापती बापटांनी इंजिनिअर होऊन भारतात आले. नोकरी किंवा व्यवसाय केला असता तर खोऱ्याने पैसा ओढला असता. बॉम्बची विद्या पहिल्यांदा भारतात आणणारा हा क्रांतीकारक होता. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची विचारसरणी पटल्याने फॉरवर्ड ब्लॉक पक्षात प्रवेश केला होता.

पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे शेतकरी परिषद घेण्यात आली होती. निवडणूकीत अपयशाची तीव्रता कमी करून लोकांमध्ये उत्साह टिकवून 'किसान सभा' अधिक मजबुत करण्यासाठी करंजी परिषदेचे आयोजन केले होते. ''बंगालचे कम्युनिष्ट नेते बंकिम मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद संपन्न झाली.''[१४] या परिषदेच्या निमित्ताने जिल्हा कम्युनिष्ट पक्षमय झाला होता.

जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, आसफअली, शंकरदेव, गोविंद वल्लभ पंत, डॉ. पट्टाभि, सीतारामय्या, डॉ. सय्यद महमूद, आचार्य कृपलानी या राष्ट्रीय कॉग्रेसच्या सदस्यांना अहमदनगर येथील किल्ल्यात जवळजवळ साडेतीन वर्षे ठेवण्यात आले होते. तुरूंगात असताना नेते मंडळी लिहिणे व वाचणे हे कार्य करत असे. बहुतेक नेत्यांना काही ना काही आजार जडला होता. ''८ ऑगस्ट १९४२ च्या रात्री गांधी, नेहरू आदि नेत्यांना ब्रिटीश राज्यकर्त्यांनी

मुंबईत अटक केली. महात्मा गांधींना येरवडयात ठेवण्यात आले तर इतर नेत्यांना मुंबईहून अहमदनगरला आणण्यात आले होते.''[१५] अज्ञात स्थळी आणणे हाच ब्रिटीशांचा उद्देश होता. अहमदनगर किल्ल्यात ठेवण्यात आलेल्या भारतीय काँग्रेस कमिटीच्या एकमेव पुढाऱ्याकडे ब्रिटीश साम्राज्यशाहीची दृष्टी राजबंदीच्या नजरेने पाहत होती. पण पंडित नेहरू हे भारतीय नागरिकांच्या दृष्टीने भावी स्वातंत्र्याचे शिल्पकार होते. महात्माजींने घडवलेले आणि जडवलेली जडावाची मोहनमाळ होती. हिंद देवीच्या गळयातील तो रत्नहार होता. पंडितजींच्या सदाफुली वृत्तीला फुलांची आवड हे सर्वांच्या आधी उठून कामात रंगून जात. भारतभाग्य विधाते जून १९४५ मध्ये अहमदनगरच्या किल्ल्यातून बाहेर पडले. त्यावेळी फत्ते बुरजावरील ब्रिटिशांचा युनियन जॅक डौलाने न फडकता विगळीत झाला होता. त्यावेळी युरोपियन पहारेकऱ्यांचे चेहरे काळवंडले होते हे मुद्दाम सांगावेसे वाटते.

अशाप्रकारे अहमदनगर जिल्हयातील वेगवेगळया नेत्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयात फार मोठे योगदान दिले आहे. भारतातील मोठमोठी मंडळी अहमदनगरच्या किल्ल्यातून स्वातत्र्य लढा पुढे चालवित होती. सेनापती बापट, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, भाऊसाहेब थोरात, पद्मश्री विखे पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीत फार मोठे योगदान दिले आहे.

२.४ अहमदनगर जिल्हयातील विविध कामगार चळवळी :—

ब्रिटीशांनी शासन यंत्रणेच्या माध्यमातून भारतावर राज्य केले. शासन व्यवस्थेला सर्वंकष सत्ता देऊन समाज व्यवस्थेत सर्वोच्च स्थान देण्यात आले. ब्रिटीशांचा वसाहतवादी आणि राणींच्या नावाने चाललेला कारभार संपल्यावर लोकशाहीचा आपण स्वीकार केला. लोकप्रतिनिधी निवडून आले पण शासनव्यवस्था मात्र तशीच वसाहतवादी मानसिकतेची राहिली. लोकप्रतिनिधी राज्यकर्ते त्याचा भाग होऊन गेले. अनेक राज्ये आणि संस्थाने खालसा करून ब्रिटीशांनी हिंदुस्थान निर्माण केला. सुधारणांचा अजेंडा मागे ठेवून आपण स्वातंत्र्य मिळविले. परिणामी संरजामीव्यवस्था तशीच ठेवून भांडवलदार वर्गाला वाव देत वाटचाल सुरू केली. स्वातंत्र्यचळवळीतून पुढे आलेले नेतृत्व आणि

जागृत झालेले जनसमुह यांचा सुरूवातीच्या काळात प्रभाव होता. शेतकरी कामगार वर्गाची उपस्थिती महत्वपूर्ण होती. स्वातंञ्योत्तर काळात लोकांनी स्वत:चे प्रश्न सोडविणे बंद केले. आणि प्रत्येक प्रश्न सोडविण्याची मागणी होऊ लागली. मागण्यांसाठी मोर्चे, निदर्शने, आंदोलने, उपोषणे होऊ लागले. या प्रत्येक मागणीतून समाजाचा स्वत:चा प्रश्न सोडविण्याचे पर्याय बंद होत गेले आणि प्रश्न सोडविण्यासाठी आपण शासनावर अधिकाधिक अवलंबून राहू लागलो. सुप्रसिध्द विचारवंत लॉक यांच्या ''In Liberty'' या स्वातंञ्याविषयीच्या पुस्तकात असे म्हटले आहे की, ''समाज स्वातंञ्यासाठी झगडतो, बलिदान देतो, पण स्वातंञ्य मिळाल्यावर प्रत्येक गोष्टीबाबत शासनाकडे मागणी करतो.''[१६] परिणामी तो समाज आपले सर्व हक्क शासनाला अर्पण करून पुन्हा पारतंञ्यात लोटला जातो आणि स्वतंत्र देशातील परतंत्र समाज अशी त्यांची स्थिती होते. अहमदनगर जिल्हा सतत दुष्काळी असल्याने आणि असंघटित कामगारांच्या संस्था जास्त असल्याने स्वातंञ्योत्तर काळात आपल्या हक्कासाठी काही चळवळी याठिकाणी झाल्या आहेत, त्यातील काही प्रमुख चळवळींचा आढावा याठिकाणी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) विडी कामगार चळवळ :— कम्युनिष्ट पक्षाचा क्रांतिकारी विचार खेडयातील थेट कुटुंबापर्यंत नेण्यासाठी विडी कामगारांनी मोलाची भागीदारी केली आहे. विडी कामगार आणि कम्युनिष्ट या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अहमदनगर जिल्हयातील संगमनेर, अकोले तालुक्यातील दुष्काळी भागामध्ये शेती खरीपाची होती. शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे गुजराण करणे लोकांना अडचणीचे होते. दुष्काळी भागामुळे कुटुंबाला विडी कामामुळे आर्थिक हातभार लागला आहे. संगमनेर तालुक्यातील राजापूरचे कॉ. राम नागरे हे ही स्वत: विडी कामगारच होते. इ.स. १९४२ च्या भूमिगत आंदोलनात भाग घेतलेले भाऊसाहेब थोरात तुरूंगातून सुटून आले होते. कॉ. नागरे हे स्वातंञ्यचळवळीशी व कम्युनिष्ट तत्वाशी बांधील होते. विडी कामगारांच्या हालअपेष्टा जवळून पाहत असल्यामुळे त्यांच्याविषयी कम्युनिष्ट फार जागरूक होते. ''कॉ. रामभाऊ नागरे यांनी विडी कामगारांची एक सभा घेऊन संगमनेर,

अकोले तालुका विडी कामगार युनियनची स्थापना केली.''[१७] कोणत्याही उद्योगात संघटना असेल तरच कामगारांना न्याय मिळतो नाहीतर अन्यायाला सामोरे जावे लागते. त्यासाठी कामगारांची एकजूट राहणे फार महत्वाचे आहे. कामगारांची संघटना मजबूत असणे काळाची गरज आहे. पूर्वीच्या काळी जुने कार्यकर्ते एकमेकांना खूप मदत करीत असत त्यांच्यात त्यागाची व आपुलकीची भावना होती. संघटनेला नेतृत्व चांगले मिळाले तरच कामगारांना न्याय वेळेवर मिळतो. त्याकाळी कॉ. राम नागरे, भाऊसाहेब थोरात गावोगावी जात असत. निवृत्ती गोडसे, गजानन हासे, सीताराम राऊळ, सीताराम बडदे, कॉ. परब ही मंडळीही संघटनेच्या कामात पक्षाचा प्रसारही जोमाने करीत होते. कम्युनिष्ट पक्षाचे अहमदनगर जिल्हयाचे प्रमुख संघटक म्हणून कॉ. चंद्रभान आठरे पाटील ठिकठिकाणी विडी कारखान्यांना भेटी देऊन कामगारांना संघटित होण्यास प्रवृत्त करीत होते. विडी कारखानदारांच्या आणि पोलिसांच्या दडपशाहीमुळे संप मोडून काढले जात असे. जे कामगार संपात सहभागी होत त्यांना कामावरून कमी केले जात असे. पर्यायाने कामगारावर बेकार होण्याची वेळ येत असे. अशाप्रकारे कामगारावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम कम्युनिष्ट पक्षाने खंबीरपणे केले होते.

''संगमनेर येथे विडी कामगार फेडरेशनचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन ६ मे १९६१ रोजी झाले.''[१८] त्या अधिवेशनात वीस संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अहमदनगर जिल्हयामध्ये विडी कामगार चळवळ लाल निशाण गटाने उभ्या केली. नवजीवन संघटनेमधील कार्यकर्ते कॉ. भास्करराव जाधव, कॉ. मधुकरराव कात्रे, यांच्या मदतीने कॉ. दत्ता देशमुखांनी संगमनेर परिसरात संघटना बांधणी केली. पुढाऱ्यांनी गावा गावात जाऊन संघटना बांधल्या. ''अहमदनगर जिल्हयामध्ये संगमनेर, अकोले, अहमदनगर येथे कॉ. राम रत्नाकर आणि कॉ. नाना दुर्वे यांच्या विडी कामगारांच्या दोन संघटना निर्माण झाल्या.''[१९] संघटना एक असेल तर कोणताही प्रश्न चटकन सोडविण्यास मदत होते. मात्र दोन संघटना असल्यास त्यातील मतभेदामुळे कामगारांचे प्रश्न सोडविण्यात अपयश येते त्यासाठी एकजुटीने काम करणे फार महत्वाचे आहे. त्यासाठी त्या

दोन्हीही संघटना लाल निशाण पक्षात सामील झाल्या. त्या एकत्र आल्यामुळे विडी कामगारांचे प्रश्न जोमाने सोडविण्यास मदत झाली. आजही वेगवेगळया संपाद्वारे, मोर्च्याद्वारे कामगारांना न्याय देण्यासाठी धडपड चालू आहे. जागतिकीकरणामुळे आणि स्पर्धेमुळे विडी कामगारामध्ये बेकारीची समस्या मोठया प्रमाणावर भेडसावत आहे. विडी कामगार संघटना अजून मजबूत होणे गरजेचे आहे. त्यासाठी धडाडीच्या पुढाऱ्यांची आज गरज आहे. त्यांचे प्रश्न मांडणारे पुढारी असेल तरच कामगाारंना न्याय मिळेल. म्हणून कामगारा संघटना असणे ही काळाची गरज आहे.

२)मैलकोले व कोतवाल संघटना :—वर्षानुवर्षे रस्त्याचे कामे करणाऱ्या मजूरांना न्याय मिळणे फार महत्वाचे आहे. घाम गाळून कष्ट करण्यात कामगारांचे संपूर्ण आयुष्य खर्च होत आहे. परंतु त्यांना न्याय मिळण्यासाठी संघटनेची फार आवश्यकता निर्माण झालेली होती. संघटना तयार करायची म्हटले तर त्यासाठी सर्व कामगार एकत्र येणे फार महत्वाचे होते. मैलकोले व कोतवालांवर वर्षानुवर्षे अन्याय होत असे. त्यासाठी बापूसाहेब भापकर यांनी ही कामगार संघटना लाल निशाण पक्षाच्या नेतृत्वाखाली पुढे चालू ठेवली. ग्रामीण कष्टकऱ्यांना संघटित करून समाज परिवर्तनासाठी वर्गीय आधार निर्माण करण्याचा ध्येयवाद कॉ. भास्करराव जाधवांनी स्वीकारला होता. ''अन्याय घडो कोठेही चिडून उठूनआम्ही. अशाज्वलंत भावनेने बापूसाहेबांनी कामगार चळवळीकडे सर्व लक्ष केंद्रित केले होते.''[२०] बापूसाहेब भापकर गरीबीतील गरीब माणसाला मदत करीत असे. त्यामुळेच कामगार चळवळीकडे त्यांचे बारीक लक्ष होते. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' या तुकोबांच्या वचनाप्रमाणे आयुष्यभर जगले. त्या कामगारांचे वेतन, भत्ते, सेवाशर्ती, कामाची परिस्थिती वेठबिगारीसारखी होती. क्षेत्रीय कर्मचाऱ्यांपासून गावपातळीवरील कोतवालापर्यंत समावेश असलेली समन्वय समिती इ. १९७७ साली स्थापन करण्यात आली. संपाचे डावपेच, चर्चेत घ्यावयाची भूमिका संपाबरोबर इतर कृतिकार्यक्रम असे. विविध निर्णय घेताना कॉ. भास्करारावांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होते. व्यापक एकजुटीच्या चळवळीबद्दलची त्यांची आस्था, कळकळ आणि प्रामाणिकता

व्यक्तिमत्वातून जाणवते. समन्वय समितीच्या सर्व सभासदानी सभासदामागे प्रत्येकी १/— रूपया समन्वय समिती निधी म्हणून घ्यावा असा निर्णय झाला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी फक्त महाराष्ट्रातील कोतवाल परिषदेने केली. ''वास्तविक पाहता भोळे वेतन आयोगाची सुधारणा व केंद्रियदराने महागाई भत्ता कोतवालांना मान्य झालेला नव्हता.''[२१] त्यासाठी इ.स. १९७८ नंतरही ज्या ज्या वेळी समन्वय समिती पुर्नजिवित करण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळी कॉ. भास्करराव जाधव यांच्या एकजुटीच्याच चळवळीबद्दलची असलेली आत्मीयता साक्ष पटवणारा आहे. कोतवालांची भरती करण्यासाठी इ. स. १९८४ साली घातलेली बंदी उठविणे, रिकाम्या कोतवालांच्या जागा मयत कोतवालांच्या वारसातून भरून काढणे, कोतवालावर लादलेली कामवाढ कमी करणे, बोनस जाहीर करणे इ. मागण्या होत्या. लाल निशाण पक्षाच्या धरणे आंदोलनास महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव, विजयराव मोरे, हिंद मजदूर सभेचे राम शरमाळे अशा अनेकांनी जाहीर पांठिबा दिला होता. कोतवाल संघटित झाला तरच त्याला न्याय मिळू शकेल असे वाटते.

अशाप्रकारे आजच्या कामगार चळवळीमध्ये दहशत वाद वाढून त्याचा उपयोग स्वार्थासाठी मोठया प्रमाणात केला जात आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने कामगारांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. सत्य व अहिंसेवर आधारलेली कामगार चळवळ नष्ट झाली आहे. त्यामुळे कामगार हितापेक्षा राजकारण आणि व्यक्तीगत हेवेदावे जास्त प्रमाणात वाढले आहेत. कामगार चळवळीवर त्यांचे परिणाम उमटू लागले आहेत. अशा वेगवेगळया कारणामुळे कामगार चळवळी वाढण्यापेक्षा दिवसेंदिवस क्षीण होत चालल्या आहेत हे कामगारांच्या दृष्टीने धोक्याचे ठरणार आहे.

३) जिल्हा लोकलबोर्ड कामगार चळवळ : इ.स. १९५५ साली नगर जिल्हयातील महाराष्ट्रात पहिलीच असलेली जिल्हा कामगार युनियन व त्यापाठोपाठ पी.डब्ल्यू.डी. इरिगेशन कामगार युनियनची स्थापना झाली.''[२२] त्याचबरोबर कोपरगाव म्युन्सिपल कामगार संघटित झाले. तेथे युनियनचीही

स्थापना झाली होती. जिल्हयामध्ये कम्युनिष्टांचा दबदबा असल्याने कामगार चळवळी होत होत्या. कम्युनिष्ट पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते कॉ. एस.के. लिमये यांना एक कार्यकर्ता म्हणून पाठवावे अशी कॉ. मधुकर कात्रे, यांनी सुचना केली होती. अत्यंत हालअपेष्टांत त्या कार्यकत्यांनी जीवन घालविले. राजकीय कार्यकर्त्यांचा आधाराने व सहानुभुतीवर कामाचा विस्तार वाढत होता. कॉ. भास्करराव जाधव कॉलेजचे शिक्षण करत असतांना संघटनेत काम करत होते. कॉ. भास्कर जाधवांनी त्यावेळी नुकतीच बी.ए.परीक्षा दिली होती. नोकरीचे स्थिर जीवन सोडून अशाश्वत व धकाधुकीचे जीवन त्यांनी पत्कारले होते. दुसऱ्या महायुध्दात सोव्हीएट युनियनचा व दोस्त शक्तींचा विजय झाला होता. जर्मनी, जपान आणि इटलीचा फॉसिझम जनतेने नेस्तानाबूत केला होता. बलाढय फ्रेंच साम्राज्य शाहीचा केलेला पराभव या वातावरणात बर्लिनवर व पूर्व युरोपात, चीनमध्ये डौलाने फडकणारा लाल बावटा पाहून कोणत्याही क्रांतीकारक विचारांच्या कार्यकर्त्याला निश्चित स्फुर्ती मिळत होती. भारतातील हजारो वर्षे गुलामगिरीत खितपत पडलेल्या दलितांना या सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरी विरूद्ध बंड करण्याचा लढाऊ भूमिकेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. गुलामगिरी विरूद्ध गुलामांनीच बंड करून उठले पाहिजे हा अब्राहम लिंकनचा संदेश दलितांपर्यंत पोहचत होता.

अहमदनगर शहरातील म्युन्सिपल संघटना बांधण्यात बापूसाहेब भापकरांनी पुढाकार घेतला होता. जिल्हा लोकल बोर्डाप्रमाणेच नगर म्युनिसिपालटीतही ३० ते ४० वर्षे राजकारण बापूसाहेबांनी केले होते. जनसेवा हीच ईश्वरसेवा मानली होती. त्यामुळेच कामगार चळवळीत व जिल्हा लोकल बोर्डात राहून, कामगारांच्या प्रश्नासाठी झटणारे कार्यकर्ते मिळणे दुर्मिळ होते.

४) नगरपालिका कामगार चळवळ :— ब्रिटीशांनी स्थानिक स्वराज्य संस्थात लोकप्रतिनिधींना सामावून घेण्यासाठी संपत्ती, शिक्षण व हुजुरी यावर आधारलेला नागरी संस्थाबाबत १८४२ साली नगरपालिका कायदा जाहीर करून मुंबई, मद्रास, कलकत्ता या शहरांना प्रथम लागू केला होता. नगरपालिकांना घरपट्टी, जकात, पाणीपुरवठा, शिक्षणकर, बाजारफी इ. वसूल करण्याचा

अधिकार दिला. वाढती लोकसंख्या औद्योगिकरणाचा अधिकार दिला. वाढती लोकसंख्या औद्योगिकरणाचा वेग, क्षेत्रविकास, जनतेची कर देण्याची क्षमता, नगर विकासाची येणारी जबाबदारी यामुळे नगरपालिकांचा खजिना सतत रिकामाच राहतो. अनेकवेळा विकासाचे काम करण्यासाठी कर्ज काढावे लागते. नगरपालिकांचा कारभार नेहमीच जनतेच्या, राजकीय पक्षांच्या सार्वत्रिक टिकेचा विषय झालेला आहे. नगरपालिकेच्या कारभारात नगराध्यक्ष, नगरसेवक व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यावर नियंत्रण ठेवणारी नगरपालिका कारभारात दोष, भ्रष्टाचार, वशिलेबाजी यांनी थैमान मांडले आहे. त्यासाठी कामगार वर्गाने व पक्षांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. ''नगरपालिका कामगार युनियनची स्थापना ३१ मार्च १९५८ रोजी झाली.''[२३] नगरपालिका कामगार आपल्यातील किमान वेतनाच्या मागणीसाठी संघटित झाले. कामगारांना लाभ मिळत नसल्याने त्रस्त होते. त्यामुळे कामगारांना संघटनेचे महत्व पटले होते. त्यांनी एकत्रित येऊन बापूसाहेब भापकर, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. भास्करराव जाधव यांच्या साहाय्याने त्यांनी आपली युनियनची स्थापना केली.

आरोग्य खात्यातील सफाई कामगारांना सेवा निवृत्तीनंतर वारसांना नोकरी मिळू लागली. नगरपालिका कामगारांचे राज्यव्यापी महामंडळ व जकात बचावाची लढाई यासाठी युनियनचे महत्वाचे कार्य केले. अहमदनगर येथे राज्यातील कामगारांची परिषद १९८६ साली होती. नगरपालिका उत्पन्नाचा स्त्रोत म्हणजे जनतेकडून मिळणारे कर, जकात कर व विक्रीकर होय. जकात कर रद्द केल्यास नगरपालिकांना लोकांच्या सेवा देण्यास अडचणी निर्माण होतील. शिवाय कामगारांच्या पगाराचा प्रश्न निर्माण होतो. कसबेकर समितीने बहुमताने जकात कर रद्द करून प्रवेश कर लागू करण्याची शिफारस केली होती. कामगार परिषदेने असा ठराव केला की शासकीय नोकरांप्रमाणे जिल्हा परिषद व विविध पातळीवरील शिक्षकांना लागू होणाऱ्या सेवाशर्ती व वेतनाच्या १०० टक्के खर्च शासन करते. त्याचप्रमाणे नगरपालिका कर्मचाऱ्यांना वेतन मिळणे आवश्यक आहे.

अहमदनगर नगरपालिका कामगार चळवळीचे अस्तित्व आजही भक्कमपणे टिकून आहे. आजचा कामगार आपल्या हक्कासाठी जागृत झाला आहे. १९८४—८५ पासून शहरपालिका कामगार युनियनच्या वतीने करार झाला. त्यातील थकबाकीमधून कॉ. बाबूराव दलाल यांच्या पुढाकाराने अडीच लाखाचा निधी मिळाला होता. युनियनसाठी दहा वर्षापूर्वीच जागा घेतली होती. ''पुण्याहुन परत आल्यावर'श्रमिक' कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामावर लक्ष केंद्रित केले.''[२४] इमारतीच्या बांधकामाला खऱ्या अर्थाने गती निर्माण झाली, कॉ. भास्करराव जाधव यांच्यामुळेकॉ. बाबूराव दलाल हे कम्युनिष्ट पक्षात आले होते. त्यामुळे पक्षाला एक प्रकारची ताकद मिळाली होती. त्याचबरोबर कामगार चळवळ समृध्द होण्यास अशा झगडणाऱ्या नेत्यांचीही गरज होती. नगरपालिका संघटनेमध्ये कामगारांचे वेगवेगळे स्तर होते. कारकून, नाका कारकून, झाडूवाला, ड्रायव्हर, माळी, फायरब्रिगेड, गटारवाले या सर्वांचे प्रश्न सुटावेत असे प्रत्येकाला वाटते. परंतु कामगारामधील पूर्णवेळ कार्यकर्ता संघटनेत असावयास हवा. कामगारांच्या बाबतीत उदासीन धोरण पाहावयास मिळते. त्यासाठी कामगारांनी कामगार नेत्यावर दबाव आणावयास हवा तरच प्रश्न मार्गी लागतील. कामगारांचे प्रश्न वेळेवर सुटले नाही तर कामगारांचा संघटनेवरील विश्वास कमी होत आहे. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत. अहमदनगरमधील कामगार चळवळ संघटनात्मक व आर्थिकदृष्टया कमजोर वाटते. कामगार संघटनेने निदर्शने, संप, निवेदने दिल्यास समोरच्या व्यक्तीवर दबाव पडावयास हवा तरच संघटना ताकदवान आहे असे समजले जाते. त्यासाठी संघटनेने ठोस भूमिका घ्यायला हवी होती.

कामगार संघटनांनी कामगारांचे प्रबोधन करावयास हवे. कामगारांना सार्वजनिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली पाहिजे. आजपर्यंत कामगारांच्या भत्त्यात वाढ करण्यात कामगार संघटना यशस्वी झाल्या असल्या तरी कामगारांच्या गरजा, घर, शिक्षण, आरोग्य इ. पूर्ण करण्यास संघटनेला अपयश आले आहे. ''भांडवली पध्दतीच्या जाहीरातीला कोणताही आधार नसताना दैनिक श्रमिक विचार हे २८/११/७९ ला पुण्यात सुरू करण्यात

आले.''[२५] हे दैनिक फक्त श्रमिकांसाठी चालविले जात होते. कॉ. भास्करराव जाधव स्वत:च्या पैशातून चालवित होते. शेवटी आर्थिक परिस्थितीने साथ न दिल्याने १९८७ साली हे दैनिक बंद केले गेले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीला भास्करारावांना तोंड दयावे लागल्याने शेवटी 'श्रमिक' दैनिकाचा नाद सोडून दयावा लागला. कॉ. भास्करराव जाधवांनी म्युन्सिपल कामगारांच्या युनियनला चांगला आकार दिला. त्यानंतर कॉ. मधुकर कात्रे यांनी म्युन्सिपल संघटना यशस्वीपणे चालविली. कामगारांचे प्रश्न पोटतिडकीने सोडविण्याची त्यांची तळमळ होती. त्यांच्यानंतर सध्या कार्यरत असलेले अनंत लोखंडे संघटनेचे नेतृत्व समर्थपणे करीत आहेत हे सांगावेसे वाटते.

५) शेतमजूर कामगार चळवळ :—

इ.स. १९४४ ते ४६ या काळात खाजगी साखर कारखानादारांच्या ऊस शेतीवर काम करणाऱ्या शेतमजूरांना हरेगाव साखर कारखान्यावर कॉ. विनायकराव भुस्कूटे, कोपरगांव तालुक्यातील लक्ष्मीवाडी व साखरवाडी कारखान्याच्या ऊस मळयावर कॉ. ढोले व कॉ. ढुमणे या कम्युनिष्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रथम शेतमजुरांना संघटित करण्यास सुरूवात केली. शेतमजुरांना शेतीवर दिवसभर काम केल्यानंतर जे मजूरीचे पैसे मिळतात ते शेतमजूराने घेतल्यावर त्याचे व मालकाचे काही संबंध राहत नाही. शेतमजूराने मजूरी घेतल्यावर त्यांची कोणतीही जबाबदारी मालक घेत नव्हते. शेतमजूरामध्ये असलेले अज्ञान व दारिद्रयामुळे हा कामगार वर्ग संघटित झालेला दिसत नाही. त्यामुळे शेतमजूरांची आर्थिक स्थिती, हलाखीची राहिली आहे. शेतमजूर कुटुंबाकडे शेती किंवा शेतीचा तुकडाही नव्हता. या सर्व शेतमजूर कुटुंबाना आपल्या उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याच्या म्हणजे मालकाच्या जमिनीवर कष्ट करावे लागत होते. शेतमजूरांचा प्रश्न हा ग्रामीण जीवनातील बेकारी व अर्धबेकारीच्याच प्रश्नाचाच भाग होता. हया कारणांमुळेच शेतमजूराला कर्ज घेण्याशिवाय पर्याय नव्हता. कर्जाची परतफेड न करू शकल्यामुळे लहान शेतकरी आपल्या जमिनीची मालकी गमावून बसत होता. शेतमजूरांचे उत्पन्न इतके कमी होते की, प्रयत्न करूनही कर्जाच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडू शकत

नव्हता. भारतामध्ये वर्षातून काही महिने काम मिळत होते. चांगले जीवन जगण्यासाठी वाटेल तेवढे कष्ट करण्याची तयारी असतानाही वर्षातील काही महिने काम मिळत होते. ''कॉ. भि.र.बावके यांचे कम्युनिष्ट पक्षाशी संबंधित असलेल्या शेतमजूर चळवळीशी सन १९५५—५६ पासून संबंध आले. कोपरगांव तालुक्यात शेतमजूर चळवळीचा विस्तार करण्यामध्ये त्यांच्या पुढाकार होता.''[२६] त्यामुळे शेतमजूर चळवळीला चांगले स्वरूप प्राप्त झाले होते.

भारतामध्ये व विशेषत: महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार झाला परंतु शहरामध्ये ग्रामीण भागात बहुसंख्य स्त्री शेतमजूर आणि पुरूष शेतमजूर निरक्षर व अज्ञानी आहेत. शेतमजूर प्राप्त परिस्थितीमध्ये आपले समाधान मानून घेतात. शेतमालकाकडून अन्याय होत होता. मात्र त्या अन्यायाची जाणीव शेतमजूरांना नव्हती. त्यांच्यावरील अन्याय समाजासमोर येणे आवश्यक होते. त्यासाठी एकत्रित संघटन होणे फार महत्वाचे होते. त्यात कॉ. भि.र.बावके व इतर सहकार्यांना यश आले. ''अहमदनगर जिल्हा शेतमजूर युनियन इ.स. १९६५ मध्ये रजिस्टर्ड झाली. बोनस, पगारवाढ या मागण्यावर मार्च १९९६ मध्ये कृषी संशोधन केंद्र सावळीविहिर व के.बी. फार्म शिंगवे येथे १५ दिवस संप केला.''[२७] शेतमजूरांनी बोनस व पगारवाढीसाठी हा संप केला होता. शेतमजूरांनी मॅनेजरला ६ तास घेराव घातला होता. महाराष्ट्रातील कामगार चळवळीतील हा पहिला घेराव होता. हा संप यशस्वी ठरला होता. बडया बागाईतदार शेतकऱ्यांकडून जमिनी घेऊन त्या जमिनींचे शेतमजूरात फेरवाटप झाले पाहिजे. या मागणीसाठी कोरपगाव व श्रीरामपूर तालुक्यात संघटित झाले. उच्च बागायतदारांच्या विरोधात उभे राहण्यासाठी २६ जानेवारी १९६८ ला कोपरगाव येथे शेतमजुरांचे पहिले अधिवेशन झाले. शेजमजूर संघटित करण्यासाठी कॉ. भि.र.बावके, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. बापूसाहेब भापकर, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. भास्करराव जाधव इत्यादींची भाषणे अधिवेशनात झाली होती. कोपरगाव शहरातून पहिल्यांदा दोन हजारापर्यंत शेतमजूरांची मिरवणूक निघाली होती. त्यामुळे शेतमजूर चळवळीत समाधानाचे वातावरण तयार झाले होते. अहमदनगर जिल्हयाच्या बागायत भागात वाढत असलेल्या चळवळीला

राज्यव्यापी पाठिंबा उभा करण्यासाठी भूमिहिन शेतमजूर, गरीब शेतकरी, परिषदेची स्थापना करून भारतीय कम्युनिष्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष, लाल निशाण पक्ष यांच्या पुढाकाराने ८ मार्च १९७० रोजी श्रीरामपूर येथे पहिले अधिवेशन घेण्यात आले. त्या अधिवेशनात सुमारे ८ ते १० हजार आदिवासी, गवळी, धनगर, शेतमजूर, गरीब शेतकरी उपस्थित होते. त्या परिषदेत कॉ. डांगे, कॉ. गोदावरी परूळेकर, कॉ. दत्ता देशमुख उपस्थित होते. 'ज्याच्या हाताला घट्टा—त्याचे नावे जमिनीचा पट्टा' अशी घोषणा या परिषदेत देण्यात आली होती.

इ.स. १९७१—७२ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गावोगावचा शेतमजूर, शेतकरी लाल बावटा हातात घेऊन रस्त्यावर आला. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे एस.टी.चा रास्ता रोको आयोजित केला होता. दुष्काळात चटके बसू नये व दुष्काळ निर्मुलनाचा मार्ग म्हणून नाला बंडिग, जमिनीचे सपाटीकरण, पाझरतलाव, ओवर फ्लो, पाणी साठविण्यासाठी टँक अशा मागण्या सरकारकडे केल्या होत्या. सरकारला दुष्काळग्रस्तांसाठी कार्यक्रम आखण्यास भाग पाडले त्यातूनच ६ मे १९७३ ला ऐतिहासिक १५ लाख दुष्काळी कामावरील शेतमजूरांचा संप झाला. त्या संपाला औद्योगिक कामगारांनी ही पाठिंबा दिला होता. या ऐतिहासिक आंदोलनातून रोजगार हमी योजना पुढे आली. दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी शेतमजूर व इतर कामगारांना कामे प्राधान्याने दयावी लागतील यावर सरकारमध्ये एकमत झाले होते. दुष्काळात कामे दिल्याशिवाय जनता शांत राहणार नाही. हे ही सरकारला कळून चूकले होते. ''इ.स. १९४८ साली झालेल्या कायदयाखाली शेतमजूर किमान वेतन १९७४ साली राज्यव्यापी प्रमाणावर प्रथम लागू करण्यात आले. रोजगार हमी कायदा करण्याचे निश्चित झाले. कायदयाने कामाचा हक्क मिळवून घेतला.''[२८] कामाचा हक्क मिळाल्याने कामगारांना काम दिल्याशिवाय सरकारकडे पर्याय उरला नव्हता परंतु कायदा होऊन सुद्धा कामगारांना कामे मिळत नव्हते. अहमदनगर जिल्हयातील शेतमजूर युनियनच्या वतीने रोजगार हमी कामगारांना कामे मिळावीत म्हणून श्रीरामपूर, राहूरी, कोपरगाव, नेवासा या तालुक्यात इ.स.

१९८६ साली सत्याग्रह केले होते. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी कोपरगावला येऊन काम देण्याची आश्वासन दिले त्यानुसार मुर्शतपूर, जेऊर, टाकळी येथील मजूरांच्या हाताला गावापासून चार ते पाच किलोमीटर अंतरावर कसलीही व्यवस्था नसताना नमुना नं. ७ मध्ये कामाला जाण्याचे हुकूम दिले होते. शेतमजूर कामगार प्रतिनिधी समक्ष जाऊन पाहिले असता तेथे ही काम शिल्लक नव्हते. कामाची काही व्यवस्थाही केली नव्हती. त्याविरूध्द शेतमजूर युनियनने महसूल आयुक्त नाशिक यांच्या कार्यालयासमोर अहमदनगर जिल्हयातील २०० शेतमजूर व शेतमजूर कामगार युनियन प्रतिनिधींनी ३ मार्च १९८६ ते ५ मार्च १९८६ पर्यंत धरणे आंदोलने केली होती. सरकार फक्त आश्वासने देत होती. मात्र कामे सुरू केली जात नव्हती.

महाराष्ट्र सरकार शेतमजूर कामगारांना फक्त आश्वासने देऊन चालढकल करीत होते. सरकारच्या धोरणाविरूध्द जिल्हयातील शेतमजूर युनियनच्यावतीने १५ एप्रिल १९८६ रोजी कोपरगाव, श्रीरामपूर, राहूरी या तीन तालुक्यातील मजूरांचा प्रश्न सुटला नाही. महाराष्ट्र राज्य शेतमजूर समन्वय समितीच्या वतीने १२ ते १५ मे १९८६ रोजी राज्यभर पुन्हा निदर्शने केली. तरीही सरकारच्या धोरणात बदल झाला नव्हता. त्यामुळे कामगार फार चिडले होते. आमदार जिल्हाधिकारी यांच्या लोणी येथील बैठकीवर जवळजवळ १००० हजार मजूरांनी निदर्शने केली. त्यावेळी जिल्हाधिकारी व कॉ. दत्ता देशमुख व शेतमजूर कामगार युनियनच्या शिष्टमंडळाने चर्चा केली. पंरतु चर्चेस काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे शेतमजूर कामगारांनी अधिकच आंदोलनात भाग घेऊन भव्य मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर नेला होता. सरकारने कामे सुरू केल्यावर शेतमजूरांना आपल्या कुटुंबाचे बिऱ्हाड शाळेच्या पटांगणात मांडावे लागले. शेतमजूर काम करून तीन आठवडे झाले तरी मजूरांना पगार नव्हता. मजूरांनी आंदोलन केल्यावर पगार देण्यात आला होता. ''दि. १/६/१९८७ रोजी राहुरी तालुक्यातील संक्रापूर, आंबी, दवणगाव, केसापूर येथील शेतमजूरांनी कामाची मागणी केली. कचेरीवर निदर्शने करून बाळासाहेब विखे समिती बरखास्त करावी अशी मागणी केली होती.''[२९] समितीवर शेतमजूर प्रतिनिधीला स्थान

दयावे. कायदयाप्रमाणे शेतमजूर कामे मिळावी, किमान वेतन कायदयाची अंमलबजावणी करावी यासाठी तीव्र आंदोलने केली होती.

केंद्र व राज्य सरकारच्या कामगार व कष्टकरी विरोधी धोरणाचा पाडाव करण्यासाठी अहमदनगर जिल्हयातील शेतमजूर युनियनने, कष्टकरी, कर्मचारी यांची एकजूट निर्माण केली व सरकारच्या विरोधात शांततेच्या मार्गाने आंदोलने करत होते. ''रविवार दि. १६ जानेवारी १९९३ रोजी दुपारी १२ वाजता नगरपालिका सभाग्रह अहमदनगर येथे शेतमजुर कामगारांची परिषद घेण्यात आली.''[३०] त्या परिषदेत शेतमजूरीवर चर्चा केली. शेतमजूरांची संख्या १ कोटी आहे तसेच रोजगार हमी योजनेत कामगारांना १९८८ पासून १२, १४, २८, २० असे किमान वेतन लागू आहे. मात्र विखे समितीने दोन वर्षांनी महागाई निर्देशांक ५० अंकांनी वाढल्यास किमान वेतनाची फेररचना करण्याची शिफारस केली होती. मात्र राज्य सरकारने वेतनात वाढ व खास भत्ता वाढविला नाही. यातून राज्य सरकारची शेतमजूराप्रती असहकार्यांची भूमिका पाहावयास मिळते. मोठमोठया बागायतदारांना सवलती दिल्या जातात. मात्र शेतमजूर कामगाराप्रती उदासीन दृष्टीकोन पाहावयास मिळतो. ग्रामिण भागात भांडवली शेतमालकाचा थर तयार झाला आहे. मात्र या थराने नवीन जमिनी विकत घेऊन आपली मालमत्ता वाढविली आहे. मध्यम शेतकरी व शेतमजूर यांना त्याने टाचेखाली दाबून टाकण्याचे काम करीत आहे. भांडवली विकास प्रक्रियेतील विकास सुध्दा कामगार, शेतमजूर आणि कष्टकरी शेतकरी यांच्या श्रमातून होत असतो. त्यांना शोषणातून मुक्त करण्यासाठी शेतमजूर कामगार चळवळ धडपड करीत आहे. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ही धडपड चालू आहे.

अहमदनगर जिल्हयाचे क्षेत्रफळ मोठे आहे. गावागावात शेतमजूर विखूरलेला असल्यास शेतमजूरांच्या हक्कासाठी तालुका जिल्हयापर्यंत मजबूत असल्यास शेतमजूरांच्या हक्कासाठी निश्चितच यश येईल. मात्र संघटनेत एकात्मतेचा अभाव दिसून येतो. त्यामुळे पूर्वीसारखे शेतमजुरांचे संघटन अहमदनगर जिल्हयात दिसत नाही. पोट भरण्यासाठी कामगारांचे शहराकडे स्थलांतर, दुष्काळामुळे शेतीवर काम न मिळणे अशा अनेक प्रश्नांमुळे शेत

मजूर संघटनेवर परिणाम झालेला आहे. यासर्व कारणांमुळे अहमदनगर जिल्हयामध्ये खंबीर नेतृत्वाचा अभाव आज संघटनेपुढे पाहावयास मिळतो.

अशाप्रकारे कामगार चळवळ यशस्वी होण्यासाठी चळवळीतील कामगारांना योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी पैशाची गरज आहे. संघटनेसाठी जो पैसा कमी पडतो त्यासाठी कामगार सभासद फी वाढवून भांडवल संघटनेने उभारले पाहिजे तरच कामगार संघटना टिकतील. संघटित कामगार चळवळीतील सर्वात मोठा अडथळा म्हणजे पक्षीय फाटाफुट होय. कामगार संघटनात राजकीय पक्षांचा हस्तक्षेप वाढलेला आहे. त्यामुळे त्या संघटना न राहता पक्षाच्या हातातील बाहुले बनल्या आहेत. त्यामुळे कामगारांमध्ये एकजूट ठेवण्यात अडचणी येत आहेत. त्यासाठी कामगार संघटनेने फुट टाळली पाहिजे. जेणेकरून संघटना मजबूत होईल. प्रत्येक क्षेत्रात एक संघटना असली तरच दबदबा राहतो. त्यासाठी कामगार संघटनांनी आपल्या पक्षाचे झेंडे बाजूला ठेवून कामगार चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे. कामावर शासन निर्णयाचा कोणताही वाईट परिणाम होणार नाही याची कामगार संघटनांनी काळजी घेतली पाहिजे. भविष्यात येणाऱ्या कोणत्याही आव्हानास कामगार संघटनांना समर्थपणे तोंड देता येईल असे सांगावेसे वाटते.

६) कचरा, प्लॅस्टीक, काच, पत्रा चळवळ :— माथाडी कामगार चळवळ यशस्वी होऊन अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अस्तित्वात आली. हमाल पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन असंघटीत कामगारांना संघटीत करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली. वास्तविक माथाडी कामगार आणि काच, पत्रा कष्टकरी हे दोन्हीही कामगार अतिशय हालाखीचे जीवन जगत होते. खेडयातून आलेला हमाल कामगार कोठेतरी झोपडीत राहत होता. काच, पत्रा, कचरा गोळा करणारा समाज मागास जातीचा आहे. हे लोक झोपडपट्टीत राहून कागद, काच, पञ्याचे भंगार गोळा करण्याचे काम करतात. ''देशातील औद्योगिक कामगार संघटित होऊन शतकाहून अधिक काळ लोटला. सरकारी कर्मचारीही संघटित झाले. मतांच्या राजकारणातून ऊस तोडणी मजूर, शेतमजूर संघटित केले. या कामगार संघटनाच्या बाहेर मोठया प्रमाणावर असंघटित

कामगारांचा वर्ग आहे. हे असंघटित कामगार दलित आहेत, कष्टकरी आहेत, अशा असंघटित वर्गापर्यंत जाण्यात कामगार संघटनांचा उपयोग आपल्या राजकारणातील अस्तित्व टिकविण्यासाठी असमर्थ ठरले आहेत.''[३१] झोपडपट्टीत राहणारा समाज हमाली करतो, कुणी हातगाडीवर काम करतो तर कुणी रोजंदारीने कामे करतो. काम करून पोट भरणे हा रोजचा दिनक्रम चालू असतो. मात्र कचरा, प्लॅस्टिक गोळा करीत फिरूनही पोटाला पोटभर मिळणे मुश्किल होते. शिवाय कचरा, प्लॅस्टिक गोळा करतानाही लोकांकडून खूप अन्याय, अत्याचार, चोरीचे आरोप होत असतात. काचपत्रा गोळा करणाऱ्या स्त्रियांना गुंडाकडूनही त्रास होतो. अशा असंघटित कामगारांना एकत्र आणणे हे काम सोपे नव्हते. काच, कचरा गोळा करणारे कामगार जिल्हाभर वेगवेगळया वसाहतीत राहतात. हे कामगार रोज वेगवेगळया परिसरात जाऊन काच, पत्रा गोळा करीत असतात. त्यांचे कामाचे ठिकाण ठरलेले नसल्याने एकत्र आणणे खूप जिकीरीचे होते. हमाल कामगारानाही वेगवेगळया ठिकाणी काम करावे लागत होते. त्यामुळेच संघटना स्थापन करणे अवघड जात होते. तसे पाहता दोन्हीही कामगारांची कामाची पध्दत वेगवेगळी होती. मात्र संघटनेची परिस्थिती सारखीच होती. संघटनाच नसल्याने आर्थिक व मानसिक शोषण त्यांचे होत होते. मात्र माथाडी कामगार चळवळीला गती प्राप्त होऊन संघटनेचे वारे वाहू लागले होते. माथाडी कामगारांच्या अन्यायाकडे कोणीच लक्ष देत नव्हते. हमाल कामगार हा जागृत झाल्याशिवाय अन्याय अत्याचार थांबणार नव्हते. संघर्ष केल्यामुळेच हमाल कामगारांची संघटना होऊ शकली.

हमाल कामगारांच्या संघटनेला डॉ. बाबा आढावांचे मार्गदर्शन मिळाले होते. संघटना स्थापण झाल्यास काच, पत्रा कामगारांच्या जीवनात काहीतरी बदल होईल असा ध्यास भाऊसाहेब उडाणशिवे यांनी घेतला होता. संघटनेच्या कामाची सुरूवात कशी करायची हा प्रश्न त्यांच्या पुढे होता. देवचक्के सर, नेहरू युवा केंद्राचे समन्वयक कोल्हे सर यांनी उडाणशिवे यांच्याकडे तक्रार केली की, भंगार वेचणाऱ्या स्त्रिया वाळत घातलेले कपडे चोरून नेतात. त्यावेळी उडाणशिवे यांनी खात्रीने सांगितले की, चोऱ्या करणारे असते तर ते

भंगार कशाला गोळा करतील? चोरी कोणीही करणार नाही. चोरी करणारे भंगार जमा करणारे नाहीत. हे त्यांनी ठामपणे सांगितले होते. संघटनेच्या माध्यमातून काही चांगले करता येईल आणि या वंचितांना दोन वेळेचे सुखाचे घास मिळतील. पुण्यात डॉ. बाबा आढावांनी खुप मोठा मोर्चा काढून त्यांचे अनेक प्रश्न येथील प्रशासनाच्या कानावर घातल्याने शासन खडबडून जागे झाले होते. उडाणशिवे यांना ही बातमी समजल्यावर अतिशय आनंद झाला होता. ते स्वत: नगरसेवक होते. मात्र तरीही त्यांची काच,पत्रा कामगारांविषयी तळमळ होती. पुण्याला भाऊसाहेब उडाणशिवे यांनी डॉ. बाबा आढावांना फोन केला होता. त्यांना डॉ. बाबा आढावांनी पुण्याला बोलावून घेतले. देवचक्के सर व कोल्हे साहेब त्यांच्याबरोबर गेले होते. ''कागद, काचपत्रा वेचणारे ४—५ जण व उडाणशिवे पुण्याला संघटनेच्या ऑफिसवर गेले. तेथे काचपत्रा वेचणाऱ्यांच्या व्यथा समजावून घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याची पध्दत समजावून घेतली.''[३२] डॉ. बाबा आढावांना अहमदनगरला कार्यक्रमांसाठी आंमत्रित करण्याचे ठरविले होते. त्यासाठी हमाल पंचायतीची मदत घेण्याचे ठरविले होते. डॉ. बाबा आढावांनी शंकरराव घुले, अप्पा कोरपे यांना भेटण्यास सांगितले होते.

संघटनेची कामे व कामाची पध्दत समजावून घेण्यासाठी डॉ. बाबा आढावांचे मार्गदर्शनानंतर काच, पत्रा कामगारांना एकत्र बोलविणे आवश्यक होते. अशा उपेक्षित कामगारांचे प्रबोधन होणे आवश्यक होते. मात्र हे कामगार जिल्हाभर विखुरलेले होते. त्यांना एकत्र करण्याचे ठरविले. ''चार—पाचशे लोकांचा मेळावा टिळकरोड मंगलकार्यालयात १९८८—८९ च्या सुमारास झाला. हया मेळाव्यात डॉ. बाबा आढाव, देवचक्के सर, कोल्हेसाहेब यांनी काच—पत्रा गोळा करणाऱ्या लोकांच्या समस्यांचा पाढा वाचला.''[३३] संघटना स्थापन करून कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत असे संघटनेचे नाव देण्यात आले. अशा परिस्थितीत अत्यंत उपेक्षित असलेल्या कष्टकऱ्यांची संघटना स्थापण्यात आली. आपल्या अस्तित्वाची जाणीव संघटना करून देऊ लागली. स्वांतञ्यसैनिक मनोहर देवचक्के, नेहरू युवा केंद्राचे भास्करराव कोल्हे, माजी नगरसेवक भाऊसाहेब उडानशिवे यांच्या प्रयत्नातून ही संघटना उभी राहिली होती.

भाऊसाहेब उडानशिवे यांना संघटनेचे अध्यक्ष करण्यात आले. डॉ. बाबा आढावांनी भाऊसाहेबांना प्रेरणा दिल्यामुळे संघटना अस्तित्वात येऊ शकली. संघटनेस ऐक्य टिकले पाहिजे. यावेळी भर देण्याचे ठरले. संघटना टिकविणे अवघड गोष्ट असते. संघटनेत स्वार्थपणा आला की आरोप प्रत्यारोप होतात. यासाठी सर्वांच्या सहमतीने निर्णय झाल्यास संघटनेची ताकद दिसून येते. भाऊसाहेब उडानशिवे यांच्याबरोबर आसाराम साबळे, रंगनाथ शिव लोंढे, विमल लोंढे, कौसा शिंदे, हिरा भारस्कर, सुमन घोरपडे, गिरजा उडानशिवे हेही आज संघटनेचे काम पाहत आहेत.

काच, पत्रा गोळा करणाऱ्या महिला पहाटेपासून पाठीवर गोणी किंवा पोते घेऊन कचरा प्लॅस्टिक गोळा करीत असतात. दिवसभरातील १२ तास वणवण फिरल्यानंतर सांयकाळी जमा होणारे भंगार व्यापाऱ्यांकडे जमा करतात. एवढे दिवसभर वणवण, फिरूनही त्यांना मोबदला अतिशय कमी मिळतो. त्यांच्या मुलांना शिक्षण देणे आवश्यक आहे. गरीबी दूर करण्यासाठी व मुलांवर संस्कार होण्यासाठी शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. त्यासाठी संघटना मुलांना शाळेकडे आणण्याकरिता प्रयत्न करीत आहे. त्या मुलांना शालेय उपयोगी साहित्य मिळविण्यासाठी दानशूर व्यक्तींकडून शालेय साहित्य, गणवेश उपलब्ध करून दिले जातात. संघटना विधायक कार्यासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे. काच, पत्रा कामगारांना भंगार गोळा करीत असताना त्यांच्यावर चोरीचे आरोप केले जातात. चोरीच्या संशयावरून पोलीस त्यांना अटक करतात त्यासाठी नगरपालिकेने ओळखपत्रे दयावीत अशी संघटनेने मागणी केली होती. या मागणीचा पाठपुरावा केल्यामुळे पालिकेने कष्टकऱ्यांना ओळखपत्रे देऊन प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. ''येथील कागद, काच, पत्रा गोळा करणाऱ्या २०३ महिला श्रमिकांना नगरपालिकेने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाचे औचित्य साधून ओळखपत्रे दिली.''[३४] तळागाळातील शेवटच्या माणसाला सुविधा व प्रतिष्ठा मिळणे हा भारतीय लोकशाहीचा विजय आहे असे पुण्याच्या कष्टकरी लोकशाहीचा विजय आहे असे पुण्याच्या कष्टकरी पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी सभागृहात सांगितले. महिलांनी य

ओळखपत्राचा उपयोग रेशनकार्डप्रमाणे करावा जेणेकरून पोलिसांकडून त्रास होणार नाही. श्रमिकांच्या चळवळीत राजकीय मात्र पक्ष योगदान देत नाहीत. मतदान, मोर्चा अथवा दहशतीसाठी त्यांची शक्ती वापरली जाते. त्यासाठी काच, पत्रा संघटनेने जनजागृती करणे आवश्यक आहे.

तळागाळातील शेवटच्या कष्टकरी माणसाला सुविधा व प्रतिष्ठा मिळणे हा भारतीय लोकशाहीचा विजय आहे. आजवर कष्टकऱ्यांना पत नाही. कष्टकऱ्यांना बरोबरच्या नात्याने वागविले जात नाही. ही माणसे देखील नवनिर्माणाचे काम करतात हे सरकारला पटवून दिले पाहिजे. अहमदनगर जिल्हयातील बहुसंख्य काच, पत्रा कष्टकरी संघटित असून त्यांचे संघटन जोमाने होत आहे. जीवापाड कष्ट करूनही जेमतेम रोजच्या भाकरीची सोय करू शकतात. कधीकधी तीही मिळत नाही. इतकी दयनिय अवस्थेत हे कामगार जीवन जगत आहेत. काच, पत्रा कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळाली पाहिजे. ही संघटनेची प्रमुख मागणी आहे. परंतु सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. म्हणूनच कष्टकरी न्याय हक्कांसाठी आंदोलनाच्या पाविऱ्यात होते. त्यांच्या आरोग्याचा प्रश्नही फार महत्वाचा होता. त्याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे. ''काच, पत्रा कष्टकरी आपल्या न्याय हक्कांसाठी बुधवार दि. १०/०३/२०१० रोजी रॅली काढून शासनाकडे दाद मागण्यात आली. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी व मनपाचे आयुक्त यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.''[३५] या रॅलीमध्ये कष्टकऱ्यांसाठी दवाखाना सुरू करावा, प्रा. फंड, विमा, सामाजिक सुरक्षा देणाऱ्या कल्याणकारी कायदयाची अमंलबजावणी कष्टकऱ्यांना माथाडी कामगार कायदा लागू करावा, दारिद्रय रेषेचे पिवळे कार्ड इत्यादी मागण्या करण्यात आल्या होत्या. ही रॅली यशस्वी करण्यासाठी रंगनाथ लोंढे, आसाराम साबळे, विमलबाई मंडलिक, मच्छिंद्र शेलार, भाऊसाहेब उडाणशिवे इ. असंख्य कष्टकरी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले होते.

रस्त्यावरील कागद वेचणारे, काच पत्रा गोळा करणारे कामगार पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी हातभार लावत आहे. कामगारांच्या कामाची दखल घेऊन अखिल भारतीय अधिवेशनासाठी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब

उडानशिवे यांच्यासह कष्टकरी लोकांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण मिळाले होते. ''अलायन्स ऑफ इंडियन वेस्टचिफर्स या संस्थेच्या श्रीमती लक्ष्मी नारायण यांनी हे निमंत्रण दिले होते. सेवा ॲकडमीस रूरल ट्रेनिंग सेंटर मनीपूर व्हिलेज सांनद तालुका अहमदाबाद येथे हे अधिवेशन २८ व २९ जानेवारी २०११ रोजी झाले.''[३६] जिल्हयातील संघटनेचे काम अनेक वर्षापासून सुरू झालेले असून या कामाची नोंद अखिल भारतीय पातळीवर घेतली असल्याने राष्ट्रीय व राज्यस्तरीय उपक्रमात नगर जिल्हयाचा समावेश झाला आहे. शहर व गावे स्वच्छ ठेवण्यासाठी हे काचपत्रा कामगार फार महत्वाची भूमिका बजावत आहेत. काम करून उदरनिर्वाह करणारे हे आर्थिक मागासलेले तर आहेच पण बहुसंख्य मागासवर्गीय समाजातील आढळतात. त्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने अधिवेशनात चर्चा घडवून आली. कचरागोळा करून तो कचरा रिसायकलिंगसाठी पाठविला जात आहे. या उदयोगात प्रत्यक्ष वेचणाऱ्यांचा कसा समावेश करता येईल याचा विचार झाला पाहिजे.

असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी विविध योजना राबविणे आवश्यक आहे. विविध धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यांना दारिद्रयरेषोखालील कार्ड, रेशनकार्ड, मतदान कार्ड, आधारकार्ड, आरोग्य विमा योजनांचा लाभ या कामगारापर्यंत पोहचला पाहिजे तरच हा कामगार दारिद्रयातून बाहेर येऊन चांगले जीवन जगू शकेल. यासाठी सरकारने सहकार्याची भूमिका घ्यायला हवी तरच कामगारांच्या जीवनात प्रकाश येईल असे सांगावेसे वाटते. संघटनेने या कामगारांसाठी आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. कचरा गोळा करणारे कामगार अस्वच्छ जागी जाऊन वस्तु गोळा करतात त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा फार मोठा प्रश्न उभा आहे. त्यांनी स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे तरच त्यांचे आरोग्य चांगले राहिले हे सांगावेसे वाटते.

७) इमारत व इतर बांधकाम कामगार चळवळ :—

देशात कंत्राटी कामगारांचे मोठया प्रमाणावर शोषण होत आहे. या कामगारांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. त्याना वर्षभर काम मिळेलच असे नाही. काम मिळाले नाही तर कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. त्यासाठी कामगारांना काम मिळाले पाहिजे. त्याचबरोबर काम करण्याच्या ठिकाणी सुरक्षितता लाभली पाहिजे. त्यांना कामाचा योग्य मोबदला मिळाला तरच त्यांची आर्थिक परिस्थिती उंचावेल. यासाठी कामगारांना एकत्र येणे खूप आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांचे मालकांकडून होणारे शोषण थांबणार नाही. त्यासाठी कामगारांमध्ये जनजागृती होणे खूप आवश्यक आहे. मालकांना सिमेंटच्या मोठमोठया इमारती बांधणारा कामगार मात्र स्वत: झोपडीत राहतो. हे चित्र कुठेतरी बदलले पाहिजे. कामगार एवढे कष्ट करूनही तो स्वत:चे घर घेऊ शकत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी कामगारांनी एकत्र आले पाहिजे. ''इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ अंतर्गत केंद्र सरकारने इमारत आणि इतर असंघटित बांधकाम मजूरांसाठी प्रत्येक राज्याचे बोर्ड स्थापन केले आहे.''[३७] मात्र अजूनही बांधकाम कामगारांना या अधिनियमांची माहिती नसल्याने कामगार सोयी सुविधांपासून वंचित राहिले आहे. बांधकाम कामगार या सोयी मिळण्यासाठी राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

देशात व महाराष्ट्र राज्यात खूप मोठया प्रमाणावर आज इमारती उभ्या राहत आहेत. त्या इमारती कामगारांच्या श्रमातून निर्माण होत आहेत. दिवसभर काबाड कष्ट करून उंच उंच इमारती उभारतो मात्र तोच कामगार सोयीसुविधापासून वंचित राहत आहे. अशा वंचित कामगारांना न्याय मिळणे आवश्यक आहे. ''देशात शेतमजुरानंतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या जवळपास ४ कोटीच्या आसपास आहे. या सर्व कामगारांसाठी शासनाने कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली असून कामगारांच्या कल्याणासाठी १ टक्के चा सेस कापला जातो. त्यातून हजारो कोटी रूपये कामगारांच्या कल्याणासाठी पडून आहेत.''[३८] केवळ बांधकाम सभासद नोंदणी नसल्याने ते कामगार सोयीसुविधापासून वंचित राहिला आहे. त्यासाठी कामगारात जागृती

होणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत सलंग्न होऊन इमारत व बांधकाम संघटना १४ डिसेंबर २०१४ रोजी रजिस्टर झाली आहे. संघटना रजिस्टर झाल्यापासून आजपर्यंत अहमदनगर जिल्हयातील ४००० कामगार सभासद झाले आहेत. सभासद नोंदणी मोहिम मोठया प्रमाणात हाती घेण्यात आली आहे. त्यांना शासनाच्या वेगवेगळया योजना समजावून सांगितल्या जात आहेत. त्यासाठी संघटनेचे कार्याध्यक्ष शंकरराव घुले, सरचिटणीस नंदू डहाणे, खनिजदार पोलस भिंगारदिवे, कॉ. बाबा आरगडे मार्गदर्शन करीत आहेत. शासन स्तरावर लोक जागृती नसल्याने इतके कामगार सवलतीपासून वंचित राहिला होता. मात्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमुळे कामगारांना चांगले दिवस आले आहेत.

अहमदनगर जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार संघटना स्थापन करून असंघटित कामगारांना सभासद करून घेण्याची मोहिम सुरू केली. त्यांना शासनाच्या वेगवेगळया योजना समजावून सांगितल्या. त्यामुळे कामगारांना संघटनेचे महत्व पटवु लागले. शासनस्तरावर लोक जागृती होत नसल्याने कामगार दूर्लक्षित राहिला आहे. मात्र अहमदनगर जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष शंकरराव घुले, अध्यक्ष बाबा आरगडे, सरचिटणीस नंदू डहाणे यांच्या पुढाकाराने संघटना जोमाने काम करीत आहे. जिल्हयातील कामगारांचे मेळावे घेऊन संघटनेने मोठया प्रमाणावर सभासद नोंदणी केलेली आहे. मेळाव्यात कामगारांना विमा योजनांचे मार्गदर्शन केल्याने कामगारही संघटनेकडे आकर्षित झाले आहेत. ''२६ मे २०१४ रोजी बांधकाम कामगारांना गृहोपयोगी वस्तू घेण्यासाठी प्रत्येकी ३०००/— रूपयेचे वाटप महाराष्ट्रात प्रथम जिल्हा संघटनेने वाटप करण्याचे काम केले. सदर रक्कम वाटल्यानंतर बांधकाम कामगारांना या योजनेची पूर्णत: खात्री झाली.''[३९] इमारत व इतर बांधकाम कामगार स्वत:हून सभासद होण्यास पुढाकार घेऊ लागले. सभासद नोंद केलेल्या कामगारांना कल्याणकारी मंडळाकडून पाच गृहोपयोगी वस्तु घेण्यासाठी अर्थसहाय्य मिळू लागले. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सर्वात मोठी योजना म्हणजे दोन लाख रूपयांपर्यंत

संपूर्ण कुटुंबासाठी आरोग्यविमा योजना अहमदनगर जिल्हयामध्ये प्रभावीपणे सुरू आहे. आजपर्यंत १ कोटीच्या जवळपास बांधकाम कामगारांच्या कुटुंबियावर खर्च झालेला आहे. हे संघटनेचे सर्वात मोठे यश आहे. या कल्याणकारी मंडळातर्फे बांधकाम कामगारांच्या पाल्यांना ६०० रू. ते ३५००० पर्यंत शिष्यवृत्ती मिळते. संघटना त्यासाठी कामगारांना मार्गदर्शन करीत आहे. कामगारांच्या पाल्यांना व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी व्यक्तिमत्व विकास संचाचे वाटपही संघटनेतर्फे केलेले आहे. या सर्व योजना देण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वात प्रथम अहमदनगर जिल्हा इमारत व इतर बांधकम कामगार संघटना अग्रेसर आहे.

अहमदनगर जिल्हयातील इमारत व इतर बांधकाम कामगारांना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबा आढाव नेहमी प्रयत्नशील असतात. त्यांच्या धडपडीमुळे व संघटनेच्या अथक प्रयत्नामुळे कामगारांची आर्थिक परिस्थिती उंचावण्यास हातभार लागलेला आहे. त्याचबरोबर जिल्हयाचे सहाय्यक कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ यांचेही मार्गदर्शन मिळत असल्याने दुर्लक्षित असलेल्या कामगारांना चांगले दिवस येऊ लागले आहेत. आज देशामध्ये असंघटित क्षेत्रात बांधकाम क्षेत्र हे सर्वात मोठे रोजगाराचे केंद्र आहे. एकूण लोकसंख्योच्या ४ कोटी लोक या क्षेत्रात काम करीत आहेत. त्यासाठी संघटनेचे पदाधिकारी दिवसरात्र उर्वरित बांधकाम कामगारांना जिल्हयातील उर्वरित बांधकाम कामगारांना त्यांना मिळणाऱ्या हक्काची जाणीव करून देत आहे. अशा कामगारांच्या आयुष्यातील अंधकार दूर करण्याचे काम संघटना करीत आहे. कामगारांच्या मुलांच्या पुढील आयुष्याला कलाटणी मिळाल्याशिवाय राहणार नाही. कामगारांच्या कुटुंबाची आर्थिक उन्नती निश्चितच झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र त्यासाठी राज्य सरकारशी जिल्हा संघटनेला फार सावध राहून त्यांच्या हक्कासाठी झगडाव लागेल. त्याशिवाय सहजासहजी कोणताही लाभ मिळू शकणार नाही हे सांगावेसे वाटते. इमारत व इतर बांधकाम कामगारांनी खूप धोकादायक इमारतीवर काम करावे लागते. काम करताना कधीही अपघात होऊ शकतो. त्यासाठी त्यांना विम्याचे संरक्षण सर्व कामगारांपर्यंत पोहचविण्यासाठी संघटनेने प्रयत्नशील राहिले पाहिजे, हे महत्वाचे आहे.

८) पथारी व्यावसायिक चळवळ :—

रस्त्यावरील विक्रेते हे देशातील असंघटित क्षेत्रातील अतिमहत्वाचा घटक आहे. देशातील प्रत्येक शहरात, तालुक्यात रस्त्यावरील विक्रेत्यांची संख्या खूप मोठी आहे. रस्त्यावरील विक्रेत्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या २ टक्के आहे. प्रत्येक शहरापासून मोठया गावापर्यंत रस्त्यावरील विक्रेत्यात महिलांचा सहभाग फार मोठा आहे. त्यातून लोकांना खूप मोठा रोजगार मिळत आहे. सरकार प्रत्येकाला नोकरी देऊ शकत नाही. त्यासाठी स्वत:चा धंदा करणे आजच्या काळात खूप आवश्यक झाले आहे. रस्त्यावरील वस्तूंची विक्री साधन नसून शहरी लोकसंख्येला परवडणाऱ्या किंमतीत सेवा पुरविणारे साधन बनले आहे. रस्त्यावरील विक्रेते म्हणजे जे लोक कमी शिकलेले, बेरोजगार, त्यांना नियमित उत्पन्न मिळणाऱ्या संघटित क्षेत्रात काम मिळत नाही. कुटुंबाची उपजिविका भागविण्यासाठी घाम गाळून पैसे मिळविण्याकडे कल दिसतो. मात्र वाढत्या लोकसंख्येमुळे रस्त्यावर बसणाऱ्या विक्रेत्यामुळे रहदारीला खूप त्रास होतो. रस्त्यावरील विक्रेते फुटपाथवर अतिक्रमण करत असत्याने येणाऱ्या जाणाऱ्यास त्रास होतो. मात्र रस्त्यावरील विक्रेते सामान्य माणसाला मौल्यवान सेवा पुरवितात, हे लक्षात घेतले जात नाही. फुटपाथवरील विक्रेते सामान्य माणसाला दररोजच्या जीवनात लागणाऱ्या वस्तु तुलनात्मकदृष्टया कमी किंमतीला देऊन त्यांच्या सुखसोयीमध्ये मोलाची भर घालत आहे. रस्त्यावरील विक्रेत्यांचे हितसंबंध व जनतेचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत. ''पथारी म्हणजे अशी व्यक्ती जी जनतेला वस्तू व सेवा रस्त्यावर देऊ करते, ज्यांना कायमस्वरूपी इमारत/बांधकाम नसते.''[४०] अशा व्यवसायात मुलभूत तीन प्रकार आहेत.

१) स्थिर, २) फेरीवाले, ३) अस्थिर.

स्थिर विक्रेते म्हणजे जे विशिष्ट जागेवर उदा. फुटपाथ, सार्वजनिक जागा, खाजगी जागा अशा ठिकाणी व्यवसाय करतात. फेरीवाले म्हणजे जे पायी फिरून त्यांचा माल विकून सेवा देतात. अस्थिर विक्रेत्यामध्ये जो जागोजागी सायकल किंवा हिंडून माल विकला जातो. चालत्या बसमध्ये किंवा लोकल आगगाडयामध्ये हा माल विकणाऱ्यांचा समावेश होतो.

भारतीय नागरिकाला राज्यघटनेने कोणताही व्यवसाय, धंदा, उद्योग, व्यापार करण्याची परवानगी दिली आहे. हा जनतेचा मुलभूत अधिकार आहे. जी व्यक्ती घाऊक बाजारामधून वस्तू विकत घेऊन किरकोळ पध्दतीने फेरी मारणारी व्यक्ती याच अधिकाराचा वापर करीत आहे. प्रत्येक फेरीवाल्याला कायमचे ठिकाण देणे अव्यवहार्य आहे. बहुसंख्य शहरात जागेचा व व्यापारी जागेचा कमालीचा तुटवडा आहे. त्यामुळे त्यांना वस्तूंची विक्री ठराविक वेळेत करावी लागते. रस्त्यावरील विक्रेते हे त्यांच्या स्वत:च्या उद्योगाचे, मर्यादित स्त्रोत व कष्ट यामुळे शहरी लोकांना सेवा पुरवून आपला उदरनिर्वाह करतात. रस्त्यावरील विक्रेते हे शासनाच्या बेरोजगारी व गरीबी विरूध्दच्या लढयात मदत करीत असतात. शासनाचे कर्तव्ये आहे की अति लहान उद्योजकांचा प्रामाणिकपणे उदरनिर्वाह करण्याचा हक्कचे संरक्षण करणे. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवर त्यांच्या योगदानास मान्यता मिळावयास हवी. व्यावसायिक एवढी सेवा देऊन सुद्धा त्यांच्या व्यवसायातील अडचणी कमी न होता वाढत आहेत. त्यासाठी पथारी व्यावसायिक पंचायत पुणे जिल्हा यांच्या मार्गदर्शनासाठी अहमदनगर जिल्हयात व्यावसायिकांना उभे करण्याचे काम हमाल पंचायतीचे अध्यक्ष मा. शंकरराव घुले, कार्याध्यक्ष कॉ. बाबा आरगडे, सरचिटणीस नंदू डहाणे करीत आहे. पथारी व्यावसायिक पंचायत अहमदनगर यांच्या वतीने स्थिर व अस्थिर पथारीवाले (फेरीवाले) यांची नोंदणी करण्याचे काम मोठया प्रमाणावर हातात घेतले आहे. अहमदनगर शाखेची स्थापना ३० जुलै २०१४ रोजी झाली आहे. ''इ.स. २००९ ला पथारी व्यावसायिकांच्या राष्ट्रीय हॉकर्स धोरण कायदा अंमलात आला आहे. हे काम डॉ. बाबा आढाव यांच्या प्रयत्नामुळे होऊ शकले. त्यामुळे पथारी वाल्यांना यापुढे व्यवसाय करण्यास सुलभ आणि सोपे जाणार आहे.''[४१] पोलिस खात्याकडून व अतिक्रमण विभागाकडून यापुढे व्यावसायिकांच्या समंती घेतल्याशिवाय कारवाई होणार नाही. त्यांना संरक्षण मिळण्याचा कायदा झाल्यामुळे व्यावसायिकामध्ये समाधानाचे वातावरण तयार झाले आहे. डॉ. बाबा आढाव यांच्या अथक प्रयत्नामुळेच हे सर्व होऊ शकले. त्यांच्या निर्णायक लढयास यश मिळाल्याने

अहमदनगर जिल्हयातही व्यावसायिकांना हक्काची संघटना तयार झाल्याने निश्चितच त्यांच्या भल्यासाठी जिल्हा संघटना प्रयत्नशील आहे.

केंद्रसरकारने रस्त्यावरील विक्रेत्यांबाबत २००९ चे राष्ट्रीय धोरण केलेले असून सर्व भाजी विक्रेते, हातगाडीवाले, फेरीवाले व ज्यांना स्वत:ची जागा नसताना रोडवर व्यवसाय करावा लागतो. अशा सर्व व्यावसायिकांना केंद्र सरकारने केलेल्या कायदयानुसार सर्व व्यावसायिकांचे सर्वेक्षण करून पुनर्वसन करण्याचे आदेश राज्य सरकारने आणि सुप्रिम कोर्टाने दिले आहेत. शहरातील व्यावसायिकांना पालिका जेणे करून त्यांच्यावर पोलिसांचा व अतिक्रमण विभागाची कारवाई होणार नाही. ''पथारी व्यावसायिकांसाठी तयार केलेल्या कायदयाकडे व संघटनेच्या मागणीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने पुढील मागण्यांसाठी ११/२/२०१५ रोजी धरणे आंदोलन महापालिकेसमोर करण्यात आले.''[४२] त्यात संघटनेने शहर फेरीवाला समितीमध्ये सदस्यत्व देण्यात यावे, पथविक्री नियंत्रण कायदा २०१४ ची काटेकोर अंमलबजावणी फेरीवाल्यावर कोणतीही कारवाई करू नये इ. मागण्या करण्यात आल्या होत्या. त्याचा गांभीर्याने विचार केला नाहीतर तीव्र आंदोलन करण्यात येईल असे अध्यक्ष शंकरराव घुले, कॉ. बाबा आरगडे, सरचिटणीस नंदू डहाणे यांनी सांगितले. पथारी व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न डोळयासमोर उभा राहिला. अतिक्रमण कारवायामुळे पथारी व्यावसायिकांचे धंदे बंद पडण्याची वेळ आली आहे. त्यासाठी शहरातील महापालिकांनी पथारी व्यावसायिकांना लायसन्स देणे खूप गरजेचे झाले आहे. तरच त्यांच्या व्यवसायात स्थिरता येईल. पथारी व्यावसायिकांना व्यवसाय करीत असताना आर्थिक लुटीलाही सामोरे जावे लागत आहे. शहरातील रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांकडून महापालिका दर दिवशी रू. १०/— घेते. केंद्र सरकारने उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री नियंत्रण कायदा २०१४ मंजूर केला असून त्याप्रमाणे महापालिकेने प्रथम जागा निश्चित करून व्यवसाय प्रमाणपत्र देणे बंधनकारक असतानाही लायसन्स दिलेले नाही. उलट व्यावसायिकावर अतिक्रमणाची कार्यवाही होते. ही पथारी व्यवसायिकांची हेळसांड आहे. त्यासाठी महापालिकेने मानवीदृष्टीकोनातून विचार करणे

आवश्यक झाले आहे. एकीकडे गरीबी हटाव नारा दयायचा तर दुसरीकडे गरीबांना त्रास दयायचा. हा अजब प्रकार चालू आहे. त्यासाठी राज्यसरकारनेही पथारी व्यावसायिकांच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. जेणे करून बेरोजगारांना हाताला काम मिळेल, त्यांची आर्थिक परिस्थिती उंचावेल हे महत्वाचे असल्याचे दिसून येते.

२.५ अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार चळवळीचा उदय :—

अहमदनगर जिल्हा हा ऐतिहासिकदृष्टया फार महत्त्वाचा आहे. या जिल्हयाने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत फार मोलाची भूमिका बजावली आहे. देशला स्वातंत्र्य मिळाल्यावर खऱ्या अर्थाने औद्योगिक विकासास गती मिळाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात मुंबईतील गिरणी कामगारांची भीषण पिळवणूक होत होती. त्याच काळात महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळीमुळे मुंबई ठाण्यात जागृतीचे वारे वाहू लागले होते. इ.स. १८७० मध्ये नारायण लोखंडे कापड गिरणीत स्टोअरकीपर म्हणून काम करू लागले होते. लोखंडे तरूण वयातच महात्मा फुले यांच्या विचारांने प्रभावित झाले. त्यामुळेच त्यांच्या मनात दलालांना विरोध आणि शोषणाला नकार ही भूमिका तयार झाली होती. त्यांनी कामगारांना संघटित करून बैठका घेण्यास सुरूवात केली. दिवसाचे १७ तास काम, कोणतीही सुट्टी नाही, निश्चित पगाराची हमी नसलेला कामगार वर्ग, लोखंडे यांना साथ देऊ लागला. समाजात कष्ट करणाऱ्या वर्गाची प्रतिष्ठा वाढली तरच समाज जीवन खऱ्या अर्थाने संपन्न होऊ शकेल. ''नारायण मेघाजी लोखंडे या कामगार नेत्याने मुंबईत इ.स. १८९० मध्ये गिरणी कामगारांची पहिली संघटना स्थापन केली.''[४३] संघटनेच्या पहिल्या सभेला साडेचार हजार कामगार उपस्थित होते. कामगारांच्या न्याय मागण्या पटत असूनही गिरणी मालकांच्या दबावामुळे सरकार कायदा करत नव्हते. पंरतु संघटनेमुळे मालक वर्गालाही नमावे लागले होते.

मुंबई हे देशातील प्रथम क्रमांकाचे औद्योगिक केंद्र होते. मात्र तरीही कामगार चळवळीला फारशी चालना मिळाली नव्हती. लोखंडे यांच्या पुढाकाराने

संघटना स्थापन झाल्यापासून अनेक कामगार संघटना वेगवेगळया क्षेत्रात स्थापन झाल्या. त्या संघटना औद्योगिक कामगारांशी निगडीत होत्या.

शारीरिक श्रमाची किंवा अंगमेहनतीची कामे करणारे व विखुरलेल्या अवस्थेत काम करणारा हमाल कामगार संघटित करणे खूप अवघड काम होते. मुंबईच्या कामगार क्षेत्रात अनेक कामगार नेते व कार्यकर्ते कामगारांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील होते. परंतु हमाल या कष्टकरी वर्गाकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले होते. त्याला कामगार नेतेही जबाबदार आहेत असे म्हणता येणार नाही. हमाल शहरातील लहान मोठया व्यापाऱ्यांकडे काम करीत असे. त्यावेळी हमालीचे काम व्यक्तीगत किंवा टोळी पध्दतीने चालत असे. एखादया ठिकाणी एक हमाल काम करतो तर काही ठिकाणी पूर्ण टोळी काम करीत होती. त्यामुळे सर्व हमाल एकत्र करणे फार जिकीरीचे होते. कामानिमित्त कामाच्या ठिकाणी सर्वांनी एकत्र येण्याची गरज भासत नव्हती. त्यामुळे कामगार नेत्यांना संघटना उभारण्याच्या वेळी अवघड वाटत होते. हमालामध्ये असणारे अज्ञान व निरक्षरता यामुळे संघटना स्थापण्यात अडचणी येत होत्या. त्यातच व्यापारी कामगारांची दिशाभूल करून कामगार पुढाऱ्यांविषयी चुकीची माहिती देत होते. हमालांनाही व्यापाऱ्यांनी सांगितलेले पटत होते. ''ज्याच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी संघटना बांधायची त्यांनाच त्या अन्यायाची जाणीव नव्हती''[४४] त्यामुळेच त्यांना संघटनेचे महत्त्व पटत नव्हते. हमाल संघटनेत येण्यास घाबरत होते. त्यामुळे अण्णासाहेब पाटील निराश झाले होते. माथाडी कामगारांची संघटनाच अस्तित्वात नव्हती. हमाल ज्या व्यापाऱ्यांकडे काम करीत त्या व्यापाऱ्यांला कामगाराचे नाव सुध्दा माहित नव्हते. व्यापारी गडी किंवा हमाल या नावानेच हाक मारीत.

दिवसभर हमाल कष्ट करून सुध्दा त्याला सन्मानाची वागणूक मिळत नव्हती. अण्णासाहेब पाटील यांनी पूर्ण विचार करून संघटना स्थापन करावयाची ठरविले. ''इ.स. १९६२ मध्ये अण्णासाहेब पाटलांनी संघटनेच्या स्थापनेची रितसर घोषणा केली.''[४५] त्यावेळी त्यांनी संघटनेला ''माथाडी कामगार संघटना'' असे नाव दिले. ''माथाडी' हा शब्द मुंबईत वापरला जात असे. माथाडी म्हणजे

माथ्यावरून ओझे वाहणारे होय. पंरतु ही व्याख्या आजच्या परिस्थितीत हमाली कामाची विविध रूपे किंवा प्रकार पाहताना ती अधिक व्यापक झाले आहे असे आपल्या लक्षात येईल. केवळ माथ्यावरून ओझे वाहणारे तेवढेच माथाडी कामगार नसून पाठीवरून पोती वाहणारे, हातावर पोट असणारे आणि अंगमेहनती कष्ट करणारे हे सर्वच माथाडी कामगार आहेत.

अहमदनगर जिल्हयामध्ये तालुक्याच्या ठिकाणी लहान मोठया बाजार पेठा होत्या. त्यामानाने अहमदनगर शहराची बाजारपेठ मोठी समजली जात असे. अहमदनगर शहरामध्ये धान्याचा बाजार गंजबाजारात असे. बदलत्या काळामध्ये हमाल कामगार वेगवेगळया बाजारपेठेत काम करत होते. भुसार मार्केट, कांदा, बटाटा मार्केट व त्याचबरोबर एस.टी. स्टँडवरही हमाल मोठया प्रमाणावर काम करीत होते. काम करून पोट भरविणे एवढाच त्यांचा नित्यनेम होता. वाढत्या औद्योगिकरणामुळे व प्रगतीच्या लाटेत शहरे बदलू लागली. तसे कामाच्या पध्दतीही बदलल्या. कोणत्याही प्रकारच्या उद्योग किंवा व्यवसायात वाहतुकीच्या साधनांना अनन्यसाधारण महत्व आहे. कच्च्या व पक्क्या मालाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने आण करणे हे प्रत्येक उद्योग तसेच व्यवसायाच्यादृष्टीने आवश्यक असते. वाहनामध्ये निरनिराळया प्रकारचा माल भरण्याचे किंवा उतरविण्याचे काम करणारी व्यक्ती म्हणजे हमाल होय. अशा अर्थाने माथाडी हा शब्द प्रचलित झालेला आहे. शारीरिक कष्टाची कामे करणारे हमाल मोठया शहराप्रमाणेच अन्न—धान्य, कापड, औषध, भाजीपाला, दूध, किराणा, लोखंड, लाकूड, सिमेंट, रासायनिक खते इ. विविध प्रकारच्या वस्तूंच्या वितरणात हमाल या कामगाराचे श्रम कारणी लागलेले असतात. त्यामुळेच त्या वस्तू सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचू शकतात.

अहमदनगर शहरातील मार्केट १९६२ च्या काळात नवीन जागेत आले होते. नवीन जागेत येण्यासाठी जुने आडते उत्सुक नव्हते. मात्र नवीन जागेत आल्याने हमाल कामगारांच्या दृष्टीने सोयीचे झाले. मात्र हमाल कामगारामध्ये अज्ञान व एकोपा नसल्याने हमाल कामगारावर खूप अन्याय, अत्याचार होत होते. हमालीत कोणत्याही प्रकारची वाढ नव्हती. हमाली वाढविण्यासाठी संप

केला तर कामगार फोडले जात होते. त्यामुळे एकूणच बाजारात अनागोंदीचा कारभार व्यापारी व बाजार समिती यांचा चालू होता. ''सन १९६२—६३ मध्ये संघटनेचे दप्तर बापूसाहेब भापकर व मधुकर कात्रे या कामगार नेत्यांना देऊन त्यांच्यामार्फत संघटन केले.''[४६] त्या अगोदर हे अप्पा कोरपे व इतर हमाल कार्यकर्ते नेतृत्व करत होते. मात्र त्यांना फारशी दाद व्यापारी देत नव्हते. संप वारंवार होत होते मात्र व्यापारी संप फोडण्याचे काम करत होते. हमाल कामगारांची फार केविलवाणी अवस्था झाली होती. हमाल कामगारास कोणी वाली नव्हता. त्यामुळे इतके दिवस हा कामगारवर्ग दुर्लक्षित राहिला.

२.६ माथाडी कामगारांची आर्थिक परिस्थिती :—

अहमदनगर जिल्हा हा हमालांच्या कष्टावर मालांची वितरण व्यवस्था केविलवाणी होती. त्याचे कारण त्यांना मिळणारे वेतन नव्हे तर मजूरी अगदी तुटपुंज्या स्वरूपाची होती. १९३५ च्या दरम्यान नारळाची पोती ट्रकमध्ये चढविण्याची मजुरी फक्त चार आणे होती. इ.स. १९५४—५५ साली शेतकऱ्यांचा माल गाडीतून उतरवून थप्पी मारून लिलावानंतर काटयावर ठेवणे एवढया कामाचे चार आणे मजूरी मिळत होती. हमालांना मिळणाऱ्या मजूरीची ही अवस्था असल्याने त्यांना जीवनाश्यक गरजा भागविणे अडचणीचे ठरत होते. पंरतु त्या हमाल कामगारांकडे पाहण्यास कोणालाच वेळ नव्हता. हमाल हा दुर्लक्षित घटक होता. श्रमिक कामगारांच्या पिळवणूकीचे आणि भांडवलदारांच्या अर्थव्यवस्थेचे विदारक चित्र आपल्या लेखनीतून अण्णाभाऊ साठे मांडत अण्णाभाऊ म्हणतात, ''ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलित श्रमिक कामगारांच्या तळहातावर तरली आहे.''[४७] हे वचन वाचताना व ऐकताना कष्टकऱ्यांची छाती फुगल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक कष्टकरी किती महत्वाचा असून सुध्दा आपल्या देशात कामगारांच्या व्यवस्थेबद्दल आणि सरकारच्या व समाजाच्या अनास्थेबद्दल खेद वाटतो. कामगारांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारणे आवश्यक आहे. हे सर्वजण बोलू दाखवितात. पंरतु कोणीही प्रामाणिकपणे काम करताना दिसत नाही. कामगारांच्या श्रमाला प्रतिष्ठा

मिळाली पाहिजे. त्याला समाजात ताठ मानेने उभे राहता आले पाहिजे. त्याशिवाय तो समाजात सक्षमपणे उभा राहणार नाही.

नवीन विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी श्रमाचे महत्व दिवसेंदिवस कमी होऊ लागले आहे. यंत्रमानव निर्मितीने भरभराट व समृद्धीच्या नावाखाली विषमतेला खतपाणी घातले जात आहे. समतेला नकार दिला जात आहे. भारतीय समाज वर्णनांच्या बंधनात अडकलेला आहे. या वर्णजाती विषमतेत अडकलेल्या पाहावयास मिळतात. केवळ श्रमविभागणीच्या तत्वावर जाती व्यवस्था चालते ही गोष्ट खरी नाही. भारतातील धनिक वर्ग या सनातनी वृत्तीचा फायदा घेऊन कामगारांचे शोषण करीत आहे. ठेकेदारी हा एका प्रांतातून दुसऱ्या प्रातांत कामगार घेऊन कामगारांना व्यापाऱ्यांच्या पर्यायाने मालकांच्या दावनीला बांधतात. कामगारांनी संघटित होऊ नये. त्यासाठी मोठमोठया शहरातून गुंडाच्या नावाखाली विविध मजूर सहकारी संस्था हमाल कामगारांचे मोठया प्रमाणावर शोषण करीत आहेत.

काही मजूरांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी संपाचे हत्यार उपसल्यास भाडोत्री हमाल आणण्याची मुभा कंत्राटी कायदयात असेल तोपर्यंत मजूरांना संरक्षण मिळणे अशक्य आहे. ठेकेदार मूळ मालकाची इमानेइतबारे सेवा करत राहतील व कामगारांचे शोषण करीत राहतील.''या ठेकेदारी पध्दतीचा वापर शासकीय धान्य, गोदामे, वखार महामंडळ येथे मोठया प्रमाणावर होत आहे.''[४८] त्याक्षेत्रात आजही मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. हमाली व वाहतुकीची कामे एकत्रित दिली जातात. त्यामुळे कमी मजूरीत हमालांना राबवून घेतले जाते. अशा प्रवृत्तीमुळे खऱ्या अर्थाने हमाल कामगारांची आर्थिक परिस्थिती दोलायमान झाली आहे. अशा प्रवृत्ती थांबविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. हमाल माथाडी कामगारांच्या आर्थिक परिस्थितीमुळेच त्यांचे मुले शिक्षणापासून वंचित राहिली आहे. उलट अपवाद म्हणून एखादया हमाल कामगाराने आपली मुले शाळेत घातली तर आश्चर्याची बाब ठरत होती. रोच्या गरजा भागविणे मुश्किल होत होते. शिक्षणासाठी पैसा कोठून आणायचा हा प्रश्न हमाल कामगारांपुढे उभा होता.

हमाल कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची अवस्थाही फारशी वेगळी नव्हती. हातात पैसा शिल्लक राहत नसल्याने इतर गरजा पूर्ण करणे मुश्किल होत होते. कामगारांच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती आजारी पडली तर तिच्या औषधोपचारासाठी पैसा खर्च करणे हमालाला शक्य होत नव्हते. औषधावर पैसा खर्च केला तर त्यांचे महिन्याचे संपूर्ण आर्थिक नियोजनच कोलमडून जात होते. एकीकडे पोट भरण्याचा प्रश्न डोळयासमोर उभा राहत होता. त्यामुळे खूप अडचणींना तोंड दयावे लागत होते. मालकाकडून किंवा व्यापाऱ्यांकडून वैद्यकीय कारणांसाठी मदत मिळण्याचा प्रकार प्रचलित नव्हता. घरात लग्नकार्य किंवा एखादी व्यक्ती गंभीररित्या आजारी पडली तर अशावेळी खूप मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहत होता. ''पैशाची गरज भागविण्यासाठी सावकाराकडून किंवा गावातील एखादया धन दांडग्याकडून पठानी व्याजाने कर्ज घेण्याशिवाय हमालांपुढे दुसरा पर्यायच नसायचा.''[४९] हमाल कामगारांना त्यांच्याकडे पाहून पैसे मिळणे फार अवघड काम होते. पैसे दिल्यावर पुन्हा परत मिळतील याची शाश्वती नव्हती. म्हणून समाज हमालांकडे संशयाने पाहत होता.

हमालांकडून महिल्याला जेवढे दिवस काम केले जायचे तेवढयाच दिवसाची त्यास मजूरी मिळत असे. महिन्याच्या ठराविक वेतनाची हमालांनी कधी कल्पनाच केली नव्हती. काही हमाल कामगार रोजंदारीवर काम करीत होते. त्यामुळे ज्यादिवशी काम मिळत नसे त्यादिवशी बेकरी म्हणून बसण्याशिवाय पर्यायच नव्हता. प्रत्येक ठिकाणाच्या कामाचे स्वरूप भिन्न असे. मात्र कोणतेही काम केले तरी त्यात शारीरिक कष्ट होतेच. हा त्यामधील एकमेव समान धागा होता. खरेतर हमालांच्या श्रमावरच मालाची ने आण अवलंबून आहे. हमालांच्या असहकार्यामुळे धनिकांच्या नाडया आवळल्या जाऊ शकतात. पंरतु या सामर्थ्याची जाणीव अशिक्षित हमालांना मात्र झाली नव्हती. हमालांच्या घरी अठराविश्व दारिद्रय आहे. त्या दारिद्रयावर मात करण्यासाठी पैसा आवश्यक आहे. पैसा कमविण्यासाठी हमाली करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

अहमदनगर शहरात कामगारांना भेडसावणारा आणखी एक प्रश्न म्हणजे निवाऱ्याची सोय. शहरात कामधंदा व रोजगार मिळण्याच्या आशेने रोजच लोकांचे लोंढे येत असतात. अशा अफाट लोकसंख्येच्या व कमालीच्या गर्दीच्या अहमदनगर शहरात हमालांना राहण्यासाठी जागा मिळणे अवघड झाले होते. ''हमाल हा समाजातील आर्थिकदृष्टया एक दुर्बल घटक असल्याने त्यांना अशा ठिकाणी राहण्याची वेळ यावी हे स्वाभाविक होते.''[५०] कामाच्या ठिकाणी आर्थिकदृष्टया त्यातल्या त्यात सुस्थितीत असलेल्या मध्यमवर्गीयांना सुध्दा अशा गर्दीच्या वस्तीत राहण्याशिवाय पर्यायच उरला नाही. व्यापाऱ्यांच्या दुकानात, गोदामात, चाळीच्या गॅलरीत किंवा फूटपाथवर राहणाऱ्या हमालांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. हमाल कामगारांना आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे बरेचसे हमाल दुकानात किंवा गोदामात राहणे पसंद करीत. हमाल स्वत:चे घर घेवू शकत नव्हता किंवा भाडे ही देऊ शकत नव्हता. गोदामात अडगळीच्या ठिकाणी राहून तेथेच मुक्काम करीत होता. त्यातील काही हमाल आर्थिक परिस्थिती ठिक नसल्यामुळे झोपडपट्टीत राहत होते. माणसाच्या जीवनमानाचा दर्जा किती कनिष्ठ असू शकतो हे त्याचे चालते बोलते उदाहरण होते. पावसाळयात झोपडपट्टीत हमाल रात्रीची झोप घेऊ शकत नव्हते. पावसाचे पाणी झोपडीत शिरत होते. सकाळी उठल्यापासून ज्या शरीराने बोजा वाहण्याचे जीवापाड श्रम केलेले असतात ते शरीर विश्रांतीसाठी टाहो फोडत असे. त्यामुळे बाकीच्या गैरसोयीची हमालांना फारशी जाणीव होत नव्हती. जमिनीवर अंग टाकल्याबरोबर झोप लागत होती. 'त्यांना ना निद्रानाशाचा विकार ना झोपेच्या गोळीची गरज' लागत होती.

सकाळी उठल्यापासून रात्री उशिरापर्यंत काबाडकष्ट करणाऱ्या हमाल कामगारास पोटभर अन्न मिळणेही अडचणीचे ठरत होते. चप्पल घालून काम करणारा हमाल दुर्मिळच होता. बहुतांश हमालांना बनियन व हाफपँट यावरच दिवसभर काम करावे लागत होते. त्यात पोटाला पोटभर अन्न मिळाले नाही तर त्याचा कामावर परिणाम जाणवत होता. अशा स्थितीत त्यांना भूक मारण्यासाठी

चहा वारंवार घ्यावा लागात होता. पोटाला कितीही भूक लागली तरी जेवन वेळेला मिळणे फार अवघड होते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कष्ट करून सुध्दा बदलत नव्हती. अप्पा कोरपे हे हमाल आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबताना आढळतात. ''स्वत:ला देवऋषीचे ज्ञान जादूटोणा काही येत नसताना दारिद्रयामुळे रस्त्यात जादूगाराचे खेळ करणाऱ्या गावाकडील जादुगाराच्या संगतीत येतात.''[५१] वास्तविक पाहता अप्पा कोरपेंना काहीही येत नव्हते. तरीही ते जादूगाराच्या सांगण्यावरून त्या जादूच्या खेळात भाग घेऊन पुंगी बंद केल्याचे नाटक करतात. ताईत देणे, काविळीवर माळा देणे, करणी करणे इ. वर काम केल्याचे दिसते. अप्पा कोरपे यांनी अशी कामे केल्याने आसपासच्या लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसला होता. त्यामुळे अप्पा कोरपेंची आर्थिक कमाई वाढली होती. परंतु अल्पावधीत अप्पांनी चटकन दारिद्रय संपविण्यासाठी स्वीकारलेला खोटा मार्ग सोडून देतात. आपल्या पाठीवर पोतच योग्य आहे हे ठरवून पुन्हा प्रामाणिकपणे हमालीकडे वळतात. अंधश्रद्धा जोपासून कमी श्रमात पैसा मिळत होता. मात्र खोटया मार्गाने मिळणाऱ्या पैशाकडे अप्पांनी पाठ फिरविली. दारिद्रयातून सुटण्यासाठी पैसा कमविणे अपरिहार्य मानत असले तरी त्यासाठी कोणता मार्ग किंवा साधन वापरायचे याचे तारतम्य अप्पा कोरपेंकडे होते.

हमाल कामगारांची व्यापारी वर्गाकडून शारीरिक पिळवणूकीबरोबर आर्थिक पिळवणूकही होत होती. उलट दाद मागायला केले की काम गेले म्हणून समजायचे. तोंड दाबून बुक्यांचा मार हमाल कामगारांना सहन करावा लागत होता. परंतु अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निर्णायक लढा चालू होता.

संदर्भ सूची

१) अहमदनगर नगरपालिका शतसंवत्सारिक ग्रंथ १८५४ ते १९५४,पान नं.३

२) कित्ता पान नं. २

३) धर्माधिकारी स्वप्नील,आपला अहमदनगर जिल्हा,वेध प्रकाशन,पुणे,पाननं.१५

४) कित्ता पान नं. ७

५) कित्ता पान नं. १५

६) कॉ. पानसरे गोविंद अमृत महोत्सव समिती, संगमनेर अकोल्याची क्रांतिकारी परंपरा, पान नं. ९

७) कित्ता पान नं. ४४

८) धर्माधिकारी स्वप्नील, आपला अहमदनगर जिल्हा, वेद प्रकाशन, पुणे. पान नं. ३७.

९) दैनिक महाराष्ट्र टाईम्स्, १७ जानेवारी २०१४

१०) झेप, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर अमृत महोत्सवी वर्ष, १९९४ स्मरणिका, पान नं. ७

११) दैनिक महाराष्ट्र टाईम्स, १७ जानेवारी २०१४

१२) कॉ. पानसरे गोविंद, अमृत महोत्सव समिती, संगमनेर अकोल्याची क्रांतीकारी परंपरा, पान नं.

१३) खा. आठरेपाटील स्मरणिका, स्मृतीग्रंथ, पान नं. १६.

१४)कॉ. पानसरे गोविंद अमृत महोत्सव समिती, संगमनेर. अकोल्याची क्रांतिकारी परंपरा, पान नं. १६.

१५) पंडित नेहरू जन्मशताब्दीद्वारा, अहमदनगर वस्तूसंग्रहालय स्मरणिका १९८८—८९ पान नं. ३३

१६) साप्ताहिक युगांतर, दिवाळी अंक २०१०, पान नं. ४६.

१७) पानसरे गोविंद, अमृत महोत्सव समिती, संगमनेर अकोल्याची क्रांतीकारी परंपरा, पान नं. १०

१८) कित्ता पान नं. १४

१९) प्रा.डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ, एक राजकीय विश्लेषण,

शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर पान नं. १९८

२०) डॉ.दहातोंडे भि.ना. बापूसाहेब भापकर जीवन व कार्य,२००४,पान नं. ७

२१) कॉ. जाधव भास्कर्राव गौरवग्रंथ, मुक्तिवेध, १९९७ पान नं. ६०

२२) कित्ता पान नं. ३८.

२३) प्रा.डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ, एक राजकीय विश्लेषण,शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर, पान नं. १३७.

२४) कॉ. जाधव भास्कर्राव गौरव ग्रंथ, मुक्तीवेध १९९७ पान नं. २९

२५) प्रा.डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ एक राजकीय विश्लेषण, शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर पान नं. १९९.

२६) कॉ. लंघे वकिलराव गौरव विशेषांक दि. ५ डिसेंबर १९९५ पान नं. १६.

२७) डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ, एक राजकीय विश्लेषण, शब्दगंध प्रकाशन, अ.नगर पान नं. ७६.

२८) कॉ. लंघे वकिलराव गौरव विशेषांक ५ डिसेंबर १००५ पान नं. १७.

२९) प्रा.डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ — एक राजकीय विश्लेषण, शब्दगंध प्रकाशन, पान नं. ८१.

३०) कित्ता पान नं. ९०

३१) दैनिक लोकसत्ता, ७ जुलै १९९९

३२) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका, २०११ पान नं. ५४

३३) कित्ता, पान नं. ५४.

३४) दैनिक सकाळ, दि. ११ डिसेंबर २००२.

३५) दैनिक नवा मराठा, दि. १२/०३/२०१०

३६) दैनिक लोकआवाज, दि. १२/०३/२०१०

३७) इमारत व इतर बांधकाम कामगार, अधिनियम १९९६.

३८) दैनिक पुण्यनगरी, दि. ७ नोव्हेंबर, २०१४

३९) दैनिक पुण्यनगरी, दि. २७ मे, २०१४

४०) पथारी व्यवसायीक स्मरणिका, २०१४ पान नं. १३

४१) राष्ट्रीय हॉकर्स धोरण कायदा, २००९.

४२) परिपत्रक पथारी व्यवसायिक पंचायत, दि. १२/०२/२०१५

४३) पाटील व्ही.पी. दि. ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन, कराड, १९९८ पान नं. ७१.

४४) कित्ता पान नं. ७३

४५) कित्ता पान नं. ७४

४६) दैनिक सकाळ दि. १५/५/२००८

४७) डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता विशेषांक,जून १९९७पान नं. ३३

४८) कित्ता पान नं. ४

४९) पाटील व्ही.पी. दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील जयजगदीश प्रकाशन कराड, १९९८ पान नं. ५३.

५०) कित्ता पान नं. ५५

५१) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे. १९९२, पान नं. १९

प्रकरण तिसरे

माथाडी कामगार हक्कासाठी चळवळ

३.१ माथाडी कामगारामध्ये असलेला शिक्षणाचा अभाव

३.२ माथाडी कामगारांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन

३.३ माथाडी कामगार व व्यापारी यामधील संघर्ष

३.४ माथाडी कामगारावरील अत्याचार व शोषण

३.५ माथाडी कामगारामध्ये असलेला संघटनेचा अभाव

३.६ माथाडी कामगार चळवळीची विविध आंदोलने व संप

प्रकरण तिसरे

माथाडी कामगार हक्कासाठी चळवळ

अहमदनगर जिल्हा दुष्काळी म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो. खेडोपाडी पाण्याचा बारमाही तुटवडा होता. अशा परिस्थितीमुळे शेती पिकली जात नव्हती. कुटुंबाचा पोट भरण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. पोट भरण्यासाठी एका गावाहून दुसऱ्या गावाला जावे लागत होते. त्यातच हाताला रोजच काम मिळेल असे नाही. त्यामुळे उपासमारीची वेळ कुटुंबावर येत होती. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखिची असल्याने एका गावावरून दुसऱ्या गावाला कामासाठी जावे लागत होते. मुलांना शिक्षण मिळणे अवघड झाले होते. कमवायचे तेव्हा खायचे अशा परिस्थितीत शिक्षणाचा तर गंधच नाही. शिक्षण नसल्यामुळे कुटुंबाची दयनिय परिस्थिती निर्माण झाली होती. हमाल अडानी जीवन जगत असल्यामुळे आपल्याला येणाऱ्या अडचणी मुलांना येऊ नये असे हमाल कामगारांना प्रामाणिकपणे वाटते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने पोट भरण्याच्या उद्देशाने हमाली व्यवसाय नाईलाजाने स्वीकारलेला होता.

हमाल कामगारास समाजात खूप कमी लेखले जात होते. ग्रामीण भागात ज्या पध्दतीने मागास समाजाला वागविले जाते तशाच पध्दतीची वागणूक हमालांना मिळत होती. मात्र तरीही बुध्दीवादी समाज त्यांच्याकडे फारसा लक्ष देताना दिसत नाही. ''तुमचे कोणतेही काम असो, ते कागदावर तयार होते, कोणतीही योजना तिचा आराखडा बनविला जातो. परंतु तो प्रत्यक्षात आणण्यासाठी माझा कष्टकरी समाजच झिजतो की नाही?''[१] असे अहमदनगर हमाल पंचायतीचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव घुले प्रश्न उपस्थित करतात. रात्रंदिवस हमाल जगाचे ओझे वाहतो तरीही त्याची आर्थिक, सामाजिक परिस्थिती बदलण्यास तयार नाही. हमालांना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. महागाईच्या काळात अनेक अडचणींना हमालांना तोंड दयावे लागते. त्यांच्या कामाला योग्य मोबदला मिळत नसल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट होते. हमाल कामगारांना योग्य मोबदला व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अनेक आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो. आजच्या काळात मागितल्याशिवाय काही मिळत नाही. त्यांनाही वेळोवेळी संप करून संघर्ष करावा लागतो. त्यांना सवलती, हमालीत वाढ मिळत नव्हती. वर्षानुवर्षे

तेवढयाच मोबदल्यात हमाल कामगार घाम गाळत आहेत. परंतु समाज त्याकडे दुर्लक्ष करताना दिसतो. हमाल ही माणूस आहे, त्यालाही घर, संसार, बायको—मुले आहेत हे त्याकाळी व्यापाऱ्यांना विसर पडला असावा. चोविस तास व्यापाऱ्यांच्या दारात रखवालीचे काम करत होते. एवढे करूनही पुरेसा मोबदला दिला जात नव्हता. माणसाला माणसाने माणसाप्रमाणे वागविले पाहिजे. या गोष्टींचा जणू त्या व्यवस्थेत विसर पडलेला दिसतो. व्यापाऱ्यांकडून अन्याय, अत्याचार, शोषण खूप मोठया प्रमाणावर चालू होते. घरदार सोडून व्यापाऱ्यांच्या दावणीला बांधलेल्या बैलासारखी अवस्था त्याची झाली होती. मालकाने बैलाला चारा टाकला किंवा पाणी पाजले तरच पिण्याची वेळ येत होती. तशीच परिस्थिती बिचाऱ्या हमाल कामगारांवर आली होती. त्यासाठी कोणीतरी पुढाकार घेऊन आवाज उठवावा लागतो. त्यामागे इतरांची साथ असावी लागते तर कोणताही प्रश्न धसास नेता येतो. त्यासाठी कामगारामध्ये एकजूट असावी लागते. एकजूट असेल तर कितीही मोठे काम खूप सहजतेने होते. त्याचे महत्त्व त्यांना हळूहळू पटू लागले. एकदम कोणताही हमाल कामगार एकत्र येऊन संघर्ष करण्यास तयार होत नव्हता. ज्यावेळी एखादयावर अन्याय होतो तेव्हा दुसरा फक्त त्याकडे पाहत असतो. परंतु तो काही बोलत नाही. परंतु तीच वेळ आपल्यावर आली की, मग एकजूट किती महत्त्वाची आहे हे समजते. त्यासाठी आपण एकत्र आले तरच आपल्या अडीअडचणी सुटतील. अन्याय, अत्याचार कमी होतील. पर्यायाने थोडया दिवसात बंद होतील हे कामगारांना पटवू लागले. हळूहळू हमाल एकत्रित गोळा होऊन चर्चा करून एकमेकांचे विचार ऐकू लागले. तेव्हा कोठे त्याचे महत्त्व पटले. त्यातूनच खऱ्या अर्थाने लढयास मनाची तयारी होऊ लागली.

३.१ माथाडी कामगारामध्ये असलेला शिक्षणाचा अभाव :—

अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात दळणवळणाचा दृष्टीने मध्यभागी आहे. एकीकडे पुणे जिल्हा तर दुसरीकडे औरंगाबाद जिल्हा आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्हयाची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. येथील बाजार पेठा महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत. अहमदनगर शहर असो किंवा तालुके असो तेथील बाजारपेठा फार गजबजलेल्या दिसतात. बाजारपेठामध्ये रोज खूप मोठया प्रमाणावर मालाची ने आण चालू असते. त्या मालाची ने आण जरी मोठमोठया ट्रकातून होत असली तरी माल खाली करण्यासाठी हमालांची गरज पडतेच. माल चढ—उतार करण्यासाठी हमाल फार महत्त्वाचा घटक आहे. परंतु हा जो हमाल आहे तो आसपासच्या गावातून कामासाठी

बाजारपेठांमध्ये येत असतो. सर्वच हमाल सुशिक्षित असेलच असे नाही. हमाल निरक्षरही मोठया प्रमाणावर होते. काम हातास मिळणे हाच त्यांचा हेतू होता. माणूस जीवनात खडतर कष्टाने, जिद्दीने व संकल्पाने मोठा होतो. मोठा होत असताना त्याला गरीबीचे चटके बसतात. प्रसंगी त्याला अपमान व अवहेलना सहन कराव्या लागतात. एवढे करूनही निष्ठा त्यांच्या पदरी ठेवावीच लागते. अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या गरजा जीवनात पूर्ण करण्यासाठी माणूस पडेल ते काम करण्यास तयार होतो. पोटाची खळगी भरण्यासाठी हा सर्व काही आटापिटा चालू होता.

ग्रामीण भागातील बेरोजगार तरूण हाताला काम मिळण्यासाठी दिवसेंदिवस शहराकडे धाव घेत आहेत. दोन वेळचे अन्न मिळण्यासाठी धडपड चालू होती. एवढी धडपड करूनही कुटुंबाची केविलवाणी अवस्था होती. खेडेगावी शेती करण्यासाठी सर्व कुटुंबच राबत होते. कुंटुब मोठे असेल तर त्यांच्या सर्वांच्या गरजा भागविणे खूप जिकिरीचे ठरते. शेती थोडी असली किंवा चांगली पिकत नसल्यास खूप अडचणींना तोंड दयावे लागत होते. पर्यायाने कुंटुबाची आर्थिक परिस्थिती ढासळली होती. कुटुंबाला अनेक प्रश्नांना तोड दयावे लागत होते. घरात अठरा विश्व दारिद्रय असेल तर फारच कुटुंबाची कुंचबणा होते. मुलांना चांगले शिक्षण देता येत नाही. त्यातच एका ठिकाणी काम मिळण्याची शाश्वती नव्हती. काम मिळाले तरी ही पुरेशी मजूरी न मिळाल्याने मुलांना शिक्षण देणे अडचणीचे ठरत होते. कुटुंबातील लहान मुलांच्या गरजा पूर्ण करू शकत नसल्याने कुरबुर होते. त्यातच राहण्यासाठी नीटनेटके घर नसल्याने संसार रस्त्यावर मांडून आपला जीवन प्रवास हमाल कामगारांचा चालू होता. कुटुंबातील आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने बऱ्याच हमालांना शिकता आले नाही हे प्रकर्षाने जाणवते. ''त्यामुळे हमालांची मुले शिक्षणापासून वंचित राहिली तर त्यात नवल वाटण्यासारखे काहीच नव्हते.''[२] कुटुंबाची असणारी बेताची आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना चांगल्या प्रकारच्या सोयी सुविधा वेळेवर हमाल कामगार देऊ शकत नाही. त्यांना पोटभर अन्न वेळेवर देऊ शकत नाही. मुलांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा वेळेवर देऊ शकत नाही. तत्कालीन समाजात असणारी अंधश्रध्दा व निरक्षरता गरीबीस कारणीभूत ठरते. समाजात शिक्षणाचा प्रसार कमी झाल्याने लोक अंधश्रध्देकडे आकर्षित झालेले पाहावयास मिळतात. त्या ढोंगीपणामुळे समाजाचे फार मोठे नुकसान झालेले दिसते. भोंदूगिरीचा मार्ग स्वत:ची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अवलंबिलेला दिसतो. त्यासाठी शिक्षणाचा प्रसार हमाल

कामगारामध्ये होणे आवश्यक आहे. त्याबद्दल अप्पा कोरपे म्हणतात, ''हमाल म्हटला की त्याचा मेंदू सगळा गुडघ्यात त्याचा रक्तस्त्रावच वरती जात नसल्यामुळे तो लिहिण्याच्या कामात एकदम अडानी. दोन माणसाचं भागल हीच एक चिंता त्याला असते.''[३] हमालामध्ये असलेली निरक्षरता कारणीभूत आहे. जेवढी मजूरी मिळेल तेवढयावरच कुटुंबाची गुजराण चालू होती. त्यापलिकडे तो विचारच करत नव्हता. विचार करण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे हे प्रकर्षाने सांगावेसे वाटते. खेडेगावी अपुऱ्या असणाऱ्या शेतीवर संपूर्ण कुटुंबाची उपजिविका होणे अवघड जात होते. आई वडिल छोटे भाऊ असे कुटुंब मोठे होत होते मात्र मजुरी त्या पटीत वाढताना दिसत नाही. घरात कमविणारा एक व बाकीचे काम न करता खाणारे असतील तर कुटुंब चालविणे अडचणीचे ठरत होते. शेती करण्यासाठी काही माणसे गावी राहून बाकीचे लोक शहराकडे कामधंदा मिळविण्यासाठी आलेली आपणास पाहावयास मिळतात. शहरात आल्यावर त्यांनी कोठे राहायचे व काय खायचे हा प्रश्न उभा होतो. शहरात नवीन असल्याने ओळखीचे कोणी नव्हते. राहण्याची सोय करणे फार अडचणीचे ठरत होते. राहण्यासाठी कसाबसा निवारा मिळविल्यावरच तो निश्चिंत होतो. शहरातील मिळणाऱ्या कमाईतून उरलेले पैसे आपल्या गावाकडील माणसांना तो पाठवित होता. हमाल हा शरीराने धष्टपुष्ट होता. त्याला रोज जड ओझे उचलावे लागत होते.

अहमदनगर जिल्हयात बेताचा पाऊस पडत असल्याने पिकांची आवक ही बाजारपेठेत बेताचीच होते. काही कामगार बाजारपेठेत तर काही कारखान्यात, लोखंड, सिमेंट, रासायनिक खते इत्यादी विविध प्रकारच्या वस्तूंच्या वितरणात हमाल या व्यक्तीचे श्रम कारणी लागतात. गोडावून मधील काम म्हणजे हजारो पोत्यांची उलाढाल रोज होत असते. एखादा हमाल खूप चपळ असेल तर तो मालकाच्या मनामध्ये लवकर बसतो त्याला मालक अवघड काम नेहमी सांगत असतो. पोते उचलून थप्पीवर फेकणे फार अवघड काम होते. मात्र हमालांना ते रोजचे काम असल्याने करावेच लागते. ''एक लांबलचक फळी ती टाकायची नंतर पोत पाठीवर घेऊन शरीराचा तोल संभाळत त्या पस्तीस चाळीस पोत्यांची थरावर म्हणजे पाऊणशे फुटावर पोतं टाकावं लागतं.''[४] अशा प्रकारे साखरचे पोते असो किंवा इतर पोते थप्पीवर टाकावे लागत. पोते फळीवर नेत असताना शरीराचे संतुलन राखावे लागते. हमालामध्ये ते कौशल्य विकसित झालेले असते. मात्र हे कौशल्य सर्व हमालामध्ये

असेलच असे नाही. एवढे कष्टप्रद काम पण त्याला मोबदला मात्र फारचं कमी मिळत होता. कष्टाच्या व धोक्याच्या कामात वास्तविक पाहता मोबदला जास्त मिळणे अपेक्षित होते. हमालांचे कामच अवघड वस्तु उचलणे असल्याने ते केल्याशिवाय पर्याय नाही. हमाल कामगारांना पूर्वी वेळेचे बंधन नव्हते. चोवीस तास व्यापाऱ्यांच्या दारात उभे राहावे लागत होते. हमाल कामगारांना किती अडचणी असल्यातरी त्याला घरी जाता येत नसे. त्यामुळे वडिलांचा मुलांशी फारसा संपर्क राहत नव्हता. हमाल कामगार घरी येत नसल्याने आपले वडिल कोणते हे ओळखणे सुद्धा त्या मुलांना अवघड जात होते. तो हमाल कामगार घरी अधुनमधुन आला तरी त्यांची मुले झोपलेली असायची. सकाळी मुले उठण्याच्या अगोदर हमाल कामगाराला मार्केटला जावे लागे. मुलांशी फारसा संवाद नव्हताच असे म्हणावे लागेल.

आपल्याकडे असणाऱ्या पुरूषप्रधान संस्कृतीमुळे पुरूषांचे महत्व प्रत्येक घरात अनण्यसाधारण आहे. घरातील मुलांवर वडिलांचा वेगळाच धाक असतो. त्यामानाने आईचा मुलांवर फारसा वचक नसल्याने मुले वाईट मार्गाला लागत होती. मुलांचे निरक्षर प्रमाणही मोठे होते असे जाणवते. मुले वाईट मार्गाला लागल्यामुळे घरात शांतता, स्थैर्य फारसे जाणवत नव्हते. कुटुंबे व्यसनाच्या आहारी गेल्याचे जाणवते. दिवसेंदिवस हमालांमध्ये एकजुट व हक्कासाठी जागरूकता वाढल्यामुळे हळूहळू हमालांना घरी येता येऊ लागले. हमाल पंचायत स्थापन झाल्यामुळेच हमाल कामगारावरील बंधने हळूहळू सैल होऊ लागले. पर्यायाने हमालांना आपल्या कुटुंबाकडे लक्ष देता येऊ लागले. बदलत्या काळात शिक्षणाचे महत्व पटल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष देता येऊ लागले. आज मोठया प्रमाणात हमालांची मुले उच्चशिक्षण घेत आहे. बऱ्याच हमालांची मुले उच्चशिक्षण घेऊन मोठया पदावर काम करत आहे. ''नाथूमामा बुगे आता त्यांचे चागलं आहे त्याचा मुलगा वकिल आहे.''[५] हमालाचा मुलगा वकिल, पोलिस अधिकारी होऊ शकतात ही खऱ्या अर्थाने परिवर्तनाची नांदी आहे. त्याचबरोबर हमालांच्या मुलांना शिक्षणास माथाडी बोर्ड व माथाडी कामगारांची पतसंस्था प्रोत्साहन देत आहे. ''माथाडी कामगार पतसंस्थेतर्फे गुणवान पाल्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातात. इ. १२ वीत ७५ टक्के गुण मिळवून इंजिनियर, डॉक्टर, कॉम्प्युटर क्षेत्रासाठी प्रवेश घेतल्यास आर्थिक मदत दिली जाते.''[६] त्यासाठी माथाडी बोर्डाकडून हमालांच्या मुलांना मोफत वहयांचे वाटप केले जाते. त्यामुळे आज हमालांच्या घरात सुखाचे दिवस आले आहेत. मुले

शिकत असल्याने खऱ्या अर्थाने आज सन्मान व प्रतिष्ठा मिळू लागली. त्यासाठी जिल्हा हमाल पंचायत प्रोत्साहन देत आहे. पूर्वीच्या हमालात व आजच्या हमालात लक्षणीय फरक जाणवू लागला आहे. हमाल पंचायत स्थापण झाल्यामुळे हा बदल झाला हे ठामपणे म्हणावे लागेल. शिक्षणामुळे मुलांना संस्कार व चांगल्या सवयी लागल्या आहेत. आज समाजात शिक्षणामुळे हमालांची मुले ताठ मानेने जगत आहेत. आपल्या दारिद्रयाचा झालेला अन्यायाचा मोठयाने गळा काढून ते पाढा वाचत नाहीत. उलट धैर्याने, नीतिने, प्रमाणिकपणे जीवन संदर्भ लक्षात घेऊन अथकपणे प्रयत्न केले तर आजही समर्थपणे जगता येईल व इतरांना यथाशक्ती उभे करता येईल. यावर हमाल कामगारांची श्रद्धा आहे.

अशाप्रकारे अशिक्षित असलेला हमालवर्ग पुस्तकी ज्ञानाने, समृद्ध झाला नसला तरी व्यवहार ज्ञानाने फार समृद्ध झाला आहे. त्याने स्वत:च्या मुलांना चांगले शिक्षण दिल्याने आज तो समाजात ताठ मानेने जगत आहे. हे सर्व शिक्षणाने होऊ शकले. गरीबीच्या चटक्यामुळे शाळा जरी शिकता आली नसली तरी पोट भरयासाठी चोरीचा मार्ग न अवलंबता कष्टाने, हिमंतीने समाजापुढे उभे राहण्याची धमक निश्चितच कौतुकास्पद आहे. शिक्षण नाही म्हणून त्यापासुन अलिप्त न राहता आपल्या ताकदीवर व जिद्दीवर हमालांनी नेत्रदिपक प्रगती केली आहे हे ठामपणे सांगावेसे वाटते.

३.२ माथाडी कामगाराकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन :—

आपल्याकडे कामावरून त्याची श्रेष्ठ कनिष्ठता ठरत असल्याने हमाल वर्गाकडे समाजाचा पाहाण्याचा दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. आपल्याकडील जाती व्यवस्थेतील कामाच्या वाटपावरून समाज काही अंशी ओळखला जातो. काही कामे विशिष्ट समाजानेच केली पाहिजे हे पूर्वपार चालत आलेले आहे. ते आजही आपणास पाहावयास मिळते. हमालाला शिक्षण नाही, घर नाही, दार नाही अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये गाव सोडून मोठया शहरात येऊन उघडयावर संसार मांडून आपले जीवन जगत होता. शहरात आले म्हणजे दुसऱ्या व्यक्ती चोरी करतात तर काही अनैतिक धंदे करताना आढळतात. हमाली हा धंदा स्वीकारून एक प्रकारे शिक्षणावर त्यांनी मात केली. शिक्षण घेऊन सुध्दा आपण कोणता व्यवसाय करावा हे लवकर समजत नाही. त्यांच्याकडे शिक्षण नसतानाही चोरी करण्यापेक्षा हमाली केलेली बरी हा उद्दात्त हेतू ठेवून कष्टाने कमवून समाजापुढे हमालांनी आदर्श उभा

केला आहे. आज बहुतेक लोक कमी श्रमात गैरमार्गाने मोठे होण्याचा प्रयत्न करतात हे मात्र हमाल बांधवाना मान्य नाही. कष्टाने मिळून सन्मानाने जगण्याची वृत्ती खरोखरच अभिमानास्पद आहे. हमाल हा जगाचा भार वाहतो. ''हमाल म्हंजे ज्याला असं समजतो हा एक जगाचा भार पाठीवर घेऊन चालतो, असा एक मनाचा हेतू होतो आणि म्हणूशनि मी स्वत: महाल हे मला हमाल म्हणन्याची लाज वाटत न्हाई.''[७] असे ठामपणे अप्पा कोरपे सांगतात. हमाल या तीन शब्दांनी त्यांना पोटभर खायला दिले आणि सन्मानाने आयुष्यही जात आहे. हमाल शब्दाचा आज आम्हाला अभिमान वाटतो. हमाल आज एकमेकांच्या सहकार्याने कोणतेही अवघड काम पूर्ण करत आहे. हमालांचे जीवन हमालांचे राहणीमान, हमालांच्या खाण्याच्या सवयी, व्यसने हे जवळून पाहिल्यावर आपल्याला त्याच्या जीवनातील व सामान्य लोकांच्या जीवनातील फरक समजतो. हमाल वर्ग हा अंगमेहनती, कष्ट करणारा वर्ग आहे. आज या क्षेत्रामध्ये लाखो लोक काम करत आहेत.

हमालामध्येही चार प्रकार पडतात. हमालामध्ये पहिला वर्ग म्हणजे डोक्यावर किंवा पाठीवर ओझे उचलून टाकणारा कामगार वर्ग. या कामामध्ये घाम गाळूनच मोबदला मिळतो. पूर्वीच्या काळापासून पूर्ण पोते पाठीवर उचलण्याची पध्दत होती. त्या पोत्यात अठरा ते वीस पायल्या म्हणजे १ क्विंटलपेक्षा जास्त धान्य असे. एवढे ओझे उचलावे लागत होते. मात्र आजचा हमाल १ एप्रिल २०११ पासून ५० किलोपेक्षा जास्त बोजा उचलत नाही. ''हमालांच्या स्वास्थ्यासाठी १९४८ साली जागतिक श्रम संघटनेने ५० किलोपेक्षा जास्त बोजा माणसाच्या पाठीवर देऊ नये असा ठराव श्रम परिषदेत झाला होता.''[८] भारताने १९९९ साली या ठरावाचा स्वीकार केला तरीही गेली ११ वर्षे आपल्या देशात भांडवलदारांनी या ठरावाची अमंलबजावणी होऊ दिली नाही. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीने अनेक दिवसापासून पाठपुरावा केल्याने त्याला यश येऊ शकले. हमालामधील दुसरा वर्ग बैलगाडी चालविणारा वर्ग. त्या बैलगाडीत दहापोती उचलून गाडीत टाकलेली असतात. हमालच दहापोती उचलून थप्पी लावत असतो. त्याबद्दल अप्पा कोरपे हमालाबद्दल म्हणतात, ''म्हंजे बैलाबरोबर काम हा करतो आनि येवढा करूसनी त्यांच्या जीवनात काहीच अर्थ नाही बघा काय ? इळभर कष्ट करायचं.''[९] हमाल कामगार दिवसभर बैलासारखे काम करून पैसे कमवितात. परंतु सर्वच हमाल हे पैसे व्यवस्थित सांभाळून ठेवीत नाही. काही हमालांना असलेल्या वेगवेगळया व्यसनांमुळे

संध्याकाळपर्यंत बरेच पैसे खर्च झालेले असतात. तात्पर्य दिवसभर कष्ट करून सुद्धा पैसे घरापर्यंत नेताना दिसत नाही.

हमालामध्ये तिसरा वर्ग असा आहे की, बेडकासारखा हंगामापुरते काम करणे. हंगाम सुरू झाला की, तीनचाकी गाडी काढायची जेवढे मिळतील तेवढे पैसे खर्च करून टाकायचे. हंगाम संपला की काम बंद करत असे. ''जसं पाऊस पडला म्हंजी अशा बेडक्या व्हरडयात, तसा हा डरकतो निसता, आन तो सिझन संपला की, मालक त्याला इचारीत नाही, आन तो ही त्याला इचारित नाही.''[१०] अशाप्रकारे हंगमापुरते काम करण्याची पध्दती किंवा प्रवृत्ती काही कामगारामध्ये पाहावयास मिळते. हमालामध्ये चौथा वर्ग उंदरासारखे जीवन जगत आहे. मार्केटमध्ये जे धान्य मातीत सांडलेले आहे तो गोळा करणारा स्त्री कामगार वर्ग. त्या कामगाराला मजूरी मिळत नाही. दिवसभर पोत्यातील सांडलेले धान्य गोळा करणे व त्यावरच आपले आयुष्य काढत आहेत. चांगले धान्य नेण्याची त्यांना परवानगी नसते. मातीतील धान्य गोळा करून घरी घेऊन जातात. त्यांचे कुटुंबच त्यावर जगत असते.

हमाल कामगारामध्ये बहुतेक सर्व जातीतील कामगार काम करताना दिसतात. या व्यवसायामध्ये मराठा, महार, मांग, वंजारी, मुस्लिम अशा विविध जाती धर्माचे कामगार काम करताना आढळतात. मराठा २५ टक्के, माळी १० टक्के, वंजारी २५ टक्के, हरिजन ३० टक्के, मुस्लीम ५ टक्के व इतर मागास ५ टक्के आहेत. नेवासा, पाथर्डी, शेवगाव, कडा, आष्टी तालुक्यातील कामगार मोठया प्रमाणात आढळतात. गावाकडे वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे हा वर्ग हमाली व्यवसायाकडे वळलेला दिसतो. चोविस तासांची गुलामगिरी सोसणारा, पोत्यावर ठरलेल्या हमालीचा तो मालक होता. हमालामध्ये ताकद असते मात्र बुध्दी फारशी चालत नाही. आडमुठेपणा त्यांच्याजवळ जास्त होता. अंगात ताकद आणि अन्यायाविरूध्द चीड यामुळे त्याला राग आला की, भान राहत नाही. खूप खडतर आयुष्य हमाल वर्गाचे होते. हातातोंडाची गाठ पडण्यासाठी इतके काही करावे लागत असेल तर मरण काय वाईट आहे असा विचार हमाल कामगारामध्ये अनेकदा येतो. आशा कधी सोडली नाही व माणूसकीवरील विश्वास कमी होऊ दिला नाही. आजच्या गढूळ वातावरणातही हमाल तितक्याच ताकदीने उभा आहे. प्रत्येक हमालाचे दु:ख एकसारखे आहे. कष्ट व दु:ख कमी करण्यासाठी धडपड चालू होती. हमालांना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगावे लागत होते. शिक्षणाशिवाय समाज सुसंस्कृत, ज्ञानी होत नाही. समाज ज्ञानी

झाल्याशिवाय सुधारणा, समृद्धी आणि समाधान मिळत नाही. भाकरीच्या शोधात हमालीचा व्यवसाय करताना कुठलीही मोठी अपेक्षा करत नाही, कष्टकरी लोकांना एकत्र करून त्यांचे जीवन घडविणे महत्वाचे होते. जिल्हयामध्ये हमालांना कोणी पुढारी साथ देत नव्हते. हे इतर हमाल कार्यकर्त्यांनी ओळखले होते. हमाल कामगारांना वाली कोणीच नाही. आयुष्य असेच कष्ट करीत जाईल याची हमाल कामगारांना जाणीव होऊ लागली होती. ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता हमालास पोटाची खळगी भरण्यासाठी हमाली करावीच लागते. हे सुर्यप्रकाशाइतके सत्य कोणीही नाकारू शकणार नाही. हमालांकडे 'ओझे वाहणारा' अशा तुच्छ भावनेने समाज पाहत असतो. पंरतु तो ही माणूस आहे. याकडे कोणी लक्ष देत नव्हते. उपेक्षित हमालांना समाजात पतप्रतिष्ठा प्राप्त करून देणे महत्वाचे आहे.

महाराष्ट्रामध्ये जवळजवळ हमालापेक्षा चौथ्या हिश्यांना राखणदार वर्ग आहे. कुठल्याही प्रकारच्या उद्योंग धंदयामध्ये सुरक्षा ही महत्वाची आहे. खाजगी कंपन्या, दवाखाने, बँक, टोलनाके, देवस्थाने, शैक्षणिक संस्था, सरकारी महामंडळे, मार्केटकमिटया, एम.आय.डी.सी.तील छोटी मोठे कारखाने इत्यादी ठिकाणी आपणास डोक्यावर टोपी घालून दिवसरात्र राखण करत असतात. एखादया ठिकाणी प्रसंगी स्वत:च्या जीविताला धोकादेखील पत्कारून रक्षणाची जबाबदारी पार पाडत असतो. ''जागतिकरणाचा पहिला फटका बसला तो सुशिक्षित बेकारांना रोजगार आणि नोकरी हे सर्व ठेकेदारांच्या स्वाधीन केले त्याला सुरक्षागार्ड अपवाद कसा राहिल.''[११] सुरक्षा रक्षकांची पदे संबंधित विभाग स्वत: भरण्याऐवजी ते ठेकेदाराला सुरक्षारक्षक पुरवण्याचा ठेका देतात. कामगार म्हणून नोकरीची सुरक्षितता कायम कामगाराला मिळणारे नोकरीचे फायदे मिळू नयेत. यापासूनच सुरक्षा रक्षकांची व्यथा व पिळवणूक सुरू होते.

गरीबांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी श्रीमंत किंवा मोठी माणसे फारशी उत्सुक नसतात. समाजात अशी काही माणसे असतात की जणू गरीबांसाठी जन्मलेली असतात. त्यांचे जीवन अन्यायाविरूध्द लढण्यात जाते. त्यात डॉ. बाबा आढावांसारखा महाराष्ट्राला लढाऊ हिरा मिळाला आहे. कामगारांसाठी अहोरात्र धडपड त्यांची चालू आहे. महिला कामगारांना काम मिळाले पाहिजे. त्यांना सुरक्षितता मिळाली पाहिजे, त्यांची इज्जत लुटता कामा नये यापासून संरक्षण मिळण्यासाठी बाबा आढाव प्रयत्नशील आहेत. हमाल कामगारांचे गाऱ्हाणे ऐकणारा व त्यांना

प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी धडपडणारा नेता मिळाला होता. काम करीत असताना अनेक धोक्यांना तोंड दयावे लागते. कधी कधी काम करीत असताना पोती अंगावर पडून दगावल्याची किंवा गंभीर जखमी झाल्याची उदाहरणे पाहावयास मिळतात. मोठमोठी पोती थप्पीवर उचलून टाकणे सोपे काम नाही. ''मोठया श्रीमंताचे जर कुत्रं मेलं तर पंचनामा व्हतो, पण आमची कित्येक मानसं गेली पन त्याचा पंचनामा झाला नाही हा!''[१२] संघटने अगोदर हमालवर्गाकडे कोणी गांभीर्याने पाहत नव्हते. हमाल म्हणजे जणू घाण्याचा बैल आहे अशी जणू समजूत झाली होती. ही व्यवस्थाच बदलणे आवश्यक होते. म्हणतात ना कोणती ही वेळ यावी लागते. त्या उक्तीप्रमाणे हळूहळू बदल होऊ लागला. हमालामध्ये जागृती होऊ लागली. सर्व हमाल एकत्र येऊ लागल्याने त्यांच्यात चर्चा होऊ लागली. त्या चर्चेचा परिणाम हमालामध्ये जाणवू लागला. डॉ. बाबा आढाव यांनी संघटनेत लक्ष घातल्यापासून व शंकरराव घुले यांनी संघटनेचे नेतृत्व स्वीकारल्यापासून हमालांना न्याय मिळू लागला. त्यांच्याकडे लक्ष देणारा व आपुलकीने चौकशी करणारा तळमळीचा नेता मिळाल्याने हमाल नेतृत्वामुळे कामगारामध्ये चैतन्य निर्माण झाले होते. त्यांच्या खंबीर नेतृत्वामुळे व्यापाऱ्यांमध्ये वेगळाच दरारा होता. त्यांच्या राजकीय प्रवासाचा हमाल कामगारांना निश्चित फायदा झाला. राजकारणाबरोबर समाजकारण करून दुर्लक्षित हमाल कामगारांना समाजात ताठ उभे करण्यास फार मोठा हातभार लावला. शंकरराव घुले यांच्या कुशल नेतृत्वामुळे अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड व इतर हमाल कार्यकर्त्यांना साथ मिळाल्याने समाजात वेगळे स्थान निर्माण झाले आहे. आज हमाल कामगारांची दखल सरकार ही घेऊ लागल्याने त्यांच्याशिवाय सुरळीत बाजारपेठ चालू शकत नाही. एवढा वचक हमाल संघटनाचा आज निर्माण होऊ शकला.

खेडयातून शहरात पोट भरण्यासाठी आलेला हा हमाल कामगार स्वत:ची पाठ विकत आहे. त्याशिवाय त्याच्यासमोर पर्याय नव्हता. कामाची हमी नव्हती, वेळेचे बंधन नव्हते. काम असेल तर दाम, ते दामही देणाऱ्याच्या मर्जीवर. त्यासाठी त्याची सामाजिक पत पाहिली जात होती. हमालांना एवढे पैसे असा अचंबित प्रश्न प्रत्येकक्षणाला विचारला जात होता. रेल्वेने वाढवलेले तिकिटाचे पैसे प्रवासी निमूटपणे देतात. हमाल कामागाराने चार पैसे जास्त मागितले की, त्यांचा राग अनावर होतो. शेताच्या बांधावर, व्यापाऱ्यांच्या पेढीवर, बांधकामावर सर्वत्र एकच सूर असतो. मजूर फार माजलेत. या व्यवस्थेविरूध्द अंगमेहनती करणारा ताठ मानेने उभा राहताना

दिसत आहे. ना 'पत' असलेला वर्ग पत मागू लागला आहे. तोही स्वाभिमाने जगू लागला आहे. हमाल ही माणूस आहे. त्यालाही पोट आहे, संसार आहे. त्यालाही बायको—मुले आहेत. त्यांचे कुटुंबही आनंदाने जगले पाहिजे हा विचार होत नव्हता. हा विचार लोकांना समजू लागल्यामुळेच समाज आज हमाल कामगाराकडे इतर कामगारांसारखे पाहू लागला आहे. हमालालाही समाजात मानाचे स्थान प्राप्त होईल असे सांगावेसे वाटते.

३.३ माथाडी कामगार व व्यापारी यामधील संघर्ष :—

अहमदनगर जिल्हा हा पर्जन्य छायेत येत असल्याने येथे दरवर्षीच पाऊसाचे प्रमाण कमी आहे. शेती कमी पिकत असल्याने हाताला काम मिळणे अवघड होते. त्यातच घरची परिस्थिती गरीबीची होती. पाऊस वेळेवर पडत नसल्याने त्यांची खूप पंचाईत होते. गावात हाताला काम न मिळाल्याने शहराकडे कामगार धाव घेत होते. त्यातच शहरात दुसरे काम मिळणे अवघड होते. त्यामुळे लोक हमाली व्यवसायाकडे आलेले आढळतात. हमाल म्हणजे बैल अशी समजूत झाली होती. हमालांकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा होता. संघटनेच्या अगोदर हमाल कामगारांची खूप वाईट परिस्थिती होती. अगदी ग्रामीण भागात ज्या पध्दतीने मागासवर्गीय समाजाला वागविले जात असे तशाच पध्दतीची वागणूक हमाल कामगारांना मिळत होती. कोणतेही काम असो ते कागदावर तयार होत नाही तर प्रत्यक्षात कार्यवाही करण्यासाठी कष्टकरी कामगारच झिजताना दिसत आहे. ''देशात जवळपास ४० कोटी असंघटित कामगार आहेत.''[१३] त्यांचाही विचार सरकारने करायला हवा. आता परिस्थिती हळूहळू बदलेली आहे. हमाल असले तरी ती ही माणसे आहेत ना ? त्यांची मुले वेगवेगळया क्षेत्रात नाव कमवित आहेत. कष्टकऱ्यांच्या वेदनांची समाजाने दखल घ्यावयास हवी परंतु तसे काही करताना दिसत नाही. समाजाच्या त्या संवेदना झाल्या पाहिजेत असे वाटते.

हमाली करताना अशी प्रथा होती की आपण कोणतेही काम सांगितले की त्याने केले पाहिजे. आपल्यापेक्षा वरचढ हमालीत चालत नसे. कमी वृत्तीचा व आपण पळ म्हटले की पळाला पाहिजे. अशा माणसाला ते कामावर घेत असे. धनराज फोजमलच्या दुकानी शंकरराव गायकवाड, तुकाराम दरेकर, धर्माजी चौधरी, किसन पुंड, दादा बाजरे, तानाजी आंधळे असे जुने हमाल काम करीत होते. त्यांनी जवळजवळ दोन वर्षे अर्ध्या वाटणीत अप्पा कोरपे यांना ठेवले होते. हमाली

शेतकऱ्यांकडून घ्यायची मात्र काम व्यापाऱ्यांच्या घरी करावे लागत होते. त्यावेळी अहमदनगर शहराचे मार्केट गावात होते. त्याला दाणेडबरा म्हणत असे. वजन मापासाठी अधोली, पायलीचे माप होते. व्यापाऱ्यांच्या घरी जाऊन हमाल कामगारांना वेगवेगळी कामे करावी लागत असे. पापडाच्या पीठाचे गोळे कुटणे, गाईला चारा टाकणे, घर स्वच्छता करणे अशी वेगवेगळी कामे करावी लागत असे. पापडाचे पीठ फक्त स्वत:चे कुटून घेत नव्हते तर आपल्या नातेवाईकांचेही काम करून घेत असे. ''पहिला चुलतीचा, दुसरा मावशीचा, तिसरा शेजारणीचा, चौथा चुलत मावशीचा, पाचवा मामाचा, सहावा स्वत:चा''[१४] अशाप्रकारे एवढी कामे हमाल कामगार कोणताही शब्द न बोलता करत असे. त्याशिवाय त्याच्यासमोर दुसरा मार्गही नव्हता.

हमाल हा कामगार असला तरी तो माणूस आहे. त्यालाही काही किंमत आहे. दिवसभर कष्ट केल्यावर संध्याकाळी शरीर थकून जात असे. व्यापाऱ्यांचा कामगारांवर खूप धाक होता. कोणत्यावेळी व्यापारी कोणते काम सांगेल याचा नेम नव्हता. कधीही हमाल कामाला बैलासारखे जुंपलेले असायचे. ''जरी आम्ही हमाल असलो तरी आम्हाला काही जीवन आहे की नाही ? सगळयांना जीव सारखा आहे. संध्याकाळीच्या वेळेला थोडा जरी विसावा पाहिजे की नको ?''[१५] दिवसभर कष्ट करून सुध्दा रात्रभर मालाच्या गाडया खाली कराव्या लागत होत्या. कामगारांना झोप पुरेशी मिळत नव्हती. जेथे जागा मिळेल तेथे झोपणे व गाडी आली की उठणे असे दिवसरात्र काम करावे लागत असे. आपल्यावर अन्याय होत आहे हे हमालांना वाटू लागले. अन्याय थांबवायचा असेल तर आपण एकत्र आले पाहिजे असे कामगारांना वाटू लागले. हमाल हातगाडीत आठ दहा पोती टाकून ओढत असे. त्या ओझ्याने त्याचा पूर्ण घाम निघत असे. हातगाडी ओढताना पायात चप्पल न घालता ओढावी लागे. पायाला भर उन्हात चटके बसत असे. रस्त्याने हमालांच्या बऱ्याच गाडया उभ्या करून ठेवत असे. हमालामध्ये एकजूट नसल्याने एकाने पंचवीस रूपये भाडे सांगितले की दुसरा वीस रूपयात काम करण्यास तयार होत असे. एकमेंकांचा द्वेष व संघटना नसल्याने कमी मोबदल्यात ते काम व्यापाऱ्यांचे होत असे. मात्र तोटा हमाल कामगारांचा होता.

हमालांना वेगवेगळया प्रकारची ओझी उचलावी लागतात. केरू माने हमाल दुकानात असलेली पेटी उचलण्यासाठी आला होता. पेटी लोखंडाची असल्याने जड होती. त्यापेटीत काचेच्या बाटल्या असाव्यात. ती पेटी स्टँडवर घेऊन जायची होती.

पेटी उचलताना जड असल्याने खाली आदळली त्यातील एक दोन बाटल्या फुटल्यावर दुकान मालक भाईचंद हमालावर ओरडला, ''का रे हरामखोर, तुइया बापाचा माल आहे का? एवढयानं आपटलीस पेटी फुटली.'[१६] हमालही माणूस आहे. त्याच्यामध्ये जीव आहे. परंतु दुकानदाराने खुर्चीवरून उठून त्या हमालाच्या पाठीवर लाथ मारली. लाथ मारल्यामुळे पाठीतून रक्त येऊ लागले. तरीही हमाल कामगार काही बोलला नाही. हमाल एवढे कष्ट करतो तरीही त्याला कोणीही वाली नाही. त्याच्या कष्टाची कोणी कदर करीत नाही. पैशाच्या जोरावर गरीबाची इज्जत घेण्याचा प्रकार होता. नुकसान भरपाई देण्यास हमाल कामगार तयार होता. हमाल सर्वजण गोळा होऊन हमालांचे नेते अप्पा कोरपे यांच्याकडे त्या व्यापाऱ्याची तक्रार केली. अप्पा कोरपे व इतर हमाल जाब विचारण्यासाठी त्या दुकानावर गेले होते. त्या दुकानावर माफी मागेपर्यंत हमाल कामगारांनी बहिष्कार टाकण्याचे ठरविले होते. घटनेच्या दिवशी हमालांनी या घटनेचा निषेध करून बंद पाळला. मालक जीवंत राहीला तरच कामगार जीवंत राहील. हरजीवन भाईचंदने हमाल कामगारांची माफी मागावी अशी माणगी केली होती. व्यापाऱ्याने हमाल कामगारांची माफी मागितली व सांगितले, ''हमाल बंधूनो तुमच्यावर अन्याय झाला तो एकदाच आणि त्याच्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो की, आमच्याकडून चूक झाली आहे. तुमच्यावर हाथ उचलायला नाही पाहयजे.''[१७] हमाल कामगारांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नव्हते की संघटना नव्हती. व्यापारी हमालावर अन्याय, अत्याचार, मारहाण करीत होते. नोकरीची शाश्वती नसल्याने कामगार अन्याय सहन करत होता. संघटना झाल्यापासून हमाल कामगारांना संरक्षण मिळून वेगवेगळया सुविधा मिळू लागल्या. आजच्या काळात व्यापाऱ्याने मारहाण केल्यास कामगार सहन करणार नाही. संघटनेमुळे कामगारांच्या नोकरीला संरक्षण मिळाल्याने भितीचे काहीही कारण नाही. त्यासाठी संघटनेची एकजूट व कामगारामधील एकता फार महत्वाची आहे. संघटना अस्तित्वात आल्यापासून कामगार वर्ग सुखी समाधानी दिसत आहे. वर्षानुवर्षे व्यापाऱ्यांची गुलामगिरी उलथून टाकण्याचे काम हमाल कामगार एकत्र आल्याने होऊ शकले. समाजाचा दृष्टीकोन ही बदलू लागला आहे. समाजाची हमाल कामगाराकडे पाहण्याची दृष्टी जोपर्यंत बदलत नाही. तोपर्यंत या व्यवस्थेत संघर्ष अटळ आहे. कामगार आणि मालक दोन्हीही टिकले पाहिजे अशी समन्वयाची भूमिका घेणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे हमाल व व्यापारी यामधील जो दुरावा आहे तो कमी झाल्याशिवाय कोणतेही काम प्रभावी ठरणार नाही. हमाल व व्यापाऱ्यामध्ये विश्वासाचे वातावरण तयार झाले पाहिजे. एकमेकांविषयी आत्मीयता जिव्हाळा तयार होईल. कोणतेही काम विश्वासाने व आपुलकीने चांगले होते. धाकाने, जबरदस्तीने प्रत्येक काम होईलच असे नाही. त्यासाठी दोन्ही घटकांनी एकमेकांना समजावून घेतले तरच त्यांच्याकडील अविश्वासाची दरी कमी होईल. माणूस असल्याने चूका प्रत्येकाकडून होत असतात. मात्र त्या चूका दुरूस्त करून पुढे गेले तरच येणारा काळ दोन्ही वर्गासाठी प्रगतीचा ठरेल यात शंका नाही.

३.४ माथाडी कामगारावरील अत्याचार व शोषण :—

२१ व्या शतकात युरोप, अमेरिका या देशांच्या तुलनेत भारतातील सामाजिक जीवनात आजही आपणास फार मोठया प्रमाणावर विषमता दिसून येते. एकीकडे असणाऱ्या गगनचुंबी इमारती तर दुसरीकडे असणारे गलिच्छ झोपडपट्टी. झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांना अंगभर कपडे आणि पोटभर अन्न मिळत नाही अशी अवस्था आपणास पाहावयास मिळते. अंगमेहनती करणाऱ्या कामगार वर्गाचे शोषण मोठया प्रमाणावर होत आहे. या वर्गाला सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाईभत्ता मिळत नाही. पोटासाठी वणवण भटकावे लागत असल्याने एका जागी राहत नसल्याने शिधापत्रिका मिळणेही अवघड होते. त्यातील काही कामगार आजही दयनिय स्थितीत जीवन जगत आहेत. आजही त्यांच्या राहत्या घरी अंधार आहे. रात्री त्यांच्या घरी पेटलेल्या चुलीच्या उजेडात कामे उरकावी लागतात. अशा प्रतिकूल परिस्थितीत आजही हमाल कामगार जीवन जगत आहे. एकीकडे फार मोठी श्रीमंती तर दुसरीकडे कमवायचे तेव्हा कसेबसे पोट भरायचे एवढी विषमता आजही आपणास पाहावयास मिळते. पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात अजूनही खूप परिवर्तन होणे आवश्यक आहे. गरीब हा गरीब होत चालला आहे तर श्रीमंत हा श्रीमंतच होत चालला आहे. दिवसेंदिवस विषमतेची दरी कामगार वर्गामध्ये वाढताना दिसून येते. या व्यवस्थेविरूध्द हमाल वर्ग ताठ मानेने उभे राहण्याच्या प्रयत्न करीत आहे. हमालांची समाजात असणारी नापत हा वर्ग पत मागू लागला आहे. जीवनावश्यक वस्तूंचे रेशनिंग, प्रॉव्हिडंट फंड, विमा, सातबाराच्या उताऱ्यावर नाव असलेल्या भूखंडाची मागणी करीत आहे. हमाल कामगारामध्ये असलेल्या वेगवेगळया जातीच्या स्त्रियामध्ये महार, मांग, वंजारी स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. त्या स्त्रिया घर सांभाळून वेगवेगळी

कामे करताना दिसतात. ''वाण्या ब्राम्हणाच्या बाया मोलाने अंगमेहनतीच्या कामाला तयार नसतात, मराठयाच्या बाया रस्त्यावर झाडू मारणार नाहीत.''[१८] आजही कामावरून तो कोणत्या जातीचा आहे हे ओळखले जाते. आजही खोलवर जातीव्यवस्था रूजलेली आहे. अंगमेहनतीचे काम करणाऱ्या स्त्रिया मागास जातीच्या मोठया प्रमाणावर असून त्या हे काम तत्परतेने करताना आढळतात. रस्त्यावर झाडू मारणारी बाई भंगीकाम करायला तयार नसते. आजही ब्राम्हण्य जातीव्यवस्था किती खोलवर रूजलेली आहे हे यावरून आपणास लक्षात येईल. त्यात खूप मोठी आर्थिक व सामाजिक विषमता जाणवते. म्हणूनच हया कामगारांचा आर्थिकस्तर उंचावणे खूप गरजेचे आहे.

दारिद्रय रेषेखालील वर्ग असंघटित, तळागाळातील वर्ग, हातावर पोट भरणारे वर्ग असे कितीतरी शब्द प्रयोग वापरले जातात. यातील बहुसंख्य कामगार अंगमेहनत करणारे आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या किमान गरजा भागविणे या कामगार वर्गाला दिवसेंदिवस कठिण होत चालले आहे. त्यामध्ये बालमजूरी वाढीचा दरही खूप मोठा आहे. परीक्षेत पास होणाऱ्या मुलांचा विचार होतो परंतु नापासांचा विसर पडतो. त्यामुळे नापास मुले शाळेच्या प्रवाहातून बाहेर पडतात. ही मुले कुठेतरी काम करण्यास सुरूवात करतात. त्यात मुलांना वाईट संगत लागल्यास त्याची कुटुंबाला खूप मोठी किंमत मोजावी लागते. परिणामी गुन्हेगारीकडे गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यासाठी माथाडी कामगारांची मुले शाळेत गेली पाहिजेत. जेणेकरून त्यांच्यावर वाईट संस्कार होणार नाहीत. आईवडिल दोन्हींचे त्या मुलावर लक्ष असावयास हवे तरच मुले योग्य दिशेने पाऊल टाकतील. माथाडी कामगाराला घरी जाता येत नव्हते गेला तरी तो मुले झोपल्यावर जात होता सकाळी मुले झोपत असताना त्याला कामावर जावे लागत होते. त्यामुळे मुलांची भेट दुर्मिळ होती.

सरकारने आतापर्यंत कामगारांसंबंधी अनेक कायदे मंजूर केले आहेत. त्याचबरोबर मुक्या जनावरांचेही कायदे केले आहेत. टांग्यामध्ये किती माणसे बसवावित? तीन माणसे बसण्याची परवानगी आहे. तीन ऐवजी चार माणसे बसविले की घोडयाचा नाल पडतो. घोडयाचे नुकसान होते म्हणून सरकारने त्याविरूध्द कायदा केला आहे. तीनपेक्षा जास्त बसविल्यास मालकावर केस होते. बैलगाडीत दहापोते वाहून नेण्याची परवानगी आहे. दहा पोत्यापेक्षा जास्त ओझे टाकू नये. टाकल्यास त्या मालकावर गुन्हा दाखल होतो. हमालांच्या पाठीवर वजन किती दयावे याचा कायदा

झाला नाही. ''दीडक्विंटल असो क्विंटल असो, एकेक पोतं, एक क्विंटल पन्नास किलोपर्यंत, त्याच्या पाठीचं काय होत असंन?''[१९] सरकारने मुक्या प्राण्यांवरील ओझे वाहून नेण्यावर मर्यादा आणली, कायदे केले. मात्र वर्षानुवर्षे जगाचे ओझे वाहून नेणाऱ्या हमाल वर्गाकडे दुर्लक्ष केले गेले हा फार मोठा अन्याय हमाल कामगारांवर झाला आहे. त्या कामगार वर्गाला न्याय मिळणे फार महत्वाचे आहे. दररोज अवजड ओझे उचलण्यामुळे हमालांच्या गुडघ्याच्या वाटया खराब झाल्या आहेत. हमालांना म्हतारपणी चालणेही मुश्किल झाले आहे. हमालांना खाली बसले की उठता येत नाही. एवढी वाईट अवस्था हमाल कामगारांची झाली आहे. त्यासाठी सरकारने हमाल कामगारांच्या आरोग्यांचा विचार गांभीर्याने करणे आवश्यक आहे.

हमाल पंचायत स्थापण्यापुर्वी हमाल कामगारावर खूप अन्याय, अत्याचार होत होते. व्यापाऱ्याच्या दुकानात तो कामाला राहिला की तो चोविस तासाचा नोकर समजला जात होता. तो दिवस रात्र त्याच्या दारात पडलेला असे. मालक त्याच्याकडून अनेक कामे करून घेत असे. दळण आणणे, पाणी भरणे, घरच्या गायीला वैरणकाडी करणे, चिंचाचे काम, पापडाचे गोळे असो की मालकाच्या चपला शिवून आणणे अशी अनेक कामे न बोलता करावी लागत. मालकाच्या नजरेला नजर देण्याचीही हिंमत हमाल कामगारात नव्हती. पडेल ते काम गुपचूप करावे लागे. एवढे कष्ट करूनही त्याला तीन रूपये रोज होता. महिन्याला नव्वद रूपये मिळत असे. कोणत्याही दिवशी सुट्टी नसे. सुट्टी घेतल्यास त्या दिवसाचा रोज दिला जात नसे. १९६०—६२ चा तो काळ होता. एवढया मोठया प्रमाणावर हमालांची पिळवणूक होत होती. त्यावेळी ज्वारीचे पोते तीन रूपयास मिळत असे. खेडेगावातून शहरात आलेला कामगार परिस्थितीने गांजलेला होता. गरीबीमुळे त्याला गाव सोडावे लागलेले होते. ''चार आठआणे जे मिळायचे त्यातून आणा दोण आणे गावाकडे पाठवायचे.''[२०] शहरात मिळालेल्या कमाईवर हमाल कामगार खुश होता. रोज कामाचे पैसे हातात येत होते. त्यामुळे पैसे खर्च करण्यास मिळत होते. त्यामुळे अधिक कष्ट करण्यास उत्साह येत होता. भरपूर काम केले जात असे. खेडेगावातून शहरात आल्यावर हमाल कामगाराने पैसे कमविणे व पोट भरणे एवढेच ध्येय समोर ठेवले होते. आर्थिक परिस्थिती चांगली नसतानाही चेहऱ्यावर आनंद दिसत असे. परिस्थितीच त्यावेळी तशी होती. काम केले तर हमाली मिळत होती. ज्या दिवशी

काम नाही त्या दिवशी उपासमार सहन करावी लागत होती. पोटासाठी कोणत्याही प्रकारचे कष्ट करण्याची तयारी होती.

बाजारपेठेत हमाल कामगार दिवसभर काम करून सुध्दा संध्याकाळी राखणाचे काम करावे लागत होते. तरी ही अधुनमधुन चोऱ्या होत होत्या. व्यापारी लखन लालजी यांच्या गोडावूनमध्ये मालाची चोरी झाली होती. चोरी झाल्यावर पोलीस पंचनामा करण्यासाठी मालकाच्या गोडावूनमध्ये आले होते. गोडावूनचे कुलुप डुप्लीकेट चावीने उघडलेले होते. पोलिसांनी मालकाकडे चोरीसंबधी चौकशी केली ''तुम्ही इतके दिवस धंदा करताय तुम्हाला कुणावर शक हे?''[२१] असे पोलिसांनी विचारल्यावर मालकाने चंद्रभानचे नाव सांगितले. वास्तविक चंद्रभान त्या दिवशी कामावर नव्हता. मालकाच्या दारात इतके वर्ष कुत्र्यासारखी इमानदारी करून सुध्दा त्याचे नाव घेतले. पोलिसांनी चंद्रभानला घरी जाऊन अटक केली होती. त्याला सात दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. चंद्रभान वारंवार पोलिसांना मी चोरी केली नाही हे सांगत होता. परंतु त्याचे कोणी खरे ठरवित नव्हते. आठव्या दिवशी चोरीचा तपास लागल्यावर खरे चोर वेगळेच होते. चंद्रभान इतके वर्ष प्रामाणिकपणे काम करूनही त्याचे कोणी ऐकत नव्हते. गरीबाने कितीही कष्ट केले, प्रामाणिक राहिले तरी त्याच्यावर अन्याय होतोच हे सिध्द झाले. सर्व हमालांनी चंद्रभानला सोडवून आणले. त्यादिवशी मार्केटयार्डमध्ये सर्व हमाल एकत्र जमुन असा निर्णय घेतला की, येथून पुढे मालकाच्या चाव्यांना हात लावायचा नाही. मालक कितीही चांगला असला तरी तो विषाचा साप आहे. तो कधी चावेल हे सांगता येत नाही. दिवस मावळला की आपली मजुरी संपली. मालकाने दुकानाला स्वतः कुलूप लावावे. इतके दिवस इमानदारीचे कामे करून सुध्दा अविश्वासामुळे व गरीबीच्या नावाखाली हमालांना बळीचा बकरा बनविले जात होते. त्यासाठी अन्याय, अत्याचार थांबवायचे असेल तर कामगारात एकजुटपणा हवा होता. कामगारात एकजुट राहिली तरच अन्याय, अत्याचार, अविश्वास थांबेल असे सांगावेसे वाटते.

व्यापारी हा हमालांकडून घरचे काम करून घेत होते. मात्र त्याचा कोणताही मोबदला त्याला मिळत नव्हता. या जुलमी आणि अनिष्ट पध्दती बंद होणे आवश्यक आहे असे हमाल कामगारांना मनोमन वाटू लागले. मात्र ते काम एकटयाने बंद होण्यासारखे नव्हते. हमाल म्हणजे व्यसनी माणूस दिवसरात्र व्यापाऱ्यांच्या दारात राहावे लागत असल्याने हमालांच्या बायकाही त्यांना सोडून जात होत्या. ''मुळात

हमालाला बायको मिळण्याची पंचायत ! अशात ज्यांना मिळाल्या त्यांना रात्रंदिवस व्यापाऱ्यांच्या दारात पडावं लागल्याने बायका निघून गेल्या.''[२२] अनेक हमालांच्या बाबतीत घडले होते. कामापुरते व्यापाऱ्यांकडे राहणे योग्य परंतु रात्रंदिवस दुकानात थांबणे गैर होते. त्यामुळे अनेकांचे संसार अडचणीत आले होते. त्यात मुलांची ससेहोलपट होते व मुलांचा बळी जातो. मुलांसमोर भांडणे करणे योग्य नाही. त्याचा परिणाम मुलांवर होतो हे नमुद करावेसे वाटते.

हमाल कामगार दिवस रात्र कष्ट करून सुध्दा आर्थिक सामाजिक परिस्थिती फारशी सुधारली नव्हती. कौटुंबिक स्थैर्य मिळणे आवश्यक होते. कुंटुबाबरोबर राहिल्याने खाण्याची सोय झाल्यास शरीर सांभाळणे सोपे जात होते. ज्यांची घरची मंडळी येथे राहत नव्हती त्यांची फारच उपासमार होत होती. अतिशय दयनिय अवस्थेत हमाल कामगार जीवन जगत होता. एवढे कष्ट करून सुद्धा आर्थिक स्थैर्य कुंटुबाला फारसे आलेले नव्हते. पैशाची बचत करणे फार अवघड होते. अचानक काही संकट आल्यास त्याच्याजवळ पैसेही नव्हते एवढी अवस्था वाईट होती. अचानक बबन पठारे, हमालाचा मृत्यू झाला. अत्यंविधिलाही त्यांच्या कुटुंबाकडे पैसे नव्हते. त्यावेळी अप्पा कोरपे यांनी त्या हमालाच्या बायकोला विचारले, ''मौतीला तुझ्यापाशी काही आहे का? बाई हुंदके देतच म्हणाली, पोराच्या पायातलं तेवढं आहे, बाकी काही नाही''[२३] हमालांनी वर्गणी करून त्या हमालाचा अंत्यविधी केला. गावाकडून एकटाच शहरात आल्यामुळे हमाल बांधवानांच खांदेकरी व्हावे लागले. बिकट परिस्थितीमध्ये आयुष्यभर कष्ट करून ही शेवटी असे मरण येते याचे फार मोठे दु:ख आहे. गरीबी कमी झाल्याशिवाय तो सन्मानाने जगू शकणार नाही हेच खरे. अन्याय, अत्याचार सहन करून हमाल आपले जीवन जगत होते. जो पर्यंत या देशात कष्टकरी अंगमेहनती, शेतकरी, शेतमजूर वर्गाचे शोषण थांबत नाही तोपर्यंत स्वराज्याला अर्थ नाही. आज भांडवलशाहीमुळे सरकार फक्त मोठया भांडवलदारांच्या दृष्टीने निर्णय घेताना दिसते. दुसरीकडे कामगारांचे हक्क व सुरक्षितेकडे दुर्लक्ष केले जाते. आज कामगारांची नोकरी सुरक्षित राहिली नाही. दिवसेंदिवस सरकार खाजगीकरणाकडे वाटचाल करीत असल्याने येणाऱ्या काळात कामगारांच्या समोर अनेक प्रश्न उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आज घडणारे दंगेधोपे, नक्षलवाद, दहशतवाद या कारवाया त्याचीच उदाहरणे आहेत. कोणत्याही समाजावर किंवा कामगारावर जास्त दिवस सरकार जबरदस्ती करू शकत

नाही. त्यांचा विरोध दिवसेंदिवस वाढत आहेत. त्याचा परिणाम हिंसक कारवाया घडण्यात होतो. सरकारने वेळेवर त्याकडे लक्ष दिले पाहिजे. जेणेकरून हमाल कामगारांच्या मागण्या पूर्ण होतील व हिसंक मार्गाकडे जाणार नाही याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. अशाप्रकारे माथाडी कामगारावरील अन्याय, अत्याचार थांबवून न्याय मिळाला तरच ते सुखी समाधानी होतील असे वाटते.

३.५ माथाडी कामगारामध्ये असलेला संघटनेचा अभाव :—

अहमदनगर जिल्हयातील हमालांच्या श्रमावरच संपूर्ण बाजारपेठा अवलंबून आहेत. हमाली व्यवसायात असणारी चोविस तासांची गुलामगिरी हमाल कामगारांना होती. हमालाने न विचारता घरी गेले की दुसऱ्या दिवशी व्यापारी त्या हमाल कामगारास कामावर घेत नसे. व्यापाऱ्यांच्या दारात कायमच पडून राहावे लागत. हमालांनी काम नाकारले तर सामान्य लोकांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागेल. सामान्य जनतेला दैनंदिन गरजेच्या जीवनाश्यक वस्तूही मिळू शकणार नाहीत. हमालांच्या असहकार्यामुळे येथील श्रमिकांच्या नाडया आवळल्या जातील. पंरतु आपल्या या सामर्थ्यांची जाणीव हमालांना मात्र झाली नव्हती. त्यांना एकच गोष्ट माहित होती ती म्हणजे आपल्या घरी असणारे अठरा विश्व दारिद्रय. पैसा कमावण्यासाठी हमालीशिवाय अन्य पर्याय नाही. ''हमालांच्या कामाचे वैशिष्टये म्हणजे हमालाकडून महिन्याचे जेवढे दिवस काम केले जायचे तेवढयाच दिवसाची त्यास मजूरी मिळत असे.''[२४] महिन्याचे ठराविक वेतन या गोष्टीची कल्पनाच हमालांनी कधी केली नव्हती. एवढे करूनही त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार दूर होणे शक्य नव्हते. कामगारामध्ये सुसंवाद होत नसल्याने एकजुटता होत नव्हती. प्रत्येकजण स्वत:च्या कामाचा विचार करत होता. त्यांच्यावरील अन्याय कमी होण्याऐवजी वाढत होता. अन्यायाला वाचा फोडणे सोपे काम नव्हते. जो कामगार विरोध करील त्याला कामावरून काढून टाकले जात होते. परिणामी हमाल कामगार स्वत:च्या कामासाठी अन्याय सहन करत होता.

अहमदनगर जिल्हयातील कामगारामध्ये फार संघटनेचे वारे पोहचलेले नव्हते. कोणताही कामगार असो तो मिळेल ते काम मिळेल त्या मजूरीत करण्यास तयार होत असे. त्याशिवाय हमाल कामागारापुढे पर्यायही नव्हता. ''हमाल हा हमालच! व्यापारी तर त्याला बैलच समजतात.''[२५] घरची आर्थिक परिस्थिती हमाली व्यवसायातच येण्यास कारणीभूत ठरते. शिक्षणाच्या अभावामुळे व्यापारी त्यांच्या

अज्ञानाचा गैरफायदा घेत होते. होरपळून टाकणाऱ्या जगाच्या बाजारातील धग शांतपणे सहन करत होता. रोजच्या जीवन व्यवहारात लबाडी करून जगणे शक्य आहे हे बहुतेक जण सांगतात. परंतु हे हमाल कामगारांना मान्य नाही. कष्ट करून स्वाभिमानाने जगण्याची त्यांच्या अंगात धमक आहे. वाईट कामाकडे जाण्यास आवडत नाही. जे कमवायचे ते कष्टाने मिळवायचे हे त्यांनी पक्के ठरविले होते. व्यापाऱ्यांच्या दारातील गुलामगिरी निमूटपणे सहन करत होते. एखादया दिवशी हमाल कामगार घरी गेलाच तरी तो रात्री बारा नंतर जात असे. त्यावेळी मुले व बायको झोपलेली असे. सकाळी लवकर उठून व्यापाऱ्याच्या भितीने पुन्हा दुकानात हजर होत असे. त्यामुळे स्वत:च्या मुलांची ओळख पटणेही कठिण झाले होते. हमालांच्या जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी कोणालाही वेळ नव्हता. हमाल जीवनात अनेक चढउतार येत होते. हमाल कामगारास कोणी वाली नव्हता.

अहमदनगर जिल्हा दुष्काळी असल्याने बाहेरगावी काम करून पोट भरण्याशिवाय गत्यंतर नव्हते. कोयाळपिंपळयाचा हमाल किसन दरेकर हा अंगाने खूप धष्टपुष्ट होता. कारखान्यात काम करण्यासाठी सिल्लोडला गेला होता. तो कामामध्ये अतिशय चपळ होता. कारखान्यात चाळीस पन्नास पोत्यांचे थरावर थर लावावे लागत. एक लांबलचक फळी लावून पोते पाठीवर घेऊन शरीराचा ताल संभाळत पोते थप्पीवर टाकावे लागत. काम करत असताना पोते थप्पीवर जायला पाहिजे असे मालकाने सांगितले होते. त्यावेळी किसन दरेकरने पोते थप्पीवर फेकण्याचा प्रयत्न केला. ''त्या थप्पीवर चढत असताना असं घडलं की हादरा बसल्याने की अजुन कशाने खालची फळी थोडी सरकली चार बोटं फळी पोत्यावर असते आणि पोतं पाठीवर घेतलेला हा गडी तसाच खाली आला.''[२६] पाठीवरील पोते किसनच्या पायावर पडल्यामुळे पाय मोडला गेला. कामगारांनी उचलून टांग्यात टाकून दवाखान्यात ॲडमिट केले. मोठया व्यक्तीचे कुत्रे मेले तर त्याचा पंचनामा होतो. परंतु एखादया कामगाराचे काम करताना काही बरे वाईट झाले तरी मालक त्याकडे लक्ष देत नाही. किसन हमालाचा पाय मोडला तरी काही पंचनामा झाला नाही. काम करताना कामगाराला काही झाले तर त्याची जबाबदारी मालकावर असते. परंतु फॅक्टरीच्या मालकाना कोणी जाब सुध्दा विचारला नाही. कामगारामध्ये संघटनेचा अभाव असल्यामुळेच मालकाने त्याची दखल घेतली नाही. त्यावेळी संघटना असती

तर त्याला सर्व खर्च देणे भाग पडले असते. त्या घटनेत त्याला पाय गमवावा लागला. संघटना करणे किती महत्वाचे आहे हे कामगारांना हळूहळू समजू लागले.

हमाल कामगारांवर दिवसेंदिवस अन्याय वाढत चालत होता. हमालामध्ये एकजूटता राहणार नाही. यासारखे धोरण व्यापारी अवलंबीत होते. हमालांच्या टोळया फोडून पाहिजे हा त्यातीलच एक प्रकार होय. त्यास हमाल कामगारांनी एकजूटीने विरोध केला. मार्केटकमिटी व व्यापारी एकत्र आले मात्र हमाल कामगार त्यापासून दूरावला गेला. मार्केटकमिटीने हमाल कामगारांना बोलावून घेतले. ''तुमचे लायसेन्स असतील त्या दुकानी तुम्ही काम करा नाहीतर तुमचे लायसेन्स रद्द करू.''[२७] अशी मार्केटकमिटीने धमकीच दिली. हमाल कामगार त्यामुळे घाबरला. हमालांना मार्गदर्शन करणारे व एकजूट ठेवणारे प्रभावी नेतृत्व न मिळाल्याने शेवटी कामगारांना कामावर जावे लागले. कामगारांचे नेतृत्व करणारे शंकरराव गायकवाड व सूर्यभान पाटील यांना कोणताही व्यापारी कामावर हजर करून घेत नव्हता. सर्व हमाल कामावर हजर झाले मात्र तीन दिवस यांना बसून ठेवण्यात आले. हमालांमध्ये एकजुट करण्याचे काम केल्यामुळे त्या दोघांना मुद्दामहून त्रास देण्यास व्यापाऱ्यांनी सुरूवात केली होती. शेवटी अप्पा कोरपे व इतर हमाल कामगारांनी व्यापाऱ्यांना विनंती केल्यावर त्यांना कामावर घेण्यात आले. व्यापाऱ्यांचा त्रास वाढतच चालला होता. व्यापारी सांगेल ते काम निमुटपणे करावे लागत होते. काम केल्याशिवाय हमाल कामगारांना दुसरा पर्यायही नव्हता.

हमाल कामगार दिवसरात्र काम करत होता. त्याला घरी जाण्याची परवानगी नव्हती. कोणत्याही वेळी कोणतेही काम करावे लागत होते. दिवसभर काम केल्याने संध्याकाळी कामगारांना सुट्टी मिळणे आवश्यक होते. कामगारांना कंटाळा आला किंवा थकवा आला तरी निमुटपणे काम करावे लागत होते. अप्पा कोरपे व त्यांच्या साथीदारांना संध्याकाळी १०० पोते बाजरी चाळून भरावयास सांगितली. दिवसभर कामामुळे हमाल कामगार खूप थकले होते. हमालांची व्यापाऱ्यांला विरोध करण्याची हिंमत झाली नाही. मात्र अप्पा कोरपे यांनी एकटयाने व्यापाऱ्याला विरोध केला. ''आम्ही दिवसभर कामे केलय आम्ही दमलोत भाऊ उदया करू.''[२८] व्यापारी काही केल्या ऐकण्यास तयार नव्हता. अप्पा कोरपे यांनी हे काम उदया करू म्हटल्यावर अप्पांना त्या व्यापाऱ्याने दुकानातून बाहेर काढले होते. शेवटी इतर हमालांनी विनंती

केल्यावर अप्पा कोरपे यांना कामावर घेण्यात आले. व्यापारी म्हणेल तसे कामगाराला वागावे लागत होते. व्यापाऱ्यांना उत्तर देण्याची हिंमत कोणी करत नव्हते.

हमाल कामगार न विचारता कामावरून घरी गेल्यावर दुसऱ्या दिवशी त्यास कामावर घेतले जात नसे. मग कारण सुखाचे असो कि दु:खाचे त्याच्याशी व्यापाऱ्यांना काहीही देणेघेणे नव्हते. हमाल म्हणजे काबाड कष्ट करणारा बैल आहे असे काहीसे चित्र निर्माण झाले होते. हमालांना खाजगी जीवनच नव्हते. हमालही माणूस आहे. त्यालाही आईवडील, बायको मुले आहेत हे व्यापारी वर्ग पूर्णपणे विसरला होता. गोंडाजी हमालाची आई खूप आजारी होती. स्वत:च्या मुलाला पाहण्याची आईची शेवटची इच्छा होती. ती खूप अत्यवस्थ होती तेव्हा गोडांजीला तातडीचा गावावरून निरोप मिळाला होता. त्याने मालकाला विचारले, ''मालक गावाकडे जायचंय, आई आजारी आहे.''[२९] आई आजारी असल्याने भेटण्यासाठी सुध्दा व्यापाऱ्याने सुट्टी दिली नाही. शेवटी त्याची आई देवाघरी गेली. अशाप्रकारे चोवीस तासांची गुलामगिरी हमालांना सहन करावी लागत होती. व्यापाऱ्यांपुढे हमालांचा काही इलाज चालत नव्हता. तोंड दाबुन बुक्यांचा मार सहन करावा लागत होता.

देशात मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे सुरू झाले आहे. खुलेकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण झाल्यामुळे सर्व क्षेत्रात स्पर्धा सुरू झाली होती. आता हे लोन माणसांच्या बाजारापर्यंत पोहचले आहे. धनिकवर्गाची मानसिकता दिवसेंदिवस माणूसकीहीन बनत चालली आहे. नव्या व्यवस्थेत हे नाणे संपुष्टात आणून मजूरांना जेरीस आणून गुलामासारखे वागण्याची प्रवृत्ती बळावत आहे. हमालांना अन्यायाविरूध्द जागृत करण्याचे काम अप्पा कोरपे व इतर हमाल कार्यकर्त्यांनी केले. अप्पा कोरपे यांनी हमालांना त्यांचे हक्क व कर्तव्यांची जाणीव करून दिली. हमालांचे जीवन असेच कष्ट करीत जाणार हा दूरदृष्टीचा विचार हमालांपुढे मांडला. आपल्या विकासासाठी स्वत:लाच पुढाकार घ्यावा लागेल हे हमालांना पटवून देत होते. हमालांमध्ये हळूहळू जागृती होऊ लागली होती. सध्याचा नोकरदार वर्ग हा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वस्तुंचा ग्राहक आहे. धर्म, जात, भाषेच्या नावावर माणसामाणसात फूट पाडणाऱ्या अस्मितावादी राजकारणाचे वाहक म्हणून कार्यरत आहेत. आपल्या कुटुंबाच्या आशा आकांक्षा पूर्ण होण्यासाठी एकटयाने सक्रिय होण्याऐवजी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. समाजात निर्माण झालेली समगता व

सक्रियता एकत्रितपणे प्रभावी व परिणामकारक होताना दिसत नाही. एकेकाळी संघटित कामगाराला क्रांतिचा अग्रदूत मानत असे. माणसामाणसात फूट पाडणारे राजकारणाचे वाहक बनले आहेत. अशा काळात असंघटित कष्टकऱ्यांच्या चळवळी एकवटून चालणार नाही तर त्या लढयात सांस्कृतिक चळवळीचा सकस आशय ओतावा लागेल.

हमाल कामगार एकत्र आल्याशिवाय अन्याय, अत्याचार बंद होणार नाही. हे पटल्यामुळेच कामगारात एकता निर्माण झाली. कामगार एक झाल्याशिवाय कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत हे त्यांना पटले होते. डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाने व हमाल कार्यकर्ते अप्पा कोरपे व इतर कार्यकर्त्यांच्या मदतीने जिल्हा हमाल पंचायत इ.स. १९७८ ला स्थापन झाली. संघटनेचे पदाधिकारी नेमले गेले. १९५६ पासून लढा चालू होता. त्या लढयाला खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त झाले. माणूस म्हणून जगण्याची सवय, महिलांना सन्मानाने वागविण्याची प्रवृत्ती, व्यसनापासून चार हात दूर करण्याचा निर्धार, डामडौलाला नकार दिला पाहिजे.

थोडक्यात महात्मा फुलेंनी जसे स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. त्यांच्या वाणीत व कृतीत कोणताच फरक नव्हता. ते खरोखरच कृतियुक्त समाजसुधारक होते. असंघटित कष्टकऱ्यांनी एकत्र आले पाहिजे आणि पुढची वाटचाल करताना अशा व्यापक लढयाचा झेंडा हातात घेतला पाहिजे तरच कामगारांना न्याय मिळेल असे सांगावेसे वाटते. देशात बेकारीची समस्या गंभीर बनत चालली आहे. त्याचा फायदा स्पर्धा मानणारे घेऊ लागले. त्यामुळेच संघटित कामगार क्षेत्राचे प्रमाण एकसारखे कमी होत आहे. मंजूर संस्थाच हमालांचे अधिक शोषण करतात हे लक्षात आलेले आहे.

३.६ माथाडी कामगार चळवळींची विविध आंदोलने व संप :—

मानवाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या मूलभूत गरजा आवश्यक आहेत. या गरजा पूर्ण करण्यासाठी कष्टकरी वर्गाला अपार कष्ट करावे लागतात. दिवसभर कष्ट करूनही पोटभर अन्न मिळणे मुश्किल झाले होते. तेथे आरोग्याकडे लक्ष देणे कसे शक्य आहे. कोणताही व्यक्ती सुखासुखी हमाली करू शकत नाही. कोणी जीवंतपणी मरणयातना अनुभवतो तर कोणी मृत्यूनंतर एवढाच फरक असतो. पोते गाडीतून खाली घेऊन थप्पीवर टाकण्याचे चार आणे मिळत होते. रात्रभर आलेला माल उतरून घ्यावा लागत होता. कामात हायगय केल्यास कामावरून हाकलून दिले जात होते. पापडाचे पीठ कुटून सुध्दा कधी एक पापड

खाता आले नाही एवढी दयनिय अवस्था कामगारांची होती. व्यापाऱ्यांची घरे धुण्यासाठी कामगार निरम्याचा वापर करीत मात्र स्वत:च्या अंघोळीसाठी साबण घेऊ शकत नव्हता. एकीकडे व्यापाऱ्यांकडे असणारी श्रीमंती तर दूसरीकडे जगण्याची धडपड करणारा हमाल कामगार पाहावयास मिळतो. हमाल कामगारास दिवस रात्र काम करावे लागत होते. हमाल ही माणूस आहे. त्यालाही जीव आहे त्या गोष्टीचा व्यापारी व मार्केटकमिटीला विसर पडला होता. ''तुम्ही गादीवर झोपता, तरी तुम्हाला पंखा असून झोप येत नाही, आम्ही तिथं गटारात पडलो तरी झोप येती, पण झोपायला टाईम मिळत नाही. काम आहेच मागं.''[३०] हमाल कामगारांना दिवसरात्र काम करावे लागत असल्याने विश्रांती मिळत नव्हती. दिवस रात्र काम केल्याने शरीर पूर्णपणे थकून जात होते. झोपायला वेळ मिळत नव्हता. जमिनीवर टेकले की हमाल कामगारांना झोप येत असे. त्यासाठी गादीच झोपायला पाहिजे असे नाही. काही माणांना गादीवर झोप येत नाही. दुसरीकडे हमाल कामगारास बसले तरी डुलकी येत होती. या दोन्हीमध्ये खूप फरक आहे.

रात्रीच्या वेळी सर्व हमाल एकत्र येऊन मार्केटमध्ये जेवायला बसत. त्यावेळी हमालांची वेगवेगळया विषयावर चर्चा होत असे. हमाल कामगार काम करीत असल्याने एकमेकांच्या ओळखी वाढल्या. गप्पा मारीत असताना व्यापाऱ्याकडून होणाऱ्या अन्यायावर चर्चा होऊ लागली. प्रत्येक कामगाराच्या मनात होते मात्र आता ओठावर येऊ लागले होते. त्यात अप्पा कोरपे ही चर्चेत भाग घेऊन मार्गदर्शन करीत असे. ''हे जाच तर आपल्याला तोडायचे असतील तर आपल्याला संघटनाच करावी लागलं.''[३१] अप्पा कोरपे संघटना किती महत्वाची आहे हे पटवून देत होते. सर्व हमाल कामगार जेव्हा एकत्र येतील तेव्हाच खऱ्या अर्थाने त्या प्रश्नास वाचा फुटेल त्या सर्व गोष्टी गांजाच्या नशेत अप्पा पटवून देत होते. हमालांना अन्यायाविरूध्द लढण्याची प्रेरणा मिळू लागली होती. कामगार विरोध करण्यास घाबरत होते. कामगारांवर व्यापाऱ्यांचा खूप वचक होता. इ.स. १९५५ साली आडते बाजारामध्ये हमालीत वाढ व्हावी म्हणून संप सुरू झाला होता. संप सुरू होऊन पंधरा दिवस झाले होते.

संपासंदर्भात हमालांची एक मिटींग काँग्रेस कमिटीमध्ये झाली होती. त्या मिटींगसाठी आमदार मा. श्री. विठ्ठलराव कुटे उपस्थित होते. संपाच्या काळात व्यापारी व हमालांमध्ये भांडणे, मारामाऱ्या होत होत्या. तरीही युनियन निश्चित उभी राहिली. हरिभाऊ दिंडे, बापू दिंडे, शंकरराव गायकवाड, भानुदास पोकळे यांचे मागे कामगार उभे राहिले होते. आडते बाजारात नाथूमामा बुगे यांनी संपात पुढाकार घेतला होता. संपासाठी मोर्चा काढण्याचे ठरल्यावर ती बातमी व्यापाऱ्यांपर्यंत पोहचली. व्यापाऱ्यांनी हमाल कार्यकर्त्यांना बोलावून घेतले. हमालीत जर परवडत नसेल तर महिन्याला ९० रूपये देण्यास व्यापारी तयार झाले. हमालांनी कामास सुरूवात केली. बाजार सुरळित सुरू झाला होता. हमालांच्या कामाची वेळ सकाळी ८ ते १२ व दुपारी १२ ते २ पर्यंत जेवण्यासाठी सुट्टी तर दुपारी २ ते ६ असा करार ठरला होता. काही दिवस गेल्यानंतर व्यापाऱ्यांना ते अडचणीचे ठरू लागले. हमालांच्या जेवण्याच्या सुट्टीच्या वेळात आलेला माल गाडीवान रस्त्यावर टाकत असे. व्यापाऱ्यांना ते अडचणीचे ठरू लागले. पुन्हा व्यापारी व हमाल यांच्यात वाद निर्माण झाला. व्यापारी हमाली देण्यास तयार नसल्याने हमालांनी पुन्हा काम बंद आंदोलन केले. व्यापाऱ्यांनी बाहेरून कामगार आणल्याने संघर्ष अधिक वाढला. त्यातील काही हमाल कामगार फुटल्यामुळे संप बारगळला. काही कामगारांनी लेखी देऊन संपात सामील न होण्याचा निर्णय घेतला.

''इ.स. १९५७ साली भुसार बाजार नवीन मार्केट कमिटीत आला.''[३२] इकडे मार्केट आल्यानंतर इ.स. १९५८ च्या सुमारास पुन्हा संप सुरू झाला. त्यावेळी एका पोत्याला ४ आणे हमाली मिळत होती. हमाली वाढवून मिळण्यासाठी संप केला होता. आडतेबाजारातील हमालांनी राजीनामा देऊन फक्त मार्केटचेच हमाल युनियनमध्ये राहिले. एक महिना संप चालू राहिल्यामुळे कामगार अगदी मेटाकुटीस आले होते. परंतु तरीही व्यापारी वाढ देण्यास तयार नव्हते. व्यापारी हमाल कामगाारमध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न करू लागले. व्यापाऱ्यांनी बाहेरून कामगार आणण्याचा प्रयत्न केला. हमाल कामगारांनी त्यांना आत घुसु दिले नाही. कांडेकर हमाल बाजारात काम करू लागला.

त्याला इतर हमालांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. तो ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.

सर्व हमाल कांडेकर हमालास विनंती करत होते. ''कांडेकर आमच्यावर माती लोटू नकोस, तू इथं काम करू नकोस.''[३३] संप महिन्यापासून चालू राहिल्यामुळे हमालांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती. एकीकडे संप तर दुसरीकडे कांडेकर हमाल बाहेरून ८ — १० कामगारांना कामाला घेऊन येत होता. या दुहेरी संकटात हमाल कामगार सापडले होते. शेवटी कांडेकर घरी जात असताना सीनानदीत इतर हमालांनी त्याला अडवून त्याच्याशी बाचाबाची झाली. कांडेकर माघार घेत नव्हता. त्याच्या आडमुठे धोरणामुळे संप पुन्हा बारगळला. व्यापाऱ्यांनी बैलांचा बाजार भरावा तसा हमालांचा बाजार भरविला होता. व्यापाऱ्यांनी हमाल पुढाऱ्यांचा विरोध डावलून हमालांशी चर्चा केली. महिन्यापासून संप करूनही हमालीत ५ पैसे वाढ केली. त्यातही हमालीचे प्रकार केले. गाडीतून पोते उतरवणे ७ पैसे, पुढे ओढणे ४ पैसे गाडीत उचलून टाकणे ५ पैसे असे एकूण ३० पैसे हमाली झाली होती. नवे घेतलेले हमाल काढून टाकले नाही. नवीन एक हमाल व जुने दोन याप्रमाणे वाटप केले गेले. काम करताना त्याच्यातील एक प्रकार कमी करून म्हणजे ७ पैसे कमी करून २३ पैसेच हमालांना मिळू लागले. हमालांचा लढा पुन्हा फसला. व्यापाऱ्यांनी पुन्हा हमालांना अडचणीत आणले होते. हमालांचे पुढारी शंकरराव गायकवाड, भानुदास पोकळे, सूर्यभान पाटील, रघुनाथ गिते इ. हमाल कार्यकर्त्यांनी पुन्हा संपाची हाक दिली. या संपामध्ये नेवासकर व गंगापूर वाले या दुकानाचे हमाल संपात सामील झाले नाही. त्यांच्यावर व्यापाऱ्यांचा खूप दबाव होता. ''युनियनचे पुढारी बापुसाहेब भापकर होते.''[३४] व्यापारी हमालांशी चर्चा करायला तयार नव्हते. अप्पा कोरपे व इतर हमालांना व्यापाऱ्यांनी दम भरल्यामुळे त्या रात्री झोप आली नव्हती. दुसऱ्या दिवशी बापूसाहेब भापकरांनी सकाळी दहा वाजता मार्केटसमोरील आंबेडकर पुतळयाजवळ खुर्ची टाकून बसले होते. हमालांना कामावर येईल त्याला भापकरांजवळ बसविले जात होते. पाडव्याच्या दिवशी बाजार पूर्णपणे बंद राहिला. त्यांच्यातील रघुनाथ गिते, तात्या पोकळे, ईश्वरनाथ

आव्हाड इ. हमाल कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांशी चर्चा करून थोडीफार वाढ होऊन संप मिटविला होता. हमाल कामगारामध्ये एकजूटीचा अभाव व कार्यकर्त्यांचे धरसोडीचे धोरण असल्याने कोणताच ठोस निर्णय होत नव्हता. त्यामुळे कामगारामध्ये नैराश्य दिसत होते.

माथाडी कामगारांचे अधिवेशन २२ एप्रिल १९९० ला झाले. अहमदनगर जिल्हयासाठी माथाडी कायदा लागू केला होता पण अंमलबजावणी मात्र झाली नाही. हमाली करार संपला होता परंतु विचार करून मागणी करावी असे हमाल पंचायतीने ठरविले. व्यापारी बाहेरून माल खरेदी करून मार्केटमध्ये टप करून बाजारपेठेत पाठवित होते. हमाल पंचायतीने ठराव केला की बाहेरून आलेला माल काटा केल्याशिवाय आम्ही फोडणार नाही. त्याची काटा हमाली दयावी लागेल. पण व्यापारी हमाली देण्यास तयार नव्हते. हमाल पंचायतीने माल खाली करण्यास विरोध केला. व्यापाऱ्यांची तरूण मुले एकत्र येऊन गाडी खाली करू लागले. हमाल पंचायतीने मोर्चा काढला तरी व्यापारी बैठकीस येण्यास तयार नव्हते. संप लांबत चालल्यामुळे मार्केट कमिटीने मापाडयांना नोटिसा काढल्या. मापाडी काटयावर हजर न झाल्यास तुमचे मापाई लायसन रद्द केले जाईल अशा नोटीसा बजावल्या तरीही मापाडी कामावर आले नाहीत. मार्केटकमिटीने नवीन लायसन देण्यास सुरूवात केली होती. ''व्यापारी आलेला माल उतरून घेत होते. संप लवकर मिटत नाही. बारा दिवस पूर्ण झाले परंतु वाटाघाटी करायला तयार नाहीत.''[३५] व्यापारी व हमाल यांच्यामध्ये संघर्ष वाढत चालला होता. शंकरराव घुले यांनी हमाल पंचायतच्या वतीने अहमदनगरमधील कामगार संघटनेला पत्र देऊन बोलावून घेतले. लालबावटा युनियनचे कॉ. मधुकर कात्रे, कॉ. भास्करराव जाधव, कॉ. सुरेश गवळी, कॉ. राम रत्नाकर इ. विविध विभागात काम करणाऱ्या संघटना व त्यांचे पदाधिकारी आले होते. हमाल भवनावर बैठक होऊन सर्वांच्या सहयांचे निवेदन कलेक्टराना देण्यात आले. कलेक्टर साहेबांनी लगेच व्यापाऱ्यांना फोन करून बोलावून घेतले. व्यापारी संप मोडून काढण्याच्या प्रयत्नात होते. कलेक्टर साहेबांच्या धसक्याने मिटींग होऊन

बाहेर खरेदी करून आणलेला माल काटा न करता दहा टक्के वाढ देण्यात आली. अशा रीतीने सर्व मागण्या मंजूर होऊन संप मिटला होता.

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीने संपूर्ण जिल्हयात संघटना बांधल्या होत्या. शेतकरी हमाली जिल्हयात सारखी नव्हती. त्यासाठी पणन संचालकांना एक शिष्टमंडळ भेटून हा प्रश्न सोडविण्याचा आग्रह केला होता. पणन संचालकांनी सर्व जिल्हयातील उपनिबंधकांना त्या संदर्भात पत्र दिले. जिल्हा उपनिबंधकांनी जिल्हयातील सर्व बाजार कमिटयांच्या पदाधिकाऱ्यांची मिटींग बोलावून घेऊन त्यांचे विचार ऐकून घेतले. जिल्हा हमाल पंचायतने ५० टक्के मजूरीत वाढ मागितली होती. सर्व बाजार समितीकडून हमाल पंचायतीचे दरपत्रक मागवून घेण्यात आले होते. ज्यांचे दर कमी होते त्यात वाढ करण्यात आली. ज्यांचे हमालीचे दर जास्त होते ते कमी करण्यात आले. सर्व तालुक्यांची वाढ सारखी करण्यात आली. ''शहराचे राहणीमान लक्षात घेऊन ३० टक्के वाढ केली.''[३६] या वाढीचे सर्वांना पत्र पाठविले गेले. नगर शहराच्या व्यापाऱ्यांनी ही वाढ मान्य केली नाही. काही व्यापाऱ्यांनी उपनिबंधकाकडे जाऊन हमाली वाढीला स्थगिती आणली. त्यात पंधरा दिवसाचा कालावधी निघून गेला. सर्व तालुक्यांनी नवीन दराची अंमलबजावणी केली होती. मात्र शहरातच अंमलबजावणी झाली नव्हती. अहमदनगर शहरासाठी मिटींग होऊन ३० टक्के ऐवजी १७ टक्के वाढीची ऑर्डर काढली. ती वाढ हमाल पंचायतीने नाकारली. ग्रामीण भागाचे नुकसान होऊ नये म्हणून व्यापक हित लक्षा घेऊन १७ टक्के वाढ मान्य करावी लागली. करार दोन वर्षाऐवजी तीन वर्षाचा केला गेला. हा प्रश्न तडीस नेण्यासाठी कामगार पुढारी अहोरात्र झटत होते. कामगार टिकला पाहिजे त्याचबरोबर व्यापारीही टिकला पाहिजे हा व्यापक दृष्टीकोन त्या पाठीमागे होता.

लेव्हीचा लढा — ६ ऑगस्ट १९९८ रोजी अहमदनगर जिल्हयातील सर्व मार्केटयार्डमधील हमाली दरावरील लेव्ही वाढीच्या मागणीसाठी हमालांनी संप पुकारला होता. लेव्ही २२ टक्के वरून ४० टक्के करण्याची मागणी होती. १ मे १९९१ पासून माथाडी कामगार कायदा लागू झाल्यानंतर तेव्हापासून लेव्हीचा

दर २२ टक्केच आहे. गेल्या ७ वर्षात त्यात वाढ झालेली नव्हती. त्यावर हमाल पंचायतीने संपाचा इशारा देताच कामगार उपायुक्तांनी १ ऑगस्टपासून ३० टक्के लेव्हीत वाढ केली असल्याचे जाहीर केले. खरेतर मागणी ४० टक्क्यांची होती. तरीही व्यापाऱ्यांनी लेव्हीची वाढ केल्याच्या कारणावरून संप केला. हमालपंचायतीशी चर्चा करून व्यापारी संघटनेने संप घेतला. या बैठकीस हमाल पंचायतीचे सेक्रेटरी अप्पा कोरपे, संचालक गोंविद सांगळे, बाजार समितीचे प्रशासक पवार तसेच व्यापारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत कामगार उपायुक्तांनी लेव्ही वाढीच्या संदर्भात १५ दिवसांनी चर्चा करून व्यापार पूर्ववत सुरू करावा अशी विनंती केली. सणासुदीच्या काळात ग्राहकांची गैरसोय होऊ नये म्हणून ३० टक्के लेव्हीची तडजोड हमाल पंचायतीने मान्य केली होती. व्यापारी मात्र लेव्ही वाढ देण्यास तयार झाले नाही. ''आता व्यापाऱ्यांच्या दबावामुळे पुन्हा पुर्ववत २२ टक्के आकारणे पोरखेळ''[३७] असल्याची प्रतिक्रिया हमाल पंचायतीचे नेते शंकरराव घुले यांना व्यक्त केली. किमान २५ टक्के लेव्ही आकारली जावी असे राज्याचे कामगार मंत्री ना. साबीर शेख यांनी धुळे येथील अधिवेशनात जाहीर केले असताना नगरला त्यापेक्षा कमी म्हणजे २२ टक्के लेव्ही कशी लागू केली जाते ? असा प्रश्न उपस्थित केला होता. कामगार खाते दबावाला बळी पडणार असेल तर आम्ही संघटनेच्या माध्यमातून दबाव आणु शकतो असा इशारा हमाल पंचायतीने दिला होता. ज्या संस्थांना ३० टक्के लेव्ही मान्य असेल त्यांनी लेखी दिल्यास त्यांचे काम हमाल करतील असे सहायक कामगार आयुक्त परदेशी यांनी जाहीर केले. बऱ्याच संस्थांची लेखी दिल्यामुळे हमालांनी आपली कामे सुरू केली होती.

''अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीच्या वतीने ११ एप्रिल २००८ रोजी विविध मागण्यासाठी डॉ. बाबा आढाव प्रणित जिल्हा रिक्षा पंचायत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.''[३८] कामगारांना सामाजिक सुरक्षा कायदा लागू झाला पाहिजे, कष्टकऱ्याला उतारवयात पेन्शन मिळाली पाहिजे. वाढत्या विषमतेला आळा घातला पाहिजे, जीवनाश्यक वस्तुंची

महागाईवर आळा घातला पाहिजे, सार्वजनिक सभेत आणले न जाणारे घरेलू कामगार विधेयक इत्यादी विषयावर बैठकीत चर्चा झाली. सरकार फक्त आश्वासन देतात हे ही त्या अनुषंगाने स्पष्ट झाले. त्या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले आणि नगरसेवक उडाणशिवे यांनी केले. त्यावेळी संपूर्ण जिल्हयात मोर्चा काढून निवेदने देण्यात आली होती.

हमाल हा बैलासारखे राबतो. त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी काही तरी केले पाहिजे. याच भूमिकेतून त्याचे उतार वय सुखात आनंदात जाणे आवश्यक आहे. म्हातारपणी तो कष्ट करू शकत नाही. आयुष्यभर हमाली करून सुध्दा स्वत:चे घर घेऊ शकत नाही. जिल्हयातील माथाडी कामगारांना पेन्शन, घरकुल आदी मागण्यांसाठी जिल्हा हमाल पंचायतीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला होता. ''कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १९ मार्च २०१० रोजी मोर्चा काढण्यात आला.'' यावेळी जिल्हाधिकारी डॉ. अल्बलगन यांनी निवेदन स्वीकाररून विविध मागण्यासांठी लवकरच बैठक घेऊन त्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले, अप्पा कोरपे, झुंबर आढाव, राघुजी मुरडनर, सहादू गुंजाळ, बापूसाहेब बडे, राम गाढवे, बाबा आरगडे, लक्ष्मीबाई कानडे, ॲड. लक्ष्मण वाडेकर इत्यादी जिल्हयातील कार्यकर्ते व नेते हमाल मोर्चात सहभागी झाले होते.

सरकारने मुक्या प्रांण्याच्यासाठी कायदे केले. बैलगाडीत किती ओझे टाकायचे, टांग्यात किती माणसे बसली पाहिजे ? यासंबंधी कायदे केले परंतु जगाचा भार वाहणाऱ्या हमाल कामगारांसाठी सरकारने कोणताही कायदा केला नाही. हमाल कामगाराने किती ओझे उचलले पाहिजे याचा कोठेच नियम नाही की कायदा नाही. कधी सरकारनेही या दुर्लक्षित राहिलेल्या कामगाराकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे त्यांच्यावर वर्षानुवर्षे अन्याय होत आला आहे. ''माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगारांकडून ५० किलो पेक्षा जास्त वजन हमालांना देऊ नये. लेव्हीमध्ये वाढ करावी मजूरीचा दर महागाई निर्देशांकाप्रमाणे वाढवावा.''[३९] या मागण्यासाठी व वर्षानुवर्षे होणाऱ्या अन्यायाला वाचा

फोडण्यासाठी मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चेकऱ्यांना मार्गदर्शन कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांनी केले होते. हमालांच्या मागण्या ५ एप्रिल पर्यंत मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाचे कामकाज बंद करणार असल्याचा इशारा डॉ. बाबा आढाव यांनी दिला होता. सरकार निर्दयी असून कष्टकऱ्यांच्या विरोधात काम करते असा आरोप करण्यात आला. हमालांच्या पाठीवर १०० किलो वजन ठेवते. सरकार धनवंताचे असून गरीबांचे शोषण होत आहे. त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली पाहिजे असे डॉ. बाबा आढाव म्हणाले होते.

लेव्ही प्रश्नी जिल्हयातील ९ हजार हमाल माथाडी कामगारांनी ७ जून २०१० रोजी बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनामुळे जिल्हयातील सर्वच बाजार समित्यांमध्ये मालाची चढउतार करण्याचे काम ठप्प झाले होते. खरीप हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन हमाल माथाडीनी संप मागे घ्यावा. दोन महिन्यानंतर आपण स्वत: लक्ष घालून हा प्रश्न निकाली काढू असे जिल्हाधिकारी डॉ. पी. अल्बलगन यांनी जिल्हा हमाल पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले होते. त्यामुळे हमाल माथाडींचे काम बंद आंदोलन मागे घेण्यात आले. हमाल माथाडी व इतर कामगारांकडून ५० किलो पेक्षा अधिक वजनाच्या मालाची हाताळणी करून घेऊ नये. सध्या ३० टक्के लेव्ही दिली जाते. यात वाढ करून ५० टक्के करावी. नगर शहरातील भुसार व भाजीपाला विभागातील काटयापुढील हमालीत वाढ करावी इ. मागण्या आंदोलकांनी केल्या होत्या. या सर्व मागण्यांचा जिल्हाधिकाऱ्यांनी अभ्यास केला होता. ''जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रश्नावर २६ एप्रिल २०१० रोजी बैठक घेऊन १५ दिवसात कायदयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते.''[४०] त्या बैठकीस व्यापारी प्रतिनिधी गैरहजर राहिले. माथाडी कामगारांना वेठीस धरण्याचा प्रयत्न होता. त्यामुळे संप करण्याशिवाय हमाल पंचायतीपुढे पर्याय नव्हता. ७ जून २०१० पासून जिल्हयातील सर्व हमालांनी बेमुदत संप पुकारला होता. त्या संपात सर्व हमाल कामगार सहभागी होऊन सभा घेण्यात आली. या संपाचे नेतृत्व अहमदनगर

जिल्हा हमालपंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले यांनी केले. त्यावेळी गोंविद सांगळे, अप्पा कोरपे, बाबा आरगडे इत्यादींची भाषणे झाली. ही स्वाभिमानाची लढाई आहे. आम्ही कोणाला भीक मागत नाही असे हमाल पंचायतीने जाहीर केले होते. गेल्या चार महिन्यांपासून प्रश्न मांडला तरी व्यापाऱ्यांना त्याचे देणे घेणे नाही. व्यापारी लेव्हीप्रश्नी दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. व्यापाऱ्यांचा माथाडी कायदयाला विरोध आहे. त्यामुळेच त्याची अंमलबजावणी होत नाही. अशा प्रकारे अनेक आंदोलने संप करून मागण्या मान्य केल्याशिवाय माथाडींना न्याय मिळणे शक्य नाही हे सांगावेसे वाटते.

५० किलो ओझे :—

''आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने हमालांनी ५० किलोपेक्षा जास्त वजन उचलल्यास त्यांच्या शरीरस्वास्थ्यावर परिणाम होतो म्हणून हमालांनी ५० किलोपेक्षा जास्त वजन उचलू नये असा ठराव १९९९ मध्ये केला आहे.''[४१] त्या ठरावाची केंद्रसरकारने दखल घेऊन देशभरातील सर्व मुख्यमंत्र्यांना कळविण्यात आले होते. त्यांनीही कामगार आयुक्तामार्फत माथाडी बोर्डात जिल्हा उपनिबंधक कार्यालयांना व बाजार समित्यांना कळविले होते. पण तब्बल एक तप उलटले तरी या ठरावाची अंमलबजावणी अद्याप झाली नव्हती. गेल्या १२ वर्षात अनेक चर्चा, परिसंवाद झाले पण हमालांच्या पाठीवरील ओझे काही कमी झाले नाही. शरीरशास्त्रानुसार सुदृढ माणूस जास्तीत जास्त ३० ते ४० किलो वजन पाठीवर उचलू शकतो. त्यापेक्षा जास्त वजन उचलले तरी पाठीच्या मणक्याला त्रास होऊ शकतो. याशिवाय पायाचे गुडघे, कंबर, पाठ अन्य विकार ही होऊ शकतात.

हमालही माणूस आहे त्याला ही जीवन आहे. वयाच्या २० ते ४० वयापर्यंत उत्साह व ताकद असल्याने माणसे जीव मोडून काम करतात. पण पुढे वयानुसार ताकद कमी होत जाते. परिणामी व्याधी जडतात. याला हमाल तरी कसे अपवाद असतील ? मुक्या प्राण्याला दया दाखविण्याची आपली संस्कृती असताना हमालासारख्या जित्याजागत्या माणसाला जनावरांपेक्षा कमी किंमत देण्याची वृत्ती चिंताजनक म्हणावी लागेल. हमालांना सध्या एक पोते

१०० किलोचे उचलल्यावर जी मजूरी मिळते त्यापेक्षा जास्त मजुरी ५० किलो वजन उचलल्यावर मिळणार आहे. त्यामुळे एक तर पाठीवरचे वजन कमी होणार व हमालीचे उत्पन्नही दुप्पट होणार आहे. त्याचा फायदा हमालांनाच होणार आहे. खरे तर वाढलेले हमालीचे दर व्यापारी आपल्या खिशातून देण्याची शक्यता नाही. शेतकऱ्यांनाच ही झळ सोसावी लागणार आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी चार चाकीत फिरायचे, कुशनच्या खुर्च्या वापरायच्या मात्र कष्ट करणाऱ्या कामगाराला उपाशी ठेवायचे. ही रीत माणूसकीच्या जमान्यात अमानवी म्हणावी लागेल. अशी वृत्ती एकीकडे ठेवून दुसरीकडे समाजसेवेचे, मानवसेवेचा आव आणणे म्हणजे ढोंगीपणा म्हणावा लागेल. हमाल व व्यापारी ही बाजारपेठेची दोन चाके आहेत. दोघांनी एकमेकांना समजून घेतले तरच एकमेकांच्या अस्तित्वाची किंमत दोन्ही घटकांना समजेल.

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीच्या वतीने अनेक दिवसापासून सुरू झालेल्या लढयास यश आले. ''हमालांना यापुढे फक्त ५० किलो वजनाचे पोते पाठीवर दयावे असा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी १ जानेवारी २०११ पासून होणार असल्याचे उपनिंबधक कैलास वाबळे यांनी जाहीर केले.''[४२] सर्व हमालांनी याप्रसंगी आनंद व्यक्त केला. खूप दिवसांच्या लढयाला अखेर यश आले अशी भावना कामगारांमध्ये निर्माण झाली. हमाल व व्यापारी यांची बैठक उपनिंबधक कार्यालयात झाली होती. हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले, उपनिबंधक कार्यालयाचे शिवाली बनकर, माथाडी मंडळाचे निरीक्षक पी.एन.लोंढे, एस.सी. देवकर, बाबा आरगडे, अप्पा कोरपे, गोंविद सांगळे, ॲड. लक्ष्मण वाडेकर इ. जिल्हयातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. हमाल कामगारास यापुढे ५० किलो पेक्षा जास्त वजन उचलण्यास देऊ नये याबाबत जनजागृती करणे आवश्यक होते. अशाप्रकारे फार मोठया लढयाला यश मिळाल्याने सगळीकडे आनंदाचे वातावरण तयार झाले होते.

अशाप्रकारे अहमदनगर जिल्हयातील हमाल पंचायतीने हमालांसाठी संप, आंदोलने करून आपले हक्क मिळविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहे. त्यामुळेच हमालांना आज सुख व समाजात मान मिळत आहे. घाम घाळून

आपले हक्क मिळवित असल्याने त्यांच्या जीवनमानात निश्चितच बदल येथून पुढील काळात पाहावयास मिळेल यात शंका नाही. माथाडी कामगारामधील शिक्षणाची जागृती, हमालांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, हमाल व व्यापारी यामधील संघर्ष, हमालावरील अत्याचार व शोषण, संघटनेचा अभाव, त्यासाठी उभारलेली विविध आंदोलने हे सर्व त्यांच्या प्रगतीसाठी व त्यांच्या अमुलाग्र बदल घडविण्यासाठी उपयोगी ठरतील यात मुळीच शंका वाटत नाही.

संदर्भसुची

१) दैनिक गावकरी, दि. ४ मार्च २०१२

२) पाटील व्ही.पी. दि. ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन कराड, पान नं. ५३. १९९८

३) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२ पान नं. २४.

४) कित्ता पान नं. २४.

५) कित्ता पान नं. ११८

६) अहमदनगर जिल्हा माथाडी कामगारांची पतसंस्था अहवाल — २०११, १२ पान नं. १०.

७) कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर, पान नं. ५

८) जागतिक श्रम संघटनेचा ५० किलो वजनाचा ठराव, १९४८.

९) कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर पान नं. १

१०) कित्ता पान नं. २

११) डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता विशेषांक २०१२ पान नं. ४८.

१२) कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर पान नं. ४०.

१३) दैनिक गावकरी, दि. ४ मार्च २०१२

१४) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११ पान नं. ९

१५) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन पुणे १९९२ पान नं. ११७

१६) कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर पान नं. ५.

१७) कित्ता, पान नं. ८

१८) डॉ. आढाव बाबा, सत्यशोधनाची वाटचाल, मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे १९९९. पान नं. १७९.

१९) कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर १९९५ पान नं. १५.

२०) दैनिक लोकमत, दि. २५/२/१९९७.

२१) कोरपे अप्पा, भारवाही स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर पान नं. २४.

२२) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत

स्मरणिका २०११ पान नं. ९

२३) कित्ता पान नं. २९

२४) पाटील व्ही.पी. दि. ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जय जगदीप प्रकाशन, कराड १९९८, पान नं. ५३.

२५) दैनिक तरूण भारत दि. २/९/२०००

२६) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२ पान नं. २४

२७) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११ पान नं. १०

२८) कित्ता पान नं. १०

२९) कित्ता पान नं. १०

३०) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२. पान नं. ११७

३१) कित्ता पान नं. ११७

३२) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका, पान नं. ७

३३) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२ पान नं. ११७

३४) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका, पान नं. ८

३५) कित्ता पान नं. २३

३६) कित्ता पान नं. २३

३७) दैनिक समाचार, दि. ८/८/१९९८

३८) दैनिक सार्वमत, दि. १२/४/२००८

३९) दैनिक देशदूत दि. २०/३/२०१०

४०) दैनिक सार्वमत दि. ८/६/२०१०

४१) साप्ताहिक ज्ञानधारा दि. १४ फेब्रुवारी २०११ ते २० फेब्रु २०११

४२) दैनिक नवामराठा दि. ९/१०/२०१०.

प्रकरण चौथे

हमाल पंचायत आणि माथाडी कामगार चळवळ

४.१ माथाडी कामगारांची संघटना स्थापण्याच्या वेळी झालेला विरोध

४.२ माथाडी कामगार चळवळीतून तयारझालेले अनुकुल वातावरण

४.३ माथाडी कामगार चळवळीसाठी प्रभावी नेतृत्वाची गरज

४.४ माथाडी कामगारांचे हमाल पंचायत स्थापण्यासाठी योगदान

४.५ जिल्हा हमाल पंचायतीला मिळालेले कुशल नेतृत्व

४.६ जिल्हा हमाल पंचायत स्थापन झाल्यावर माथाडी कामगारांच्या जीवनात झालेला बदल

प्रकरण चौथे

हमाल पंचायत आणि माथाडी कामगार चळवळ

४.१ माथाडी कामगारांची संघटना स्थापण्याच्या वेळी झालेला विरोध :—

अहमदनगर जिल्हा हा विविधतेने नटलेला आहे. एकीकडे धरणाच्या पाण्यामुळे समृद्ध बनलेला उत्तरेचा भाग तर दुसरीकडे नेहमीच दुष्काळाने होरपळत असलेला दक्षिणेचा भाग. माणसाला जीवन जगण्यासाठी दोन वेळेची पोटाला भाकरी मिळावयास हवी. त्यासाठी धडपड केल्याशिवाय पर्याय नव्हता. ग्रामीण जीवनात रोजच काम मिळेल असे नाही. ज्या दिवशी काम मिळाले, त्यादिवशी पोटाला पोटभर खायला मिळत होते. मात्र ज्यादिवशी काम मिळाले नाही. त्यादिवशी संपूर्ण कुटुंबावर उपासमारीची वेळ येत होती. त्यातून काहीतरी मार्ग काढायला हवा असे हळूहळू ग्रामीण लोकांना वाटू लागले. गावात काम मिळेनासे झाल्यामुळे साहजिकच शहराकडे धाव घेऊ लागले. शहरात आल्यावर काम मिळेलच असेही नाही. त्यासाठी शिक्षण हवे मात्र गरीबीमुळे शिकता न आल्याने कुटुंबाची दयनिय अवस्था झाली होती. माणूस अडानी, अशिक्षित असेल तर काम मिळणे ही मुश्किल होते. अशिक्षित असल्याने त्यांच्या सोयीचे काम म्हणजे हमाली होय. माणसाला कोणतेही काम करण्यासाठी त्याच्या अंगी कौशल्य हवे असते. अशिक्षित असल्याने हमाली व्यवसायाकडे वळल्याची अनेक उदाहरणे आपणास पाहावयास मिळतात. कोणताही माणूस आनंदाने हमाली व्यवसायाकडे येत नाही. त्या माणसाला पोटाची खळगी भरण्यासाठी तो मार्ग अवलंबावा लागतो. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून हमालांच्या व्यवसायात चोरीपेक्षा हमाली बरी असे ठरवून काम चालू होते.

हमालाला हमालीच्या बदल्यात दाणेडबऱ्यात धान्य मिळत होते. मार्केटकमिटीची स्थापना झाल्यावर हमालांना पैशात हमाली मिळू लागली होती. ''शेतकऱ्याचा माल गाडीतून उतरवून थप्पी मारून लिलाव झाल्यानंतर पोते उचलून काटयावर ठेवणे, ओढून गाडीत टाकणे, एवढया कामाचे चार आणे हमाली मिळत होती.''[१] तरीही हमाल मंडळी खुश होती. गावावरून शहरात

आल्यामुळे निदान हाताला काम मिळाले होते. त्यातील पैशाने पोट भरत होते. एवढेच समाधान मात्र होते. व्यापाऱ्यांच्या दृष्टीने हमाल म्हणजे बैल. अवहेलना व हालअपेष्टा सहन करत हमाल आपले जीवन जगत होता. हमाल ज्यावेळेस हमालीचा व्यवसाय स्वीकारतो. त्यावेळेस त्याच्या नशिबात चोविस तासाची गुलामगिरी होती. हमाल हा जवळपासच्या गावातून किंवा परिसरातून कामासाठी बाजार पेठेत आलेला होता. रात्री घरी जात असे तेव्हा बायको, मुले झोपलेली असायची. सुट्टी खूप मुश्किलीने मिळत होती. मालकाने सुट्टी दिली तरच घरी जाता येत असे. एखादया दिवशी हमाल घरी जात होता त्यावेळी मुलांची आई घरी नसे. हमालांची मुले दारात बसलेली असायची. त्यावेळी हमालाने विचारले, ''का रे तुमची आई कुठे गेली? त्यावेळेस त्या मुलांनी सांगितलं की आई दळायला गेली पण तुम्ही कोण?''[२] हा प्रश्न मात्र स्वत:च्या वडिलांना विचारला होता. यावरून बापलेकांची ओळखच नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली होती. चोविस तास मालकाच्या दारात असल्याने प्रपंचासाठी हमालांना दोन तासही मिळत नव्हते. हमाल ही माणूस आहे. त्यालाही कुटुंब आहे हे व्यापारी वर्ग विसरला होता. हमालीमुळे हमाल कौटुंबिक सुखापासून परका झालेला होता.

हमालांची व्यापाऱ्यांकडून शारीरिक पिळवणूक होतेच परंतु आर्थिक पिळवणूक मोठया प्रमाणावर होत होती. मात्र त्याविरूध्द 'ब्र' शब्द काढण्याची हिंमत त्यांच्यात नव्हती. एवढा व्यापाऱ्यांचा धाक होता. यातूनही एखादया हमालाने अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केलाच तर त्याला कामावरून काढून टाकले जात होते. हमालांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन लागत होता. हमाल म्हणजे हमाल. कान धरून कामाला जुंपायचे, पाठीवर, डोक्यावर ओझे वाहून सुध्दा हमाली पाच दहा पैसे मिळत होती. हमालांनी जास्त हमालीची मागणी केली तर हमाल माजलेत असे ऐकायला मिळत होते. हमाल म्हणजे त्या व्यवस्थेचा गुलाम होता. एवढया तुटपुंज्या कमाईवर पोट भरणे मुश्किल झाले होते. कष्टाने आणि उपासमारीने अंगातली ताकद कमी होत

चालली होती. शिवाय दिवसभर कष्टामुळे अंग मोडून निघत असल्यामुळे शीण हलका करण्यासाठी नशा घेण्याकडे त्यांचा कल वाढत होता. त्या सर्व प्रकारांमुळे हमालांने कितीही कष्ट केले तरी हमाल गाळातच रूतलेला होता. कर्जबाजारी झाला होता. त्यांची परिस्थिती बदलणे अवघड होते.

हमाल कामगार इमानदारीने काम करूनही त्याच्या पदरी निराशाच येत होती. दुकानामध्ये रात्रंदिवस काम करावे लागत होते. हमाल कामगारांना उपेक्षेचे जीवन जगावे लागत होते. त्याच सुमारास अहमदनगर जिल्हयात कम्युनिष्ट कामगार चळवळीचा पाया घालणारे डी.बी. कुलकर्णी घोसपुरीगावचे रहिवाशी होते. गावोगावी सावकारशाहीने धुमाकुळ घातला होता. ती सावकारशाही नष्ट करण्यासाठी शेतमजूर शेतकऱ्यांनी हत्यारे घेऊन सावकारांविरूध्द तीव्र बंड पुकारले होते. ''इ.स. १९५६—५७ साली राहाता येथे कॉ. विठ्ठल हरी सदाफळे यांनी ऊस शेतीवर काम करणाऱ्या टोळीवाल्यांची संघटना बांधण्यास सुरूवात केली. त्याचे नेतृत्व दत्ता देशमुख यांनी स्वीकारले.''[३] अशा संघटनेला नेतृत्व मिळाल्याने ठिकठिकाणी कामगार एकत्र येऊ लागल्याने शेतमजुरांचे संघटन उभे राहिले होते. बडया बागायतदारांकडे मोठया प्रमाणावर जमिनी असत. त्यांच्याकडील काही जमिनी घेऊन शेतमजुरांना दिल्या पाहिजेत यासाठी कोपरगांव, श्रीरामपूर तालुक्यातील आंदोलनाला धार आली होती. शेतमजुर संघटनेत लालनिशाण पक्ष यांच्या पुढाकाराने आदिवासी, शेतमजूर, गरीब शेतकरी सामिल झाले होते.

हमाल कामगारांना एकत्र येऊ दयायचे नाही हे धोरण व्यापाऱ्यांनी आखले होते. त्यास हमाल कामगार बळी पडत होते. संसदीय लोकशाहीमध्ये मध्यम व सधन वर्गाचे नेहमीच प्रभूत्व राहते. येथील राज्यकर्ता, मोठे भांडवलदार व मोठे व्यापारी हुशार आहेत. कामगारांची संघटना अशी सहजपणे क्रांतिकारक रूप घेऊ शकत नाही हे त्यांना माहिती होते. येथे गरीब व मध्यम वर्ग संख्येने मोठा आहे. तो एकत्र येऊन शासनाच्या विरोधात उभा राहु नये म्हणुन शासन कर्ता वर्ग नेहमीच काळजी घेतो. कामगारांची आंदोलने दडपण्याचे

काम केले जात होते. हमाल कामगारांचे शोषण मोठया प्रमाणावर होत होते. हमाल कामगार पुढाऱ्यांना हे कळून चुकले होते. जिल्हयात इतर कामगार संघटनाही आपल्या अस्तित्वासाठी व संघटना भक्कम करण्यासाठी झटत होत्या. त्यात शेतमजूर कामगार, कोतवाल, मैलकोले यांच्या संघटना स्थापण्यासाठी भास्करराव जाधव आघाडीवर होते. ''खेडयापाडयात पसरलेला जो ग्रामीण कामगार आहे. त्याच्या संघटित चळवळीला दिशा देणे व ती जीवंत चळवळ म्हणून चालू ठेवणे हे जे पुढारीपणाचे काम आहे ते कॉ. भास्करररावांनी चांगल्या प्रकारे पार पाडलेले आहे.''[४] कॉ. भास्करराव जाधवांचा शहरातील औद्योगिक कामगार चळवळीशी संबंध कमी आला असला तरी त्यांना त्यांचे प्रश्न माहित होते. सर्वच कामगारांचे प्रश्न थोडे बहुत एकसारखेच असतात. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार नेत्यामध्येही धाडस व सहनशिलता असावयास हवी तरच संघटना यशस्वी होऊ शकते.

अहमदनगर जिल्हा कम्युनिष्टांचा बालेकिल्ला होता. त्यामुळे कम्युनिष्टांच्या भोवती चळवळी फिरताना दिसतात. बापूसाहेब भापकर शेतकरी किसान पक्षाच्या स्थापनेत सहभागी झाले होते. महाराष्ट्रातील नवजीवन संघटना हा एक कम्युनिष्ट गटही या पक्षात सामील झाला होता. या गटाचे नेते कॉ. एस. के. लिमये, कॉ. यशवंत चव्हाण यांचा वैचारिक प्रभाव पडून दत्ता देशमुखही शेतकरी कामगार पक्षात दाखल झाले होते. अहमदनगर जिल्हयातून बापूसाहेब भापकर, कॉ. दत्ता देशमुख व भाई सथ्था यांच्यासह कामगार किसान पक्षात गेले होते. ते कामगार किसान पक्षात राहून शेतकरी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र झटत होते. हे सर्व लढे चालू असताना हमाल कामगारामध्ये मात्र संघटनेच स्वरूप येत नव्हते. हमाल कामगार वेगवेगळया ठिकाणी काम करत असल्याने एकत्र येणेच अवघड होते. त्याचाच गैरफायदा व्यापारी घेत होते. हमाल कामगारांचे पुढारी शंकरराव गायकवाड, भानुदास पोकळे, सुर्यभान पाटील, रघुनाथ गीते हे हमाल कार्यकर्ते युनियनचे पुढारी बापूसाहेब भापकरांना भेटले होते. व्यापारी मात्र हमालीबाबत काहीही चर्चा करत नव्हते. ''व्यापारी असोसिएशने असा निर्णय घेतला की, प्रत्येक व्यापाऱ्याने

आपापले हमाल दुकानी बोलावून घ्यायचे आणि त्यांना पाडव्याच्या आदल्या दिवशी दम देऊन तुम्ही जर पाडव्याच्या दिवशी कामावर आले नाहीत तर तुम्हाला कामावरून काढून टाकू''[५] असे व्यापारी हमाल कामगारांना दम देऊन कामावर येण्यास सांगत होते.

अशा प्रकारे अहमदनगर जिल्हयात हमाल कामगार चळवळीबरोबर शेतमजूर चळवळ, कोतवाल चळवळ, मैलकोले शेतकरी कामगार चळवळी आपल्या हक्कासाठी आंदोलनाच्या माध्यमातून बंड करत होते. हमाल कामगारांची इतर चळवळीसारखे संघटन मजबूत मिळाले नसल्यानेच हमाल कामगारांनी वाताहत झालेली दिसते. त्यात प्रत्येक विभागात वेगवेगळया युनियन असल्यानेच त्यांचा प्रभाव पडत नव्हता. त्यासाठी सर्व हमाल कामगार एकत्र येणे खूप आवश्यक होते. एकत्र आल्याशिवाय त्यांचे हक्क व रास्त मागण्या, सोयीसुविधा मिळू शकत नव्हत्या. हमाल पुढाऱ्यांमध्ये एकीचा अभाव व दुटप्पीपणा पाहावयास मिळत होता. अशा उपेक्षित कष्टकरी कामगारांना मायेचा आधार देणे खुप आवश्यक होते. हमाल वर्गाचे दु:ख समाजापुढे प्रखरतेने मांडणे खूप आवश्यक होते.

४.२. माथाडी कामगार चळवळीतून तयार झालेले अनुकुल वातावरण :—

हमाल कामगारांना पुढारी संघटनेचे महत्व पटवून देत होते. कामगारांनाही संघटना हवी होती. परंतु कामगारांच्या अडानीपणाचा व्यापारी गैरफायदा घेत होते. व्यापारी कामगारांना चूकीची माहिती सांगत होते. त्यामुळे आपल्या फायदयाचे कोणते हे ओळखणे हमाल कामगारांना अवघड जात होते. शिवाय संघटनेत गेल्यास काम मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती. हमाल कामगारांना काम महत्वाचे होते. पोटासाठी दोन वेळेची भाकरी मिळण्यासाठी खरी धडपड चालू होती. हमाल कामगारांना संघटनेचे महत्व पटवू लागले. हमाल कामगारांना चोविस तासाची गुलामी सहन करावी लागत होती. त्यातून सुटका व्हावी असे हमाल कामगारांना मनोमन वाटत होते. त्याच काळात श्रीरामपूर, कोपरगांव, राहुरी या भागात शेतमजूरांना व गरीब शेतकऱ्यांना संघटित करण्याच्या कामास

बापूसाहेब भापकरांनी लक्ष पुरविले होते. कॉ. उत्तमराव पठारे तसेच कॉ. र.ग. पंधरकर, कॉ. सोले तसेच पक्षाचे जिल्हयातील ग्रामीण भागातील अन्य कार्यकर्ते या कामी बापूसाहेब भापकर व भाई सथ्था यांची मोठी मदत घेत असत. त्यासाठी कामगारांच्या प्रश्नांसाठी झटत होते. फासेपारधी, भिल्ल, आदिवासी आणि भटक्या विमुक्त समाजात बापूसाहेब व दत्ता देशमुख काम करत होते. त्यांचे समाजाशी अतुट नाते तयार झाले होते. ''रस्त्यावरील कामगारांना मैलबिगारी म्हणत असे. हे रोजंदारीचे काम करत असत. त्यांना पाच आणे रोज मिळत असे. त्यांना केव्हाही काढायचे व केव्हाही घ्यायचे.''[६] त्यांच्याकडून हमाल कामगारांसारखेच अधिकारी लोक घरची कामे करून घेत असे. त्यासाठी या मैलबिगारी कामगारांनी संघटना बांधली. घरची कामे बंद झाली पाहिजेत. कामावर घेतल्यानंतर किमान सेवा झाल्यानंतर त्याला मधून काढता कामा नये, भरतीचे नियम करायला हवेत अशा मागण्या मैलकामगारांनीही केल्या होत्या. त्यासाठी संघटना भक्कम करणे महत्वाचे आहे हे त्यांना पटले होते.

मैलकामगार जागृत होऊन आपल्या हक्कासाठी लढत होते. हमाल कामगारातही संघटना स्थापन्यासाठी जोरदार हालचाली होत होत्या. त्यांनाही इतर संघटना स्थापन झाल्याने संघटनेची ताकद जाणवू लागल्यानेच हमाल कामगारांची संघटना स्थापन झाल्याखेरीज अन्याय अत्याचार कमी होणार नाही हे मनोमन पटले होते. या संपूर्ण काळात संघटनेचे जाळे निर्माण झाले होते ते सर्वच मान्य करतात. इतकेच नाही तर मुलभूत स्वरूपाचे काम होत होते. हे मान्य करावे लागेल, त्यांची दिशा एक होती. कामगारामध्ये एक प्रकारचे विश्वासाचे वातावरण तयार झाले होते. हाच धागा पकडून माथाडी कामगारांमध्ये संघटनेचे वारे वाहू लागले होते. हा फार चांगला शुभसंकेत होता. माथाडी कामगारांची संघटना होणे फार गरजेचे आहे हे कामगारांना वाटत होते. संघटनांची आंदोलने होऊन मागण्या पूर्ण करून घेत होते. मात्र माथाडी कामगारामध्ये नैराश्याचे वातावरण व एकजुटतेचा अभाव कारणीभूत होता. त्यामुळे व्यापारी वर्ग पिळवूणक करत होता.

हमालांना चोविस तासाची गुलामी सहन करावी लागत होती. त्यातून सुटका व्हावी असे मनोमन हमाल कामगारांना वाटत होते. रात्रभर आलेल्या मालाचे राखण करावे लागत होते. व्यापारी मात्र दुकान बंद करून घरी जात होते. मात्र हमालांने त्या मालाचे डुकरापासून रक्षण करायचे. एवढे करूनही त्याच्या आयुष्यातील गुलामी कमी होत नव्हती. एवढा प्रामाणिकपणा, निष्ठा ठेवूनही व्यापारी हमालांना सन्मानाची वागणूक देत नव्हते.

दुकानातील कामाचे पैसे मिळत होते मात्र दिवाळी दसऱ्याच्यावेळी घरी साफसफाई करावी लागत होती. त्याचा कोणाताही मोबदला हमालाला मिळत नव्हता. एवढेच नव्हे तर घरी पाठवून पापडाचे पीठ कुटायला लावत होते. व्यापारी दुकानातील कामे करून घेत होतीच. मात्र त्यांच्या घरची कामे ही करावी लागत होती. त्यावेळी हमालांच्या मनात पापडाचा विचार येत होता मात्र हे पापड व्यापाऱ्यांसाठी व त्यांच्या नातेवाईकांसाठी करायचे होते. अप्पा कोरपेंना पीठ कुटायला व्यापाऱ्याने घरी पाठविल्यानंतर त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यांच्यापुढे सहा पीठाचे गोळे ठेवले होते. अप्पांनी त्या मुलीला विचारले, ''एवढे पापड तुम्ही खाता ? ती मुलगी म्हणाली, 'अहो, तुम्हाला कळात कसं नाही ? हे सगळे पापडाचे गोळे आमचे नाहीत.''[७] असे म्हटल्यावर अप्पांना समजले की चुलतीचा, मावशीचा, शेजारणीचा, चुलत मावशीचा, मामाचा अशा सर्वांचे पीठ कुटुन ठेवण्याची जबाबदारी अप्पांवर सोपवली होती. व्यापारी स्वत:ची कामे करून घेतातच मात्र त्याचबरोबर आपल्या नातेवाईकांचेही कामे करून घेतली जात होती. या जुलमी आणि अनिष्ट पध्दती बंद झाल्या पाहिजे असे हमालांना हळूहळू वाटू लागले. पण हे काम एकटयाचे नव्हते त्यासाठी सर्व हमालांमध्ये जागृती व्हायला हवी असे प्रत्येक हमालाला मनोमन वाटू लागले. हमाल कामगार हा दिवसभर काबाडकष्ट करून थकलेला असतो. संध्याकाळी दिवसभर कमविलेली कमाई खाण्यात तर काही हमाल व्यसनात खर्च करीत होते. दिवसभर कष्ट करून शीण हलका करण्यासाठी व्यसनाकडे वळालेली पाहावयास मिळतात. संध्याकाळी एकत्र जेवण करण्यास हमाल

कामगार एकत्र जमत. त्यावेळी हमाल एकमेकांमध्ये गप्पा मारण्यात दंग होत. कामगार मिळून मिसळून राहत असल्याने अल्पावधीत त्यांची सर्वांबरोबर ओळख झाली होती. ''मग ती लोकं नशेत तयार व्हायची आन म्हणायची की, मला अजुन एक पुडी दया, एक पुडी, च्यायला म्हणे अप्पानं चांगल्या काढल्यात गोष्टी''[८] गांजा मळताना गप्पा रंगात येत असे. गांजाच्या झुरक्याबरोबर अप्पा कोरपे हमालांवर होणाऱ्या अन्यायी, जुलमी पध्दतीबद्दल बोलत असत, हमाल रात्रंदिवस मार्केटमध्ये राहत असल्याने गाय—म्हैस असेल तर चारापाणी करता येत नाही अशा अडचणी कामगारांपुढे मांडत असे. हमालांच्या जिव्हाळयाची समस्या मांडत असल्यामुळे कामगारांनाही त्यांनी सांगितलेले पटत होते. त्यातुन हमाल कामगारांचे विचार अन्यायाविरूध्द तयार होत होते. हमाल कामगारांमध्ये अशा अन्यायाविरूध्द चीड निर्माण होऊ लागली होती.

हमाल कामगार व्यापाऱ्यांच्या दुकानात कामास सुरूवात केल्यावर त्याला कोणतीही सुट्टी किंवा घरी जाता येत नसे. हमालांच्या बायका घर सोडून जात होत्या. त्या घटनांची चर्चा संपूर्ण बाजारपेठेत होत होती. हमालांला व्यापारी बैल समजत असल्याने हमालाला बायको मिळण्याची पंचाईत होती. चोविस तासाच्या गुलामगिरीमुळेच त्या बायका हमालांना सोडून निघून गेल्या होत्या. ही बाब फारच गंभीर होती. हमालांना व त्याकाळच्या व्यापारी व्यवस्थेला विचार करण्यास लावणारी घटना होती. हमाल जर घरी जातच नसेल तर हमालांच्या कुटुंबाकडे लक्ष कोण देणार ? त्यांच्या मुलांच्या खाण्या पिण्याकडे, आरोग्याकडे लक्ष कोण देणार ? अनेक अडचणी त्यांच्यापुढे ''आ'' वासून उभ्या होत्या. मात्र हमालांच्या अडचणींकडे कोणीच गांभीर्याने पाहत नव्हते. तरीही त्या घटनांनी ना बाजार कमिटीने दखल घेतली ना व्यापाऱ्यांनी. अशा खूप अडचणींना व प्रश्नांना सामोरे जावे लागत होते. मात्र त्यांचे व्यापाऱ्यांना काहीही देणे घेणे नव्हते. ते फक्त व्यापारी दृष्टीकोनातून पाहत होते. त्यांच्याकडील माणूसपण हरवले होते. त्यातील माणूसपण जागे करण्याची गरज त्यानिमित्ताने निर्माण झाली होती.

विसाव्या शतकात कामगार चळवळीवर कार्ल मार्क्सच्या विचारांचा फार मोठा प्रभाव पडला होता. रशियामध्ये १९१७ मध्ये साम्यवादी क्रांतीनंतर ते आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीचे घोष वाक्य बनले. ''दास कॅपिटल या ग्रंथात मार्क्सने भांडवलशाही अर्थव्यवस्थेची तात्विक चिकित्सा करून कामगारांची पिळवणूक कशी होते हे विशद केले आहे.''[९] दिवसेंदिवस कामगारांची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर बेकारी, दारिद्रय, गरीबी उग्र रूप धारण करीत आहे. समाजामध्ये दोन प्रमुख वर्ग तयार झाले आहे. मुठभर भांडवलदार व बहुसंख्य कामगार यामध्ये दिवसेंदिवस तीव्र संघर्ष वाढत आहे. कामानुसार वेगवेगळी मजूरी मिळणे अपेक्षित होते. परंतु तशी मजुरी मिळत नव्हती. आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी एकजूट करणे फार महत्त्वाचे होते. मार्क्सवादी विचारसरणीने भांडवलशाहीमध्ये कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारणे शक्य नाही. त्यांना जीवननिर्वाहाला आवश्यक तेवढेच वेतन मिळाले नाही तर त्यांचे दु:ख, दारिद्रय वाढत जाईल. कामगारांना गुलामासारखे राबवले जाईल, आर्थिक मंदीच्या काळात कामगारांना खूप मोठया अडचणींना तोंड दयावे लागेल. त्यासाठी माथाडी कामगारांना साप्ताहिक सुट्टी वेतनवाढ, अपघात विमा, कामाचे ठराविक तास यासारख्या मागण्या जोर धरू लागल्या आहे.

भारतातील कामगार चळवळीचे मुख्य वैशिष्टये म्हणजे कामगार चळवळीला फार मोठा इतिहास नाही. संघटित विभागात कामगार चळवळ अर्थकारणाशी निगडीत झाली आहे. शेतमजूर, छोटया आस्थापनेतील कामगार पूर्णपणे असंघटित राहिले. ग्रामीण भागातील मजूर तर सामाजिकदृष्टया मागास राहिला आहे.

माथाडी कामगार काम करत असूनही त्यांच्या जीवनात, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता नव्हती. कामगार जेथे सुरक्षित नसेल तर तेथे काम करणे काय कामाचे ? शंकर मुकादम हा आयुष्यभर मार्केटमध्ये हमाली करत होता. तो पोत्याच्या थप्पीखाली सापडून मरण पावला त्याच्यावर काळाने झडप घातली. मात्र त्यांचे कोणालाही दु:ख किंवा खंत नव्हती. श्रीमंताच्या कुत्र्यांची

लोक आत्मीयतेने चौकशी करतात मात्र कष्टकरी हमालाला कोणीही विचारत नाही. हे कटूसत्य आहे. एवढेच नाही तर हमालाची मौत मालकाच्या दारातून आणली. वर्गणी करून हमाल कामगारांना मौत करावी लागली. हमाल रात्रंदिवस राबून जर असे मरण येत असेल तर मुक्या प्राण्यांपेक्षाही भयानक आहे. एवढे करूनही परिस्थितीत कोणताच फरक पडत नव्हता. हमालांकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत व्यापाऱ्यांबरोबर संघर्ष अटळ आहे. हमालांमध्ये संघटना करणे खूप आवश्यक होते. मांजराच्या गळयात घंटा कोणी बांधायची ? असा प्रश्न उभा होता. अशा अनेक मिटिंगा दिवसा न होता रात्रीच्या वेळी होत होत्या. मात्र संघटनेत जो पुढाकार घेईल त्या पुढाऱ्याला व्यापारी कामावर ठेवत नव्हते. हमाल संघटनेच्या पुढाऱ्यांना व्यापाऱ्यांनी कामावरून हाकलून दिले होते. त्यांच्या ही कुटुबांचा प्रश्न निर्माण झाला होता. ''अप्पा कोरपे स्वत: हमाली करत होते मात्र त्यानंतर त्यांनी १९७२ साली मापाडयांचे लायसन काढले आणि हमालाच्या वादात पुढाकार करू लागले. हमालीत असताना त्यांना मार्गदर्शन करीत होते पण चोरून, लपून''[१०] मात्र हमाल आणि मापाडी यातही फरक होता. अप्पा कोरपे जेव्हा प्रश्न मांडण्यासाठी उभे राहिल्यावर व्यापाऱ्यांनी लेबर ऑफिससमोर अप्पा कोरपे यांना बोलू दिले नाही. हमालांबरोबर व्यापाऱ्यांशी मिटींग होत होती. परंतु हमालांना व्यापारी बोलू देत नव्हते. हमाल व्यापाऱ्यांच्या त्रासाला कंटाळले होते. हमाल निर्भिडपणे हळूहळू बोलू लागले. स्वत:वरील अन्याय त्यांना सहन होत नव्हते. संघटना करायची म्हटले तर त्या नियमाप्रमाणे कामगारांनी वागले पाहिजे तरच त्यांच्यात एकता निर्माण होते. हमाल कामगार कोणी घ्यायचा आणि कोणी कमी करायचा व दुसराविषय संघटनेने कामगारांपुढे ठेवला तो म्हणजे हमाल कामगार रात्री दुकानी झोपणार नाही. दोन विषय हमालांपुढे ठेवल्यावर कामगार कोणी त्या पत्रावर सही करण्यास तयार होईना. त्यापत्रावर सही केली तर व्यापारी आपल्याला कामावरून काढून टाकतील ही धास्ती होती. संघटना फक्त मार्केटयार्ड पुरतीच करायचे ठरले होते. परंतु सही करण्यास कोणी पुढे येत

नव्हते. गॅरेजची संघटना वेगळी होती, रेल्वे, मालधक्याला संघटना होती. हमालांच्या संघटनेत मापाडयांची संघटना येण्यास तयार नव्हती.

४.३ माथाडी कामगार चळवळीसाठी प्रभावी नेतृत्वाची गरज

आपण आपल्या आयुष्यात सोसले ते दु:ख इतरांच्या वाटयाला येऊ नये यासाठी अहोरात्र धडपड अप्पा कोरपे यांची चालू होती. हमाल कामगार सुखी व्हावा हाच हेतू त्यामागे होता. हमाल कामगारांना वाली कोणीही नव्हता. त्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे मनोमन वाटत होते. हमाल कामगारांना हमालांच्या जीवनाविषयी स्वत:चे अनुभव अप्पा कोरपे सांगत, आपल्यावरील होणाऱ्या अत्याचाराला तोंड देण्यासाठी संघटित होणे गरजेचे आहे. हमाल अडाणी असल्याने पटकन दुसऱ्यावर विश्वास ठेवत नव्हते. अप्पा कोरपेजवळ असणारी बोलण्याची शैलीच हमाल कामगारांना भावली होती. अप्पा आपल्यातले आहेत असे हमाल कामगारांना वाटू लागले.

युनियन खूप वेळा तयार झाल्या होत्या. प्रत्येक वेळी व्यापारी हमालामध्ये फुट पाडून संप बारगळत होते. संप बारगळण्याने हमालांची फार कुचंबना होत असे. अप्पा कोरपे व इतर कामगारांनी डॉ. बाबा आढाव यांची भेट घेतली ''त्यांनी वेगवेगळया संघटना करण्यापेक्षा एकच मोठी संघटना करण्याचा सल्ला दिला. अन तेव्हापासून नगरच्या हमालांची दिशा बदलली.''[११] व्यापाऱ्यांनी पिळवूणक व गुलामगिरीचे राज्य हमालांवर केले होते. डॉ. बाबा आढांवाचे मार्गदर्शन मिळण्यास सुरूवात झाल्यावर काहीसा अंधुक प्रकाश दिसू लागला होता. हमालांच्या जीवनातील अंधार संपण्याची चिन्हे त्यानिमित्ताने निर्माण झाली होती. डॉ. बाबा आढावांनी सर्व हमाल कार्यकर्त्यांना संघटना एक असल्यावर त्याचे फायदे व ताकद वाढते हे पटवून दिले होते. प्रत्येक विभागात वेगवेगळी संघटना असल्यामुळे वचक राहत नव्हता. 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी अवस्था होती. ती व्यवस्था बदलायची असेल तर सर्वांनी एका संघटनेच्या छताखाली यावे लागेल हे डॉ. बाबा आढावांनी पटवून दिले होते.

हमाल कामगारांनाही बाबा आढावांचे विचार पटले होते. एकत्रित आल्याशिवाय संघटनेला काही अर्थ राहणार नाही असे बाबा आढावांनी ठासून सांगितले होते.

हमालांसाठी केलेल्या कार्यामुळे अप्पा कोरपेंना महाराष्ट्रात ओळखू लागले होते. हमाल म्हणजे भारवाही, भार वाहून नेणार तो हमाल. स्वत:च्या मालकीचे त्याच्याजवळ काहीच नसते. तुकारामांने सुध्दा नम्रपणे आपल्याकडे भारवाही मापाऱ्यांची भूमिका घेतली होती. जे काही ज्ञानभंडार आपल्या अंभगवाणीतून तुकारामाने दिले त्याचा धनी दुसराच आहे. तुकाराम फक्त भारवाही होते. ''तुकारामाने हमालाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती. पण आमचा उच्चनीच भेदभावावर आधारलेली समाज व्यवस्थाच इतकी करंटी की प्रत्यक्षात हमालीचे काम करणारा उपेक्षित राहतो.''[१२] हमालांना न्याय खरोखर मिळविण्यासाठी लढावे, झगडावे लागते. तरीही त्यांना मान, प्रतिष्ठा मिळत नाही. सन्मान, प्रतिष्ठा ही सुध्दा जातीपातीवरून मोजली जात होती. ही फार मोठी समाजाची शोकांतिका होती. खरा कष्ट करणारा व्यक्ती सन्मान प्रतिष्ठेपासून आणि सत्तेपासून आजही वंचित राहतो. हमालांमधून नेतृत्व पुढे आलेले अप्पा कोरपे खरोखर असामान्य व्यक्तिमत्व आहे. असंघटित कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र झटणारे असे व्यक्तीमत्व समाजापासून इतके दिवस दुर्लक्षितच राहिले होते. हमाल कामगारांची होणारी पिळवणूक त्यांना सहन होत नव्हती. त्या अन्यायाविरूध्द आवाज उठविण्याचे काम त्याकाळी अप्पा कोरपे यांनी केले. कष्टकरी सुध्दा माणूस आहे, त्यांच्यातले माणुसपण जागविणे, टिकविणे, उन्नत करणे हाच अप्पांचा ध्यास होता. खऱ्या अर्थाने अप्पा कोरपे यांचे नेतृत्व मिळाल्यानेच संघटना स्थापण्यास गती आली होती, हमाल कामगारांना मार्गदर्शन करीत होते. अण्णाभाऊ साठे म्हणत की, ''देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा, सभ्य व्हावा अशी मंगल स्वप्ने पाहत मी लिहित असतो.''[१३] कामगारांविषयी आत्मीयता अण्णाभाऊंनी प्रकट केली होती. देश सुख करायचा असेल तर त्यासाठी गरीबातील गरीब कामगार सुखी झाला पाहिजे. त्याला सक्षम करण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न झाले पाहिजे. त्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न आवश्यक आहेत. मुठभर भांडवलदार कामगारांच्या

ताटातील हिसकावून घेण्याची भाषा करत आहेत हे कदापि मान्य नाही. देश समृध्द, बलशाली करण्यासाठी कामगार सुखी झाला पाहिजे असे वाटते. अण्णाभाऊ साठेंचे विचार समाजासाठी आजही तितकेच उपयोगी व प्रेरणादायी आहेत. बहुधा अप्पा कोरपे त्याच जाणिवने जगत असावेत की, हमालांसारखा कष्टकरी, असंघटित, सुखी व्हावा, संपन्न व्हावा, माणूसपणाने जगावा हाच अप्पा कोरपे यांच्या जीवनाचा ध्यास होता. त्याच भूमिकेतून हमाल कामगारांचे नेतृत्व करत असताना निर्भिडपणे आपले विचार व्यापाऱ्यांपुढे व हमालांपुढे मांडत असे. हमालांमध्ये निडरता, निर्भिडपणा निर्माण होऊ शकला. कोणीतरी धाडस दाखवावे लागते तरच कोणतेही काम मार्गी लागते. धाडस व हमालांचे नेतृत्व त्याकाळच्या प्रतिकूल परिस्थितीत केले हे फार महत्त्वाचे आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असूनही व्यापाऱ्यांना विरोध करून हे काम हमाल कामगारांनी व पदाधिकाऱ्यांनी केले तेव्हा आज हे नेतृत्व उदयास येऊ शकले. प्रत्येकाच्या सुख दु:खात मिळून मिसळून वावरत असल्याने अप्पा कोरपे अल्पावधीत हमाल कामगारूतन लोकप्रिय झाले. त्यांच्यामध्ये असणारे कौशल्यच काम पूर्ण करण्यासाठी मदत करीत होते हे याठिकाणी सांगावेसे वाटते.

संघटना स्थापनेसाठी अनुकुल वातावरण तयार होत असतांना इ.स. १९७८ मध्ये पुण्यामध्ये हमालांचा मेळावा डॉ. बाबा आढाव यांनी आयोजित केलेला होता. त्या मेळावेचे निमंत्रण अहमदनगर जिल्हयातील हमालांना व पुढाऱ्यांना देण्यात आले होते. निमंत्रण मिळाल्यावर सर्व हमाल कामगारांना व पुढाऱ्यांना खूप आनंद झाला होता. आता आपल्याला आपल्या हक्काची संघटना स्थापन होईल अशी आशा हमाल कामगारांच्यामध्ये निर्माण झाली होती. पुण्याला जायचे कसे हा प्रश्न त्यांच्यापुढे भेडसावत होता. हमालांजवळ पुण्याला जाण्यासाठी पैसे नव्हते. काय करावे हे हमाल मंडळीना सुचेना मात्र ते मनाने पूर्णपणे पुण्याला जाण्यासाठी तयार झाले होते. अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड यांची १३ जणांची टोळी होती. रोजची मिळकत एका पेटीत टाकत होते. त्यामुळे पेटीत बरेचसे पैसे जमा झालेले होते. ती पेटी फोडल्यावर

त्यावेळी ४० रूपये निघाले होते. पुण्याला जाण्यासाठी त्यापैशातून एक ट्रक भाडयाने केला होता. २५ ते ३० हमाल कामगार त्या मेळाव्यासाठी गेले होते. सभा ठिक १० वाजता सुरू झाली. डॉ. बाबा आढावांनी सगळया हमाल कार्यकर्त्यांना आपले विचार मांडण्यास सांगितले होते. प्रत्येकजण आपापल्या भागातील संघटना स्थापण्याच्या अडचणी मेळाव्याच्या निमित्ताने मांडत होते. त्यावेळी अप्पा कोरपे म्हणाले की, ''बाबा तुम्ही फक्त पुण्या पुरतं पाहू नका. जागोजागी मेळावे घ्या. आमच्याकडे लक्ष दया.''[१४] अहमदनगरमध्ये अनेक वेळा संघटना बांधण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र व्यापारी संघटना टिकू देत नव्हते. त्यामुळे आता तरी डॉ. बाबा आढावांच्या पुढाकाराने संघटना स्थापन होण्याची आशा निश्चित निर्माण झाली होती. बाबांना नगरमध्ये मेळावा घेण्याचा आग्रह सर्व हमाल कार्यकर्त्यांनी केला. त्यात अप्पा कोरपे आघाडीवर होते. बाबांनी अप्पांकडून सर्व माहिती विचारून घेतली. नगरमध्ये युनियन किती आहेत ते जाणून घेऊन बाबांनी त्यावर विचार केला. सर्व युनियन बरखास्त करून एकच हमाल पंचायत स्थापन करावी लागेल असे बाबांनी सांगितले होते. त्यावर अप्पांनी आम्ही जरूर प्रयत्न करू असे त्यांना सांगितले. अशाप्रकारे माथाडी कामगार चळवळीतून अनुकूल वातावरण तयार झाले होते. इतकेदिवस संप होत होते परंतु व्यापारी त्यांच्यात फोडाफोडी करत होते. बाबा आढावांसारखे नेतृत्व व मार्गदर्शन मिळाल्याने हमाल कामगारांना फार मोठा आधार मिळाला होता. हमाल कार्यकर्तेही मनापासून कामाला लागले होते. हमालाबद्दल आणि कष्टकऱ्याबद्दल उदात्त हेतू होता. जे दु:ख आतापर्यंत हमाल कामगारांनी सोसले होते त्याचा उपयोग निश्चितच या लढयाने होणार होता.

४.४ माथाडी कामगारांचे हमाल पंचायत स्थापण्यातील योगदान :—

समाजात कष्ट करणाऱ्या वर्गाची प्रतिष्ठा वाढली तरच समाजजीवन खऱ्या अर्थाने संपन्न होऊ शकते. कामगार सुखी राहिला तरच समाजातील सर्व कामे व्यवस्थित पार पडतील. त्यासाठी कामगाराची भूमिका फार महत्त्वाची होती. समाज कामगारांकडे गंभीरतेने पाहताना दिसत नाही. कामगार एकत्र आले

पाहिजे तरच त्यांना न्याय मिळू शकेल असे वाटते. तथापि शारीरिक श्रमाची किंवा अंगमेहनतीची कामे करणारे व विखुरलेल्या अवस्थेत असलेल्या हमालासारख्या कामगारांना संघटित करणे सहज साध्य नव्हते. मोठमोठया शहरात हजारो कामगार काम करत असूनही संघटनेचे वारे वाहताना दिसत नव्हते. मुंबईत असणाऱ्या मोठया प्रमाणावर असणाऱ्या कापड गिरण्यामुळे कामगारही खूप होते. तरीही तेथे संघटना अस्तित्वात नव्हती. त्यामुळे कामगारांचे शोषण, अन्याय मोठया प्रमाणावर वाढलेले होते. हे सर्व समाज उघडया डोळयांनी पाहत होता. कामगाराकडे पाहण्यास कोणासाठी वेळ नव्हता.

शारीरिक श्रमाची किंवा अंगमेहनतीची कामे करणाऱ्या कामगारांना संघटित करणे सोपे काम नव्हते. हजारो कामगार एकत्र काम करत असल्याने प्रत्येकाचे विचार हे वेगवेगळे होते. त्यातून वैचारिक मतभेद कधी कधी वाढत होते. तर कधी वैचारिक परिवर्तनही घडून येते. स्वातंत्र्य पूर्व काळात मोठमोठया शहरांत ही हमालांच्या संघटना अस्तित्वात नव्हत्या. मुंबई, पुणे यासारख्या मोठया शहरात कामगार ओझे वाहून नेण्याची कामे करतात. अशा ठिकाणी ही संघटनेचा अभाव होता. ''मुंबई शहरातदेखील इ.स. १९६२ पर्यंत हमालांच्यासाठी कोणतीही संघटना अस्तित्वात येऊ शकली नव्हती.''[१५] एवढया मोठया महानगरीत हमालांना ही कोणी वाली नव्हता. कामगार क्षेत्रात अनेक कामगार नेते व कार्यकर्ते कामगारांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील होते. मात्र तरीही कोणतीही संघटना हमालांसाठी अस्तित्वात येऊ शकली नव्हती. तसे पाहता हमाल या कष्टकरी वर्गाकडे दुर्लक्षच झाले होते. संघटना बांधणे हे काम फार अवघड होते. हमाल हे शहरातील लहान मोठया व्यापाऱ्यांकडे काम करीत होते. हमालीचे काम व्यक्तिगत किंवा टोळी पध्दतीने चालत असे. काही ठिकाणी एकच हमाल काम करतो तर काही ठिकाणी एखादी टोळी काम करत असते. थोडक्यात हा हमाल विखुरलेल्या अवस्थेत होता. त्यामुळे सर्वांना एकत्र आणणे फार अवघड होते. हमालांची संघटना स्थापन करण्यात खूप अडचणी येत होत्या. त्यांच्यामध्ये असणारे अज्ञान व निरक्षरता होय. हमाल हे ग्रामीण भागातून आलेले होते. ग्रामीण भागातून आल्यामुळे शिक्षणाचा अभाव दिसत

होता. एकत्रित येण्यास हमाल कामगार तयार नव्हता. त्यामुळे एकत्रित येण्यास हमाल कामगार घाबरत होते. एकत्र आलो तर कामावरून काढून टाकण्याची भिती वाटत होती. तसे पाहता त्यामध्ये थोडेफार तथ्य ही होते. त्याकाळची परिस्थिती कारणीभूत होती. व्यापारीदेखील हमालांची दिशाभूल करत होते. संघटनेमुळे तुमचे नुकसान होईल असे व्यापारी सांगत असे संघटनेच्या नेत्यापासून तुम्हाला त्रास होईल ही भिती त्यांच्या मनात निर्माण करीत होते. ज्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी संघटना बांधायची त्यांनाच त्या अन्यायाची जाणीव नव्हती. त्यामुळे संघटनेचे महत्व त्यांना समजत नव्हते.

संघटना उभारणीच्या वेळी अप्पा कोरपे व इतर हमाल कार्यकर्ते स्वत:चे अनुभव सांगत असे. त्यावेळेस ते अनुभव थोडयाफार फरकाने हमालांना स्वत:चेच वाटायचे. इतर हमाल कामगार उंच कान करून ऐकत असे. हमालांच्या हक्कासाठी लढत असताना संघटना उभी करणे एकटयाचे व सोपे काम नव्हते. हमालांचे जीवन वास्तवात अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड इत्यादी कार्यकर्त्यांनी स्वत: अनुभवले होते. ''त्यासाठी व्यापाऱ्यांकडून पिडलेल्या आपल्या हमाल सहकाऱ्यांना संघटित करावे ही जाणीव झाली. त्यामुळे कामगारांचा संघटनेवरचा विश्वास वाढविणे आवश्यक होते.''[१६] भानुदास पोकळे, शेख यासीनभाई, रामभाऊ गाढवे, शेख गुलाब, रामभाऊ सोनटक्के, बाळासाहेब वडागळे अशी निवडक दहा माणसे शहराच्या बाहेर अप्पा कोरपे व इतर हमाल कार्यकर्त्यांनी नेली होती. त्यांना संघटनेविषयी हातापाया पडून पटविण्यात आले. हमालांनो तुम्ही सभासद होऊ नका परंतु डॉ. बाबा आढावांचे भाषण ऐकण्यासाठी मेळाव्याला या असा आग्रह त्यांनी केला होता. त्यानंतर मालधक्यावरील हमाल एकत्रित करण्याचा खटाटोप करावा लागला. परंतु तेथे गेना कोतकर, भानुदास निमसे, हमाल कार्यकर्त्यांना भेटले, तुम्ही कार्यक्रमासाठी पैसे देऊ नका मात्र बाबा आढावांचे भाषण ऐकण्यासाठी येण्याचे निमंत्रण दिले. त्यावेळी अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड निर्भिडपणे कामगारांपुढे भाषण करत होते. कामावरून व्यापारी काढतील ही भिती त्यांच्या मनात नव्हती. अप्पा कोरपे मापाडी म्हणून काम करीत होते. त्यांना त्याची

भिती नव्हती, आपल्यावरील गुलामगिरी संपवायची असेल तर आपण एक झाले पाहिजे आणि संघटना केली पाहिजे असे मनोमन हमाल कामगारांना वाटू लागले होते. या मेळाव्यासाठी ५ रूपये वर्गणी ठेवली होती. इतर हमाल उत्साहाने वर्गणी देत होते. आता फक्त गॅरेजचे हमाल मात्र या संघटनेपासून व मेळाव्यापासून दूर होते. डॉ. बाबा आढावांनी पुण्याच्या मेळाव्यात सर्व संघटना एकत्रित आणण्यास अप्पा कोरपे यांना सांगितले होते.

प्रत्येक ठिकाणी युनियन वेगवेगळी होती. त्यामुळे म्हणावा तसा दबाव ना सरकारवर पडत होता ना व्यापाऱ्यांवर. सर्व संघटना एकत्र आणण्याच्यादृष्टीने गॅरेजच्या पुढाऱ्यांनी हमालांना बोलावून घेतले होते. त्यावर चर्चा होऊन त्यांच्या अटी मान्य केल्यावर सर्वांनी एकत्र येण्याचे ठरविले. दत्तू कळमकर, शेख गफूर, दादाबा औडानी, गोरख कोहक, नाना गर्जे हे कार्यकर्ते संघटनेत सामिल झाले. गॅरेजचा उपाध्यक्ष पदी भानुदास निमसे यांना करण्याचे ठरले. त्यावेळी अप्पा कोरपे म्हणाले की, ''तीन आठवडयात सर्वांची मनधरणी करून हात जोडून, पाया पडून, विनंती करून सर्वांना एकत्र केले.''[१७] मार्केटमध्ये मेळावा घेण्यासाठी सर्वजण एकत्र आल्याने खुश झाले होते. जिल्हाभर फिरून प्रत्येक मार्केटमध्ये जाऊन हमालांच्या भेटी घेतल्या होत्या. त्याचे फलित म्हणून डॉ. बाबा आढावांचा फारमोठा मेळावा मार्केटयार्डमध्ये झाला. जिल्हयातून सर्व हमाल कामगार उपस्थित होते. कामगारांना उद्देशून डॉ. बाबा आढाव म्हणाले की रात्र वैऱ्याची आहे, आपण सगळे एक झालेच पाहिजे. एक झाल्याशिवाय कोणताच प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी कामगारांमध्ये एकी असणे फार महत्वाचे आहे. एकीचे बळ मोठे असते ते पटवून देण्यात डॉ. बाबा आढाव यशस्वी ठरले. हमाल पंचायत स्थापना इ.स. १९७८ मध्ये झाली. मेळावा झाल्यानंतर संघटनेचे पदाधिकारी नेमण्यात आले होते. शंकरराव गायकवाड यांना अध्यक्ष केले तर उपाध्यक्ष म्हणून भानूदास निमसे यांची निवड करण्यात आली. चार उपाध्यक्ष, खजिनदार, जनरल सेक्रेटरी म्हणून अप्पा कोरपे यांची निवड केली होती. संघटनेच्या रजिस्टर नंबर पूर्वी पुण्यावरून आणावा लागत होता. रजिस्टर

नंबर मिळाला. पुण्याच्या हमाल पंचायतीचा कारभार हमाल पुढाऱ्यांनी जवळून पाहिला होता. पुण्याला आठ दिवसाला मिटिंग भरत असे. हमाल कामगार आपली गाऱ्हाणे, अडचणी त्या मिटिंगमध्ये मांडत असे. त्याच धर्तीवर अहमदनगरमध्येही शनिवारी एकदिवस मिटिंग होत असे. त्या मिटिंगमध्ये हमाल कामगारांचे गाऱ्हाणे, अडचणी मांडल्या जात असे.

१९ जुलै १९७८ रोजी अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अस्तित्वात आली होती. संघटना स्थापन करण्याच्या वेळी अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड इ. हमाल कार्यकर्त्यांना खूप अडचणींना तोंड दयावे लागले होते. हमाल कामगार सुरूवातीला संघटनेत यायला घाबरत होते. हमालांच्या थंड प्रतिसादामुळे अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड इ. कार्यकर्ते मात्र नाऊमेद झाले नव्हते. त्याना स्वत:ला या काळात खुप मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागत होता. एखादे काम हाती घेतल्यावर कामाचा अखेरपर्यंत पाठपुरावा करावयाचा हेच त्यांच्या स्वभावाचे व कार्यपध्दतीचे वैशिष्टये होते. या लढयाला नेत्रदिपक यश मिळू शकले. हमाल कामगारांच्या अथक परिश्रमाचे खऱ्या अर्थाने चीज झाले असे सांगावेसे वाटते. हमालांची संघटना स्थापन होईपर्यंत कष्टकऱ्यांना कसलीही प्रतिष्ठा नव्हती. हमाल ज्या व्यापाऱ्यांकडे किंवा मालकांकडे काम करावयाचे त्या व्यापाऱ्याला हमालाचे नावही माहित नव्हते. व्यापाऱ्यांनाही कधी नाव जाणून घेण्याची गरज भासली नाही. व्यापारी हमालांना 'गडी' या नावानेच त्यांना काम सांगितले जात होते. बाजारपेठेतही त्याच नावाने हाक मारली जात होती. मात्र हमाल पंचायत स्थापन झाल्याने प्रत्येक दुकानात त्यांच्या नावाची अधिकृत नोंदणी होऊ लागली. अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड इ. कार्यकर्त्यांनी हमाल कामगारांचे अज्ञान व भय दूर केले. संघटना स्थापनेच्या कार्यात डॉ. बाबा आढावांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले होते. संघटना स्थापन केली म्हणजे कार्य संपले असा अर्थ होत नाही. उलट त्यानंतरच त्यांच्यादृष्टीने खऱ्या कठिण कार्याला सुरूवात झाली होती. आपल्या संघटनेचे सभासदत्व हमालांनी स्वीकारावे यासाठी त्यांनी अत्यंत कष्ट घेतले होते. हमालापर्यंत प्रत्यक्ष जाऊन संघटनेची उपयुक्तता पटवून देण्याची खटपट करावी

लागली होती. म्हणूनच हमाल कामगारांमध्ये विश्वास निर्माण होऊ शकला. जिल्हा हमाल पंचायत स्थापन होऊ शकली.

४.५ जिल्हा हमाल पंचायतीला मिळालेले कुशल नेतृत्व :—

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अध्यक्ष शंकरराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली काम करीत होती. डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली हमाल पंचायत नावारूपाला येत होती. मात्र हमाल पंचायतीसमोर अडचणी कमी न होता वाढतच होत्या. हमाल कामगारामध्ये व्यापाऱ्यांची दहशत जाणवत होती. मात्र हमाल पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी हमालांच्या कल्याणाविषयी एकएक निर्णय घेण्यास सुरूवात केली होती. इतके दिवस हमाल कामगार दिवस रात्र व्यापाऱ्यांच्या दारात बैलासारखे राबत होते. हमाल पंचायतीला पूर्वीचे अन्याय अत्याचार थांबवयाचे होते. रात्रीच्या वेळी कोणताही हमाल कामगार दुकानाबाहेर राखण करण्यासाठी झोपणार नाही असा पहिला निर्णय हमाल पंचायतीने घेतला होता. मात्र खुद्द हमाल कामगारही या निर्णयाबाबत साशंक होते. व्यापारी या निर्णयाची अमंलबजावणी होऊ देणार नाही असे वाटत होते. हमाल पंचायतीच्या रेटयामुळे व्यापारीही काही करू शकले नाही. ''हमाल पंचायतीचा थोडा दाब बसू लागला, हमाल पंचायतीची कागदपत्रे अप्पाजवळ असत. प्रभाव व्यापाऱ्यावर पडू लागला होता.''[१८] हमालांच्या जीवनात येणाऱ्या काळात निश्चितच बदल जाणवेल असा विश्वास हमाल नेत्यांमध्ये जाणवत होता. हमालांच्या एकतेचे दर्शन दिसले होते. हमाल कामगारांनाही संघटनेची ताकद दाखविण्याची संधी या निमित्ताने मिळाली होती. अन्यायकारक प्रथा बद पाडण्याचा सपाटा हमाल पंचायतीने लावला होता. व्यापाऱ्यांना हे निर्णय रूचणारे नव्हते. संघटना तयार होत होत्या मात्र व्यापारी त्या संघटना मोडकळीस आणत होते. हमाल पंचायतीच्या निर्णयांना विरोध करून संघटना मोडून काढतील अशी भिती हमाल कामगारामध्ये होती.

हमाल कामगारांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळत होती. त्यांच्या अंगावरील कपडे पाहूनच व्यापारी नव्हे तर कोणीही हेटाळणी करीत होते.

''हमालांबरोबर नीट कोणी बोलत नाही तर त्यांचे नेतृत्व कोण करील? आमचे गाऱ्हाणे कोण ऐकेल? आमचे पुढारपण कोण करील.''[१९] असे हमाल पुढाऱ्यांना व हमाल कामगारांना मायेचा आधार देणाऱ्या नेत्याची गरज वाटत होती. खूप कष्टाने व हिमंतीने हमाल पंचायत स्थापन झाली खरी मात्र भिती दिवस रात्र व्यापाऱ्यांची वाटत होती. हमाल कामगार अगदी तुटपुंज्या हमालीवर काम करीत होते. महागाईच्या काळात कुटुंब चालविणे हमाल कामगारांना अवघड जात होते. हमाली वाढवून मिळण्यासाठी संप केल्याशिवाय पर्याय नव्हता. हमाल कामगार मागच्या अनुभवामुळे संप करण्यास तयार होत नव्हते. संप केल्यास तो यशस्वी होईल याची खात्री हमाल पंचायतीच्या पुढाऱ्यांनाही वाटत नव्हती.

कामगार चळवळीचा लढा यशस्वी करायचा असेल तर नेतृत्व खंबीर असावे लागते. त्यासाठी नेत्यामध्ये धैर्य व हिंमत असणे गरजेचे होते. या दोन्ही गोष्टी हमाल पंचायतीच्या पुढाऱ्यांकडे होत्या. चळवळ यशस्वी करण्यासाठी खंबीर नेतृत्वाची गरज निर्माण झाली होती. या गोष्टी एकत्र आल्याशिवाय यश मिळणे अवघड वाटत होते. ''संघटनेला डॅशिंग नेतृत्व असावे असे अप्पा कोरपे व इतरांना मनोमन वाटत होते त्याशिवाय संप यशस्वी होणे शक्य नव्हते.''[२०] हमाल कामगारांत फुट पडली तर संघटनेला धोका निर्माण होईल. त्यामुळेच संप करण्यसाठी चालढकल चालू होती. व्यापारी संप न करता हमाली वाढून देत नव्हते. जगात मागितल्याशिवाय काही मिळत नाही. संप अयशस्वी झाल्यास हमाल कामगार बेकार होईल अशी भिती संघटनेला वाटत होती.

अहमदनगर शहरामध्ये नवीन मार्केट व जुने मार्केट याबाबत वाद चालू होता. गावातील जुने व्यापारी नवीन मार्केटमध्ये येण्यास तयार नव्हते. नवीन मार्केटमध्ये शंकरराव घुले यांनी आडत सुरू केली होती. त्यामुळे त्यांचा मार्केटशी संबंध निर्माण झाला होता. त्यांनीही जुने व्यापारी नवीन मार्केटमध्ये येण्यासाठी प्रयत्न केला होता. मात्र त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला होता. शंकरराव घुले व इतर व्यापाऱ्यांनी उपोषण मार्केट कमिटीच्या दारात केले. त्या उपोषणास हमाल पंचायतीचे अध्यक्ष, शंकरराव गायकवाड, अप्पा कोरपे, व

इतर कार्यकर्त्यांनी जाहीर पांठिंबा दिला होता. शंकरराव घुले यांनी हमाल पंचायतीचे नेतृत्व केल्यास हमाल कामगारांना चांगले दिवस येतील असे वाटत होते. राजकीय क्षेत्रात शंकरराव घुले नवीन असले तरी कुस्तीचे मैदान गाजविणाऱ्यास ते अशकय नव्हते. हमाल पुढाऱ्यांनी शंकरराव घुले यांची त्यांच्या घरी भेट घेऊन नेतृत्व करण्याची विनंती केली. ''साहेब तुम्हाला जर समाजकल्याण करायचं असेल आणि आमचं गोरगरीबांच पुण्य पदरी जर घ्यायचं असेल तर फक्त हमाल पंचायतीचे अध्यक्षपद स्वीकारा. तुम्हाला परमेश्वर कमी पडू देणार नाही. पंरतु आमच्या गरीबावर छत्री राहू दया नुसती''[२१] हमाल नेत्यांनी खूप कष्टाने स्थापन केलेली हमाल पंचायत मोडकळीस येऊ नये असे मनोमन कामगारांना ही वाटत होते. त्याचाच विचार करून शंकरराव घुले यांनी हमाल पंचायतीला फार मोठा आधार मिळाल्याचे समाधान वाटले. शंकरराव घुले खूप तरूण असे व्यक्तीमत्व होते. नगरपालिकेतील अतिशय तरूण नगरसेवक होते. कुस्तीच्या मैदानातील पैलवान राजकीय आखाडयात डाव टाकत होते. त्यांचा प्रत्येक डाव यशस्वी ठरत होता. त्याचा प्रत्यय हमाल कामगारांना येत होता. नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शिकर यांचाही खूप जीव शंकरराव घुले यांच्यावर होता.

हमाल पंचायतीला नव्या उमेदीचे नेतृत्व मिळाल्याने हमाल कामगारामध्ये नवचैतन्य निर्माण झाले होते. त्यांचा अहमदनगर शहरात व परिसरात चांगला वचक होता. त्यांच्याबरोबर त्यांना खंबीर साथ देणारे दादा कळमकर, डॉ. नाथ पाऊलबुध्दे, पै. सहादू गुंजाळ, अशोक बाबर, मुरली तात्या भोसले, बापू बडे इत्यादी मंडळी होती. हमाल पंचायत अस्तित्वात होती. मात्र ऑफिससाठी जागा नव्हती. संघटनेचे कागदपत्रे पिशवीत घेऊन फिरावे लागत होते. संघटनेचे कायमस्वरूपी एका जागेवर ऑफिस असणे खूप आवश्यक होते. त्याशिवाय व्यापाऱ्यांवर वचक ठेवणे अवघड जात होते. शंकरराव घुले यांना युक्ती सुचली. संघटनेसाठी जागा मिळवायची असेल तर तडजोड करणे गरजेचे होते. मार्केटयार्डमध्ये मारूतीचे मंदीर होते. व्यापारी ट्रस्ट आणि मार्केट कमिटी असा वाद होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार अहमदनगर जिल्हयाच्या दौऱ्यावर

होते. त्यांच्याकडे ऑफिसच्या जागेची मागणी केली होती. पवार साहेब व शंकरराव घुले यांचे संबंध चांगले होते. अप्पा कोरपे यांनी साक्ष दिली. ''देवळाची देखभाल मार्केट कमिटी करते असे बरेच काही लिहून दिले आणि देवळाशेजारी आम्हाला प्लॉट दिला.''[२२] हमाल पंचायतीला हक्काची जागा मिळाली. हमाल कामगारांसाठी स्वत:च्या मालकीचे हमालभवन असावे असे कामगारांना वाटत होते. हमालपंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले यांनी मा. मुख्यमंत्री शरद पवारांकडे हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर चर्चा होऊन शरद पवार यांच्या हस्ते हमालभवनाचे भूमिपूजन करून घेतले. त्यातही शंकरराव घुले यांच्या नेतृत्वाचा विजय म्हणावा लागेल. धडाडीचा नेता, हमाल पंचायतीला लाभल्यानेच उत्तरोत्तर प्रगती होत गेली.

अहमदनगर जिल्हयामध्ये हमालपंचायतीचा विस्तार झपाटयाने वाढत आहे. त्यात तालुका पातळी, गावपातळी पर्यंत शंकरराव घुले यांचा दांडगा संपर्क आहे. जिल्हयातील प्रत्येक पक्षाशी शंकररावांचे मैत्रीचे संबंध असल्याने कामास अडचणी येत नाही. त्यांचा सर्व खटाटोप हमाल कामगारांसाठी आहे. त्यामुळे त्यांना जिल्हयातून खंबीर साथ मिळत आहे. ''स्थानिक कार्यकर्ते वेगवेगळया विचारधारेशी बांधील असून त्यांची बांधिलकी वेगवेगळया पक्षांशी आहे.''[२३] मात्र सर्वजन हमाल पंचायतीत काम एकत्र येऊन करतात याचा रास्त अभिमान आहे. राजकारण कमी करून समाजकारणाशी त्यांचा फार जवळचा संबंध आला आहे. म्हणून काय ते दुर्लक्षित अशा हमाल कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी झटत आहेत असेच म्हणावे लागेल. वेगवेगळया तालुक्यातील अध्यक्षांचा त्यांना खंबीर पांठिबा आहे. पारनेरचे सबाजी बुगे, राहूरीचे सतिष कोळपकर, श्रीरामपूरचे हरिभाऊ अजबे, नेवाशाचे कॉ. बाबा आरगडे, पाथर्डीचे रंगनाथ बोरूडे, शेवगावचे एकनाथ कोरडे, संगमनेरचे बाबा करपे, अकोल्याचे सुरेश आरोटे, श्रीगोंदयाचे भाऊसाहेब कोथंबिरे, जामखेडचे रंगनाथ राळेभात, कर्जतचे महावीर बाफना तर कोपरगावचे राधूजी मुरडणर अशी मातब्बर मंडळीच्या पांठिब्यामुळे शंकरराव घुले यांची हमाल कामगाराविषयी धडपड आपणास पाहावयास मिळते. कोणत्याही संघटनेचा नेता राजकीय पक्षाशी

संबधित असेल तर त्या कामगारांना लवकर न्याय मिळतो हे पुन्हा सिद्ध झाले आहे. अशा धडाडीच्या नेत्यामुळेच जिल्हा हमाल पंचायत यशाचे शिखर काबीज करीत आहे हे सांगावेसे वाटते. हमाल पंचायतीच्या कामात कॉ. आरगडे, ॲड. वाडेकर, गोविंद सांगळे, झुंबर आव्हाड यांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. माथाडी कामगार कायदा, लेव्हीचा प्रश्न, ५० किलोचा लढा असे अनेक लढे शंकरराव घुले यांच्या नेतृत्वाची परीक्षाच होती. हे सर्व लढे यशस्वी करून झुंजार नेतृत्व करून दाखविले. म्हणूनच आज हमाल कामगारांना सन्मानाची वागणूक मिळत आहे.

४.६ अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन झाल्यावर माथाडी कामगारांच्या जीवनात झालेला बदल –

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन करण्यामध्ये हमाल कामगारांचा सिंहाचा वाटा आहे. हमाल कामगारांना बहुमोल मार्गदर्शन करणारे महाराष्ट्र राज्य हमाल मापाडयांचे नेते डॉ. बाबा आढाव यांचे फार मोठे योगदान आहे. महाराष्ट्रातील माथाडी कामगारांना जागृत करण्याचे खरे काम डॉ. बाबा आढावांनी केले. अत्यंत अभ्यासू नेतृत्व लाभल्यानेच महाराष्ट्रातील कामगारांना त्यांचा फार मोठा आधार वाटतो. हमाल कामगारांना ताठ मानेने जगण्यासाठी खऱ्या अर्थाने तयार केले. ''एकत्रित आलो तर ते ही काम मिळणार नाही अशी भिती कामगारामध्ये होती. मात्र ही भीती दूर करण्याचे काम सर्वांच्या मदतीने केले त्यावेळी हमाल पंचायतीचे ५०० च्या आसपास सभासद होते. आज मात्र जिल्हाभर ही संख्या अडीच हजारावर गेली आहे.''[२४] एकत्र येऊन बाबा आढावांनी त्यांच्या मनातील भिती दूर केली. हमालांना देखील व्यापाऱ्यांचे म्हणणे पटत होते. ज्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी संघटना बांधायची होती. त्यांनाच त्या अन्यायाची जाणीव नव्हती. सर्वसामान्य लोक संघटनेच्या कामाची हेटाळणी करीत होते. हमाल नेत्यांनी तोच धागा पकडून शंकरराव गायकवाड, तानाजी आंधळे, दत्तू कळमकर, अप्पा कोरपे इत्यादींनी जीवाचे रान केले. म्हणूनच संघटना अस्तित्वात येऊ शकली. त्या संघटनेमुळे हमाल

कामगारांच्या आयुष्याला कलाटणी मिळू शकली. हमाल कामगारांच्या आयुष्यात विविध प्रकारचे बदल हमाल पंचायत स्थापन झाल्यावर झाले आहेत.

१) आर्थिक बदल :— हमाल कामगारांना रोज भेडसावनारी आर्थिक अडचण, हमाल पंचायत स्थापन झाल्यामुळे त्यांच्या जीवनाला आर्थिक स्थैर्य लाभले आहे. त्यांच्या कुटुंबातील असणारे अठरा विश्व दारिद्रय कमी होण्यास मदत झाली. हमाल पंचायत स्थापण्यापूर्वी काम मिळाले तरी पोटाला भाकरी मिळत नव्हती. मात्र कधी अर्धपोटी तर कधी उपाशी राहून दिवस काढावे लागत होते. खूप भयानक परिस्थिती माथाडी कामगारांची होती. दिवसभर ओझे वाहूनही हमाली खूपच कमी मिळत होती. त्या हमालीत स्वत:चे पोट भरणे ही मुश्किल होते. मात्र हमाल कामगारांना हे सर्व सहन करावे लागत होते. हमाल पंचायत स्थापण्यापूर्वी मजूरी मिळत होती. हमाल पंचायत स्थापन झाल्यावर महिन्याला वेतन मिळू लागले. मोलमजूरीचे जीवन जगणारा हमाल कामगार सरकारी कर्मचाऱ्यांसारख्या सवलती घेऊ लागला. बँकेत पत नसल्याने बँक ही त्यांना कर्ज देत नव्हती. बँकेतून पगार होऊ लागल्याने हमाल कामगारांना पत वाढली आहे. त्यातून हमाल कामगारांना बचतीची सवय निर्माण झाल्याने ती रक्कम सुरक्षित राहू लागली. आर्थिक व्यवहार व महिन्याचा खर्च यांचा मेळ घालता येऊ लागला. इतके दिवस अंधारात खितपत पडलेल्या कामगारांना सूर्यप्रकाशाची वाट सापडली आहे. आर्थिक परिस्थिती खराब असल्याने नातेवाईक सुद्धा कोणतीही मदत करीत नव्हते. आज हमाल कामगारांना आर्थिक स्थैर्य लाभल्याने त्यांचा विकास झालेला पाहवयास मिळतो. ''हमालाला पत नव्हती त्याला कोणी कर्ज देत नव्हते आलेली हमाली रोजचे रोज खर्चुन टाकण्याची अशी परिस्थिती होती.''[२५] हमालांना कोणतीही बचतीची सवय नसल्यानेच हमालाने मरेपर्यंत हमाली करूनही मेल्यावर त्याच्यासाठी वर्गणी करावी लागत होती. त्या हमालांचा अत्यंविधी वर्गणी करून करावा लागत होता. हमाल पंचायत अस्तित्वात आल्यावर पतसंस्थाही अस्तित्वात आल्याने अडचणीच्या काळात कर्ज मिळणेही सोयीचे झाले. कष्टकरी कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांची स्वत:ची पत निर्माण

करण्यासाठी माथाडी मंडळाचे अध्यक्ष सहायक कामगार आयुक्त आणि कष्टकऱ्यांचे दुसरे आधारस्तंभ मा.टी.जी. चोळके यांच्या मार्गदर्शनाखाली हमाल कामगारांची पतसंस्था स्थापन झाल्याने हमाल कामगारांना खूप फायदा झाला. बाहेरील कुठल्याही बँकेचे अर्थसहाय्य न घेता प्रत्येक हमाल मापाडी कामगारांच्या घामाच्या मोबदल्यातून ठराविक रकमेची बचत करून भांडवल उभारणी केली. संपूर्ण अहमदनगर जिल्हयात पतसंस्थेचे दोन हजार पाचशे सभासद आहेत. एकेकाळी बँका, पतसंस्था या हमालांना दारात उभ्या करीत नव्हत्या. एका आर्थिक संस्थेचा चेअरमन हमाल कामगार झाला याचा सार्थ अभिमान आहे. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महान कार्य शंकरराव घुले यांनी केले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आज हमाल कामगार स्वत:च्या घरात राहू लागला व सन्मानाने जगू लागला हे फार महत्वाचे आहे.

२) **सामाजिक बदल** – हमाल कामगार मुक्या प्राण्यांप्रमाणे गप्प राहून अन्याय सहन करत होता. त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी कोणीही वाली भेटत नव्हता. हमाल कामगार माणूस आहे. याचा विसर व्यापाऱ्यांना पडला होता. दिवस रात्र व्यापाऱ्यांच्या दारात राबूनही त्यांना सन्मानाची वागणूक मिळत नव्हती. व्यापारी हमालांना सालगडी समजत होते. मात्र प्रत्येकाचा दिवस एक ना एक दिवस येतो. या उक्तीप्रमाणे हमाल पंचायत स्थापन झाल्यावर खऱ्या अर्थाने हमाल कामगारांना सामाजिक मान, सन्मान मिळू लागला. त्यासाठी हमाल कामगारांना खूप त्याग, अपमान सहन करावा लागला. म्हणूनच आज माथाडी कामगारांना समाजात प्रतिष्ठा मिळत आहे. महात्मा गांधीजीनी म्हटले होते की, ''ज्या दिवशी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होईल त्या दिवशी मी माझा भारत देश स्वतंत्र झाला असे समजेन.''[२६] असा महान विचार कामगाराविषयी असणारी तळमळ व्यक्त करतो. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत केवळ कामगारांच्या फायदयासाठीच काम करत नसून ती एक सामाजिक बांधिलकी मानणारी संस्था बनली आहे. हमाल कामगार हा अधिकृत कर्मचारी झाल्याने समाजात त्याला सन्मानाची वागणूक मिळत आहे. त्याचे सर्व श्रेय हमाल कामगारांच्या पदाधिकाऱ्यांना दयावेच लागेल. समाजात असणारी आर्थिक व

सामाजिक परिस्थिती बदलण्यास मदत झाली आहे. हमालांना स्वाभिमानी जीवनाची खऱ्या अर्थाने सवय लागल्यानेच यशस्वी ठरले असे वाटते. कष्टाची भाकर वशिल्याने न मिळविता घाम गाळून मिळविल्यानेच ताठ मानाने भारवाही जगत आहे. हमाली करणारे कामगार सर्व जाती धर्माचे आहेत. मात्र त्यांच्यात सामाजिक सहिष्णुता पाहावयास मिळते. त्यांच्यातील एकोप्याचे दर्शन अनोखे आहे. हमाल कामगारांनी समाजाचा विश्वास मिळविल्यानेच आज कामगारांचे ही संसारे चांगले चालले आहेत. समाजाचे उतराई होण्यासाठी जणू इमानदारीने काम हमाल कामगार करत आहेत असे वाटते. हमाल कामगारास जगण्याचे साधन व स्वाभिमान मिळाल्याने त्यांच्या जीवनात स्थिरता निर्माण झाली. भाकरीसाठी कष्ट नाही तर जगण्यासाठी कष्ट, घर, कुटुंब, समाज, देश, देव, धर्म या सर्व गोष्टींच्या मुळाशी असलेले माणूसपण महत्वाचे आहे. म्हणूनच आज अहमदनगर जिल्हयातील हमाल कामगार स्वाभिमानाने जीवन जगत आहेत.

३) शैक्षणिक बदल :— अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगार खूप मोठया प्रमाणावर निरक्षर आहे. त्यांच्या प्रगतीमध्ये निरक्षरता हा अडसर होता. संघटना मजबूत तत्वावर बांधून हमाल पंचायत स्थापन झाल्यावर त्यांचे जीवनच बदलत गेले. निरक्षतेमुळे कुटूंबाची फार मोठी हानी झाली. व्यसनाला कामगार बळी पडले. त्याचा परिणाम कुटुंबात आर्थिक अडचणी वाढल्या होत्या. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीने हमाल कामगारांचे प्रबोधन केले. त्यांच्या मुलांना शाळा शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. ''अहमदनगर जिल्हा माथाडी कामगारांच्या पतसंस्थेतर्फे सभासद कल्याण निधी उभारला जातो. त्या निधीतून सभासदांच्या मुलांमुलींना गुणवत्तेनुसार बक्षिस वाटप केले जाते. हमाल कामगारांच्या मुलांच्या उच्चशिक्षणासाठी आर्थिक मदत संस्था करते.''[२७] त्याचबरोबर पाल्यांना शालेय साहित्याचे वाटप करून मदतीचा हात देऊन शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. हमाल कामगारांची मुले शिक्षण घेऊन नाव लौकिक मिळवित आहे. आईवडिलांना गरीबीमुळे न शिकता आलेले स्वप्न मुले पूर्ण करीत आहे. त्याचा हमाल कामगारांना सार्थ अभिमान आहे. त्यासाठी अहमदनगर जिल्हा हमाल

पंचायत नेहमीच प्रयत्नशील राहत आहे. शिक्षणामुळे त्यांच्या कुटुंबातील अंधार दूर होऊन सूर्य उगवला आहे. सूर्याच्या तेजासारखे त्यांची मुले विविध क्षेत्रात चमकत आहे. हमाल कामगारांची मुले पोलिस, क्लार्क, शिपाई, शिक्षक अशी वेगवेगळी पदे भूषवित आहे. हमाल कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीने आईवडिलांच्या चेहऱ्यावर समाधान वाटत आहे. त्यामुळे आज आर्थिक परिस्थितीमुळे चांगले शिक्षण घेत आहेत. त्यांचे सर्व श्रेय वेळोवेळी हमाल पंचायतीने राबविलेल्या योजना व आंदोलनाला देता येईल. हमाल कामगारांच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी दिवस रात्र हमाल पंचायत झटल्यामुळेच आज हमाल कामगारामध्ये स्वाभिमान पाहावयास मिळतो.

४) **आरोग्यविषयक बदल** :— हमाल कामगार दिवसभर जड ओझे उचलत असल्याने त्याचा त्यांच्या शरीरावर प्रतिकूल परिणाम होत आहे. हमाल पंचायत स्थापण्यापूर्वी २४ तासांची गुलामी सहन करावी लागत होती. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. हमाल कामगारांना घरी जाता येत नसल्याने अस्वच्छता फार मोठया प्रमाणात जाणवत होती. कामगार वेगवेगळया आजारांना बळी पडत होते. त्यांना आरोग्यविषयक कोणतीही सवलत किंवा मदत मिळत नव्हती. परिणामी हमाल कामगार प्रसंगी दगावत होते. त्याच्याजवळ उपचारासाठी पैसे नव्हते किंवा हक्काचे एखादे हॉस्पीटल ही नव्हते. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन झाल्यावर कामगारांसाठी आरोग्यविषयी वेगवेगळी पाऊले उचलली गेली. चोविसतासाची गुलामगिरी संपून हमाल कामगार रोज आपल्या घरी जाईल असे कामाचे ठराविक तास केले त्यामुळे रोज आंघोळ केल्याने त्याचे आरोग्य चांगले राहू लागले. सकस आहार, स्वच्छ पाणी, स्वच्छ राहणी याकडे हमाल कामगार लक्ष देऊ लागले. ''आरोग्यासाठी जागरूक असणे ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नसून ती एक सामाजिक जबाबदारी आहे.''[२८] हे हमाल पंचायतीने ओळखले होते. दूषित वायू सोडून भोवताली हवा प्रदूषित करणारा कारखानदार जितका बेजबाबदार तितकाच श्रमजीवी हमालांच्या आरोग्याचा विचार न करता घेणारा मालक जबाबदार आहे. त्यासाठी हमाल पंचायतीने १९९२ साली हॉस्पीटल सुरू करून अत्याधुनिक सुविधा देत

आहे. हमाल कष्टकऱ्यांसाठी चालवित असलेले हॉस्पीटल श्रमिकांकडून प्रत्येक महिन्याला ५० रूपये घेऊन त्या मोबदल्यात हमालांच्या आरोग्याचे रक्षण करीत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवार यांनी १५ लाखाची मदत केली होती. हमाल कामगारांना हक्काचे हॉस्पीटल असल्याने वेळोवेळी आरोग्यविषयक सल्ले कामगारांना दिले जातात. हॉस्पीटल चालविणे सोपी गोष्ट नव्हती. कामगारांच्या आरोग्याशी तडजोड करायची नाही हे हमाल पंचायतीने पक्के ठरविले होते. ''कामगारांच्या लेव्हीमधून १ टक्का रक्कम हॉस्पीटलला वर्ग करावी असा निर्णय झाला मंत्रालयातील अधिकारी श्री दफरे व श्री. डांगे यांनी हॉस्पीटलची पाहणी केली.''[२९] त्यानंतर हॉस्पीटलचे ऑडिट करण्यात आले. कामगारांना आरोग्यविषयक सर्व सुविधा पुरवित असलेल्या हॉस्पीटलला निधी मिळतो. हॉस्पीटल ही केवळ दगडविटांची इमारत असून उपयोगाची नाही. त्यासाठी अत्याधुनिक सुविधा तेथे रूग्णांना मिळतात. ओपीडी, आयपीडी, व्हीस्को बेल्ट, आयफटी मशीन, एक्स रे, इसीजी मशिन, ऑटो ट्रॅक्शन इत्यादी सुविधा मिळत आहेत. भाजी मार्केट आडतेबाजार, रेल्वेस्टेशन, भुसार मालातील कामगार अशा विविध उदयोगातील कामगार आरोग्य सेवेचा लाभ घेत आहेत. त्यासाठी दानशूर व्यक्तींनी श्रमिकांच्या आरोग्यासाठी झटणाऱ्या अशा उपक्रमाला हातभार लावल्यास निश्चितच हॉस्पीटलची भरभराट झाल्याशिवाय राहणार नाही हे नमूद करावेसे वाटते.

अशाप्रकारे हमाल पंचायतीच्या अथक प्रयत्नामुळे हमाल कामगारांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक बदल घडविण्यात फार मोठा हातभार लावला आहे. कवी कुसुमाग्रजांनी म्हटले होते की, कोणतीही संस्था त्या संस्थेच्या इमारतीवर अथवा बँक बॅलन्सवर मोठी होत नसते तर ती संस्थेच्या नेतृत्वाच्या कर्तृत्वावर दिवा होऊन भक्त झाल्याशिवाय प्रकाशाच्या देवळात जाता येत नाही. अशाच पध्दतीने हमाल पंचायतीचे कार्य सतत चालू आहे.

संदर्भसूची

१) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका—२०११ पान नं. ७

२) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२ पान नं. २३

३) डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ—एक राजकीय विश्लेषण, शब्दगंध प्रकाशन, २००८.

४) मुक्तीवेध, डॉ. भास्कर जाधव, गौरव व समारंभ समिती. ५ मे १९९७.

५) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११. पा.नं.८.

६) देशमुख कॉ. दत्ता — मी दत्तूचा दत्ता झालो ही गोष्ट. पा.नं. ६५

७) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११, पान नं. ९

८) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२ पा.नं. ११७

९) डॉ.प्रा.चव्हाण शंकर, कामगार चळवळ, एक राजकीय विश्लेषण शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर २००८, पान नं. ३६

१०) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका — २०११ पा.नं. १२

११) दैनिक नवशक्ती दि. १५/५/२००८

१२) दैनिक नवशक्ती (मुंबई) ११ एप्रिल १९९९

१३) कित्ता

१४) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका — २०११ पान नं. १२

१५) पाटील व्ही.पी., दि. ग्रेट माथाडी आण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन, कराड, १९९८, पान नं. ७२.

१६) लोकप्रभा दि. ७ मार्च १९९३

१७) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११ पान नं. १३.

१९) कित्ता, पान नं. १४.

२०) दैनिक सकाळ, दि. १५/५/२००८

२१) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२ पान नं. १२१

२२) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११ पान नं. १८

२३) कित्ता. पान नं. ५

२४) दैनिक लोकयुग दि. ४/१/२००२

२५) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११ पान नं. २०.

२६) महापुरे संजय — जिल्हा हमाल माथाडी पतसंस्था, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका लेख — २०११.

२७) अहमदनगर जिल्हा माथाडी कामगारांची सहकारी पतसंस्था अहवाल पान नं. १०

२८) डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, जाने २०११ पान नं. ४

२९) कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११ पान नं. ३८.

प्रकरण पाचवे

माथाडी कामगारांना मिळालेले संरक्षण व सुविधा

५.१ महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळ स्थापन

५.२ माथाडी कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीची परिस्थिती

५.३ माथाडी कायद्यासाठी संघर्ष

५.४ माथाडी कायदयाने मिळालेल्या सुविधा व त्याचा कामगारावर झालेला परिणाम

प्रकरण पाचवे

माथाडी कामगारांना मिळालेले संरक्षण व सुविधा

भारतातील कामगार चळवळीला एक नवा आयाम प्राप्त झाला आहे. कारखान्यातील कामगार, सरकारी, निमसरकारी, सहकार क्षेत्रातील कर्मचारी यांच्यापुरते तिचे क्षेत्र मानले जात होते. आता असंघटित असुरक्षित कष्टकऱ्यांच्या चळवळीने जुने गृहित मोडीत काढले आहे. 'कामगार' शब्दाची व्याख्याच आज बदलली आहे. ज्याला कष्ट करून जगावे लागते. ज्याचे पोट हातावर आहे तो कष्टकरी ही नवी व्याख्या प्रचलित झाली आहे. असंघटित कामगारांनी संघटित होऊन संघर्ष केल्याशिवाय त्यांना न्याय मिळणार नाही. माथाडी कामगारांनी संघटित होऊन खूप कष्टाने हक्क व सुविधा मिळविल्या आहेत. त्यासाठी आंदोलने, संप यांचा आधारही घ्यावा लागलेला होता. आज माथाडी कामगारांना संरक्षण व सुविधा मिळू शकल्या अजुनही खूप मागण्या बाकी आहेत. त्या मिळविण्यासाठी त्यांना संघर्षाची तयारी ठेवावी लागेल. ''१९९१ पासून देशात मुक्त अर्थव्यवस्था सुरू झाली. भारतीय घटनेने लोकशाही समाजवादाचा सरनाम्यात स्वीकार केलेला असतानाही भांडवलशाहीला मान्यता दिली गेली.''[१] त्यामुळे येथुन पुढच्या काळात कामगारांना भांडवलदाराविरूध्द संघर्ष करावा लागेल हे आज जगमान्य झालेले आहे.

५.१ महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळ स्थापन :—

व्यापाऱ्यांकडे पिढयानपिढया हमाल काम करीत होते. वडिलानंतर मुलगा कामाला राहत होता. इतके जवळचे संबंध असतानासुध्दा हमाल निरक्षर असल्यामुळे व्यापारी त्यांना फक्त बैलासारखे राबवून घेत होते. नंतरच्या काळात मार्केट कमिटया स्थापन झाल्या. शेतकऱ्यांचा माल मार्केटला येऊ लागला आणि कायदयाची कक्षा व्यापाऱ्यांना कळू लागली. कायदयाची कक्षा कळाल्यावर व्यापारी आम्ही हमालांचे मालक नाहीत अशी भूमिका घेऊ लागले. आमचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही असे व्यापारी म्हणत होते. हमालांचा

पुढारी होण्यास कोणीच तयार नव्हते. ज्यावेळी एखादा कार्यकर्ता बनतो त्यावेळी कोणत्या कामगाराला कोणता त्रास होतो हे जाणून घेणे महत्वाचे असते. डॉ. बाबा आढावांनी हमालांचे जीवन अगदी जवळून पाहिले होते. हमालांवर होणाऱ्या अन्यायावर त्यांनी नेमके बोट ठेवले होते. हमालांची पिळवणूक कशी होते ? हे डॉ. बाबा आढावांना माहिती होते. राज्य स्तरावर हमालांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी एक व्यासपीठ असावे असे डॉ. बाबा आढाव यांना वाटत होते. राज्यातील सर्व मार्केट कमिटयामधील हमाल एकत्र बांधणे सोपे काम नव्हते. त्यांना एका छताखाली आणणे खूप गरजेचे होते. अहमदनगर येथे इ.स. १९८० मध्ये महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाची स्थापना डॉ. बाबा आढाव यांनी केली. महामंडळाचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबा आढाव यांची निवड केली गेली. त्या कार्यात अप्पा कोरपे यांनी मोलाची साथ दिली. ''१९८३ मध्ये महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष झाले. महामंडळाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील हमाल संघटित करण्याचा प्रयत्न करून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.''[२] अप्पा कोरपे अतिशय कमी शिकलेले असतानादेखील राज्यपातळीवर डॉ. बाबा आढावांबरोबर त्यांनी प्रभावीपणे कार्य केलेले जाणवते. त्या महामंडळात ११ माथाडी बोर्डाचे अध्यक्ष सदस्य म्हणून घेतलेले आहेत. त्याचबरोबर कामगार आयुक्त व प्रत्येक हमाल पंचायतीचा एक प्रतिनिधी महामंडळावर नियुक्त केला आहे. महामंडळ माथाडी कामगारांसाठी राज्यस्तरावर व केंद्रस्तरावर आवाज उठविण्याचे व्यासपीठ आहे. डॉ. बाबा आढावांच्या रूपाने कष्टकरी कामगारांना कैवारीच मिळाला आहे. प्रत्येक बाजार समितीतील येणाऱ्या अडचणी आणि उद्दिष्टे यांना मार्गदर्शन देऊन कामगारामध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम महामंडळाचे अध्यक्ष डॉ. आढाव करीत आहेत. ''महामंडळाच्या लढयामुळेच बाजार समितीवर आपले म्हणणे मांडणे करिता आपल्या एका प्रतिनिधीस शासनाने मान्यता दिली आणि त्यामुळे आपले विषय बाजार समितीत मांडत आहेत.''[३] पर्यायाने इतके दिवस बाजार समिती आपली जबाबदारी टाळत होते. परंतु या निर्णयामुळे हमालांना एक व्यासपीठ मिळाले होते.

पेन्शन हा कामगारांचा हक्क आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य महामंडळ प्रयत्नशील आहे. १८ डिसेंबर १९८२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने पेन्शन संदर्भात एक महत्वपूर्ण निकाल दिला. न्यायालयाने पेन्शनबाबत कारणे ही मुलभूत स्वरूपाची दिली आहेत. १७ डिसेंबर हा दिवस देशभर पेन्शन दिवस म्हणून साजरा केला जात आहे. त्या निकालात न्यायालयाने म्हटले आहे की तुम्ही पेन्शन देता म्हणजे उपकार करीत नाही. आपल्या कार्यक्षम वयात (१८ ते ६०) मालकांसाठी काम करून त्याने हा हक्क मिळावलेला आहे. भारताची राज्यघटना ही कष्टकरी राज्याची राज्यघटना आहे. ''कामगाराला जन्मभर राबवून घेऊन मालकाने गलेलठ्ठ बनायचे व ज्याच्या श्रमातून तो श्रीमंत बनला त्याला मात्र निवृत्तीनंतर उसाच्या चिपाडासारखे उकिरडयावर फेकून दयायचे हे धोरण कल्याण करण्याच्या व्यवस्थेत बसूच शकत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने निकालाद्वारे जाहीर केले होते.''[४]

इ.स. २००७—२००८ साली पंतप्रधानांनी नेमलेल्या डॉ. अर्जुन सेन गुप्ता समितीने असंघटित कामगारांच्या किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, कामाच्या ठिकाणच्या सुविधा, कामाचे तास इ. बाबत आपले अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला आहे. ''या देशात २००४—०५ मध्ये ७५ टक्के जनता ही दारिद्रयरेषेखाली किंवा त्यांच्या आसपास होती. त्यामध्ये येणारे असंघटित क्षेत्रातले कामगार व त्यांचे कुटुंबीय हे दरडोई दरदिवशी २० रू. किंवा त्याहून कमी रकमेत कशी जगतात. याची आकडेवारी अहवालात सापडते.''[५] गेल्या काही वर्षामध्ये जीवनावश्यक वस्तूंची महागाई ज्या पध्दतीने वाढते. असंघटित क्षेत्रात त्या निवृत्तांची परिस्थिती केविलवाणी बनली आहे. किमान वेतनाची हमी नसलेल्या असंघटितांना आपले स्वत:चे संसार चालवू शकणार नाहीत. त्या पार्श्वभूमीवर असंघटित कामगारांना पेन्शन मिळावी यासाठी महामंडळ आजही अहोरात्र झटत आहे.

राज्यात माथाडी कायदा १९६९ लागू झाला परंतु त्याची राज्यात अंमलबजावणी झाली नाही. त्यासाठी हमालांना संप, मोर्चे, धरणे इ. आंदोलने

करावी लागली. ''डॉ. बाबा आढावांच्या सनदशीर मार्गाने केलेल्या आंदोलनाला यश मिळाले. डॉ. बाबा आढाव यांच्या भगीरथ प्रयत्नामुळेच महाराष्ट्रातील इतर जिल्हयामध्ये माथाडी कायदयची अंमलबजावणी होऊ शकली''[६] श्रम या जंगम मालमत्तेला योग्य किंमत मिळाली पाहिजे. म्हणजेच रास्त व उचित वेतन मिळाले पाहिजे असे वेतन न देता अथवा अत्यंत तुटपुंजे वेतन देऊन श्रमिकाचे श्रम कवडीमोल किंमतीने विकत घेणे ही फार मोठी श्रमचोरी आहे. श्रमचोरी थांबली पाहिजे. कष्टकऱ्याला कष्टाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. त्यासाठी महामंडळ आवाज उठवित आहे. त्याविरूध्द लढा देत असल्यानेच कामगारांना न्याय मिळू लागला.

गेल्या काही वर्षामध्ये जीवनावश्यक वस्तूंची होणारी महागाई कामगारांचे कबंरडे मोडीत आहे. त्यामुळे कामगारांची केविलवाणी परिस्थिती पाहावयास मिळते. सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांना महागाईच्या स्वरूपात महागाई भत्ते मिळतात. त्यामुळे त्यांच्यावर महागाईचा परिणाम होत नाही. असंघटित कामगारांची निवृत्तांची परिस्थिती फार बिकट झालेली आपणास पाहावयास मिळते. अलीकडे केवळ बेकारीचा प्रश्न तीव्र बनला आहे असे नव्हे तर विशेषत: किमान वेतनाची हमी नसलेल्या असंघटितांना आपले स्वत:चेच संसार व्यवस्थित चालवू शकत नाही तर आपल्या आई वडिलांना संभाळणे मुश्किल बनले आहे. त्यासाठीच महाराष्ट्र राज्य मापाडी महामंडळ पेन्शनबाबत मागणी करू लागले आहे. पेन्शन मिळत नसल्यानेच कामगारांना म्हातारपणी आर्थिक अडचणींना तोंड दयावे लागत आहे. असंघटित कामगारांना पेन्शन मिळण्याच्या दृष्टीकोनातून पेन्शन परिषदेद्वारे जागृती करण्याचे व सरकारचे लक्ष वेधण्यासाठीच त्याचे आयोजन करणे आवश्यक आहे. पुण्यातील मार्केटयार्डच्या मैदानावर ही परिषद २५ फेब्रुवारी २०१२ रोजी पार पडली. त्या परिषदेत पेन्शन देणे का आवश्यक आहे यावर चर्चा करण्यात आली. ''किमान ४० ते ५० हजार असंघटित कामगार महाराष्ट्रातून या परिषदेमध्ये सामील होऊन आम्हाला पेन्शन मिळालीच पाहिजे ही मागणी केली आहे. देशभरात अशा परिषदा घेत शेवटी या पेन्शनच्या मागणीसाठी दिल्लीला धडक देण्याचा संघटकांचा मानस

आहे.''[७] त्यासाठी मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव प्रयत्नशील आहेत. तुमची निवडणूक म्हणजे आमची फसवणूकच हे आम्ही चालू देणार नाही. देश स्वतंत्र होऊनही असंघटित कामगारांना न्याय मिळू शकला नाही. इतके वर्षे वाट पाहून ही पेन्शनबाबत सरकारने विचार केला नाही. त्यासाठी पेन्शनची मागणी महामंडळाद्वारे उचलून धरली जात आहे. त्यास देशभरातून पांठिबा मिळत आहे. हे सांगावेसे वाटते. कामगारांसाठी झटले तरच त्यांच्या पदरात पडेल अशी आजची परिस्थिती आहे.

महाराष्ट्र राज्यातील हमाल वर्षानूवर्षे काम करत असूनही त्यांना माथाडी कायदयाचे संरक्षण मिळत नव्हते. त्यामुळे हमाल कामगारांची आर्थिक परिस्थिती बरोबरच कामाची हमी त्यांना मिळत नव्हती. बाबा आढावांनी हमालांमध्ये जागृती करून माथाडी कायदयाचे महत्व पटवून दिले. पुण्यातून माथाडी कायदयाची घोषणा झाल्यावर व्यापारी न्यायालयात गेल्यामुळे अंमलबजावणीचे काम रखडले होते. हमालांना संप, मोर्चे, धरणे, सत्याग्रह, जेलभरो आंदोलने करावी लागली. डॉ. बाबा आढावांच्या सनदशीर आंदोलनाला यश येऊन पुण्यात माथाडी कायदयाची अंमलबजावणी झाली. मात्र महाराष्ट्रातील इतर जिल्हयात माथाडी कायदयाची अंमलबजावणी होत नव्हती. त्यासाठी महामंडळाचे अध्यक्ष बाबा आढावांनी जिल्हावार बैठका घेऊन हमाल कामगारांना माथाडी कायदयाचे महत्व पटवून दिले. व्यापारी मात्र हमाल कामगारांच्या संघटनांना जुमानत नव्हते. अहमदनगर जिल्हयातील माथाडी कायदयाची अंमलबजावणी संपूर्ण जिल्हयात १९९१ पासून झाली. संपूर्ण जिल्हयाला माथाडी कायदा लागू झाला. ''त्यामुळेच माथाडी कायदयाच्या तरतूदीनूसार अनेक फायदे मिळू लागले. हमालांच्या आर्थिक परिस्थितीत, राहणीमानात बदल झाला. शेतीत, घरात बदल दिसू लागला. हमालांच्या या आर्थिक परिवर्तनामूळे समाजात त्यांची पत निर्माण झाली.''[८] डॉ. बाबा आढावांनी महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व हमाल कामगारांना माथाडी कायदयाचा लाभ मिळावा म्हणून वेळोवेळी आग्रह धरला. आज माथाडी कायदा लागू होऊ शकला हे सांगावेसे वाटते.

अहमदनगर शहरात हमाल पंचायत इ.स. १९७८ ला स्थापन झाली होती. तालुक्याच्या ठिकाणी हमाल पंचायती स्थापण करणे आवश्यक होते. महाराष्ट्र राज्य माथाडी महामंडळाच्या माध्यमातून डॉ. बाबा आढावांनी जिल्हाभर संघटना स्थापण करण्यासाठी मेळावे घेतले. माथाडी कामगारांचे प्रबोधन केल्याशिवाय संघटनेत येण्यास कामगार घाबरत होते. कामगारांच्या शंकाचे निरसन झाले. ''अहमदनगर जिल्हयात संघटना नव्हत्या. कोपरगावात राधूजी मूरडणार यांची संघटना आणि शेवगावमधील एकनाथ कोरडे वगळता जिल्हयात गुलामगिरी होती.''[९] मात्र डॉ. बाबा आढावांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर, राहुरी, जामखेड, सोनई, नेवासा इ. ठिकाणी हमाल पंचायती स्थापण करण्यात आल्या. डॉ. बाबा आढावांच्या बरोबर अप्पा कोरपे उपाध्यक्ष म्हणून त्यांची चांगली साथ मिळाली. त्याचबरोबर अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले यांच्या पुढाकाराने जिल्हयात संघटना स्थापण्यास मदत झाली. नेवासा तालुक्यातून हमाल पंचायत संघटना स्थापन्यास खूप विरोध झालेला होता. त्याचबरोबर माथाडी कामगार कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी कॉ. बाबा आरगडे यांच्या नेतृत्वाखाली हमालांना संप करावा लागला. मोर्चे, सत्याग्रह करून शेवटी माथाडी कामगार कायदा ४ मे १९९१ रोजी लागू झाला. अशाप्रकारे जिल्हाभर संघटना स्थापण करण्यास महामंडळाचा सिंहाचा वाटा आहे.

महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या वतीने २१ ऑक्टोबर २०१० रोजी झालेल्या सभते ५० किलो पेक्षा अधिक वजन न उचलण्याचा निर्णय घेतला होता. राज्याच्या पणन, सहकार व कामगार खात्याने त्या मागणीची दखल घेतली. ''१ जानेवारी २०११ पूसन ५० किलोपेक्षा अधिक वजनाचे पोते न वाहण्याचा निर्णय केला. त्या निर्णयास व्यापाऱ्यांनी वेगवेगळया सबबी सांगून विरोध करण्याचा प्रयत्न केला.''[१०] १८ जानेवारी २०११ रोजी महामंडळाच्या सभेत त्या विषयावर हमाल मापाडी वार्ता अंक प्रसिध्द करून सर्व बाजू उजेडात आणल्या गेल्या. महामंडळाच्यावतीने त्यांना संमंती देण्यात आली. खूप दिवसापासूनच्या प्रश्न सोडविण्यात यश आल्याने महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा

आढाव यांचे कामगारांनी आभार मानले. हमाल मापाडी कष्टकऱ्यांची चळवळ पुढे जावी त्यासाठी डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळ प्रयत्नशील आहे. त्यासाठी पुण्यातून बाबा आढाव, ज्ञानदेव गव्हाणे, गणपतराव मानकर, धुळयाचे निबांजी खताळ, सांगलीचे बापू मगदूम, अमरावतीचे जनक कडू आणि अहमदनगरचे अप्पा कोरपे यांचा मोलाचा सहभाग होता. महाराष्ट्र राज्य महामंडळ स्थापण झाल्यामुळे राज्यातील हमाल कामगारांना खूप आधार वाटू लागला आहे. महामंडळामुळे राज्यातील प्रश्न सोडविण्यास हातभार लागत आहे. हमालांचे कैवारी म्हणून डॉ. बाबा आढाव महाराष्ट्राला सुपरिचित झाले आहे.

५.२ माथाडी कामगार कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीची परिस्थिती :—

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून भारतात ओळखले जाते. कामगार कायदयाचे फायदे संघटित कामारांनाच मिळत होते. ''संघटित कामगारांचे कामाचे तास, विश्रांतीचे तास, पगार सुट्टी, प्रॉव्हिडंट फंड, वैद्यकीय खर्च इ. कल्याणकारी योजना व नोकरीची निश्चिती इ. मोठया प्रमाणावर फायदे मिळत असे. हे सर्व फायदे कामगार कायदे औद्योगिक निवाडा कायदा, १९४७ किमान वेतन कायदा १९४८ अन्वये मिळत आहेत.''[११] मात्र असंरक्षित असलेला व पूर्णपणे संघटित नसलेला असा हा माथाडी कामगार आहे. मुंबईमध्ये माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांनी संघटना स्थापन केली असली तरी कामगारांवर फार अन्याय, अत्याचार होत होते. मुंबई महानगराची ही अवस्था होती तर उर्वरित महाराष्ट्राची स्थिती फारच केविलवाणी होती. हमाल कामगार हा वेगवेगळया ठिकाणी काम करत होता. त्यामुळे एकजूट होणे खूप अवघड गोष्ट होती. त्यातच माथाडी कामगारांच्या संघटनाच नव्हत्या तर सवलती मिळणे अशक्य होते. अशा परिस्थितीमुळे माथाडी कामगार पूर्णपणे खचलेला होता. संघटना नसल्याने कामाची शाश्वती नव्हती. मिळालेल्या मजूरीवर गुपचूप काम करावे लागत होते. मात्र कामगारांच्या श्रमाला कोणत्याही प्रकारची प्रतिष्ठा नव्हती. कामगारालाही ताठ मानेने समाजात माणूस म्हणून जगता आले पाहिजे.

त्यासाठी अनेक कामगार नेत्यांनी व समाजसुधारकांचे प्रयत्न अपुरे ठरत होते. उर्वरित महाराष्ट्रात कामगारांवरील अन्याय दूर होण्यासाठी वेगवेगळया जिल्हयात संघटनेचे वारे वाहू लागले होते.

माथाडी कामगारांचे अश्रू त्या काळच्या पुढाऱ्यांना दिसत नव्हते. हमालांना संरक्षण देणारा, त्यांचे हित जपणारा कायदा महाराष्ट्रात अस्तित्वात नव्हता. इतर कामगारांचे कायदे हमाल कामगारांना लागू होत नव्हते. इतर कायदयातील 'नोकर' या व्याख्येत हमाल कामगार बसत नव्हते. कायदयाप्रमाणे 'नोकर' या व्याख्येत असण्यासाठी मालकाने नोकराची अधिकृत नेमणूक केलेली असली पाहिजे. त्यासाठी नोकरीत सातत्य असावयास पाहिजे. मात्र हमाल कामगारांची परिस्थिती म्हणजे याच्या उलट होती. हमाल कामगारांची अधिकृत नेमणूक नव्हती. त्यांना दिलेले काम कायमस्वरूपी नव्हते. 'शिवाय हे काम कधी दिवसभर तर कधी तासभर होते. एका ठिकाणी काम संपले की दुसऱ्या ठिकाणी कामासाठी जात असे. एकाच दिवशी अनेक ठिकाणी हमाल काम करीत होते. व्यापारी आणि हमाल यांचा संबंध फक्त कामापुरता येत होता. शिवाय कामेही हंगामी स्वरूपाचे असल्याने व्यापाऱ्यांशी संबंध फारसे चांगले नव्हते. अशा परिस्थितीमुळे व्यापारी आणि हमाल नाते कामापुरते राहिले होते. त्यामुळे माथाडी कामगार दुर्लक्षितच राहिला होता.

''नोकरीची व कामाची शाश्वती नव्हती. कामाचे तास व विश्रांतीची वेळ त्यासंबंधी कोणतेही नियम नव्हते. कामाचा मोबदला निश्चित नसल्याने अगदी तुटपुंज्या मजुरीवर हमाल कामगारांना काम करावे लागत होते. कामाच्या वेळी कोणतीही सोय नव्हती.''[१२] कामच मुळी मुकादमाकडे करावे लागत होते. मुकादम सांगेल तसे वागावे लागत होते. संघटना केल्यास चळवळ केल्यास हमाली कामाला कामगारांना मुकावे लागत होते. हमालाला त्या दिवसापुरता मुकादम मालक होता. काम संपले की, एक दुसऱ्याचा काही संबंध येत नव्हता. अशा विचित्र परिस्थितीत हमाल कामगार अडकला होता. हमाल कामगार व्यापाऱ्यांच्या दुकानात पिढयानपिढया काम करत असूनही व्यापारी त्यांची

जबाबदारी स्वीकारीत नव्हते. शेतकऱ्यांचा माल हमाल उतरून घेत होते. शेतकऱ्यांच्या मालाची पट्टी झाल्यावर त्याची विक्री, हमाली, काटा हमाली व्यापारी वजा करून घेत होते. व्यापारी हमाल कामगाराशी काही संबंध नाही किंवा मालक नाही अशी भूमिका घेत होते. मार्केटकमिटी हमाल कामगारांना लायसन देत होती. मात्र हमाल कामगारांची जबाबदारी घेत नव्हती. ''आमच्या यार्डात काम करता म्हणून आम्ही तुम्हाला लायसन दिलं. संबध काय तुमचा आमचा? हमाल कामगारांना ना मार्केटकमिटी आधार देत होती. ना व्यापारी, मालक''[१३] म्हणून जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही तयार नव्हते. त्या दोन्हींच्या भूमिकेमुळे हमाल कामगार भरडला जात होता. राज्य सरकारही हमाल कामगारांच्या बाबतीत उदासीन होते.

हमाल कामगाराने आपल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी एकेकटयाने सक्रिय होण्याऐवजी सामुहिक प्रयत्नाची जोड दयावी लागेल असे त्यांना वाटू लागले होते. विविध शोषित सामाजिक समुहांनी आपल्या राजकीय आकांक्षेच्या पूर्ततेसाठी समान हितसंबंधाच्या आधारे एकत्रित वाटचाल करण्याची भावना निर्माण करण्यातील अपयश आहे. व्यापक समाजबदलाच्या एकत्रित चळवळीशी जोडून घेतले तरच चळवळ यशस्वी ठरेल. हमाली काम हे जातीवर आधारित नसले तरी हमाली कामाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी बदलली पाहिजे. कष्टाला जात नसते असे म्हणतानाच कष्टकऱ्यांच्या जातीचा उद्धार पावलोपावली करणे आणि जातीच्या प्रतिष्ठेवर त्याच्या कष्टालाही उच्चनीचता समजणे ही समाजविघातक प्रवृत्ती आज समाजात वाढत आहे. त्यासाठी माथाडी कामगारांच्या कष्टाला प्रतिष्ठा मिळावी, सुरक्षितता लाभावी याचसाठी माथाडी कायदयाची गरज आहे.

शेतकऱ्यांकडून हमालास हमाली मिळत होती. मात्र लेव्ही मिळत नसल्याने माथाडी कामगारांचे फार नुकसान होत होते. पर्यायाने कल्याणकारी योजनेपासून हमाल दुर्लक्षित होता. त्याचबरोबर नोकरीची शाश्वती व निश्चित वेतन मिळणे आवश्यक होते. हमाल कामगारांच्या कुटुंबाला स्थैर्य लाभणे शक्य

नव्हते. त्यासाठी माथाडी कायदा अस्तित्वात येणे फार आवश्यक होते. त्यासाठी माथाडी कामगार कायदा झाला पाहिजे अशी कामगारांची मागणी होती.

५.३ माथाडी कामगार कायदयासाठी संघर्ष :—

राज्यस्तरावर माथाडी कामगार संघटनेने कामगारांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी अनेक लढे दिले होते. त्यांच्या प्रयत्नांना कमी अधिक प्रमाणात यशही मिळाले होते. आर्थिक लाभापेक्षाही माथाडी कामगारांना नोकरीची शाश्वती व निश्चित वेतन मिळणे जास्त गरजेचे आहे याची अण्णासाहेब पाटील यांना जाणीव झालेली होती. हे फायदे फक्त कायद्याच्या माध्यमातूनच कामगारांना मिळू शकतात हे त्यांनी ओळखले होते. संघटनेने माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा झाला पाहिजे अशी प्रथमपासून मागणी केली होती. माथाडी कामगार संघटना कायदयाचा पाठपुरावा करत होतीच. पंरतु सरकारला जाग आणणे हे काम सोपे नव्हते. सरकारला जाग आणण्यासाठी संप हे हत्यार संघटनेने उपसले होते. ''त्यानुसार १० सप्टेंबर १९६२ पासून माथाडी कामगारांच्या बेमुदत संपाला सुरूवात झाली. हा संप अपेक्षापेक्षाही जास्त यशस्वी झाला.''[१४] त्या संपामुळे मुंबई शहराच्या दैनंदिन व्यवहारावर फार मोठा परिणाम झाला. सर्वसामान्य लोकांना जीवनाश्यक गरजेच्या वस्तू उपलब्ध होण्यास खूप अडचणी आल्या. त्या संपामुळे खऱ्या अर्थाने राज्यसरकारला जाग आली. मा. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मध्यस्थी करण्यासाठी तत्कालीन पुरवठा मंत्री तल्याखान यांना पाठविले होते. पुरवठा मंञ्यांनी प्रत्यक्ष बाजारपेठेत फिरून माथाडी कामगारांच्या कामाच्या परिस्थितीची पाहणी केली होती. हीच माथाडी कायदा निर्मितीच्या प्रक्रियेची सुरूवात होती.

माथाडी कामगार संघटनेने मुंबईत कामगार मंत्री बॅ. माधवराव माने यांना संघटनेने आपल्या मागण्यांचे निवेदन दिले होते. ''संघटनेच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक २० ऑक्टोबर १९६३ रोजी माथाडी कामगारांच्या कामाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी के. आर. पोवार

समिती नेमली होती. त्या समितीने कामगारांना फायदा व्हावा यादृष्टीकोनातून आपला अहवाल २२ जानेवारी १९६५ रोजी राज्य सरकारला सादर केलेला होता.''[१५] माथाडी कामगारांना आठवडयाची सुट्टी, भरपगारी सुट्टी, रजेचा पगार, भविष्य निर्वाहनिधी, वैद्यकीय सेवा इत्यादी सुविधांचा लाभ मिळवून देणे आवश्यक आहे अशी शिफारस केली होती.

इ.स. १९६३—६४ मध्ये लोखंडी जथ्था कामगार व मालक यांच्यात उग्र संघर्ष निर्माण झाला होता. तेव्हा लोखंडी बाजारातील कामगारांच्या कामाच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक त्रिपक्षीय समिती नेमली होती. त्या समितीचे अध्यक्ष बी.एस.कालेलकर होते. ''कालेलकर समितीने १५ डिसेंबर १९६५ रोजी अहवाल राज्यसरकारला सादर केला. त्यात माथाडी कामगारांना रजा, भविष्य निर्वाह निधी, सुट्टया, वैद्यकीय सुविधा इ. गोष्टींचा लाभ कामगारांना मिळाला पाहिजे असे स्पष्ट करण्यात आले होते.''[१६] त्यासाठी प्रचलित कायद्यात आवश्यक ते बदल करावा किंवा वेगळा कायदा करावा अशी शिफारस करण्यात आली होती. राज्यसरकारने ठोस पावले उचलले नव्हते. ''राज्य सरकारने राज्यातील सर्वच असंरक्षित कामगारांच्या प्रश्नांचा एकत्रितपणे अभ्यास करण्यासाठी १५ ऑक्टोंबर १९६५ रोजी शिवाजीराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती केली होती. या समितीने या अगोदर नेमलेल्या समितींच्या शिफारसी विचारात घेऊन आपला अहवाल १७ नोव्हेंबर १९६७ रोजी राज्य सरकारला सादर केला.''[१७] असंरक्षित कामगारांचे काम व सेवाशर्ती यासाठी इतर कामगारांपेक्षा वेगळा कायदा करावा अशी शिफारस करण्यात आली होती. असंरक्षित कामगार मंडळ या नावाचे एक स्वायत्त मंडळ स्थापन करावे अशी शिफारस करण्यात आली होती. त्या मंडळावर कामगारांचे, मालकांचे आणि शासनाचे प्रतिनिधी असले पाहिजे तरच त्या योजनेची अंमलबजावणी होईल हा त्यामागचा उद्देश आहे. मात्र शिवाजीराव पाटील समितीच्या अहवाल महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द न करताच तसाच ठेवून दिला होता. येथे एक प्रकारे कामगाराविषयी उदासिनता

सरकारकडून जाणवत होती. अखेरीस संघटनेच्या दबावामुळेच शासनाने हा अहवाल प्रसिध्द केला.

कामगार, व्यापारी प्रतिनिधी व शासनाचे प्रतिनिधी यांच्यात विचारविनिमय केल्यानंतर कायद्याचा मसुदा तयार केला होता. कायदेमंडळातील सर्वच पक्षाच्या प्रतिनिधींनी त्याविधेयकाचे स्वागत केले होते. महाराष्ट्र शासनाने माथाडी कामगारांसाठी कायदा करण्याचे ठरविल्यावर मालक वर्गाने त्यास जोरदार विरोध केला होता. माथाडी विधेयकातील तरतुदींवर घेण्यात आलेल्या आक्षेपामुळे महाराष्ट्र कायदेमंडळाने संमत केलेले विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीसाठी पाठविण्यात आले होते. विधेयकाला राष्ट्रपतींनीही संमती देऊन कायदयात रूपांतर केले. ''महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या निरनिराळया समित्यांचा अभ्यास करून १९६९ साली (१३ जून १९६९) महाराष्ट्र, माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम अस्तित्वात आला होता.''[१८] त्यासाठी माथाडी कामगारांना शासनाबरोबर संघर्ष करावा लागला. राज्यस्तरावर जवळजवळ सात वर्षे मोर्चे, संप, निदर्शने, उपोषण यासारख्या कामगार चळवळीतील सर्वच मार्गाचा कामगार संघटनेने अवलंब केला होता. ही आंदोलने मुंबईमध्ये तीव्र स्वरूपात होत होती. उर्वरित महाराष्ट्रात हमाल कामगारांच्या संघटना स्थापण्यासाठी संघर्ष चालू होता. अहमदनगर जिल्हयात या काळात संघटना स्थापनेचे वारे वाहत होते.

माथाडी कायदा अस्तित्वात आला असला तरी, त्याची अमंलबजावणी करण्यासाठी त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करणे गरजेचे होते. कायदा अस्तित्वात येऊनही अमंलबजावणी होत नसल्याने माथाडी कामगारामध्ये कायदयाविषयी सांशकता निर्माण झाली होती. मालकवर्गही कामगारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र कामगारांच्या शंकाचे निरसन करून अण्णासाहेब पाटलांनी हा कायदा कामगारांच्या हिताचा आहे हे ठामपणे पटवून दिले. मुंबईमध्ये हा कायदा लागू झाला. उर्वरित महाराष्ट्रात या कायदयाची अंमलबजावणी होत नव्हती. इतर जिल्हयामध्ये संघटनाच निर्माण झालेल्या

नव्हत्या. अहमदनगर जिल्हयामध्ये १९६९—७० च्या कालावधीत माथाडी कामगार संघटनाच अस्तित्वात आलेली नव्हती. त्यामुळे व्यापाऱ्यांवर दबाव निर्माण होत नव्हता. वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया युनियन काम करत होत्या. कामगारांमध्ये माथाडी कायद्याविषयी अज्ञान होते. व्यापारी हमाली वाढवूनच दयायला तयार नव्हते तर माथाडी कायद्याची अंमलबजावणी होणे अवघड होते. संघटना स्थापन करण्यासाठी संघर्ष करण्याचे काम हमाल नेत्यांकडून चालू होते. डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाने इ.स. १९७८ मध्ये हमाल पंचायत स्थापन झाल्यावर माथाडी कामगारांना स्वतंत्र व्यासपीठ तयार झाले. संघटना अस्तित्वात आल्याने कामगारांना संरक्षण, सुरक्षितता व नोकरीची निश्चिती लाभली होती.

माथाडी कामगार कायदा १९६९ साली मुंबईत लागू झाला. मुंबईच्या बाहेर माथाडी कामगार कायदा कागदावरच राहिला. या माथाडी कामगार कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे होते. हमाल कामगारांच्या अज्ञानाचा फायदा व्यापारी घेत होते. शेतकऱ्यांचा माल उतरविला जात होता. इतके ओझे उचलून सुद्धा व्यापारी हमालांचे मालक होण्यास तयार नव्हते. हमालांना कोणीही स्वीकारण्यास तयार नव्हते. डॉ. बाबा आढाव हे सामान्य व्यक्तीमत्व गरीबांचे कैवारी होण्यास पुढे आले. सर्व हमालांच्या कामाचा डॉ. बाबा आढावांनी अभ्यास केला. हमालांना खरी गरज काय आहे? त्याला कोठे कोठे अडचणी येतात ? त्याची पिळवणूक कोठे कोठे होते? हे सर्व लक्षात घेऊन या सर्व गोष्टीवर बाबांनी अचूक बोट ठेवले. संपूर्ण महाराष्ट्र डॉ. बाबा आढावांच्या मागे उभा राहिला. मुंबईनंतर पुण्यात माथाडी कायदा लागू झाला. त्यासाठी बाबा आढावांना व हमाल कामगारांना खूप झगडावे लागले. पुण्याला बाबा आढावांच्या रूपाने कणखर नेतृत्व लाभल्यानेच यशस्वी ठरले. अहमदनगर जिल्हयात मुंबई पुण्यापेक्षा वेगळी परिस्थिती होती. अहमदनगर जिल्हा विस्ताराने मोठा होता. सहकारी चळवळ जोमाने वाढत होती. कारखानदारी व बाजारपेठा वाढत होत्या. मात्र त्यामधील कामगारांच्या संघटनाही वेगवेगळया होत्या. त्या कामगारांना एकत्र आणणे खूप अवघड होते. कामगार एकत्र येत नसल्यानेच

पिळवणूक मोठया प्रमाणावर होत होती. कामगारामध्ये संघटना स्थापन होण्याचे फार अवघड काम बाबा आढावांच्या माध्यमातून जिल्हयात झाले. संघटना स्थापन झाल्या त्यामुळे कामगार स्थिर जीवन जगू लागला. ''अन ज्या वेळेस जिल्हयाला हा कायदा लागू झाला. त्यावेळेस अहमदनगर जिल्हयाचा असा पुकार झाला की, जिल्हयाला कायदा लागू झाला. त्याला तीन वर्षे होतील. सत्याऐंशी साली हा कायदा लागू झाला.''[१९]

अहमदनगर जिल्हयात इ.स. १९८७ साली माथाडी कायदा लागू झाला असला तरी त्याची कोठेच अमंलबजावणी झाली नाही. हा कायदा कागदावरच राहिला. त्यासाठी रास्ता रोको, आमदाराच्या घरावर मोर्चे नेले तरीही हमाल कामगारांना माथाडी कायदयाची अंमलबजावणी होत नव्हती. व्यापारी हा कायदा मानत नव्हते. हमाल पंचायत हमालांना एकत्र करूनही त्याचा फायदा होत नव्हता. व्यापारी हमाल कामगारांचे मालक होण्यास तयार नव्हते. हमाल कामगारांची सर्व जबाबदारी व्यापारी, सरकारवर टाकत होते. सर्व हमाल कामगारांची मिटींग होऊन डॉ. बाबा आढावांनी मार्गदर्शन केले. तीव्र आंदोलन केल्याशिवाय माथाडी कायदयाचा प्रश्न सुटणार नाही. अशी सर्व हमाल कामगार संघटनांची भावना तयार झाली होती. ''हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष मा. बाबा आढाव यांनी निर्णय घेतला. मुंबईला मंत्रालयावर मोर्चा नेण्याचा तो मोर्चा माथाडी कायदयाची अंमलबजावणी महाराष्ट्रभर झाली पाहिजे. मुंबईला जाण्याकरिता हमाल पंचायत नगरहून पाच गाडया केल्या होत्या. त्यादिवशी संपूर्ण बाजार बंद ठेवला होता.''[२०] मोठया प्रमाणावर हमाल कामगार मोर्चात सामिल झाले होते. हमाल कामगारांच्या तीव्र आंदोलनामुळे सरकार खडबडून जागे झाले. या आंदोलनात प्रत्येक गाडीला लाल बावटयाचे झेंडे व बोर्ड लावले होते. त्या आंदोलनास फार मोठा प्रतिसाद मिळाला होता.

इ.स. १९६९ साली राज्यस्तरावर हमाल माथाडी बोर्ड स्थापन झाले होते. सर्वात प्रथम मुंबई व त्यानंतर पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर अशा मोठया शहरात माथाडी बोर्डाची स्थापना करण्यात आली होती. अहमदनगर जिल्हयात

माथाडी कायदा लागू झाला नव्हता. वारंवार संप, मोर्चे, उपोषण करूनही माथाडी कायदयाची अंमलबजावणी होत नव्हती. ''दादा कळमकर आमदार असताना त्यांनी माथाडी कायदा नगर जिल्हयाकरीता लागू करावा म्हणून अनेक वेळा प्रश्न मांडला. त्यांची कामगारांविषयी खूप तळमळ होती. आणि त्यांनी तळमळीने वेळोवेळी प्रश्न मांडून कायदा लावून पण त्यांची अंमलबजावणी झाली नाही.''[२१] कामगारामध्ये दुहीचे वातावरण तयार झाले होते. मात्र व्यापारी, माथाडी कायदयास विरोध करीत होते. संघटनेला कणखर नेतृत्वाची गरज होती. त्याशिवाय संघटना प्रभावी काम करणार नाही हे कळून चुकले होते. शंकरराव घुले यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे संघटनेला नवसंजीवनी मिळाली होती. अहमदनगर जिल्हयाला माथाडी बोर्ड सुरू होऊन ५ वर्षे झाली पण अंमलबजावणी झाली नव्हती. त्यासाठी माथाडी कामगार लढा देत होते. त्यातुन माथाडी कामगारांसाठी अनुकूल वातावरण तयार झाले होते. संघटनेने बाळसे धरल्यामुळे लवकरच माथाडी कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी धडपड चालू होती. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष मा. शंकरराव घुले यांचे अहोरात्र प्रयत्न चालू होते. कोणतेही काम मार्गी लागण्यासाठी योग्य वेळेची गरज होती. दुसरी गोष्ट म्हणजे इच्छाशक्ती फार महत्वाची होती. कोणतीही संस्था यशस्वी होण्यासाठी कामगार कार्यकर्ते यांचा त्याग असतोच परंतु त्यासाठी प्रभावी नेता मिळणेही फार जरूरीचे असते. माथाडी कायदयाची अंमलबजावणी घडवून आणण्यासाठी योग्य वेळ आल्याने त्या संधीचे सोने शंकरराव घुले व अप्पा कोरपे यांनी करण्याचे ठरविले. म्हणूनच त्या लढयास यश मिळू शकेल असे वाटते.

५.४ माथाडी कादयानुसार मिळालेल्या सुविधा व त्याचा कामगारावर परिणाम

''असंरक्षित कामगार याचा अर्थ कोणत्याही अनुसुचित नोकरीतील कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवायचे असेल असा श्रमजीवी कामगार असा आहे.''[२२] माथाडी कामगार कायदा १९६९ अस्तित्वात येऊनही मुंबई, पुणे महानगर वगळता कोठेही अंमलबजावणी झाली नव्हती. माथाडी कामगारावर खूप अन्याय होत होता. संप, मेळावे, निदर्शने करूनही प्रश्न सोडवेला जात

नव्हते. मात्र माथाडी कामगारांना यावेळी एक संधी चालून आली होती. लोकसभेच्या निवडणूका जवळ आल्या होत्या. त्यामुळे जिल्हयात राजकीय चर्चेला उधान आले होते. अहमदनगर दक्षिण मतदार संघात बाळासाहेब विखे पाटील विरूध्द यशवंतराव गडाख अशा मातब्बरांमध्ये निवडणूक होणार होती. ही निवडणूक खूप प्रतिष्ठेची होती. ही संधी साधून जिल्हा हमाल पंचायतीने १ मे १९९१ पासून पूर्ण जिल्हयात आंदोलने करण्यात येईल असे जाहीर केले. त्या आंदोलनाची पत्रके कलेक्टर, उपनिबंधक, मार्केट कमिटी यांना देण्यात आले होते. त्यामुळे सर्वजण पेचात सापडले होते. गडाख साहेबांनी मिटींग घेऊन मार्ग काढण्याचे ठरविले. निवडणूकीच्या वातावरणातच प्रश्न सुटेल हे माथाडी कामगारांना माहित होते. गडाख साहेबांनी मुख्यमंत्री शरद पवार यांच्याशी चर्चा करून प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईला बोलविण्यात आले. माथाडी कामगार नेते अप्पा कोरपे व अशोक बाबर यांनी मुंबईत शरद पवारांची भेट घेतली. ''कामगार मंञ्याशी चर्चा करून अहमदनगर जिल्हयात ४ मे १९९१ ला माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्याचे ठरले. महाराष्ट्रात प्रथमच एकाच वेळी नगर शहर व जिल्हयात या कायद्याची अंमलबजावणी झाली.''[२३] त्यासाठी डॉ. नाथ पाऊलबुध्दे यांचाही सिंहाचा वाटा होता. पहिले कामगार आयुक्त म्हणून अत्यंत हुशार व तळमळ असणारे टी.जी.चोळके साहेब यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी अतिशय नियोजनबध्द रितीने कायदयाची अंमलबजावणी केली. त्यामुळेच कष्टकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने स्थैर्य निर्माण झालेले आहे.

माथाडी कायदा नसल्यामुळे हमालवर्ग असुरक्षित होता तो सुरक्षित होण्याच्या मार्गावर वाटचाल करू लागला. महाराष्ट्र राज्यात जवळजवळ ३४ माथाडी मंडळे असून त्या अंतर्गत नोंदीत कामगारांची संख्या तीन लाखाइतकी आहे. निरनिराळया उद्योगास माथाडी कायदा लागू झाला आहे. ''किराणा बाजार, दुकान मंडळ, लोखंड व पोलाद, बाजार कामगार मंडळ, भाजीपाला मंडळ, मालवाहतुक मंडळ, रेल्वे गुडस् मंडळ, इ. उद्योगामध्ये काम करणारे असंघटित कामगार व असुरक्षित कामगारास सुरक्षित कामगार म्हणून संबोधले

जाऊ लागले.''[२४] त्यात कामगार मंडळाचे अध्यक्ष, सचिव शासकीय अधिकारी नेमले जातात. कामगार व व्यापारी मालक यांचे समसमान प्रतिनिधी नेमण्याची तरतूद त्या कायदयात आहे. त्यामुळे कामगारांचे प्रश्न व अडचणी कामगार प्रतिनिधी मांडू शकतात. पंरतु इतर कामगार कायद्यामध्ये असलेले मालक व कामगार हे नाते या कायद्यामध्ये नसल्याने माथाडी कामगारांना त्यांचे हक्क, चांगल्या सेवाशर्ती व कल्याणकारी योजना या त्यांच्या निर्माण झालेल्या संघशक्ती व लाभदायक तडजोडीतून मिळवाव्या लागतात. कामगार जेथे कमी आहेत तेथील कामगार हा सुरक्षितता व कल्याणकारी योजनांपासून वंचितच राहतो अशी परिस्थिती निर्माण झालेली होती.

हमाल माथाडी कामगारांना फायदे मिळवून देणारा माथाडी कायदा असला तरी तो स्वत:हून कामगारांना फायदे मिळवून देत नाही. तशी यंत्रणा कायदयात नाही. कामगारांना आपल्या सामुदायिक तडजोडीच्या माध्यमातून तो आपल्या ताकदीवर मिळवून घ्यावा लागतात. आपणास आवश्यक असणारी सुरक्षितता व कल्याणकारी योजना मिळविण्यासाठी प्रेरणा, बळ व वाटचाल यांची जाणीव करून देतो. हमालांमध्ये बंधुभाव निर्माण होतो. कामगार जागृत राहतो. कामगार अशिक्षित असूनही सुशिक्षित संघटित कामगारापेक्षा आव्हान पेलण्याची वाटचाल करतो. त्यातच डॉ. बाबा आढाव यांच्यासारखा कुशल व कळकळीचा मार्गदर्शक मिळाल्यामुळे कामगारांची परिस्थिती सुधारण्यास किती वेळ लागणार आहे या कायदयात कामगार व मालक हे नाते नसल्यामुळे इतर कामगार कायदयापेक्षा वेगळा कायदा आहे. त्या कायदयाप्रमाणे कामगार व मालक हे नाते शासनाने कायदयाच्या तरतूदीतून करणे आवश्यक आहे. जेथे वरिष्ठ कामगार संघटना आहेत, त्या आपल्या तक्रारीवर पगार, सेवाशर्ती, दवाखाने, प्रॉव्हिडंट फंड, नुकसान भरपाई तरतूद, सेवानिवृत्ती योजना, घरबांधणी, मुलांसाठी कल्याणकारी योजना तडजोडीने मिळवित आहे. बोर्ड अस्तित्वात आल्यावर राज्यात पहिला नगर जिल्हा आहे की जेथे संपूर्ण जिल्हयातील कामगारांसाठी लेव्हीसाठी पाठपुरावा केला. त्यासाठी संघटनेची ताकद व एकजुट कामी आली. ''लेव्ही म्हणजे व्यापाऱ्यांनी हमालांसाठी ठराविक रक्कम बोर्डाकडे

वर्ग करावयाची त्यातून सर्व कष्टकऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात, परंतु आजही अनेक ठिकाणी नेमकी लेव्ही कोणी दयायची हा प्रश्न प्रलंबित आहे.''[२५] मात्र अहमदनगर जिल्हयात हा प्रश्न सोडविण्यासाठी आंदोलन मोर्चे काढावे लागले. व्यापारी म्हणत की, ती शेतकऱ्यांनी दयावी मात्र १०० रूपयांचे काम झाले तर ३२ रूपये हमालांसाठी लेव्ही दयावी असा निर्णय झाला. ती लेव्ही व्यापाऱ्यांनी दयावी असे ठरले. त्या लेव्हीतूनच माथाडी कामगारांना पी.एफ., दिवाळी बोनस, ग्रॅज्युएटी, रजेचा पगार, नुकसानभरपाई, वैद्यकीय सुविधा त्यांना मिळवू लागल्या. कष्टकऱ्यांना शोषणमुक्त करण्यासाठी सरकारला माथाडी कामगार कायदा करावा लागला. हमाल कामगारांच्या कामाला न्याय व प्रतिष्ठा मिळावी हाच या कायद्यामागील उद्देश आहे.

हमाल व इतर श्रमजीवी कामगारांचे नोकरीचे नियम व त्यांच्या नोकरीविषयीच्या अटी व शर्ती याविषयी खास तरतूद या कायद्यामध्ये केलेली आहे. माथाडी कामगारांचे आरोग्य, त्यांचे कल्याण व सुरक्षितता यांची हमी या कायद्यामुळे कामगारांना मिळालेली आहे. ''पब्लिक ट्रान्सपोर्ट, मालधक्का, रेल्वेयार्ड, कापड व कापूस बाजार, गोदी कामगार, मच्छिमारी उद्योगातील कामगार, मिठागरातील कामगार व सरकारी गोदामातील काम करणारे हमाल यांना या कायदयाने संरक्षण दिलेले आहे.''[२६] माथाडी कायदयामुळे असुरक्षित हमाल व इतर श्रमजीवी कामगारांना त्यांच्या कामाची हमी तर मिळालेली आहे. माथाडी कायदा अंमलात येण्यापूर्वी हमाल कामगारांना कष्टाची व अवघड कामे स्वत:च्या जबाबदारीवर किंवा वेळप्रसंगी प्राणहानी सहन करून करावी लागत होती. काम करण्याचा ठिकाणी अपघात झाला किंवा गंभीर दुखापत झाली तर त्यांची कोणीही जबाबदारी स्वीकारीत नव्हते. पंरतु माथाडी कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून ज्या ज्या ठिकाणी माथाडी कार्यालये आहेत त्या कामगाराला नुकसान भरपाई व दवाखान्याच्या खर्चाची जबाबदारी माथाडी मंडळ घेते. हमाल कामगारांना कायद्याने सहकार्य व संरक्षण मिळालेले आहे. अनूसुचित नोकरी याचा अर्थ यासोबतच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्टात केलेली कोणतीही नोकरी.

''अहमदनगर जिल्हयात माथाडी कायद्याची १० अनुसूचित उद्योगांसाठी लागू केलेला आहे. त्यानुसार जिल्हयातील ३५०० माथाडी कामगार आणि ७५० मालक मंडळामध्ये सध्या नोंदीत आहेत.''[२७] माथाडी कायद्याचा संपूर्ण लाभ घेण्यासाठी कामगार जागृत आणि मंडळात नियमित मजूरी भरणारा असावा लागतो. माथाडी कामगारांनी केलेल्या कामाचे संपूर्ण दाम हे केलेल्या कामाच्या मजूरीवर लेव्हीच्या रूपाने व्यापाऱ्यांकडून ३२ टक्क्याने मिळते. माथाडी कामगाराला केलेल्या श्रमाचे पैसे दर महिन्याला मिळतात. त्याचबरोबर इतर लाभ लेव्हीच्या पैशातून पदरात पडत आहेत. मात्र मालक बऱ्याच ठिकाणी लेव्हीची रक्कम देत नाहीत. पर्यायाने रोख स्वरूपात मजूरी घेणाऱ्या कामगारांना कल्याणकारी योजनेचा पूरेपूर लाभ मिळू शकत नाही. जे कामगार प्रामाणिकपणे मजुरीची रक्कम मंडळाकडे भरतात त्यांची लेव्ही मंडळाकडे मालकाला जमा करावीच लागते. अशाच कामगारांना कल्याणकारी योजनांचा पुरेपूर लाभ मिळतो. नियमित व संपूर्ण मजूरी मंडळात भरणाऱ्या कामगारांना दिवाळी बोनस चांगल्या प्रकारे मिळतो. मात्र जे कामगार रोख स्वरूपात मजूरी लेव्ही घेणाऱ्या कामगारावर मंडळामार्फत कडक कारवाई करण्याचे अधिकार मंडळाला असून त्यादृष्टीने मंडळामार्फत प्रयत्न चालू आहेत. जेणेकरून त्यांनाही इतर कल्याणकारी योजनेचा फायदा घेता येईल. त्यासाठी माथाडी मंडळ आजही प्रयत्नशील आहे.

माथाडी कायदयामुळे कष्टकऱ्यांच्या श्रमाला संरक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कामाची शाश्वती आणि कष्टाचा मोबदला मिळण्याचा हक्क माथाडी कायदयामुळे मिळालेला आहे. कोणत्याही व्यापाऱ्याला आपल्या दुकानात हमाली काम करणाऱ्या हमाल कामगाराला गुलाम म्हणून वागवता येणार नाही. ''त्यांचे मनमानी शोषण करता येणार नाही. त्यांच्या कामाची पध्दत, कामाच्या वेळा आणि कामाचा मोबदला त्यांच्या कामाच्या पगारावरून ठरवावा लागेल. मुकी बिचारी कुणी हाका. ही परिस्थिती आज हमाल कामगाराच्या वर्तुळात राहिलेली नाही''[२८] खूप अन्याय, अत्याचार सहन करून आज चांगले दिवस आले आहेत. हमाल कामगारांना माथाडी कायद्याचे संरक्षण

मिळाल्याने त्यांच्यात वेगळी जागृती निर्माण झाली आहे. हमाल कामगार सुरक्षित व शोषणमुक्त बनला आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. आजही कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी व शोषण मुक्तीसाठी संघटना झगडत आहे. मालक आणि कामगार घटक अस्तित्वात आहेत. तोपर्यंत श्रमिकांना त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी अखंडपणे झगडावेच लागणार आहे. प्रत्येक गोष्टीसाठी कायदा करणे योग्य ठरणार नाही. त्यासाठी समाज मन बदलण्याची गरज खऱ्या अर्थाने निर्माण झालेली आहे. त्याशिवाय कामगार सुखी होणे अवघड आहे हे सांगावेसे वाटते.

महाराष्ट्र हमाल व मापाडी व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ या प्रभावी कायदा मंजूर होऊन चाळीस वर्षाहून अधिक कालावधी लोटला आहे. या कायद्या अगोदर असंघटित कामगारांना कामाची निश्चिती व आर्थिक सुरक्षितता मिळत नव्हती. माथाडी कायदयाची अंमलबजावणी काटेकोरपणे झाल्याने नोकरीचे नियमन झाल्याने उपलब्ध कामगारांचा आवश्यक तो पुरवठा मालकांना (व्यापाऱ्यांना) होऊ शकला. माथाडी कायदयातील तरतूदीनूसार योजना तयार करणे, नियमावलीनुसार मंडळाचे कार्यालयीन कामकाज चालविणे, आर्थिक ताळेबंद तयार करणे, अंमलबजावणी तसेच योजनेच्या स्तरावर मालक, कामगारांची नोंदणी, कामगारांच्या सेवाशर्ती, त्यांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या त्यांच्यावरील शिस्तभंगाची कारवाई, गुन्हयासाठी शासन मंडळाच्या अधिकाऱ्यावरील जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये या सर्व बाबींचा समावेश या कायदयात आहे. इतके दिवस औद्योगिक क्षेत्रात माथाडी कायदयास विरोध होता. ''उच्च न्यायालयाने याचिका क्र. १९८२/२००७ सन २०१० मध्ये महत्वपूर्ण निकाल दिला असून माथाडी कायदा औद्योगिक क्षेत्रात जेथे हमाली स्वरूपाचे काम चालते तेथे माथाडी कामगारांसाठी हा कायदा लागू होत असल्याचा निर्णय देताना या कायद्याच्या संदर्भात नव्याने परिभाषा उदधृत केली. माथाडी कायदयातून सुट मिळण्यासाठी केलेल्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत.''[२९] त्यामुळे त्यांनाही माथाडी कायदयाचे संरक्षण मिळाले ही ऐतिहासिक बाब ठरली आहे. माथाडी कामगारांना लेव्ही मिळत असल्यानेच

कामगारांना इतर सोयीसुविधा व कल्याणकारी योजना राबविणे शक्य झाले आहे.

माथाडी कामगार कायदयाची अंमलबजावणी ४ मे १९९१ च्या अधिसूचनेद्वारे झाली. अधिनियम इ.स. १९६९ लागू करून अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना केलेली आहे. अहमदनगर जिल्हयामध्ये माथाडी कायदा लागू करण्यासाठी जिल्हा हमाल संघटनेचे अध्यक्ष मा. शंकरराव घुले, अप्पा कोरपे व इतर कामगार नेत्यांनी अथक प्रयत्न केले. माथाडी मंडळाचे तत्कालीन चेअरमन मा. श्री. टी.जी. चोळके यांचे फार मोठे योगदान आहे. माथाडी कायदयाद्वारे माथाडी कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, सानुग्रह अनुदान (दिवाळी बोनस), पगारी सुट्टया, नुकसान भरपाई, वैद्यकिय भत्ता इत्यादी स्वरूपाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ कामगारांना होतो. माथाडी कायदयाचे संपूर्ण फायदे मिळण्यासाठी कामगार जागृत आणि माथाडी कामगारावर संघटनेचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. माथाडी कामगारांनी केलेल्या कामाचे पैसे त्यास मिळत असून भविष्य निधीपासून तर अगदी वैदयकीय भत्त्यापर्यंत तरीही सर्व लाभ कामाच्या मजूरीवर लेव्हीच्या रूपाने मालकाकडून (व्यापाऱ्याकडून) मिळते.

''मालक बऱ्याच ठिकाणी लेव्हीची रक्कम देत नाहीत. पर्यायाने अशा रोख स्वरूपात मजूरी घेणाऱ्या कामगारांना कल्याणकारी योजनेचा पुरेपूर लाभ मिळू शकत नाही. जे माथाडी कामगार प्रामाणिकपणे मजूरीची रक्कम मंडळाकडे भरतात त्यांची लेव्ही मंडळाकडे मालकाला जमा करावीच लागते. अशा माथाडी कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळतो.''[३०] माथाडी कायदा प्रामाणिक व शिस्तीने वागणाऱ्या कामगारांना आधार देणार आहे. त्यासाठी रोख स्वरूपात मजूरी घेणाऱ्या कामगारांवर कडक कारवाई माथाडी मंडळाने करावयास हवी तरच कामगारांचे जीवन सुखी व समाधानाचे होईल असे वाटते. कामगारांच्या घामाच्या पैशाचा व्यवस्थित विनियोग त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी व्हावा जेणे करून कुटुंब नवीन उभे राहिल असे वाटते.

अशाप्रकारे माथाडी कामगारांसाठी कायदा केला असला तरी त्या कायदयातच शासन, मालक व कामगार या तिन्ही पक्षांचे प्रतिनिधी एकत्र येऊनच खऱ्या अर्थाने कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे शक्य झाले आहे. त्यामुळे या तिन्ही घटकांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. या तिन्ही घटकांना त्यासाठी एकत्र राहावेच लागेल तरच माथाडी कामगारांना चांगले दिवस येतील यात शंका नाही. त्याचबरोबर राज्य सरकारचीही फार महत्वाची भूमिका आहे. माथाडी कामगारांसाठी राबवित असलेल्या कल्याणकारी योजना व आंदोलनाला प्रभावी नेतृत्व व मार्गदर्शन लाभलेले डॉ. बाबा आढाव यांचेही फार मोठे योगदान यात आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शंकररावजी घुले यांनी अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीच्या सर्व हमालांस माथाडी कामगार कायद्याची अंमलबजावणी यशस्वीरीत्या केली आहे. अहमदनगर शहरातील व जिल्हयातील सर्व माथाडी कामगारांना त्या कायद्याचे फायदे मिळत असून आज ताठ मानेने जीवन जगत आहेत. हमालांविषयी असलेल्या तळमळीमुळे अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अल्पावधीत नावारूपाला आली आहे हे दिसून येते.

संदर्भसूची :—

१. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन, विशेषांक. पानं न. ३

२. दैनिक केसरी, दि. २ जून १९९७.

३. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, १९९७, पान नं. ७१

४. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन, पान नं. ५

५. पंतप्रधानांनी नेमलेली अर्जुनसेन गुप्ता समिती, २००७—०८.

६. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, १९९७, पान नं. २९.

७. केरकर भालचंद्र, पेन्शन कामगारांचा हक्क आहे उपकार नव्हे, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन लेख पान नं. ६

८. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता १९९७, पान नं. २९

९. कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११, पान नं. २०

१०. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ परिपत्रक, २९ जाने. २०११

११. औद्योगिक निवाडा कायदा १९४७, किमान वेतन कायदा १९४८.

१२. कित्ता पान नं. २७

१३. कोरपे अप्पा, भारवाही, स्फुर्ती प्रकाशन, अहमदनगर पान नं. २७

१४. पाटील व्ही.पी. दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन, कराड, पान नं. ९४.

१५. पोवार के.आर. माथाडी कामागाराबाबत चौकशी समिती अहवाल, १२ जानेवारी १९६५.

१६. कालेलकर बी.एस. लोखंडी जथ्था कामगार चौकशी समिती अहवाल, १५ डिसेंबर १९६५.

१७. पाटील शिवाजीराव, असंरक्षित कामगाराबाबत चौकशी समिती अहवाल १२ जानेवारी १९६५.

१८. महाराष्ट्र माथाडी हमाल व श्रमजीवी कामगार अधिनियम १३ जुन १९६९.

१९.कोरपे अप्पा, भारवाही, स्फुर्ती प्रकाशन, अहमदनगर पान नं. ९१
२०.कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११, पान नं. २१.
२१.कित्ता पान नं. २२
२२.महाराष्ट्र माथाडी हमाल आणि श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९. पान नं. ६.
२३.दैनिक गावकरी, दि. ४ मार्च २०१२
२४.महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९.
२५.दैनिक गावकरी — दि. ४ मार्च २०१२
२६.महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९.
२७.कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका — २०११, पान नं. ३१.
२८.चव्हाण रामनाथ, श्रमाची प्रतिष्ठा आणि माथाडी कायदा, हमाल माथाडी वार्ता, १९९७.
२९.डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन पान नं. ३३
३०. कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११, पान नं. ३१

प्रकरण सहावे

माथाडी कामगारचळवळीतून उदयास आलेले साहित्यिक

१. अप्पा कोरपे यांची कौटुंबिक परिस्थिती

अप्पा कोरपे यांचे साहित्यीक कार्य

अप्पा कोरपे यांना मिळालेले विविध पुरस्कार

२. रंगनाथ राळेभात यांची कौटुंबिक परिस्थिती

रंगनाथ राळेभात यांचे साहित्यिक कार्य

३. आनंदा साळवे यांची कौटुंबिक परिस्थिती

आनंदा साळवे यांचे साहित्यिक कार्य

१) मधुकर गहिनीनाथ ऊर्फ अप्पा कोरपे यांची कौटुंबिक परिस्थिती:—

मधुकर गहिनीनाथ ऊर्फ अप्पा कोरपे यांचा जन्म बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यातील ''भाळवणी'' या गावी झाला. भाळवणी गावच दुष्काळी भागातील आहे. गावातील बहुतेक शेती पावसावर अवलंबून होती. पाऊस वेळेवर झाल्यास पिके थोडयाफार प्रमाणात येत होती. बागायती क्षेत्र अतिशय कमी होते. जिरायती शेतीमुळे गावातील लोकांना बाहेरगावी कामाला गेल्याशिवाय पर्याय नव्हता. त्यातच कुटुंब मोठे असल्यास अनेक अडचणींना तोंड दयावे लागत होते. ''अप्पा कोरपे यांचा जन्म जवळजवळ ११ जानेवारी १९३६ चा. ते लिंगायत समाजाचे परंतु भयानक दारिद्रयाला सामोरे जावे लागले.''[१] अप्पांच्या आजोबांचे नाव म्हाळप्पा कोरपे होते. त्यांना दोन मुले व पाच मुली होत्या. अप्पांच्या वडिलांचे नाव गहिनीनाथ आणि चुलत्याचे नाव धोंडिबा होते. कुटुंब आकाराने खुप मोठे होते. घरात काम करणारी माणसे कमी तर खाणारी माणसेच जास्त होती. कुटुंबाची नेहमी आर्थिक परिस्थिती ढासळलेली होती. शेती कोरडवाहू असल्याने मोलमजुरी केल्याशिवाय जगणे अशक्य होते.

समाज बदलत गेला, त्याप्रमाणे विभक्त कुटुंब पध्दतीप्रमाणे अप्पांचे वडिल व चुलते वेगवेगळे राहु लागले. अप्पांच्या वडिलांना ही मोलमजूरी करावी लागत होती. गहिनीनाथांचे कुटुंब हळूहळू वाढत होते. मात्र उत्पन्नाचे साधने वाढत नव्हती. गहिनीनाथांचे ही कुटुंब पाच व्यक्तींचे झाले होते. घरात कमविणारे फक्त गहिनीनाथ होते. त्यामुळे कुटुंब चालविणे फार अवघड ठरत होते. गहिनीनाथांना दोन वेळची भाकरी देणे ही मुश्किल झाले होते. एकीकडे नातेवाईकांची परिस्थिती चांगली असूनही कधी अप्पांच्या वडिलांना कोणत्याही नातेवाईकाने मदत केली नाही. त्यातच अप्पांची आई कामसू नसल्याने कुटुंबाची परिस्थिती बदलत नव्हती. स्वत:च्या मुलांना दोन वेळची भाकरी देऊ शकत नाही याचे दु:ख अप्पांच्या आईला वाटते. त्यांना व्यवस्थित कपडे घेऊ शकत नाही. एवढे दारिद्रय अप्पांच्या कुटुंबात होते. अप्पा कोरपे यांना न कळत्या वयात बहिणीचा मृत्यू पाहावा लागला. शेजारी भाऊ बहिण भाकरी मागण्यास

जात होते. तेव्हा त्यांनी कोणीच भाकरीचा तुकडा हातात दिला नाही. ''मनात म्हटलं चला आता केसरबाई मेली आपल्याला भाकरी मिळत्याल, आता भाकरी येत्याल, ती मेल्याचं दु:ख नाही भाकरीचा आनंद आहे.''[२] असे उपरोधिकपणे अप्पा कोरपे म्हणतात. सुख दु:खात नातेवाईक येतात थोडा वेळ येतात परंतु गहिनीनाथांच्या समोर अडचणी कमी होत नव्हत्या. सुखात असताना नातेवाईक मदत करत नाहीत. मात्र दु:खात नातेवाईक भाकरी खाऊ घालतात हे मर्म अप्पांनाही समजले नाही.

अप्पांचे वडिल वयाने थकत चालले होते. गहिनीनाथांना अप्पांची काळजी वाटत होती. त्यांना अप्पांच्या भविष्याची काळजी सतावत होती. शेवंताबाई वयाने तरूण असल्याने माझ्या नंतर दुसरे लग्न करील असे गहिनीनाथांना वाटत होते. त्या काळातील भाकरीसाठीची कुटुंबाची वणवण आजही अप्पा कोरपे यांना आठवते. केवळ आपल्याला भाकरी मिळावी म्हणून अप्पा कोरपे यांच्या आईने केलेले दुसरे लग्न. ''अप्पांना नातेवाईकांकडे राहून करावी लागलेली मोलमजूरी, भाऊबंदकीतून सोसावा लागलेला त्रास, सोनारी येथे कुंभाराच्या हाताखाली केलेले काम चहाचे दुकान अशा सर्व कडू गोड आठवणींचा उमाळा आल्यावर त्यांचे डोळे पाणावतात.''[३] पूर्वीच्या गोष्टी आठवल्यावर गळा भरून येतो. त्या व्यवस्थेबद्दल ते कोणालाही दोष देत नाहीत. अप्पांच्या आईनेही जगाचा निरोप घेतल्यावर मात्र या जगात अप्पांचे कोणीच राहिले नव्हते. अप्पांनी स्वत:च्या हाताने वडिलांना, भावंडाना आणि शेवटी आई व बहिणीला पाणी पाजले होते. सर्व रक्ताचे नाते डोळयासमोरून दृष्टीआड झाले होते. मात्र कधीकधी रक्तापेक्षाही दुसरी माणसे जवळची वाटतात. शंकर कुंभाराने अप्पांना स्वत:च्या मुलासारखा आधार दिला होता. त्यांनी फक्त आधार न देता अप्पांचे कुटुंब उभे केले. अप्पांचे लग्न झाल्यावर संसार थाटून दिला. जगात आईवडिल नसतानाही कुटुंब उभे करणे सोपे काम नव्हते. अप्पांच्या अंगी असणारा प्रामाणिकपणा व संयम यामुळेच त्यांना इतरांची साथ मिळाली लग्नाचा खर्च व कुटुंबाचा खर्च भागविणे अवघड झाले होते.

याउलट त्या हलाखीच्या स्थितीने भाकरीची किंमत व त्यासाठी करावे लागणारे कष्ट या जीवन सत्याची जाणीव झाल्याचे समाधान अप्पा मानतात.

खेडेगावी वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे अप्पा कोरपे वैतागले होते. अप्पांकडे दूरदृष्टी असल्याने त्यांनी शहराकडे धाव घेतली. आष्टी ते नगर १९५५—५६ मध्ये पायी आले. नुकत्याच एस.टी. बस सुरू झालेल्या होत्या. शहराची कोणतीही माहिती नसल्याने एस.टी. स्टँडवर अप्पांनी मुक्काम केला होता. काहीतरी काम धंदा मिळेल या हेतूने अहमदनगरमध्ये आले होते. सकाळी उठल्यावर तोंड धुतले तेवढयात एक एस.टी. बस आल्यावर तिच्या भोवती टांगेवाले व ओझे उचलणारे गोळा झालेले अप्पांनी पाहिले. अप्पाही त्या गर्दीत घुसले होते. गाडीतून उतरलेल्या साहेबाने अप्पांच्या डोक्यावर पेटी दिली अन त्यांच्यामागे चालू लागले. नालेगावात पोहचल्यावर त्या ओझ्याच्या बदल्यात एक आणा कमाई मिळाली होती. त्यानंतर हमाली कामच अप्पांच्या आयुष्याची शिदोरी बनली होती. हमाली करता करता शहरात ओळखी वाढल्या. मंगलगेटच्या भुसार बाजारात हमाली बळी मुकादमाकडे काम करताना मिळालेल्या पैशापैकी काही पैसे ओळखीच्या लोकांद्वारे गावाकडे कुटुंबाला अप्पा पाठवू लागले. हमाली करताना हमालांच्या व्यथा त्यांना जाणवू लागल्या. माल कोणाचा उतरवंतय कोण व त्याची राखण करतय कोण याचा विचार करता बैलाच्या या जीवनात हक्कांचे काहीतरी मिळवायचे असे. अप्पांनी ठरविले होते. ''रात्रीच्या वेळी विविध दुकानांच्या फळयावर झोपणाऱ्या हमालांना एकत्र करून त्यांच्या हलाखीच्या स्थितीची व मालकाकडून होत असलेल्या पिळवणूकीची जाणीव ते करून देऊ लागले. इ.स. १९५८—५९ मध्ये नगरच्या आडतेबाजारात हमालांचा संप मोडून काढला. हाणामाऱ्या होऊन बाहेरचे हमाल कामासाठी घेण्यासाठी आले''[४] त्यामुळे संपातील हमालांना मालकाकडे माफी मागून कामावर रूजू व्हावे लागले. मात्र अप्पा कोरपे व इतर मित्रांनी हार मानली नाही. सन १९६२—६३ मध्ये संघटनेचे पुन्हा संघटन करून बापूसाहेब भापकर व मधुकर कात्रे यांची साथ मिळाली. हमाल कामगारांनी पुन्हा संप केला तरीही तो संप व्यापाऱ्यांनी मोडून काढला. व्यापारी संप यशस्वी होऊ देत नव्हते.

अप्पा कोरपे व इतर मित्रांनी यावेळी विचारपूर्वक पावले टाकण्यास सुरूवात केली. ''इ.स. १९७८ मध्ये मोहनधारियांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात झालेल्या हमालांच्या मेळाव्यास शंकरराव गायकवाड व अन्य हमालांच्या मदतीने पैसे जमा करून नगरच्या हमालांना अप्पा कोरपेंनी ट्रकने पुण्याला नेले.''[५] मेळाव्याला डॉ. बाबा आढावांनी मार्गदर्शन केले. त्यांनी वेगवेगळया संघटना करण्यापेक्षा मोठी संघटना करण्याचा सल्ला दिला. त्यातून अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड यांच्या प्रयत्नातून अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्थापन झाली. आडतेबाजार, रेल्वेस्थानक, ट्रान्सपोर्ट, मार्केटयार्डच्या हमालांना एकत्र घेतले. संघटनेच्च्या पहिल्याच संपाने व्यापारी वर्ग हादरला होता.

आजपर्यंतच्या कष्टप्रद जीवनाचे समाधान अप्पा कोरपे यांना आहे. वयानुसार थकवा आला तरी कष्टकऱ्यासाठी सतत धडपड चालू होती. भाकरीसाठी वणवण करताना मिळेल ते खाल्ले आणि जागा मिळेल तेथे पाठ टेकवली. दिवसभर ओझी वाहिली असल्याने हमालांनाच त्यांनी गणगोत मानले होते. त्यांचाच मला अधार आहे व मला त्यांच्याच खांदयावर जायचे आहे असे अप्पा म्हणत असत. हमाली करताना कधी पुढारी बनले हे समजले नाही. जिल्हा हमाल पंचायतीचे सेक्रेटरी ते महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष हा प्रवास करूनही त्यांनी साहित्यातही उत्तुंग भरारी मारली होती. मात्र अप्पा कोरपे आयुष्यभर भारवाही हमाल म्हणून जगले.

अप्पा कोरपे परिश्रमाने, धडपडीने, धडाडीने, प्रामाणिकपणाने जगण्याच्या निष्ठेने अन दुसऱ्यांना जागविण्याच्या दृष्टीने सेवाभावी वृत्तीने काम करीत होते. अप्पा कोरपे हमाल पंचायतीच्या कार्यात कायम गुंतून होते. ''हमाल पंचायतीने अप्पांना पद दिले, प्रतिष्ठा दिली, सत्ता दिली, सत्ता याचा विपरीत अर्थ घेऊ नका, सत्ता म्हणजे अधिकार. आज अप्पा कोरपे नावाच्या 'भारवाही' हमालाच्या शब्दाला अधिकार प्राप्त झाला आहे.''[६] हमालही माणूस असतो. त्याच्यामध्ये, माणूसपण जागविणे, टिकविणे व उन्नत करणे हाच कोरपे यांचा ध्यास होता. कोरपे अडानी, अशिक्षित असूनसुध्दा व्यावहारिक जीवनाच्या विद्यापीठात

अनुभव नावाच्या शिक्षकाने त्यांचे जे शिक्षण झाले ते कोणत्याही विद्यापीठाच्या परीक्षेद्वारे पदरात पडणार नाही हे ठामपणे सांगावेसे वाटते.

अप्पा कोरपे नावाचा 'भारवाही' धडपडीचे जीवन जगत असताना काळालाही पाहवले नाही. त्यांचे निधन ३ नोव्हेंबर २०११ रोजी अहमदनगर येथे झाले. कष्टकरी अप्पांना निरोप देताना अनेकांचे हृदय गलबलले. त्याचवेळी या श्रमिकांच्या कष्टाची फुले झाली म्हणून त्यांच्या जगण्याचा हेवाही वाटला असे सांगावेसे वाटते.

५.२ अप्पा कोरपे यांचे साहित्यिक कार्य :—

हमाल पंचायतीद्वारे सामाजिक कार्याच्या क्षेत्राबरोबर साहित्य क्षेत्रातही अप्पा कोरपे उतरले होते. ''कामगार आहे मी तळपती तलवार आहे असे आव्हान देत नारायण सुर्वे यांनी सारस्वतांचा थोडा गुन्हा करून साहित्य विश्वात पाऊल टाकले. प्रत्यक्षात तळपती तलवार नसली तरी हाता तलवारीइतकीच तेजस्वी दाहक सुर्व्यांच्या हातात होती.''[७] अप्पा कोरपे यांचे हातही मोकळे नव्हते. पाठीवरच्या गोणीचा भार वाहून नेताना ओझ्याला त्यांच्या हाताचा आधार होता. आयुष्यभर भाकरीसाठी धडपडणाऱ्या ओझे वाहणाऱ्या भारवाहीला स्वत:चे मन मोकळे करायचे होते. आयुष्यभर, अन्याय सहन केल्याने खऱ्या अर्थाने त्यांचे अनुभव कणखर भाषेत समाजापुढे आले. त्या काळचा काळचा समाज जातीव्यवस्थेत किती गुरफटलेला होता हे अप्पांनी आपल्या भाषेत ताशेरे ओढले आहेत. अप्पा कोरपे यांनी १) मी तो हमाल, २) भारवाही, ३) भाकर, ४) जाई, ५) अरे माणसा माणसा असे पाच उत्कृष्ट पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांचा थोडक्यात मागोवा घेण्याचा प्रयत्न या मुद्दयाद्वारे घेत आहे.

१) मी तो हमाल :—

अप्पा कोरपे जे बोलते झाले. त्यांच्या सांगीव आत्मकथनाचे लिखितरूप म्हणजे 'मी तो हमाल' होय. या पुस्तकाने अप्पांना खूप लोकप्रियता लाभली. २५ वर्षापूर्वी ज्यांच्याकडून कुणी एकही अक्षर लिहिण्याची अपेक्षा केली नसेल ते अप्पा कोरपे पाहता पाहता लेखक झाले. माणूस जीवनात खडतर कष्टाने,

जिद्दीने आणि संकल्पनाने मोठा होतो. अप्पांना गरीबीचे चटके बसलेले आहेत. त्यासाठी त्यांना प्रसंगी अपमान व अवहेलना सहन कराव्या लागल्या या सर्व व्यथा अप्पा कोरपे यांच्या जीवनातील आहेत. ''साहित्यक्षेत्रात नाव व्हावे किंवा साहित्याची काही तरी सेवा व्हावी म्हणून 'मी तो हमाल' आत्मकथन लिहिले नाही. आयुष्यात जे सहन केले ते मनमोकळेपणाने कधी कोणाला सांगता आले नाही.''[८] अप्पा कोरपे यांनी स्वत: भोगले ते समाजासमोर आणण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न होता. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या घरी अप्पा जे बोलले ते ध्वनिफितीवरून त्यांचे शब्दांकन अश्विनी कावळे यांनी केले. अप्पांच्या बोलण्यामागे सांगण्यामागे डॉ. मोरजे यांची प्रेरणा होती. तुमचे बोलणे लोकांपर्यत आले पाहिजे असे डॉ. मोरजे सर सांगत होते. हे आत्मकथन चार विभागात मांडले आहे. लिहित असताना किंवा सांगताना काही हातचे राखून ठेवले आहे असे वाटत नाही किंवा त्यांची रंजकता वाढावी असा कोणताही प्रयत्न त्यांनी केला नाही. आयुष्यात जे घडले जे अनुभव आले ते अनुभव काळजाला भिडणारे आहेत. यासर्व वैशिष्टयांमुळे अप्पा कथनात उठून दिसतात.

'मी तो हमाल' या आत्मकथनाच्या पहिल्या पेन्यात अप्पांच्या कुटुंबाची दारिद्रयामुळे झालेली केविलवाणी परिस्थिती आपणासमोर उभी राहते. (पेणे म्हणजे प्रसावातील मुक्कामाची जागा) माणसाला जीवनात अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या चार महत्वाच्या गरजा आहेत. त्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक माणूस धडपड करीत असतो. धडपड करूनही माणसाच्या गरजा पूर्ण झाल्या नाहीतर कुटुंबाची अवस्था वाईट होते. दोन वेळेची भाकरी धडपड करूनही मिळत नव्हती. त्यांच्या कुटुंबाला शेतीतील पिकाचा काहीही आधार नव्हता. वडिलांना मोलमजूरी केल्याशिवाय कुटुंबाचे पोट भरणे शक्य नव्हते. मोलमजूरी करूनही अप्पांच्या वडिलांना पुरेशी मजूरी मिळत नव्हती. त्यातच कुटुंबात काम करणारे एकटेच होते. त्यात एखादया दिवशी काम मिळत नसे त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला उपासमारीची वेळ येत होती. अप्पांच्या आई—वडिलांचे नेहमीच भांडणे होत होती. त्याचे प्रमुख कारण गरीबी होते. मुलांवर उपासमारीची वेळ येत असल्यानेच लेखकाच्या आईला मुलांचे दु:ख पाहवत नव्हते. अप्पांच्या आईच्या

डोळयातून पाणी आले होते. ''हा प्रपंच नको अन लेकरं नसती झाली तर बरं झालं असतं, देवा मी काही तुला मागाया गेले नाही, आता याचं पोट कसं भरायचं?''[९] शेवंताबाईला खूप राग आला होता. त्या रागातच शेवंताबाईने शिनगिरीच्या डोंगरावर नेऊन केशर या मुलीस बुडून मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. अप्पांनी व इतर भावंडांनी ठरविले की आपण भाकरी मागायची नाही. अप्पांची आई देवाला दोष देत होती. त्याचबरोबर आपल्या भावालाही दोष देत होती. गरीबीमुळे शेवंताबाईने चोरी केली. चोरी उघडकीस आल्यामुळे संपूर्ण कुटुंबाची इज्जत गेल्याने शेवटी गाव सोडावे लागले. खुप भयानक परिस्थिती अप्पांच्या कुटुंबाला सहन करावी लागली.

अप्पांच्या कुटुंबातील एकीकडे गरीबीने घेरले होते. दुसरीकडे कुटुंबातील केशर बहिण, भाऊ छगन व वडिल गहिनीनाथ अशा तीन जणांचा विविध आजारांनी मृत्यू झाला होता. या सर्वांचा विधी अप्पा कोरपे यांच्या हातून झाला होता. अप्पांनी उघडया डोळयांनी या सर्व परिस्थितीला तोंड दिले होते. वडिलांचा अप्पांवर खूप जीव होता. शेवटी कुटुंबात अप्पा व आई शेवंताबाई शिल्लक राहिले होते.

''मी तो हमाल'' या आत्मकथनाच्या दुसऱ्या पेण्यात अप्पा कोरपेंना पोट भरण्यासाठी करावी लागलेली धडपड पाहावयास मिळते, दोन वेळच्या भाकरीसाठी अप्पांच्या आईला दुसरे लग्न करावे लागले. रक्ताचे नाते संपत चालल्यामुळे स्वत:चे नातेवाईक माणूसकी सोडून कसे फटकून वागतात हे त्यात आपणास पाहवयास मिळते. आपल्याकडे काही नसेल तर कशी फजिती हाते हे अप्पांनी अनुभवले होते. अप्पांच्या चुलत भावाच्या मुलींच्या लग्नात आहेर मोडायचे काम चालू होते. ''जे आहेर आले, त्या आहेरातला एक फेटा त्याने मला आहेर मोडायला दिला. माझ्या आयुष्यात मला वाटले की, च्यायला फेटा चांगला आहे. मी लग्नात ऐटीत बांधला. आन मी मिरवायला लागलो काय? पण त्याने एका बाजूला मला बोलवून घेतलं आणि म्हणाला, आहेर मोडायपुरता दिलाय, तुला बांधायला नाही दिला फेटा इकडे दे काय ?''[१०]

आहेर मोडल्यानंतर अप्पांच्या डोक्यावरील फेटा काढून घेतला त्यावेळी अप्पांना स्वत:चा अपमान सहन करावा लागला. या सर्व गोष्टीस अप्पांच्या कुटुंबाची झालेली ससेहोलपट गरीबीमुळे झाली. माणूस ज्ञानाने मोठा न ठरता पैशाने ठरविण्याच्या पध्दतीमुळेच अप्पांना हालअपेष्टा व अन्याय सहन करावा लागला.

आपल्या देशात पुरूषप्रधान संस्कृती आहे. पुरूषांशिवाय कुटुंबाला पूर्णत्व व सुरक्षा नाही. प्रत्येक पावलोपावली अप्पांच्या आईला अनुभव येत होता. त्यातच नवरा नसेल तर समाजात ती स्त्री आजही असुरक्षित वाटते. जगात आईसारखी माया दुसरी कोणाची असू शकत नाही. त्या मायेला अंत नाही. आईवडिलांची सावली कोणत्याही मुलास फार महत्वाची आहे. ते छत्र हरपल्यावर माणूस समाजात एकाकी पडतो. ''लेखकाच्या आईचा मृत्यू हा कथानाकातला दु:खाचा परमोच्च बिंदू आहे. आईवडिलांचा आधार मुलांसाठी खूप महत्वाचा असतो.''[११] अप्पांनाही आईचा खूप मोठा आधार होता. मरण डोळयासमोर दिसत असूनही तिच्या मुलांसाठी मरेपर्यंत धडपड करणारी आई जणू काही मृत्यूला थोपवित आहे असे दिसते.

'मी तो हमाल' या आत्मकथनाच्या तिसऱ्या पेण्यात लेखकाचा म्हणजे अप्पा कोरपे यांचा आई वडिलाविना या जगातील प्रवास कसा झाला हे सांगितले आहे. आजच्या समाजव्यवस्थेत स्वत:ला स्थिर जीवन जगण्यासाठी हाताला काम व राहायला घर आवश्यक होते. या दोन्ही गोष्टी अप्पा कोरपे यांच्याजवळ नव्हत्या, समाजात अशा काही उदार मनाच्या व्यक्ती असतात. त्या दुसऱ्याची जबाबदारी हसत हसत स्वीकारतात. शंकर कुंभार हा त्यातील भला माणूस होता. त्याने अप्पांना मायेची ऊब दिली शिवाय साथही दिली अप्पांनी गावात छोटेसे किराणादुकान सुरू केले होते. अप्पा कोरपे यांच्या इमानदार व प्रामाणिक स्वभावामुळे त्यांनी अनेकांची मने जिकंली होती. त्यामुळेच जवळचे कोणीही नातेवाईक नसतानाही अप्पा कोरपे यांनी दीडशे रूपयाचा बस्ता बांधला होता. पैशाची व्यवस्था करून अप्पा कोरपे यांचे लग्न पार पडले परंतु कुणालाही साधी सुपारी सुध्दा वाटली नव्हती. लग्न झाल्यावर जबाबदारी वाढली होती.

''मी म्हणलं, लग्न लागलं आता काय? लग्न झालं सासरा आपली पोरगी संभाळील आपल्याला काय ? पण सासरा इतका हुशार व्हता की लग्न झाल्यावर म्हणाले ही खोली अनं हे तुझ घरं.''[१२] अप्पा कोरपे यांच्या लग्नामुळे कर्जाचे ओझे वाढले होते. त्यामुळे दुसरा कामधंदा शोधल्याशिवाय कुटुंब व्यवस्थित चालणे अवघड होते. खेडेगावी पुष्कळ काम करूनही योग्य मोबदला मिळत नव्हता. अप्पांनी नगरला येण्याचा निर्णय घेऊन आष्टी ते नगर प्रवास पायी केला होता. समाजात असणारे जातीधर्म माणूसकीपुढे लोंटागण कसे घेतात हे प्रत्ययास येते. 'मी तो हमाल' या आत्मकथनाच्या चौथ्या पेण्यात अहमदनगरला आल्यावर काम मिळवून पोटभर खाणे हाच एकमेव विचार होता. लेखक फारसे शिकलेले नसल्याने हमालीशिवाय दुसरे काम मिळणे शक्य नव्हते. स्टँडवर हमाली करून कामास सुरूवात केली होती. लेखकांनी कामाचा ध्यास घेतला होता. काम हेच त्यांनी दैवत मानले होते. गरीबीचे चटके सहन केल्यामुळे समाजात विविध अनुभव त्यांना आले होते. हळूहळू काम करताना ओळखी वाढल्यामुळे मार्केटमध्ये हमाली सुरू केली. काम करत असताना व्यापाऱ्यांकडून अन्याय, अत्याचार हे अप्पांना पाहवत नव्हते. श्रीमंत माणसे गरीबांची कामे करीत नाही हा अनुभव अप्पांना आल्यामुळे कोणापुढेही हात पसरवयाचे नाही हे अप्पांनी ठरविले होते. हमाल कामगारांना जागृत करून संघटना स्थापन करण्यास कामगारांना प्रवृत्त केले. आपण एकत्र आल्याशिवाय आपले शोषण थांबणार नाही हे अप्पांनी ओळखले होते. ''आपल्याबरोबर इतरांनाही समर्थ बनवावे, इतरांचे संसार उभा करता आले तर करावे, त्यासाठी आपल्या हमाल सहकाऱ्यांना संघटित करावे ही लेखकाची दुसरी बाजू आहे.''[१३] प्रामाणिकपणे व चिकाटीने जीवन समृद्ध करून इतरांनाही त्या दिशेने नेण्यासाठी लेखकाची धडपड चालू होती. हमाल कामगारांची मजबुत जिल्हा हमाल पंचायत स्थापन करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

२) **भारवाही :—** 'भारवाही' या कथनात आपल्या सहकाऱ्यांसोबत काम करताना अप्पा कोरपे यांना जे अनुभव आले ते त्यात मांडले आहेत. आपण संकटे सहन करून जीवनात भक्कमपणे उभे राहिले तसे आपल्या सहकाऱ्यांनाही उभे

राहता आले पाहिजे. त्यासाठी संघटना बांधायला हव्यात ही अप्पा कोरपेंची तळमळ होती. सहकाऱ्यांच्या कौटुंबिक अनुभवाविषयी भारवाहीत उल्लेख करतात. हमालांचे जीवन, स्वत: अनुभवले आहे. 'भारवाही' सांगीव त्यांच्या वास्तव जीवनासंबंधीचा अतुट भाग आहे. अप्पांवर हा भार कोणी लादला नाही तर जाणीवपूर्वक पाठीवर घेतलेला आहे. डॉ. बाबा आढाव यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकाऱ्यामुळे अप्पांचे नेतृत्व उदयास आले. आजकाल राजकारण असो की समाजकारण असोत मोठे होण्यासाठी मिळालेली साथ काम झाल्यावर विसरण्याची प्रवृत्ती आसपास आपणास पाहावयास मिळते. परंतु अप्पा कोरपे यांची कृतज्ञता 'मी तो हमाल' व भारवाहीतून स्पष्ट होते. डॉ. बाबा आढाव, शंकरराव घुले, आदी मंडळी आपल्या पाठीशी आहेत हे अप्पा कोरपे यांना माहित होते. ''भारवाहीतील हमाल चळवळ संघटना आदी बाबी मला सांस्कृतिक इतिहासाच्यादृष्टीने महत्वाची सामग्री वाटली तर भारवाहीतील कथातून लोककथांचा उगम कसा होत असेल ते जाणवलेही.''[१४] अहमदनगर जिल्हयात खऱ्या अर्थाने माथाडी कायदयाच्य अंमलबजावणीसाठी खूप मोठा लढा उभारला होता. ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम अप्पा कोरपे यांनी केले. हमालाच्या पाठीवर वजन किती असावे असा कायदाच नव्हता. त्याला वाचा फोडण्याचे काम लेखकाने केले आहे. हमाल कामगार दिवसभर घाम गाळून पैसा कमावतो, मात्र संध्याकाळी व्यसनात तो पैसा गमावतो हे उघड सत्य लेखकाने उघड केले आहे. अप्पांना लहानपणी वडिलांचे अनेक विषयावरील मार्गदर्शन त्यांना पुढील आयुष्यात खूप फायदेशीर ठरले. माणसांनी माणसावर उपकार करावेत. ''पण माणसापेक्षा पशुवर उपकार करावा पाखरांवर उपकार करावा, मुक्या जनावरांवर उपकार करावा यांच पुण्य जगात फार मोठं हे सगळया येळेला सांगायचं अन हे वेळोवेळी सांगत असताना आम्ही आपलं ऐकायचो की बुवा, पशुवर उपकार करून पुण्य काय ?''[१५] हे विचार अप्पांना आयुष्यभर उपयोगी पडले. कोणतेही काम प्रामाणिकपणे करण्याचा सल्ला अप्पांना आयुष्यभर उपयोगी पडला. हमाल कामगारांस कामावर आल्यावर घरी जाण्यासाठी सुट्टी मिळत नव्हती. त्याविरूध्द आवाज उठवून न्याय मिळाला

याचाही उल्लेख भारवाहीमध्ये केला आहे. पूर्वी आपल्या घरी काही दु:खाचा प्रसंग झाला तरीही व्यापारी सुट्टी देत नव्हते. त्या अन्यायाविरूध्द भारवाहीमध्ये बाजू मांडली आहे. गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रसंगी आंदोलने करून हमाल कामगारांनी प्रश्न तडीस लावले आहेत. त्याचाही उल्लेख भारवाहीमध्ये आला आहे. हमाल हा हमालच असतो त्याला काही ज्ञान नसते ही समाजाची समजून अप्पा कोरपे यांनी खोटी ठरविली आहे. हमालांच्या व्यथा समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न अप्पांनी प्रामाणिकपणे केला आहे.

अशाप्रकारे 'भारवाही'मध्ये अप्पा कोरपे यांनी हमालांच्या जीवनातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. हमाल हा समाजापासून उपेक्षित घटक समजला जात होता. त्यांच्या जीवनात उजाळा देण्याचे कामं अप्पा कोरपे यांच्यामुळे शक्य झाले. हमालांना समर्थपणे उभे करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिले अशाही व्यक्तींचा परामर्श घेतला आहे. हमाल हा जगाचा भार वाहतो परंतु तो समाजापासून आजही दुर्लक्षित राहिला आहे असे लेखकाला वाटते.

३) भाकर :— 'भारवाही' नंतर अप्पा कोरपे यांचे 'भाकर' पुस्तक प्रकाशित झाले आहे. अज्ञान, व्यसनाधिनता, आणि कष्टमय जीवन यामुळे हमालांचे जीवन पोखरलेल्यासारखे दिसते असे त्यांना वाटते. हमालांचे जीवन उलगडून दाखविताना अप्पा त्यांच्याच डोळयात अंजन घालतात. त्यांच्यातला माणूस तो माणूस दुभंगलेला असतो, हरवलेला असतो. त्यांच्यातले माणूसपण पुन्हा त्यांना मिळवून देणे हाच अप्पा कोरपे यांचा ध्यास होता. 'भाकर' कथा संग्रह इ.स. १९९६ मध्ये लिहिला गेला. 'भाकर'मध्ये भाकरीसाठी पोटाला पीळ पडेपर्यंत कष्ट करणाऱ्यांच्या कथा मार्मिक व मिश्किलपध्दतीने मांडल्या आहेत. समाजात जे दिसले ते लेखकाने यात मांडले आहे. ''व्यसनाधीनता व कर्जबाजारीपणा यावर कोरडे ओढत असतानाच कष्टकरी हा माणूस असतो. यावर भर देत त्यांनी कथा मांडल्या आहेत.''[१६] माणूसकी, नीतीमत्ता, धार्मिकता जपण्याचा

प्रयत्न ही उपाशीपोटी ही माणसे करताना पाहिल्यावर मन उदात्तेने भरून येते. पंरतु अजुनही कष्टकऱ्यांना न्याय मिळतो का ? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

'भाकर' या कथा संग्रहात अप्पा कोरपे यांचे वडिल मोलमजूरी करूनही कुटुंबाचे पोट भरू शकत नव्हते. गरीबीचे चटके बसत असताना पोटाला भाकरी मिळणे आवश्यक होते. पंरतु एवढे करूनही पोटाला पोटभर मिळत नव्हते. त्यामुळेच कुटुंबाची केविलवाणी अवस्था होत होती. गरीबीमुळे कपडे नीट घेऊ शकत नव्हते. फाटके कपडे घालून गावात मुले फिरत होती याचे दु:ख अप्पांच्या आईला वाटते. स्वत:च्या मुलांचे केस कापण्यासाठी पैसे नसल्यामुळे झालेली फसगत आपणास पाहावयास मिळते. घाम गाळून पैसे कमवायचे ही आईची शिकवण लेखकाने तंतोतंत आयुष्यात पाळली होती. कोणतेही काम प्रामाणिकपणे केले तर यशस्वी होऊन ते चिरकाल टिकते. त्यावर लेखकाचा नितांत विश्वास होता. लेखक आयुष्यभर व्यसनापासून व जुगारापासून दूर राहिले म्हणूनच समाजात त्यांची प्रतिष्ठा टिकून आहे. ''महाराष्ट्रातला हमाल उभा करायचा, लोकांची करमणूक करता करता त्यांना हमालांचे जिणं उलगडून दाखवायचं, आन हमालांच्या डोळयातबी आंजन घालायचं असं मी ठरवलं. हमाल पंचायतीचं ते कामच आहे. एक कार्यकर्ता म्हणून मी बांधिलकीने करायचं ठरवलं त्यातून मला ते सुचलं ते मी रंगवून आपल्यासमोर मांडलं.''[१७]

लेखकाच्या घरच्या गरीबीमुळेच त्यांना लहानपणी हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. आपली स्वत:ची गरीबी असल्यामुळे शेजारी, नातेवाईक फटकुन वागत होते. अप्पा कामावरून घरी येत होते. त्यावेळी त्यांना मावळणीने जेवायला घरी बोलविले होते. लेखक त्यांच्या घरी गेले होते. तेथेही अपमान सहन करून न जेवता घरी परतावे लागले होते. यावरून लेखकाला अनुभव आला की, आपल्याजवळ असेल तर लोक विचारतात. आपल्याकडे काही नसेल तर मात्र नातेवाईकसुध्दा ओळख देत नाहीत. संसार चालविण्यासाठी कुटुंबाची दोन्ही चाके सारखी असावयास हवी तरच संसार नेकीने होतो. कुटुंबातील पुरूषास व्यसन असल्यास कुटुंबाची अधोगती झाल्याशिवाय राहत

नाही. दारू, जुगार व बाईच्या नादामुळे कुटुंबाची दयनिय परिस्थिती होते. त्यावर लेखकांनी कथेतून उल्लेख केले आहेत. त्यांनी स्वत: उघडया डोळयांनी हे प्रसंग पाहिलेले आहेत. व्यसनापासून दूर राहण्यासाठी लेखकांनी काही कुटुंबाना समजावून सांगून व्यसनमुक्त केल्यामुळे आज सुखी जीवन जगत आहेत. ''ही सत्य घटना सन १९६९ सालची आहे. गोटीरामनं दारू सोडली, पुन्हा संसार करू लागला, पुढे चार महिन्यानं सखुचं लग्न झालं. सखु नांदायला गेली. गोटीराम हमाली करू लागला. मुले शाळेत जाऊ लागले. सारं घर आनंदात नांदू लागलं.''[१८]

अशाप्रकारे 'भाकर' या कथा संग्रहात दारिद्रय प्रामाणिकपणा, व्यसनाधिनता, कुटुंबातील सासूचा सासूरवास, नवरा बायकोचे नाते, विश्वासावर असते इत्यादी विषयावर लेखकांनी प्रकाश टाकला आहे.त्यातील मूळ गाभा म्हणजे 'भाकरी' मिळविण्याची धडपड हाच आहे. त्यासाठीच कराव्या लागलेल्या उठाठेवी व त्यातून आलेले सुखदु:ख पाहावयास मिळते.

४) **जाई** :— अप्पा कोरपे कथेकडून कांदबरीकडे वळले. 'जाई' ही कांदबरी त्यांनी लिहिली. स्वत: लेखनी घेऊन लिहिली. ''वेडेवाकुडे लिहीन । परी साहित्य प्रसवीन।'' असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला होता. आतापर्यंत केवळ बोलते अन सांगते असलेले अप्पा कोरपे खऱ्या अर्थाने लिहिते सारस्वत झाले आहे.''[१९] खऱ्या अर्थाने आज अप्पा कोरपे ही कांदबरी स्वत: लिहिल्याने कांदबरीकार झाले असे म्हणावेसे वाटते. 'जाई' कांदबरी म्हणजे गावाच्या मातीतून उगवून आलेली एक स्वतंत्र कलाकृती आहे. ही कथा सत्यकथेवर आधारित आहे. गावातील पाणवठा, रूढी परंपरा, समजुती, श्रध्दा, अंधश्रध्दा, व्यसनाधिनता या सर्व प्रश्नांना ओघाने वाचा फोडण्याचे काम लेखकाने केले आहे. आजही खेडयात जातीयता रक्तारक्तात भिनलेली लेखकास जाणवली. लेखकांनी 'जाई'मधून 'दायी' म्हणून काम करणाऱ्या महिलांचे जीवन या कांदबरीत रेखाटले आहे. आजही खेडयात बलुत्यांना मिळणारा समाजातील कमी दर्जा यावर या कथेत समाजाच्या मानसिकतेवर लेखकाने टीका केली

आहे. 'दायी' या घटकाकडे समाज मात्र उपेक्षेने पाहतो असे लेखकाला वाटते. लेखकाने सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेने प्रकाश टाकला आहे.

अप्पा कोरपे यांच्या लेखनातून भारतीय स्त्रीचे मनोहरी दर्शन घडविले आहे. समाजाची प्रगती झाली असली तरी जातीधर्माचा पगडा समाजावर घट्ट बसलेला आहे हे लेखकाला दिसून आले होते. समाजासाठी कनिष्ठ जातीतील माणसाने कितीही चांगले काम केले तरी गावागावात आजही धर्माच्या नावाखाली हिंसा झालेली आपणास दिसते. प्रसंगी त्यांना वाळीत टाकले जात होते. गावची प्रामाणिकपणे सेवा करून सुध्दा त्याची दखल गावकरी घेत नाहीत. याची खंत लेखक व्यक्त करतात. पूर्वी बाईचं बाळंतपण करण्यासाठी सुईण असे. सुईणींलाच दायी म्हणत,''बाईला दाईशिवाय आई होता येत नाही. असे जुने म्हतारे अजुनही सांगतात, हे दायीपण करणाऱ्या बाया जातीनं मांग असल्या तरी अडलेल्या बाईला मोकळं करण्यासाठी त्यांना बोलवावे लागे.''[२०] पूर्वीच्या काळी पाटील हा गावाचा प्रमुख माणूस असे त्या पाटलांना बहुतेक लोक घाबरत असे. पाटलाने मिशिला कितीही पिळ मारला तरी घरात सून किंवा लेक अडली तरी पाटलाला कंदिल घेऊन रात्री अपरात्री मांगवाडयाकडे धाव घ्यावी लागत होती. पूर्वीच्या काळी डॉक्टर खेडोपाडी मिळणे कठिण होते. अशावेळी दायीच बाईंचे बाळंतपण करत होत्या. खेडेगावात अजुनही दाया आहेत. त्यांना संघटित करून त्यांचे मेळावे भरवून त्यांच्यातले माणूसपण जागवण्याचे कार्य अप्पांनी केले.

जातीधर्माच्या नावाखाली मागास जातीतील लोकांची आजही गावोगावी केविलवाणी अवस्था आहे. एखादया सवर्ण व्यक्तीने मागास जातीतील मुलीशी लग्न केले तर त्याला गावात वाळीत टाकले जाते. गावातील लोक त्यांच्यावर बहिष्कार टाकतात. त्याला मूळ धर्मात येण्यासाठी शुध्दीकरण करण्याचा विधी केला जातो हे एक थोतांडआहे असे लेखकाला वाटते. लेखकाच्या साहित्यात तरूण पिढीने या विकृती विरूध्द बंड पुकारले आहे. शुध्दीकरण प्रक्रियाच मुळी तरूणांना मान्य नाही. गाव सोडण्याची तयारी असल्याचे तरूणांच्या

निश्चयावरून जाणवते. एवढे आघात होऊनही समाजाविषयी या तरूण पिढीच्या मनात आकस दिसत नाही. ''या कांदबरीतील स्त्री जात पात पाहत नाही. एवढेच नव्हे तर आपल्यातील दायीपणाचे कौशल्य ती भोवतालच्या गावातील मुलींनाही देते आणि नव्यायुगाचा पुरोगामी संदेश या कांदबरीतून लेखक लोकांपुढे ठेवतात.''[२१]

आजही गावातील मातंग समाज उपेक्षित जीवन जगताना दिसतो. त्यांना पोटभर अन्नही मिळणे अवघड बनले होते. या कांदबरीतील स्त्री अब्रु वाचविण्यासाठी वाटेल ते करावयास तयार होते. स्त्रीचा स्वभाव धर्म व सहनशिलता दिसून येते. आजही स्त्रीकडे शोभेची वस्तू म्हणून पाहिले जाते. हा दृष्टीकोन बदलणे फार आवश्यक आहे. ''स्त्री घराबाहेर पडल्यावर तिच्यावर पुरूषी हल्ले कसे होतात हे ठामपणे कांदबरीच्या माध्यमातून मांडले आहे. पंरतु त्याचबरोबर ती आपल्यातील शक्तीने आपल्या अब्रुचे रक्षण करून जाता जाता आया, बहिणीचे घरंदाजपणा समाजाला शिकवून जाते. स्त्री आपल्या स्त्रीत्वाचे शोषण कधीच सहन करीत नसते.''[२२] स्त्री निसर्गतः माता असते हे लेखकाने या कांदबरीच्या माध्यमातुन समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

अशाप्रकारे कष्टकरी, असंघटित कामगारामध्ये मोलमजूरी करणाऱ्या स्त्रियांच्या संघटनामध्ये कार्य करण्याचे लेखकाचे ध्येय होते. आदर्शवादी भूमिकेतून पुरोगामी समावेशक व सामंजस्यपूर्ण समाज उभा करण्याचे स्वप्न आपल्या साहित्यातून समाजापुढे लेखक उभे करतात. त्यांच्या लेखनीतून वाचावयास मिळते. त्यांच्या या लेखनीतून आदर्श व रोमांचकारी लेखन या कांदबरीतून वाचावयास मिळते. म्हणून ही कांदबरी समाजाला विचार करण्यास उपयोगी ठरेल असे सांगावेसे वाटते.

५) अरे माणसा माणसा :—

'अरे माणसा माणसा' या कथासंग्रहात लेखक माणसाचा शोध घेताना दिसतो. लेखक वाचकांच्या अंर्तमनाला हात घालून माणूस होण्याचे आवाहन

करीत आहेत. या कथा संग्रहातील 'मुरळी' कथेत मध्यमवर्गीय समाजजीवनातील स्त्रीचे वर्णन केलेले आहे. मुरळीचे विश्व आपल्यापुढे लेखक हुबेहुब उभे करतात. ''लोक मूल होत नाही म्हणून खंडोबाला अंधश्रध्देतून नवस करतात, परंतु त्या स्त्रीला आतोनात यातना सहन कराव्या लागतात. याचा कोणी विचार करीत नाही असे लेखकाला वाटते. काही लोक स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी मुरळी सोडतात.''[२३] हे सर्व प्रकार अंधश्रध्देतून घडतात असे लेखक सांगतात. देवाला मुरळी सोडल्यावर त्या स्त्रीची विटंबना व हालअपेष्टा खूप होत असल्याने या प्रकाराबद्दल लेखकाने प्रकाश टाकला आहे. तेथील स्त्रीयांची आजही केविलवाणी परिस्थिती पाहिल्यावर अंगावर काटा येतो. देवाच्या नावाखाली काही नराधम त्या स्त्रीयांवर अत्याचार करताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या जीवनात अंधकार निर्माण झालेला आहे. त्यावर लेखक प्रकाश टाकतात. आपली संस्कृती उच्चमानत असलो तरी काही लोक रूढी परंपरांच्या नावाखाली स्त्रियांचा बाजार मांडलेला दिसून येतो. लेखकाच्या मते ती एक रूढीग्रस्त विकृती आहे असे वाटते. 'मुरळी' या कथेत तिच्या आयुष्यातील येणाऱ्या हालअपेष्टा सांगितलेल्या आहेत. त्यांना समाजाकडून आधार मिळत नाही. तसेच मोठया प्रमाणावर फसवणूक होते यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

'पारू मांग पाटलीण' या कथेत पारंपारिक उत्कट प्रेमकथा मांडली आहे. त्या प्रेम कथेतून जातीयतेचा रूढींचा गावातील प्रश्न कथानकाच्या माध्यमातून लेखकाने मांडला आहे. जातिव्यवस्थेच्या नावाखाली दुसऱ्या उच्चजातीतील मुलगा मातंग समाजातील मुलीशी लग्न करतो. घरच्यांचा विरोध असतानाही सर्व विरोध सहन करून गाव सोडण्यास तयार होतो. यातून त्या मुलाचा धाडसीपणा व प्रामाणिकपणा आपणास पाहावयास मिळतो. समाजातील जातीव्यवस्थेमुळे आजही माणूस एकमेंकापासून दुरावलेला दिसतो. त्यास जात ही खूप महत्वाची बनली आहे. 'हो मीच खून केला' या कथेत हुंडयाच्या रूढी, जबाबदारीने प्रपंच करण्याची परंपरा, स्त्री–पुरूष संबंधातील वासना यावर प्रकाश टाकला आहे. आजच्या काळातील मानव मुक्या जनावरापेक्षाही जास्त

वासनाधीन झाला आहे असे लेखक सांगतात. स्त्रीपुरूष संबंधातील वासनेतून खून केल्याची अनेक उदाहरणे घडली आहेत. ''स्त्री हे पुरूषांच्या पुढं नव्हे तर संस्कृतीच्या पुढे ठाकलेले गुढ आहे. पुरूषप्रधान संस्कृतीने आपल्यापरीने स्त्रीची एक व्यवस्था मानून उपयोगीता लक्षात घेऊन विल्हेवाट लावली आहे.''[२४] आजही संस्कृतीच्या नावाखाली नग्न विकृती चालू आहेत असे लेखक सांगतात. आजच्या समाजात स्त्री जीवनात अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष करावा लागेल असे वाटते. स्त्री ही फक्त उपभोग्य वस्तू या दृष्टीने पाहत असल्याने तिची केविलवाणी अवस्था आज पाहावयास मिळते.

''कुठवरं आवरावं?'' या कथेत ग्रामीण जीवनातील प्रसंग सांगितलेले आहे. व्यसनाधिनतेला कंटाळून गेलेली स्त्री संसार जबाबदारीने व कर्तव्य बुध्दीने करताना दिसते. त्यातील स्त्री कामाला जाते परंतु तिचा नवरा संशयखोर नजनेने तिच्याकडे पाहत असतो. नवऱ्याचे दिवसेंदिवस दारूचे व्यसन वाढत जाते. त्याचा मुलांना व तिलाही कुटुंबात त्रास सहन करावा लागतो. व्यसनामुळे घरची आर्थिक परिस्थिती अतिशय खालावलेली दिसते. दारूचे व्यसन कमी होत नाही. अशा सर्व यातना सहन करूनही तिला आपल्या नवऱ्याचा आधार वाटतो.

अशाप्रकारे चारही कथा समाजाला अंर्तमुख करावयास लावणाऱ्या आहेत. लेखकाने या कथातून आजच्या काळातील अनेक सामाजिक समस्या उलगडून काढण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. स्त्रियांच्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने वाचा फोडण्याचे काम लेखकाने केले आहे. व्यसनाधिकतेवर लेखकाने जबरदस्त टीकास्त्र सोडले आहे. व्यसनामुळे कुटुंबाची होणारी केविलवाणी अवस्था त्यांना पाहवत नाही. त्या व्यसनामुळे बायको व मुलांचे हाल आतोनात होतात. त्यावर प्रकाश टाकण्याचे काम केले आहे. पुरूषप्रधान संस्कृती त्यास जबाबदार आहे असे लेखकाला वाटते. विकृती समाजातून लवकरच हद्दपार करावयास हव्यात जेणेकरून समाजात मूळ धरू शकणार नाही. त्यासाठी समाजाची साथ असावयास हवी असे सांगावेसे वाटते. समाजाची प्रगतीकडे योग्य दिशेने

वाटचाल करावयाची असेल तर त्यासाठी व्यसनाधिनता, वासनेवर नियंत्रण ठेवावे लागेल. विकृत गोष्टींना रोखले तर संस्कृती टिकेल हे सांगावेसे वाटते.

अप्पा कोरपे यांनी मिळालेले पुरस्कार :—

अप्पा कोरेपे हे फारसे शिकलेले नाहीत. कलेच्या व साहित्यिकांच्या जवळ आल्याने त्यांच्या हळूहळू बदल होत गेला. त्यांच्या जन्मापासूनच्या अनुभवांची शिदोरी घेऊन अहमदनगरमध्ये स्थायिक झाले. प्रामाणिकपणे हमाली करून प्रसंगी अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करून साहित्याच्या माध्यमातून केले. आपल्या आयुष्यातील जीवनानुभव सांगत आत्मकथन सांगत गेले. त्यांना डॉ. मोरजे सरांचे मार्गदर्शन मिळाल्यावरच खऱ्या अर्थाने साहित्यीकांच्या पंगतीत जाऊन बसू शकले. अल्पावधीत पुस्तकांना विविध पुरस्कार मिळाले ते पुढील प्रमाणे —

अप्पा कोरपे यांना मिळालेले विविध पुरस्कार

१) २१ फेब्रुवारी १९९२	शामगंटी पुरस्कार 'मी तो हमाल' या पुस्तकास मिळाला.
२) १ जुलै १९९२	अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतच्यावतीने सन्मानपत्र
३) १६ डिसेंबर १९९२	भैरूरतन दमानी साहित्य पुरस्कार सोलापूर येथे प्रदान
४) १ एप्रिल १९९९	'जाई' कांदबरी प्रकाशन व सत्कार.
५) १९९९	आदर्श कार्यकर्ता गौरव समिती समाजरत्न पुरस्कार
६) २२ फेब्रुवारी २०००	समरसता मंचातर्फे संत गाडगेबाबा पुरस्कार
७) १ मे २०००	आदर्श साहित्य पुरस्कार —श्रीरामपूर

८) २००२	स्वामी विवेकानंद पुरस्कार
९) २००४	कॉ. सहाणे मास्तर प्रतिष्ठान संगमनेर
१०) २००५	संत रविदास प्रतिष्ठान समाजभूषण पुरस्कार
११) २००८	अखिल भारतीय पत्रकार संघ तर्फे राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप
१२) ९ जुलै २००८	पद्मगंगा फौडेंशन तर्फे गौरव चिन्ह.
१३) २५ डिसेंबर २००८	हुतात्मा बाबू गेणू श्रमयोगी पुरस्कार.

२) रंगनाथ राळेभात यांची कौटुंबिक परिस्थिती :—

रंगनाथ बाबूराव राळेभात यांचा जन्म अहमदनगर जिल्हयातील जामखेड तालुक्याच्या गावी १३ जुलै १९५१ रोजी झाला. आई—वडिलांना एकुलता एक मुलगा म्हणून रंगनाथ व एक मुलगी होती. कुटुंब चार माणसांचे होते. शेती २ एकर होती. परंतु ती कुळाकडे होती. त्यातच वडिलांनी बहिणीचे लग्न लहान वयातच करून टाकले होते. रंगनाथ राळेभात जेमतेम चार—पाच वर्षाचे असताना वडिलांचे छत्र हरपले होते. रंगनाथवर घरची जबाबदारी पडली होती. जमीन कूळकायदयातून सोडविण्यासाठी लहान वयातच त्यांना कोर्टकचेरीची पायरी चढावी लागली. आई मोलमजुरी करून कसेतरी रंगनाथचे पालनपोषण करीत होती. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खूपच हलाखीची होती. मोलमजूरी केल्याशिवाय पोटाला भाकरी मिळणे अशक्य होते. आई कामाला गेल्याशिवाय दोन वेळेची भाकरी मिळणेही अशक्य होते. लहान वयातच रंगनाथांना आर्थिक परिस्थितीला तोंड दयावे लागले. वडिलांनी कधीही स्वत:च्या बायकोला घराच्या बाहेर कामाला पाठविले नव्हते. त्यांच्यानंतर कामाला जाण्याशिवाय पर्याय नव्हता. ''आई सव्वा रूपया रोजाने मोलमजूरी करीत असे. मजूरीतून खर्च जाऊन बचत केलेल्या पैशातून इ.स. १९५८ साली अवघ्या ६५ रूपयात एक शेळी घेतली.''[२५] शेळीचा कुटुंबासाठी हातभार लागला. कूळकादयातून जमिनही

मुक्त केली होती. सुट्टीच्या दिवशी शेळया संभाळून रंगनाथांचे शिक्षण जुन्या अकरावी पर्यंत झाले. घरची अतिशय परिस्थिती गरीबीची असल्यामुळे पुढील शिक्षण घेणे शक्य नव्हते. तो काळ १९६८—६९ होता. काँग्रेस पक्षाच्या युवक संघटनेत काम केले. राजकारण जवळून पाहिल्यावर त्यालाही रंगनाथांनी रामराम केला. आपण जर राजकारण करत राहिलो तर आहे ती जमिन विकावी लागेल हे त्यांच्या लक्षात आले.

रंगनाथ राळेभात कामाच्या शोधातू फिरू लागले. मार्केटचा प्रभारी सचिव काळदाते यांच्याशी त्याची भेट झाली. मित्राच्या आग्रहावरून इ.स. १९७०पासून मार्केटकमिटीत 'मापाडी' म्हणून कामावर हजर झाले. पोत्याला ५ पैसे तोलाई मिळत होती. दिवसभरात कधी साडेतीन रूपये तर कधी ४ रूपये मजूरी मिळत होती. हमालांना २५ पैसे पोत्याप्रमाणे हमाली मिळत होती. हमाली शेतकऱ्यांकडून घेतली जात होती. त्याच पैशात व्यापारी इतर कामे करून घेत असे. हमाल कामगारांमध्ये दोन तीन वर्षे या अन्यायाविरूध्द चर्चा करीत होते. जामखेडमध्ये प्रत्येक दुकानात सात आठ हमाल काम करीत होते. कोणताही हमाल आपल्यावरील अन्यायाविरूद्ध आवाज उठवित नव्हते. व्यापाऱ्यांची हमाल व मापाडीवर खूप दहशत होती. कोणी जाब विचारण्याचा प्रयत्न केल्यास त्याला कामावरून काढून टाकले जात होते. परंतु हमालांमधील व्यापाऱ्यांविषयी चीड बोलण्यातून जाणवत होती. हमाल कामगार एकत्र येऊन त्याविरोधात आवाज उठवू लागले. हमाल कामगार संघर्ष करण्यासाठी तयार झाले. ''अन्यायाविरोधात हमाल कामगार एकत्र करून इ.स. १९७७—७८ मध्ये मार्केट बंद केले. त्यामुळे हमालांच्या पुढील कामात १० पैसे प्रमाणे वाढ केली गेली.''[२६] हमालामधील संपाला यश येऊन हमालीत १० पैसे वाढीची मागणी पूर्ण झाली. त्या संपाच्या दणक्यामुळे हमालांना अतिशय आनंद झाला. जामखेड बाजारसमितीवर व्यापाऱ्यातील सभापती झाला होता. त्यामुळेच व्यापाऱ्यांची मनमानी चालत होती. व्यापाऱ्यांची मनमानी संपामुळे नियंत्रणात आली होती.

संप यशस्वी झाला मात्र रंगनाथ राळेभात यांना व्यापाऱ्यांकडून त्रास देण्यास सुरूवात झाली. मार्केट कमिटीचा सभापती हा व्यापाऱ्यांचा असल्यामुळे राळेभात यांना कामावरून काढून टाकले होते. कामावरून कमी केलेल्या दु:खापेक्षा त्यांना कामगारांना १० पैसे वाढ करण्यात यश आल्याचा आनंद झाला होता. त्यांच्या अंगात ताकद व स्वाभिमान होता. कुठेही काम करण्याची तयारी होती. वाळू बैलगाडी भरण्याचे केले. पोस्ट ऑफिस, सेंट्रल बँक, स्टेट बँकेमध्ये काम हंगामी केले. कोणाचाही वशिला नसल्याने कुठेही कायम स्वरूपी काम मिळू शकले नाही. रंगनाथ राळेभात लग्नाच्या वयात आल्याने आईने इ. स. १९७८ मध्ये त्यांचे लग्न करून टाकले. त्यांची शेती मार्केटजवळच होती. त्यामुळे जातायेता हमाल कामगारांच्या भेटीगाठी होत होत्या. कामातील अन्याय, अत्याचारावर चर्चा होत होती. अहमदनगर जिल्हयाची हमाल पंचायत स्थापन झाल्याची बातमी हमाल कामगारांनी रंगनाथ राळेभात यांना सांगितली. तुमच्या सारख्या धडाडीच्या कार्यकर्त्यांची गरज आहे. त्यासाठी पुन्हा मार्केटमध्ये काम करण्याचा आग्रह मित्रांनी रंगनाथ राळेभात यांना केला होता. ''जामखेड तालुक्यात १९८६—८७ ला मा. शंकरराव घुले, अप्पा कोरपे यांच्या नेतृत्वाखाली कामगार संघटना झाली आणि सन १९७५—७६ मधील कामगारांनी मला कामावर येण्याचा आग्रह केल्यावरून पुन्हा सन १९८९ मध्ये मापाडी म्हणून मार्केटमध्ये कामाला आलो.''[२७] मार्केटमध्ये कामाला सुरूवात केली होती. हमाल कामगारांना मार्गदर्शन करीत होते. हमाल कामगारांना त्यांचा आधार वाटत होता. हमाल कामगारही एक विचाराने काम करीत होते.

इ.स. २००२ मध्ये मार्केट निवडणूक होऊन रंगनाथ राळेभात यांचा भाऊबंदच सभापती झाला. भाऊबंदाचा संपूर्ण पॅनल विजयी झाला. मार्केटने रोडलगत गाळे काढण्याचे ठरविले होते. रंगनाथ राळेभातांच्या मुलाचे गॅरेज बि ॲण्ड सीच्या जागेत होते. मुलाने गॅरेजची टपरी काढली नाही म्हणून सभापतीने मापाडीचे लायसन्स रद्द केले. सभापतीची दहशत बाजारात असल्याने कामगारही कोणी पाठीमागे उभा राहिला नाही. मात्र त्यांनी हार मानली नाही. कायदयाने न्याय मिळविण्यासाठी ए.आर.डी.डी. आर सहकार आयुक्त नाशिक,

पणन संचालक, पुणे यांच्याकडे दाद मागितली. कोणताही निर्णय झाला नाही. अन्यायाला वाचा फोडण्यासाठी संघर्ष चालू होता. औरंगाबादच्या खंडपीठात सभापतीपद बेकायदेशीर आहे अशी याचिका दाखल केली. दोनच महिन्यात अपिलाचा निकाल लागून सभापतीपदच बेकायदेशीर आहे असे कोर्टाने निर्णय दिला. कोर्टाच्या निर्णयापासून सभापतीच्या राजकारणाला उतरती कळा लागली. ती आजपर्यंत तशीच आहे. सन २००४ मध्ये मातृछत्र हरपले. आईने मोलमजूरी करून पालनपोषण केले होते. रंगनाथ राळेभात घडविण्यात आईचाही फार मोठा वाटा होता. परिस्थितीला संयमाने व प्रामाणिकपणाने तोंड देण्याची सवय लागली होती. हमाल संघटनेचे उपाध्यक्ष रंगनाथ राळेभातांच्या घरी भेटण्यास आले होते. उपाध्यक्षपदही राळेभात यांनी स्विकारण्याची विनंती नवनाथ शेळके यांनी केली होती. दोनच दिवसात शेळके यांनी आत्महत्या केली. कामगारांसाठी आपल्याला उपाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारावी लागेल असे हमाल कामगारांना विनंती केली. ''त्यामुळे सन २००४ मध्ये संघटनेचे उपाध्यक्षपद स्वीकारून कामावर पुन्हा हजर झाले. अन्यायाविरोधात झगडून पुन्हा कामावर आल्यामुळे सर्व कामगार पाठीशी उभे राहिले.''[२८] हमाल कामगारांविषयी कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर सर्व कामगारांशी चर्चा करून निर्णय घेतले जात होते. त्यामुळे हमाल कामगारांचा भरघोष पांठिबा मिळत होता.

इ.स. २००८ मार्केटची निवडणूक होती. हमाल कामगार मतदार संघातून रंगनाथ राळेभात यांनी फॉर्म भरला होता. रंगनाथ राळेभात यांचा सामना त्यांच्या भाऊबंदाच्या पॅनलबरोबर झाला. रंगनाथ राळेभात यांनी निवडूण येऊ नये त्यासाठी फार मोठे प्रयत्न चालू होते. हमाल कामगार एकनिष्ठ होते. आमदारांच्या पॅनलच्या विरोधात लढून रंगनाथ राळेभात एकटे निवडून आले. विरोधी पॅनलचे १७ निवडूण आले व अपक्ष सदस्या म्हणून हमाल मापाडींचा प्रतिनिधी रंगनाथ राळेभात निवडून आले होते. जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले, अप्पासाहेब कोरपे यांच्या सानिध्यात राहिल्यामुळेच हे सर्व शक्य झाले. त्यांच्या मागदर्शनामुळेच रंगनाथ राळेभात राजकारणातही यशस्वी होऊ

शकले. सर्व जुने कार्यकर्ते एकत्र येऊन एकाच वेळी कामाला इ.स. २०१० मध्ये पूर्णविराम दिला जीवघेणा संघर्ष वयाच्या चार पाच वर्षापासून चालू होता. आयुष्यभर संघर्ष करून अन्यायाविरोधात लढले. कधी भाऊबंदकीच्या विरोधामुळे आयुष्य खपले तर कधी कामगारांसाठी लढा देण्यात खर्ची झाले याचा त्यांना सार्थ अभिमान आहे.

२) रंगनाथ राळेभात यांचे साहित्यीक कार्य :—

आयुष्यभर संघर्षमय जीवन जगत असताना मिळेल ते काम करून कुटुंबाला हातभार लावला. शेती मार्केटजवळ असल्याने हमाल कामगारांशी ओळख झाली. त्यांच्या आग्रहामुळे हमाली काम स्विकारून अन्यायाला, अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम रंगनाथ राळेभात यांनी केले. धावपळीच्या काळात त्यांची लेखनी व विचार बंद पडले होते. हमाल कामास पूर्णविराम दिल्यानंतर पुन्हा विचार जागे होऊन आपणही एखादे पुस्तक लिहावे असा विचार मनात आला. कविता लिहिण्याचा छंद होताच, ''श्री रंगनाथ राळेभात यांनी अवती भोवती घडणाऱ्या घटनांचा वेध घेऊन त्या शब्दबध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.'' 'पहाटेची चांदणी'' ही जीवाला चटका लावणारी कथा मांडली आहे.''[२९] लेखक पहाटेच्या वेळी बैल, गुरे चारण्यासाठी रानात घेऊन जात होते. गुरे माळरानावर चारत असे. लेखक जमिनीवर पाठ टेकून आकाशाकडे पाहत होते. तेवढयात त्यांची नजर पूर्वेकडील पहाटच्या चांदणीकडे नजर गेली. त्या पहाटच्या चांदणीची आणि लेखकांची मैत्री जमली. ज्याज्या वेळी पहाटे गुरे घेऊन चारण्यास जात असे त्या त्या वेळी आठवलेले विचार या कथेत मांडले आहेत. 'दिंडीचे' विलोभणीय दृश्य डोळयासमोर आणायला लावणारी 'दिंडी' कथा वाचकाला खिळवून ठेवते. त्याचबरोबर काही कथा विनोदीही आहेत.

कष्टकरी समाजातील एक ध्येयनिष्ठ कामगार रंगनाथ राळेभात यांनी हमाल मापाडी कामासोबत वाचन लेखनाच्या छंद जोपासला. जिल्हा हमाल पंचायतीचे सेक्रेटरी कै. अप्पा कोरपे यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून लेखन

केले आहे. आयुष्याच्या शेवटी आपले विचार जनमानसापर्यंत पोहचावेत म्हणून डोळयाच्या ऑपरेशनसाठी ठेवलेले १० हजार रूपये खर्च करून पुस्तकाचे प्रकाशन केले.

'पहाटची चांदणी' या पुस्तकाचे प्रकाशन मा. शंकरराव घुले कामगार मित्र आनंदा साळवे, शब्दगंधचे सुनिल गोसावी सर या सर्व मान्यवरांच्या सहकार्याने केले. हे पुस्तक शब्दगंध प्रकाशनचे आहे हे सांगावेसे वाटते.

३) आनंदा साळवे यांची कौटुंबिक परिस्थिती :—

''आंनदा साळवे यांचा जन्म अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव या छोटयाशा खेडेगावात दि. १/०६/१९६५ रोजी झाला. भटक्या समाजात झाल्यामुळे सुखदु:खाची अधिक चांगल्याप्रकारे जाणीव झाली.''[३०] शिक्षणाचे महत्व त्या काळी फारसे नव्हते. साळवे यांचे वडिल आजूबाजूच्या गावात भविष्य पाहण्यासाठी जात असे तर आई गावात गोधडया शिवण्याचे काम करीत होती. गावात तीन बांबूच्या पालात त्यांचे कुटुंब राहत होते. अतिशय गरीब परिस्थिती होती. आनंदा साळवे यांचे शिक्षण कसेबसे इयत्ता ६ वी पर्यंत झाले. चार भाऊ व सहा बहिणी असे बारा जणांचे मोठे कुटुंब होते. खाणारी माणसे एवढी असूनही वडिलच कमावून आणत होते. बहिणी मोठया असल्याने त्यांची लग्ने होऊन सासरी गेल्या आनंदा साळवे आईवडिलांबरोबर काम करून लहानचे मोठे झाले. वयाच्या चौदाव्या वर्षी आनंदा साळवे यांचे लग्न झाले. त्यांना दारूचे व्यसन होते. लग्न झाल्यावर कुटुंबाची जबाबदारी पडल्यामुळे तेही भविष्य पाहण्याचे काम करू लागले. खेडेगावात रोज वेगवेगळया गावाला जाऊन पोटाला पोटभर मिळण्यासाठी धडपड चालू होती.

आनंदा साळवे शरीराने चांगले असल्यामुळे भीक मागून जगण्यापेक्षा कष्ट करून जगण्याचे ठरविले. श्रीरामपूर येथे हमाली करण्यास सुरूवात केली. दिवसभर काबाड कष्ट करावे लागत होते. त्यामानाने मोबदला अतिशय कमी

मिळत होता. मात्र त्या पैशाचे महत्व जीवनात पटले होते. कोणत्याही प्रकारच्या व्यसनात पैसे खर्च करावयाचे नाही हे त्यांनी पक्के ठरविले होते. हमाली काम करत असताना शेतकरी, हमाल, व्यापारी यांच्याशी चांगली ओळख झाली होती. चांगले वाईट अनुभव त्यांच्या कानी पडत असल्यामुळे त्यांची विचार करण्याची पध्दतीही बदलली होती. दिवसभर काम करत असताना वाचनाची आवड निर्माण झाली होती. कामगारावर होणारे अन्याय, अत्याचार, शोषण हे जवळून पाहत होते. कामगाराने पोटासाठी सहन केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. परिस्थिती प्रतिकूल होती. चोरी करून किंवा भीक मागण्यापेक्षा हमाली केलेली बरी हा विचार त्यांच्या मनात असल्यामुळे सर्व काही सहन करत होते. रोजच पोती उचलून शरीरालाही कामाची व अन्यायाची सवय झाली होती. हमाल काम करून कुटुंब चालवित होते. त्यांना वाचनाची व लेखनाची सवय लागली. ही सवय पुढील काळात वाढतच गेली.

अशाप्रकारे अतिशय गरीब परिस्थितीत जीवन जगून हमाली कामात यशस्वी झाले. जीवन समृद्ध करण्यासाठी हमाली करण्याचा मार्ग सापडला होता.

४) आनंदा साळवे यांचे सहित्यीक कार्य –

हमालाने आपले भावविश्व शब्दाच्या रूपात मांडले. आनंदा साळवे म्हणजे ग्रामीण मातीतील अस्सल हिरा होय. फारसे शिक्षण नसतानाही अर्थपूर्ण कविता करून थेट काळजाला भिडणाऱ्या वास्तवाशी समरस होणाऱ्या व जीवनातील खरा अर्थ स्पष्ट करणाऱ्या म्हणजे आपल्या मनात जे काही आहे ते पानावर उतरविण्याचे कसब त्यांच्या अंगी आहे. प्रत्येक माणसाच्या अंगी काही उपजत गुण असतात. आनंदा साळवे यांच्या अंगी विचारांना शब्दबध्द करण्याचे गुण आहेत. आपल्या मनातील विचार व्यक्त करण्यासाठी फार शिक्षणाची आवश्यकता नाही. तळागाळातल्या समाजात राहत असल्यामुळे समाजाचे राहणीमान जात पंचायत, लग्न सोहळा, अंत्यविधी हया सर्व गोष्टींचा त्यांना चांगला अनुभव आला. सहजच हे लहान शब्द मोठे होत गेले. त्यातूनच

कविता निर्माण झाल्या. त्यांचा पहिला कविता संग्रह 'वेशीबाहेरचं जगणं' २०१२ साली प्रसिद्ध झाला. आनंदा साळवे प्राचार्य एकनाथ खिल्लारे, भटक्या विमुक्त समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते अमीन भाई जामगावकर यांच्याकडे गेले होते. ''एका भटक्या विमुक्तांच्या कार्यकर्त्यांने कविता लिहिल्या हे फार अप्रुप वाटले. मी त्या घेतल्या, चाळल्या, वाचल्या त्या मला वेगळया अनुभूतीच्या वाटल्या.''[३१] त्यांच्या कविता भीषण वास्तव आहे. जीवन या कवितेत जीवनाविषयी चिंतन मार्मिकपणे करतात. 'ठाव जीवनाचा' या कवितेत भटक्या समाजाचे अतिशय हलाखीचे प्रसंग सादर केले आहेत. अशा वेगवेगळया कविता लिहून समाजातील वास्तवता मांडली आहे.

आनंदा साळवे कामगारातून कवी झाल्याने कवितेत पसरटपणा जाणवतो. नेमकया शब्दात आशय स्पष्ट झाला पाहिजे मात्र त्यांच्या कविता अनुभव संपन्न आहेत. त्यांच्या कवितांतून समाजजीवनाचा दाहकपणा प्रत्ययास येतो.

२) टिचभर पोटासाठी :— आशय संपन्न कविता लिहिणारा चळवळीचा खंदा समर्थक आनंदा साळवे यांचा 'टिचभर पोटासाठी' हा दुसरा कविता संग्रह ३ जानेवारी २०१५ मध्ये प्रसिध्द झाला. ''हमाल ही माणूस आहे. त्यांनी चांगली स्वप्ने पहावीत. आपलं आयुष्य कष्टात गेलं तरी मुलाबाळांकडे लक्ष दयावं. त्यांच चांगल शिक्षण करावं, हे आम्ही सर्वांना भाषणातून सांगतो. पंरतु आनंदा हेच कवितेतून सांगतो.''[३२] हमाल कष्टकऱ्यांचे साहित्य समाजासमोर अप्पा कोरपे यांनी आणले. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊनच कष्टकऱ्यांचं शब्दांकन समाजासमोर येणे आवश्यक वाटले होते. हमाल कष्टकऱ्याला एकेकाळी बैल समजणाऱ्या समाजाला या लेखनीने उत्तर दिले असे वाटते. त्यामुळेच हमाल कामगाराला मान्यवरांसोबत प्रतिष्ठा मिळू लागली. हमाल कामगारही साहित्यीक, कवी होऊ शकतो. हे निमित्ताने सिद्ध झाले. हमाल कामगार असताना प्रामाणिकपणे काम केल्याने कामगारामध्ये लोकप्रिय ठरले होते. श्रमिक कष्टकऱ्यांच्या व्यथा समाजासमोर मांडण्याचे काम आनंदा साळवे यांच्या रूपाने चालू ठेवले याचा हमाल कामगारांना सार्थ अभिमान आहे. या कविता

संग्रहातील 'टिचभर पोटासाठी' किंवा 'माय बाप' या कविता म्हणजे आपल्या जन्मदात्याच्या प्रति असणाऱ्या श्रध्देचे प्रतिक आहेत. तुझ्या हातात सारे, नको मारू आई मला, फाटकं आभाळ, मरणकळा, विधाता, सहवास, जिव्हाळा, आई, निंदा, जीवन हमालाचे, कष्टाळू बाप, रामभक्ती या कवितामधून मनात होणारी घालमेल ते सहजरित्या व्यक्त करतात. आईच्या प्रति असणारी नितांत श्रध्दा त्यांच्या अनेक कविता मधून व्यक्त झालेल्या आहेत.

अशाप्रकारे ग्रामीण भागात राहणारा आपल्या भावना शब्दबध्द करणारा विद्रोही कवी वेशी बाहेरचा कवी, निसर्ग कवी म्हणून आनंदा साळवे यांनी ठसा उमटविला आहे. आनंदा साळवे यांना शब्दगंध प्रकाशनाने साथ दिल्याबद्दल त्यांचाही फार यशामध्ये सिंहाचा वाटा आहे हे मुद्दाम सांगावेसे वाटते. त्यांना डॉ. बाबा आढाव, शंकरराव घुलेसाहेब, अप्पा कोरपे, बाबा आरगडे यांचा खंबीर पाठिंबा व मार्गदर्शन मिळाल्यामुळे यश मिळण्यास दुमत असू शकत नाही. कष्टकऱ्यांना प्रतिष्ठा कामगार संघटनांनी मिळवून दिली.

संदर्भसूची :—

१) दैनिक मराठवाडा, दि. २०/०६/२००७

२) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२, पान नं. ४७,४८

३) दैनिक सकाळ, दि. १५/५/२००८

४) कित्ता दि. १५/०५/२००८

५) कित्ता दि. १५/०५/२००८

६) नवशक्ती — ११ एप्रिल, १९९९

७) कित्ता, दि. ११ एप्रिल, १९९९

८) नगर टाईम्स्, लेखक जोशी

९) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे, पान नं. ३२

१०) कित्ता. पान नं. ७९

११) नगरटाईम्स् — लेखक जोशी

१२) कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे पान नं. ९१

१३) कित्ता, प्रस्तावना.

१४) कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, पान नं. १९

१५) कित्ता पान नं. ४८

१६) दैनिक लोकमत प्रवणकुंज — २

१७) कोरपे अप्पा, भाकर, स्फूर्ती प्रकाशन, नगर पान नं. ४.

१८) कित्ता पान नं. ८०.

१९) नवशक्ती, ११ एप्रिल, १९९९

२०) कित्ता, पान नं. ३

२१) केसरी दि. १२/४/१९९९

२२) कोरपे अप्पा, जाई, रूपाली प्रकाशन, अहमदनगर पान नं. प्रस्तावना

२३) कोरपे अप्पा, अरे माणसा माणसा, रूपाली प्रकाशन, अ.नगर.

२४) कित्ता प्रस्तावना

२५) राळेभात रंगनाथ, पहाटची चांदणी, शब्दगंध प्रकाशन २०१५ पान नं ५

२६) कित्ता पान नं. ५

२७) कित्ता पान नं. ५

२८) कित्ता पान नं. ६

२९) कित्ता पान नं. ३

३०) साळवे आनंदा, वेशीबाहेरचं जगणं, अमीनभाई जामगावकर प्रकाशन, औरंगाबाद २०१२

३१) कित्ता पान नं. ६

३२)साळवे आनंदा, टिचभर पोटासाठी, शब्दगंध प्रकाशन,अहमदनगर पान नं.३.

प्रकरण ७ वे

निष्कर्ष

स्वातंत्र्यपूर्वकाळापासून अहमदनगर जिल्हयाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने विकासास गती प्राप्त झाली होती. त्यामुळे कामगारांचे अनेक प्रश्न देशापुढे उभे राहिले होते. वेगवेगळया क्षेत्रात कामगारांवर अन्याय व शोषण होत होते. त्या अन्यायाला कामगार कंटाळले होते. त्यातूनच कामगारांच्या संघटनात्मक चळवळीला सुरूवात झाली होती. कामगार वर्ग अनेक प्रश्नांनी गुरफलेला होता. त्यामुळे कामगारांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नव्हती. नोकरीमध्ये ही स्थैर्यता नव्हती. या व गोष्टींमुळे कामगार पूर्णपणे हैराण झाले होते. संघटित झाल्याशिवाय न्याय मिळणे शक्य नाही हे कामगारांच्या लक्षात येऊ लागले. त्यातूनच स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू झालेल्या वंचित घटकांच्या चळवळीने उग्र रूप धारण केले.

अहमदनगर जिल्हा हा भौगोलिक दृष्टया समृद्ध आहे. मुळा, भंडारदरा ही मोठी धरणे जिल्हयाची फार मोठया प्रमाणात तहान भागवित आहेत. त्यामुळेच उत्तरेकडील शेती ही बाराही महिने पिकत असलेली दिसते. या धरणांच्या लाभक्षेत्रात मिळणाऱ्या कालव्यांच्या पाण्यामुळे शेतीतून मोठया प्रमाणात ऊसाचे उत्पादन होते. या धरणांचे पाणी अर्ध्या जिल्हयासाठी पिण्यासाठी वापरले जाते. औद्योगिक वसाहतींसाठी या धरणांचे पाणी दिले जाते. याउलट उर्वरित तालुक्यात खूप भयानक परिस्थिती आहे. पिण्याचे पाणी मिळण्यासाठी लोकांना धडपड करावी लागत आहे. त्याठिकाणी मोठी धरणे नसल्यामुळेच पाण्याची कोणतीही बारमाही सोय झालेली नाही. पाण्याचे समन्यायी वाटप झाले नसल्याने पाण्यासाठी संघर्ष होताना दिसत आहे. त्यासाठी दुष्काळी तालुक्यात कायमस्वरूपी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. काही राजकीय पुढाऱ्यांची फक्त आपल्या भागाच्या विकासावर भर दिल्याने ठराविक भागाचाच विकास झाला आहे. त्यामुळेच आज अहमदनगर

जिल्हयात विकासात फार मोठया प्रमाणावर असमतोल जाणवतो. विकासाच्या असमतोल भरून काढण्यासाठी सामुहिक प्रयत्न करणे गरजे आहे.

अहमदनगर जिल्हयात सहकारचळवळीमुळे बँका, पतसंस्था, दूधसंघ स्थापण झाले. त्यामुळे जिल्हयाच्या अर्थकारणाला गती निर्माण झाली होती. त्यातून फार मोठया प्रमाणावर आर्थिक व्यवहार होऊ लागले. ग्रामीण भागातील लोकांना सुविधा मिळू लागल्या. पर्यायाने ग्रामीण भागाच्या विकासास हातभात लावला जात आहे. मात्र या सहकारी संस्थामधील घोटाळयांमुळे सर्व सामान्य माणसांचे पैसे बुडत आहेत. त्यासाठी राज्य सरकारने सहकारी संस्थातील घोटाळेबाजांना कडक शिक्षा केली पाहिजे. ग्रामीण भागाचा असमतोल विकासामुळेच लोकांना शहराकडे कामे मिळविण्यासाठी यावे लागत आहे. ज्या भागातील शेती पिकत नाही त्याच भागातील लोक शहराकडे कामासाठी येताना पाहावयास मिळते. त्यासाठी सरकारने खेडयातच कामे मिळवून दिली पाहिजे. त्यासाठी सरकारने खेडातच कामे मिळवून दिली पाहिजे. जेणेकरून मोठया प्रमाणावर लोकांचे शहराकडे होणारे स्थलांतर थांबेल.

स्वातंत्र्यानंतर अहमदनगर जिल्हयातील तालुक्यांमध्ये बाजार समित्या स्थापन झाल्या. मोठया प्रमाणावर बाजारपेठा निर्माण झाल्या. बाजारपेठामध्ये मोठया प्रमाणावर मालाची ने आण होऊ लागली. कामगार हमाल म्हणून काम करू लागले. मात्र हमालांना अतिशय कमी हमाली मिळत होती. त्या मिळाणाऱ्या हमालीत पाटे भरणे अवघड जात होते. मोठया प्रमाणावर फायदा व्यापारी घेत होते. मिळेल ती हमाली त्यांना स्वीकारावी लागत होती. हमाल कामगार दिवसभर वेगवेगळया ठिकाणी काम करीत असल्याने व्यापारीही त्यांची जबाबदारी घेत नव्हते. हमाल कामगारास अतिशय कमी हमाली मिळत होती. तो स्वत:चे पोटसुध्दा भरू शकत नव्हता. व्यापाऱ्यांविरूध्द आवाज उठविल्यास कामावरून काढून टाकले जात होते. स्वत:चेच पोट भरत नसल्याने मुलांना शिक्षण देऊ शकत नव्हता. मात्र संघटना स्थापन झाल्यावर हमाल कामगारांच्या नोकरीला स्थैर्य आले. संघटना स्थापन झाल्यामुळे हमालीतही मोठया प्रमाणावर

वाढ झाली. हमाल कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाल्यामुळे स्वत:च्या मुलांना चांगले शिक्षण देऊ लागला. पूर्वी झोपडपट्टीत राहणारा हमाल कामगार आज चांगल्या सिमेंटच्या घरात राहू लागला. त्यामुळे निश्चितच मिळणाऱ्या वेतनामध्ये चांगल्या प्रकारे जीवन जगत आहे. त्याला बचतीची सवय लागल्याने आज हमाल कामगार पैसे संभाळून आहेत. स्वत:ला गरीबीमुळे शिकता आले नाही मात्र आज हमाल कामगारांची मुले शिक्षक, पोलीस, शिपाई, इंजिनियर, डॉक्टर बनली आहेत. हमालांच्या कष्टाचे चीज झाले आहे.

संघटने अगोदर व्यापाऱ्यांची अरेरावी आपणास पाहावयास मिळत होती. बैलांचा बाजार भरतो तसा हमालांचा बाजार भरविला जात होता. अतिशय कमी मजूरीत हमाल कामगारांचे शोषण व्यापारी करीत होते. मात्र संघटना स्थापन झाल्यावर आज हमाल पंचायतीद्वारे हमाल कामगार व्यापाऱ्यांच्या दुकानात कामासाठी पाठविले जात आहेत. त्यामुळे बाजारभावाप्रमाणे व हमाल पंचायतीच्या दराने हमाली त्यांना मिळत आहे ती हमाली माथाडी मंडळामध्ये भरीत असल्याने त्यांना त्यावर व्यापाऱ्यांकडून लेव्ही मिळत असल्याने हमाल कामगारांना मोठया प्रमाणावर फायदा होऊ लागला. प्रत्येक हमाल हमालपंचायतीचा सदस्य झाल्याने त्यांची नोकरीही सुरक्षित बनली आहे. त्यामुळे माथाडी कामगारांबरोबर व्यापारी आज मात्र संघटने अगोदर हमालांना फार दुय्यम वागणूक मिळत होती. संघटनेच्या स्थापण्यामुळे आज हमाल कामगार स्वाभिमानाने जीवन जगत आहेत. संघटना स्थापण्याअगोदर चोविस तासाची गुलामी सहन करावी लागत होती. मात्र आज काम ठराविक तास करावे लागत आहे. त्यामुळे आज हमाल कामगारांना रोज घरी जाता येऊ लागले. घरी जात असल्याने कुटुंबाच्या सुख दु:खात रमू लागले. मुलांकडे लक्ष देता येऊ लागले. पर्यायाने मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत हातभार लागू लागला. म्हणून आज मुले चांगले शिक्षण घेत आहेत. संघटने अगोदर हमाल कामगार रात्री मालाचे राखण करावे लागत होते त्यामुळे हमाल कामगारांना घरी जाता येत नव्हते. हमाल कामगारांची कुटुंबे चालविण्यात खूप अडचणी येत होत्या. मात्र हमाल रोज घरी जाऊ लागल्याने कुटुंबालाही स्थैर्य येऊ शकले.

हमाल कामगार अतिशय गरीबीत जीवन जगत होता. मात्र तरीही हमाल कामगारांना वेगवेगळया प्रकारची व्यसने होती. दिवसभर कष्ट करून मिळणाऱ्या मजूरीतील पैसे व्यसनात खर्च होत होते. त्यामुळे त्यांची परिस्थितीही खालावत होती. हमाल कामगारांच्या कौटुंबिक वादामुळे ही कामगार दारू पित होते. हमाल घरीच जात नसल्याने नवरा बायकोची भांडणे होत होती. मात्र हमाल घरी जाऊ लागल्याने कुटुंबाला स्थैर्य येऊन व्यसनाचे प्रमाणही कमी झाले आहे. हमाल पंचायतीच्या धाकामुळे हमाल कामगारांची व्यसने कमी झाली असली तरी अजूनही कामगार व्यसने करतात. व्यसनाचे प्रमाण कमी झाल्याने आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. हमाल पंचायत हमाल कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करीत आहे. माथाडी कामगारांना इतर बँका कर्ज देत नव्हत्या. त्यामुळे त्यांना खूप अडचणी येत होत्या. त्यावर मात करण्यासाठी अहमदनगर जिल्हा माथाडी कामगारांची पतसंस्था निर्माण केल्यामुळे आज हमाल कामगारांना वेगवेगळया कामासाठी कर्ज मिळत आहे. त्यातून त्यांच्या आर्थिक अडचणी दूर होण्यास मदत झाली आहे. हमाल कामगार दर महिन्याला वर्गणी पतसंस्थेत भरीत असल्याने बचतीची सवय लागली आहे. त्या बचतीला उपयोग कामातून निवृत्ती घेतल्यावर होईल हे सांगावेसे वाटते.

हमाल कामगारांस संघटना स्थापन्याअगोदर चोवीस तास काम करावे लागत असल्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर त्याचा विपरीत परिणाम झालेला जाणवतो. धूळीत व घाणीत काम करावे लागत असल्याने धूळीचे रोग मोठया प्रमाणावर झालेले दिसून येते. त्यांच्या शरीराची रोज स्वच्छता होत नसल्याने अनेक कामगार नेहमी आजारी पडत होते. संघटना स्थापन झाल्यानंतर हमाल रोज घरी जाऊ लागल्याने रोज अंघोळ करू लागला व चांगले अन्न घेऊ लागल्याने त्यांच्या आरोग्यात सुधारणा झाल्याचे जाणवते. सकस आहार मिळाल्याने निश्चितच आरोग्य सुधारण्यास मदत झाली. चोविस तास कामामुळे शारीरिक थकवा मोठया प्रमाणावर येत होता. हमाल ही माणूस आहे. या गोष्टीचा पूर्वी विसर पडला होता. त्यामुळे आज हमाल कामगारास ठराविक तास काम, साप्ताहिक सुट्टी मिळू लागली आहे. त्यामुळे शरीराला

एक दिवस विश्रांती मिळू लागली. हमाल कामगारांच्या आरोग्यात सुधारणा झालेली जाणवते. आयुष्यभर ओझे उचलत असल्यामुळे मणक्याचे, गुडघ्याचे आजार मोठया प्रमाणावर झालेले पाहावयास मिळते. हमाल कामगारास १०० किलोपेक्षा जास्त वजनाचे ओझे उचलावे लागत होते. त्यामुळे एवढया वजनामुळे हमाल कामगारांचे गुडघे व मणके कामातुन गेले आहेत. मात्र तरीही केंद्रसरकारने किंवा राज्यसरकारने लक्ष दिले नव्हते. मुक्या प्राण्यांसाठी वेगवेगळे कायदे केले. मात्र वर्षानुवर्षे ओझे उचलणाऱ्या हमाल कामगाराकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीने संघर्ष करून २०१० पासून माथाडी कामगार ५० किलापेक्षा जास्त वजनाचे ओझे न उचलण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाची अहमदनगर जिल्हयात अंमजबजावणी सुरू झाली. ही एक कामगारांच्या दृष्टीने जमेची बाजू आहे असे म्हणता येईल.

अहमदनगर जिल्हयात माथाडी कामगार कायदा १९८७ साली लागू झाला. मात्र त्या कायदयाची अंमलबजावणीच झाली नव्हती. मात्र हमाल पंचायतींनी संघर्ष करून अहमदनगर जिल्हयात ४ मे १९९१ पासून संपूर्ण जिल्हयात माथाडी कायदयाची अंमलबजावणी झाली. माथाडी कायदयामुळे हमाल कामगारांना भविष्यनिर्वाह निधी दिवाळी बोनस, ग्रॅच्युईटी, रजेचा पगार, नुकसान भरपाई, वैद्यकीय खर्च मिळू लागला आहे. त्यामुळे निश्चितच हमाल कामगारांना खूप फायदा झाला आहे. अहमदनगर जिल्हयातील माथाडी कामगारांना आज ज्या सुविधा मिळू शकल्या त्या जिल्हा हमाल पंचायत स्थापण झाल्यामुळेच. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड, भानुदास पोकळे, सूर्यभान निमसे इत्यादींनी केला म्हणूनच आज अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत प्रगती करीत आहे. आज हमाल पंचायती तर्फे दवाखान्याची सुविधा अतिशय कमी दरात हमाल कामगारांना मिळत आहे. आज हमाल पंचायती तर्फे 'कष्टाची भाकर केंद्र' चालविले जाते. अतिशय माफक दरात पोटभर जेवण हमाल कामगारांना मिळत आहे. हमाल कामगारांना अल्पदरात किराणा दुकानही सुरू केले आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात येथून माल हमाल कामगार खरेदी करीत आहेत. हमाल कामगारांचे जीवनमान

उंचावण्यासाठी हमाल पंचायत उपक्रम राबवित आहेत. डॉ. बाबा आढाव यांचा सिंहाचा वाटा आहे.

आयुष्यभर हमाल करीत असताना अनेक सुख—दु:खाचे प्रसंग आले. स्वत:च्या आयुष्यातील अनुभव अप्पा कोरपे यांना मांडणे सोपे नव्हते. मात्र चांगली माणसे सानिध्यात आल्यास त्यात परिवर्तन निश्चित होते हे अनुभवास आले. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या मार्गदर्शनामुळेच अप्पा कोरपे कधी साहित्यिक बनले नसतानाही सांगिवाचे लिखित करून अप्पांना बोलते केले म्हणूनच त्यांच्या मनातील भावना जगासमोर येऊ शकल्या. माथाडी कामगारातील दुसरे साहित्यिक रंगनाथ राळेभात होय. हमाल कामाच्या धावपळीत लेखनी व विचार बंद पडले होते. मात्र कामास पूर्णविराम दिल्यानंतर आपल्या आयुष्यातील चांगले अनुभव मांडावे असे वाटले. घरी गाय बैल असल्याने ते चारण्यास जात होते. पहाटेच्या वेळी बैल चरण्यात गेले असताना पहाटेच्या चांदणीकडे पाहून पुस्तक लिहिण्याचे सुचले. यावरून त्यांच्यातील साहित्यिक किती खोलवर रूजलेला आहे हे पाहावयास मिळते. समाजात असणाऱ्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरा याविरूध्द आवाज उठविणारे तिसरे, साहित्यिक म्हणजे आनंदा साळवे होय. त्यांनीही दोन पुस्तके लिहून आजच्या समाजातील विशिष्ट लोकांची पुस्तके लिहिण्याची परंपरा मोडीत काढली आहे. वरील तीनही माथाडी कामगारांनी हमाली काम करून समाजाला हमालही लेखक होऊ शकतो, हे दाखवून दिले आहे. त्यातूनच समाजास आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडले हे दिसून येते.

अशाप्रकारे अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीला मा. शंकरराव घुलेंचे खंबीर नेतृत्व मिळाल्यामुळे आज हमाल कामगार स्वाभिमानाने जीवन जगत आहेत. कॉ. बाबा आरगडे, दादा कळमकर, नाथ पाऊलबुध्दे, अशोक बाबर, पै. सहादु गुंजाळ, एकनाथ कोरडे, ॲड. लक्ष्मणराव वाडेकर यांची खंबीर साथ मिळाली.

- माथाडी कामगारांसाठी पुढील उपाययोजना आवश्यक आहेत.

१. साखर कारखान्यातील हमाल कामगारांना माथाडी कायदा लागू करावा.

२. रात्रीचे कांदा मार्केट बंद करावे.

३. कामाच्या ठराविक तासाची कडक अंमलबजावणी व्हावी.

४. माथाडी कामगारांना पेन्शन मिळाली पाहिजे.

५. मातेच्या गोळा करणाऱ्या महिलांना माथाडी कायदा लागू करावा.

६. मार्केटमध्ये माल आला तरच हमाल कामगारांस हमाली मिळते. मात्र दुष्काळात माल येत नसल्याने हमाल कामगारांना काम मिळाले तरच हमाली मिळते त्यासाठी हमाल कामगारांना दुष्काळाच्या काळात तरी किमान वेतन मिळावे, जेणे करून हमाल कामगारांची उपासमार टाळता येईल.

७. घरकूल योजना हमाल कामगारांसाठी व असंघटित कामगारांसाठी राबवावी.

८. मुलांसाठी मोफत शिक्षण मिळावे.

९. भूमिहीनांना कसण्यासाठी जमिन मिळावी.

१०. श्रमचोरी हा फौजदारी गुन्हा झाला पाहिजे.

११. दारिद्रय रेषेचे कार्ड देण्यात यावे.

१२. काच, पत्रा कष्टकऱ्यांसाठी आरोग्य विमा योजना राबवावी.

१३. इमारत व इतर बांधकाम कामगारांना विमा संरक्षण व नुकसानभरपाई देण्यात यावी.

१४. पथारी व्यावसायिकांना लायसन दयावे.

१५. पथारी व्यावसायिकांना ठराविक जागा व्यवसायासाठी मिळावी.

१६. पथारी व्यावसायिकांकडून रोज शुल्क आकारले जाते त्यांची आर्थिक लुट थांबवावी.

१७. बेरोजगारांसाठी व्यवसाय मार्गदर्शन योजना राबवावी.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.[1]

[महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.]

[या अधिनियमास उपराष्ट्रपतींची कार्यवाहक राष्ट्रपती असताना दिनांक ५ जून १९६९ रोजी अनुमती मिळाली, ही अनुमती **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग-चार असाधारण यामध्ये दिनांक १३ जून १९६९ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०*. (१०-९-१९७४)†

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. (१-६-१९७७)†

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२. (१५-१-१९८२)†

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८** (५-८-१९८७)†

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

---

[1]उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र (इंग्रजी), १९६८, भाग-पाच, पृष्ठे ५०३-५०६ पहा.

*विधिग्राह्यतेसाठी सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याची कलमे ८ व ९ पहा.

†हे चिन्ह अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

**सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याची कलमे ४ व ५ खालीलप्रमाणे वाचावी :—

भूतलक्षी सुधारणेचे परिणाम व विधिग्राह्यता.

"४. (१) याद्वारे असे घोषित करण्यात येते की, कलम १ च्या पोट-कलम (४-क)ला जोडलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये उक्त तक्त्याच्या अनुक्रमे स्तंभ (३) व (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकांना व विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित नोकऱ्यांच्या संबंधात मुख्य अधिनियमाच्या तरतुदी भूतलक्षी प्रभावाने अमलात आणल्यावर व बृहन्मुंबईकरिता स्थापन करण्यात आलेली मंडळे ही, उक्त तक्त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांकरिता, विनिर्दिष्ट दिनांकाना व विनिर्दिष्ट अनुसूचित नोकऱ्यांच्या संबंधात देखील स्थापन करण्यात आलेली मंडळे असल्याचे मानण्यात आल्यावर मुख्य अधिनियमाच्या कलम ३ व ४ खाली करण्यात येणाऱ्या व उक्त क्षेत्रामधील अनुसूचित नोकऱ्यांच्या संबंधात मंडळाकडून अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या योजना, या अधिनियमात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरीही, जणू काही मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अमलात आल्या होत्या व उक्त मंडळे स्थापन करण्यात आली होती व या योजना उक्त तक्त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांकरिता, विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अनुसूचित नोकऱ्यांच्या संबंधात व विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकाना वैधरीत्या करण्यात आल्या होत्या असे समजून वैध, परिणामक्षम व अखंडपणे अमलात असल्याचे मानण्यात येईल.

एच ४१४७—१अ

(३) ठेकेदारामार्फत किंवा त्याने कामावर ठेवलेल्या कोणत्याही असंरक्षित कामगाराच्या संबंधात "मालक" याचा अर्थ, मूळ मालक व इतर कोणत्याही असंरक्षित कामगाराच्या संबंधात, आस्थापनेच्या कामकाजाचे अंतिम नियंत्रण जिच्या हाती असेल ती व्यक्ती असा आहे, आणि त्यात, त्या आस्थापनेचे कामकाज जिच्याकडे सोपविले असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीचा, मग अशा व्यक्तीस, अभिकर्ता, (एजंट) म्हणून, व्यवस्थापक म्हणून किंवा अनुसूचित नोकरीत प्रचलित असलेल्या इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो, समावेश होतो ;

(४) "आस्थापना" याचा अर्थ, कोणतीही अनुसूचित नोकरी ज्या ठिकाणी किंवा ज्या जागेत किंवा ज्या ठिकाणाच्या किंवा जागेच्या कोणत्याही भागात करण्यात येत असेल किंवा सामान्यपणे करण्यात येत असेल ते ठिकाण किंवा ती जागा असा आहे व त्यात त्याच्या आवाराचाही समावेश होतो ;

(५) मालकाच्या संबंधात, "कुटुंब" याचा अर्थ, अशा मालकाच्या सोबत राहणारा/राहणारी व त्याच्यावर/तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असणारा/असणारी पती/पत्नी, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहीण असा आहे;

(६) "निरीक्षक" याचा अर्थ, कलम १५ अन्वये नेमलेला निरीक्षक असा आहे ;

(७) "मूळ मालक" याचा अर्थ, कोणत्याही अनुसूचित नोकरीमध्ये, जो असंरक्षित कामगारांना ठेकेदारामार्फत किंवा त्याच्यावतीने कामावर लावतो तो मालक असा आहे ;

(८) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(९) "अनुसूचित नोकरी" याचा अर्थ, यासोबतच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही नोकरी किंवा अशा नोकरीचे अंग असणारी कोणतीही प्रक्रिया किंवा कामाची शाखा असा आहे ;

(१०) "योजना" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेली योजना असा आहे ;

(११) "असंरक्षित कामगार" याचा अर्थ, ज्याला कोणत्याही अनुसूचित नोकरीतील कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवावयाचे असेल, असा श्रमजीवी कामगार असा आहे ;

(१२) "कामगार" याचा अर्थ, कोणत्याही अनुसूचित नोकरीतील श्रमाचे काम करण्यासाठी, थेट किंवा कोणत्याही अभिकरणामार्फत (एजन्सी), कामावर ठेवलेली किंवा कामावर ठेवण्यात येणारी व्यक्ती असा आहे---मग तिला वेतनावर ठेवण्यात आलेले असो किंवा नसो---आणि त्यात, मालकाने किंवा ठेकेदाराने कामावर न ठेवलेल्या परंतु त्या मालकाच्या किंवा ठेकेदाराच्या परवानगीने, किंवा मालकाशी किंवा ठेकेदाराशी केलेल्या करारान्वये, काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ; परंतु त्यात, मालकाच्या कुटुंबियांचा समावेश होणार नाही ;

(१३) "वेतन" याचा अर्थ, नोकरीच्या कराराच्या सुस्पष्ट किंवा गर्भित शर्ती पुऱ्या केल्या तर पैशाच्या रूपात व्यक्त करण्यात आलेले किंवा व्यक्त करता येण्याजोगे असे कोणत्याही अनुसूचित नोकरीत केलेल्या कामाच्या संबंधात, असंरक्षित कामगारास देय होणारे, सर्व पारिश्रमिक असा आहे, परंतु त्यात पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही---

(एक) कोणतीही निवासव्यवस्था, वीजपुरवठा, पाणी, वैद्यकीय उपचार यांचे मूल्य ; किंवा राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे वेतनाच्या संगणनेतून वगळण्यात आलेली इतर कोणतीही सुखसोय किंवा कोणतीही सेवा ;

(दोन) कोणत्याही निवृत्तिवेतन निधीला किंवा भविष्यनिर्वाह निधीला किंवा सामाजिक विम्याच्या कोणत्याही योजनेअन्वये मालकाकडून देण्यात येणारे कोणतेही अंशदान आणि त्यावर उपार्जित झाले असेल असे व्याज ;

(तीन) कोणताही प्रवास भत्ता किंवा कोणत्याही प्रवास सवलतीचे मूल्य ;

(चार) कामगाराच्या नोकरीच्या स्वरूपामुळे त्याला करावा लागणारा विशेष खर्च भागविण्यासाठी त्याला देण्यात येणारी कोणतीही रक्कम ; किंवा

(पाच) सेवामुक्तीनंतर देय होणारे कोणतेही उपदान.

असंरक्षित कामगारांना नियमित नोकरी मिळावी हे निश्चित करण्यासाठी योजना.

३. (१) अनुसूचित नोकऱ्यांमध्ये, असंरक्षित कामगारांचा पुरेसा पुरवठा व्हावा व त्यांचा पूर्णपणे व यथोचित उपयोग व्हावा यासाठी व सामान्यतः अशा कामगारांच्या, [१][* * *] नोकरीच्या अटी व शर्ती याकरिता अधिक चांगली तरतूद करण्यासाठी, राज्य शासनास, योजनेद्वारे, कोणत्याही अनुसूचित नोकरीतील किंवा नोकऱ्यांतील मालकांच्या व असंरक्षित कामगारांच्या नोंदणीसाठी तरतूद करता येईल आणि [२][नोंदलेल्या असंरक्षित कामगारांच्या] कामाच्या अटी व शर्ती यांसाठी तरतूद करता येईल आणि अशा नोकऱ्यांमध्ये त्यांच्या सर्वसाधारण कल्याणासाठी तरतूद करता येईल.

(२) विशेषकरून [३][या योजनेमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—]

(क) योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा [४][नोंदलेल्या असंरक्षित कामगारांच्या व मालकांच्या] वर्गांना ती योजना लागू करणे ;

(ख) जी दायित्वे पुरी केली असताना उक्त योजना [५][नोंदलेल्या असंरक्षित कामगारांना व मालकांना] लागू होईल ती दायित्वे निश्चित करणे ;

(ग) असंरक्षित कामगारांची भरती व त्यांना योजनेत दाखल करून घेणे या गोष्टींचे नियमन करणे आणि नोंदणीपुस्तके ठेवणे, नोंदणीपुस्तकातील नावे तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे [६][* * * * *] व नोंदणीसाठी लादावयाची फी यासह असंरक्षित कामगार व मालक यांची नोंदणी करणे ;

(घ) [७][नोंदलेल्या असंरक्षित कामगारांच्या] नोकरीचे नियमन करणे आणि वेतनाचे दर, कामाचे तास, प्रसूति लाभ, अतिकालिक प्रदान, वेतनी रजा, उपदानासाठी तरतूद आणि साप्ताहिक आणि इतर सुट्यांसंबंधीच्या शर्ती व त्या सुट्यांबाबतचा पगार यांसह, अशा नोकरीच्या अटी व शर्ती यांचे नियमन करणे ;

[८][(घ-१) नोंदलेल्या मालकांनी, नोंदलेल्या कामगारांना, त्यांनी केलेल्या कामाबद्दल द्यावयाच्या वेतनाची रक्कम ज्या कालावधीत मंडळाकडे भरावयाची त्या कालावधीची तरतूद करणे ; मंडळाच्या मते, वर सांगितल्याप्रमाणे ठराविक कालावधीत अशी वेतनाची रक्कम भरण्यात जे कसूर करतील त्या मालकांना, पूर्वीप्रमाणे भरावयाच्या वेतनाच्या रकमेच्या मासिक सरासरी एवढी रक्कम मंडळाकडे अनामत म्हणून ठेवण्यास भाग पाडणे ; कोणत्याही वेळी अशी अनामत रक्कम अशा सरासरीपेक्षा कमी पडेल त्या बाबतीत, मालकांना अशा सरासरीची भरपाई करण्यास भाग

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ (१) (अ) द्वारे "मग ते नोंदलेले असोत वा नसोत" हा मजकूर नेहमीकरिता वगळण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (१) (ब) द्वारे "अशा असंरक्षित कामगारांच्या, मग ते नोंदलेले असोत वा नसोत" या मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (अ) द्वारे "योजनेमध्ये विशेषकरून, पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) द्वारे "असंरक्षित कामगारांच्या व मालकांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (अ) द्वारे "आणि अशारीतीने नावे काढून टाकण्याविरुद्ध विहित प्राधिकाऱ्यांकडे अपील करण्यासाठी करावयाची तरतूद" हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ (२) (क) द्वारे "असंरक्षित कामगारांच्या, मग ते नोंदलेले असोत वा नसोत" या मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[७] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ब) द्वारे खंड (घ-१) समाविष्ट करण्यात आला.

पाडणे ; आणि अशी रक्कम भरण्यात जे सातत्याने कसूर करतील अशा मालकांना, मंडळ ठरवून देईल त्याप्रमाणे, मंडळाकडे भरावयाच्या अशा रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नाही एवढ्या रकमेचा अधिभार, शास्ती म्हणून, भरण्यास भाग पाडणे ;]

(ड) नोंदलेले असंरक्षित कामगार कामासाठी उपलब्ध असूनही त्यांना ज्या कालावधीमध्ये नोकरी किंवा पूर्ण वेळ नोकरी उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये अशा असंरक्षित कामगारांना योजनेच्या शर्तींना अधीन राहून किमान वेतन मिळेल याची निश्चिती करणे ;

(च) योजना ज्यांना लागू होत नसेल अशा असंरक्षित कामगारांची नोकरी आणि योजना लागू न होणाऱ्या मालकांनी असंरक्षित कामगारांना कामावर ठेवणे यांस प्रतिषेध करणे, त्यावर निर्बंध घालणे किंवा अन्यप्रकारे त्याचे नियंत्रण करणे ;

(छ) योजनेखाली येणाऱ्या [१][नोंदलेल्या असंरक्षित कामगारांच्या] कल्याणासाठी योजने-व्यतिरिक्त इतरत्र ज्या बाबतीत समाधानकारक तरतूद नसेल त्याबाबतीत, अशा कामगारांच्या कल्याणासाठी ;

(ज) [१][नोंदलेले असंरक्षित कामगार] काम करीत असलेल्या ठिकाणी, आरोग्य व सुरक्षितता यांच्या उपाययोजनेसाठी, योजनेव्यतिरिक्त समाधानकारक तरतूद करणे आवश्यक असेल परंतु ती करण्यात आली नसेल तेथे आरोग्य व सुरक्षितता यांसाठी उपाययोजना करणे ;

(झ) [१][नोंदलेल्या असंरक्षित कामगारांच्या] लाभासाठी भविष्यनिर्वाह निधी यासह कोणताही निधी किंवा कोणतेही निधी प्रस्थापित करणे, असे निधी निहित करणे, अशा निधींना द्यावयाचे अंशदान व निधींचा भरणा, [१][(कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधीबाबत अधिनियम, १९५२ चा १९५२ याच्या तरतुदी व अशा नोंदलेल्या असंरक्षित कामगारांच्या कामाच्या परिस्थितीशी अनुरूप १९. ठरतील असे आवश्यक ते फेरबदल केलेली, उक्त अधिनियमाखालील योजना विचारात घेऊन भविष्यनिर्वाह निधीसाठी व अंशदानाच्या दरांसाठी तरतूद करण्यात येईल)], व त्यासंबंधीच्या सर्व बाबी ;

(ञ) योजना अमलात आणण्याचा खर्च ज्या रीतीने, [२]* * * * * [३][ज्या दिवसापासून (भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावासह)] व ज्या व्यक्तींनी भागदायाचा ती रीत, तो दिवस व त्या व्यक्ती याबाबत ;

(ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी व उपरोक्त प्रयोजनांसाठी प्रख्यापित केलेल्या निधींच्या व्यवस्थापनासाठी ज्या व्यक्ती किंवा प्राधिकरणे जबाबदार असतील त्यांची नेमणूक करणे ;

[४][(ट-१) खंड (ट) मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तींना किंवा प्राधिकरणांना ज्यांचा वापर करता येईल किंवा जे बजावता येतील असे अधिकार आणि कर्तव्ये विनिर्दिष्ट करणे;

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २(२) (ड) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला व तो नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(२) (ई) (एक) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला व तो नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(२) (ई) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला व तो नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २(२) (फ) द्वारे "मालक व असंरक्षित कामगार यांनी द्यावयाची कोणतीही अंशदाने व अशा अंशदानाचे प्रमाण धरून" हा मजकूर वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (क) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २(ड) द्वारे खंड (ट-१) समाविष्ट करण्यात आला.

आणि अशा व्यक्तींच्या आणि प्राधिकरणांच्या आदेशांविरुद्ध किंवा निर्णयांविरुद्ध अपिल आणि पुनरीक्षणाचे अर्ज करण्याविषयी तरतूद करणे आणि अशा अपिलांवर आणि अर्जांवर निर्णय करणे आणि त्याला आनुषंगिक असलेल्या गोष्टींबाबत ;]

(ठ) योजनेची प्रयोजने अमलात आणण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा आनुषंगिक किंवा पूरक बाबी.

[१][* * * *].

(३) योजनेत अशीही तरतूद करता येईल की, तिच्या कोणत्याही तरतुदीच्या उल्लंघनाबद्दल विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या कारावासाची (परंतु ती कोणत्याही बाबतीत पहिल्या उल्लंघनाबद्दल तीन महिन्यांपेक्षा किंवा नंतरच्या कोणत्याही उल्लंघनासाठी सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची नसेल) किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या रकमेपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची (परंतु तो कोणत्याही बाबतीत, पहिल्या उल्लंघनाबद्दल पाचशे रुपयांपेक्षा व नंतरच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल) किंवा कारावासाची व द्रव्यदंडाची अशा दोन्ही शिक्षा होतील [१][आणि अपराधसिद्धिनंतर उल्लंघन करण्याचे चालू राहिले तर ज्या दिवशी अशा प्रकारचे उल्लंघन चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी पंधरा रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल एवढ्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल.].

४. (१) राज्य शासनास, सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींना अधीन राहून, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या, एका करणे, योजनेकिंवा त्याहून अधिक क्षेत्रात, कोणत्याही अनुसूचित नोकरीसाठी किंवा अनुसूचित नोकऱ्यांच्या मध्ये बदल गटांसाठी, एक किंवा त्याहून अधिक योजना तयार करता येतील ; आणि त्याने केलेल्या कोणत्याही करणे किंवा योजनेत तशाच रीतीने भर घालता येईल, तीत सुधारणा करता येईल, बदल करता येईल, ती मागे घेणे. किंवा त्याऐवजी दुसरी योजना तयार करता येईल :

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना, राजपत्रात ती प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी समाप्त झाल्याखेरीज, अमलात येणार नाही :

परंतु आणखी असे की, राज्य शासनास—

(क) त्याला आवश्यक वाटेल तर, किंवा

(ख) कोणत्याही अनुसूचित नोकरीसाठी किंवा तिच्या भागासाठी अशा रीतीने तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या तरतुदी अशा अनुसूचित नोकरीतील मालकांशी व कामगारांशी विचारविनिमय केल्यानंतर, अशा दुसऱ्या अनुसूचित नोकरीस लागू कराव्यात अशी कोणत्याही दुसऱ्या अनुसूचित नोकरीतील बहुसंख्य मालकांनी किंवा कामगारांनी मागणी केली असेल किंवा विनंती केली असेल तर, अशा योजनेच्या तरतुदी किंवा तिचा भाग, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरबदलांसह, असे कोणतेही फेरबदल असल्यास, अशा अनुसूचित नोकरीस लागू करता येतील.

१९०४ चा मुंबई ३. (२) मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ याच्या कलम २४ च्या तरतुदी, महाराष्ट्र अधिनियमाद्वारे देण्यात आलेल्या, नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करताना ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींना अधीन राहून, पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना लागू होतील.

५. असंरक्षित कामगार किंवा मालक यांच्या कोणत्याही वर्गास एखादी योजना लागू होते योजना लागू किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास, ती बाब राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल करण्यसंबंधी आणि कलम १४ अन्वये घटित करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर- विवाद. शासन यावर निर्णय घेईल व तो निर्णय अंतिम असेल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २(२)(ग) द्वारे खंड (ड) वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (३) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
क्र.यु.व्ल्यु.ए-१९९५/(२९४६)/कामगार-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:-२२.०१.२००१

आदेश

पहा : शासन आदेश क्र. युडब्ल्युए १५९५/२९६४/कामगार-५ दिनांक ३०.९.९५

महाराष्ट्र माथाडी हमाल व इ र श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ खाली वेगवेगळ्या माथाडी मंडळाच्या ोजना तयार करण्यात आलेल्या आहेत. या योजनेतील तरतुदीनुसार माथाडी मंडळात नोंदीत असलेल्या काम गारांना काम पुरविण्याचे व वाटप करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार शासनाने दिनांक ३०.९. ५ च्या आदेशानुसार महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम , १९६९ च्या कलम ७(४) अन्वये पुढील प्रमाणे आदेश काढलेले होते.

" मंडळातील नोंदीत कामगारी बेकार असताना एखाद्या ठिकाणी काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असल्यास प्र थमतः मंडळातील नोंदीत बेकार कामगारांना प्राधान्याने काम देणे आवश्यक आहे. अशा बेकार असलेल्या कामगारां ी त्याठिकाणी काम करण्यास नाकारल्या खेरीज नविन कामगारांना नोंदणी करुन काम देण्यात येऊ नये. "

विविध माथाडी कामगार संघट ांकडून या संदर्भात सातत्याने मागणी करण्यात येत आहे की, माथाडी मंडळाकडील कामाच्या व्याप्तीत वाढ ाल्यामुळे आणि नोंदीत कामगारांची संख्या कमी झाल्यामुळे माथाडी कामगारांची नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता आहे. म्हणून शासनाने नवीन माथाडी कामगारांची नोंदणी करण्यास परवानगी द्यावी. त्यामुळे यास अनुसरुन शासन, शासन आदेश समक्रमांक दिनांक ३०.९.९५ मधील तरतुदी कायम ठेवून पुढील प्रमाणे सुधारी आदेश देत आहे -

" संबधित माथाडी मंडळातील नोंदीत कामगार बेकार असताना एखाद्या ठिकाणी काम वाढले असेल तर व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आव श्यक असेल तर प्रथमतः मंडळातील नोंदीत बेकार कामगारांना प्राधान्य देण्यात यावे. परंतु या कामगारांबाबत प र्वी काम करीत असलेल्या कामगारांनी नकार दिल्यास त्याठिकाणी नविन कामगारांची नोंदणी करण्यास हरकत न ही. याबाबत पर्याप्त समर्थन देऊन अशा प्रकरणी कामगार आयुक्तांची अगोदर परवानगी घेणे आवश्यक राहील (तथापी पर्याप्त समर्थन असलेल्या प्रकरणात नवीन माथाडी कामगाराची नोंदणी करण्यासंदर्भात माथाडी मंडळ ने निर्णय घ्यावा आणि असा नविन नोंदणी करण्याचा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह कामगार आयुक्त यांचेकडे न्यतेसाठी सादर करावा व त्यांच्या मंजुरी नंतरच नवीन कामगारांची नोंदणी करावी."

हे आदेश महाराष्ट्र माथाडी व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ च्या कलम ७(४) अन्वये महाराष्ट्र शा नास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत. सर्व मंडळांनी या आदेशाची काटेकोरपणे अं लबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(खालिद बी.अरब)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,
* कामगार आयुक्त, मुंबई
अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे
निवड नस्ती (कामगार-५)

अहमदनगर माथाडी व असंरक्षित
कामगार मंडळ अहमदनगर
आवक क्रमांक 882
दिनांक 6/9/06

क्र.युडब्ल्यू-१५२००६/(२११/०६)/कामगार-५
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- 25 SEP 2006

आदेश

पहा:- १) शासन आदेश क्र.युडब्ल्यू-१५९५/२९४६/कामगार-५, दि.३०/९/१९९५
२) शासन आदेश क्र.युडब्ल्यू-१५९५/२९४६/कामगार-५, दि.२२/१/२००१

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ खाली वेगवेगळया माथाडी मंडळाच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. या योजनेतील तरतुदीनुसार माथाडी मंडळात नोंदीत असलेल्या कामगारांना काम पुरविण्याचे व वाटप करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्याबाबत शासनाने दि.३०/९/१९९५ च्या आदेशानुसार महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ च्या कलम ७ (४) अन्वये पुढीलप्रमाणे आदेश काढलेले आहेत.

"मंडळातील नोंदीत कामगार बेकार असताना एखाद्या ठिकाणी काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असल्यास प्रथमत: मंडळातील नोंदीत बेकार कामगारांना प्राधान्याने काम देणे आवश्यक आहे अशा बेकार असलेल्या कामगारांनी त्या ठिकाणी काम करण्यास नाकारल्या खेरीज नविन कामगारांना नोंदणी करुन काम देण्यात येऊ नये"

संबंधित माथाडी मंडळ नोंदीत कामगार बेकार असताना एखाद्या ठिकाणी काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असेल तर वरील परिच्छेदाप्रमाणे प्रथमत: मंडळातील नोंदीत बेकार कामगारांना प्राधान्याने काम देण्यात यावे विशिष्ट परिस्थितीत या कामगारांकडून पूर्वी कामगार कायरत असलेल्या कामगारांनी

हरकत घेऊन नकार दिल्यास त्या तक्रारी नवीन कामगारांच्या नोंदणी करण्यास हरकत नाही. मात्र त्यासाठी पर्याप्त समर्थन देऊन अशा प्रकरणी कामगार आयुक्तांची अगोदर परवानगी घेणे आवश्यक राहील असेही दि.२२/१/२००१ च्या आदेशान्वये कळविण्यात आले आहे. तथापि या आदेशात बदल करुन एखादे काम वाढले असेल तर व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असेल तर पूर्वी प्रमाणेच प्रथमत: मंडळातील नोंदीत बेकार कामगारांना प्राधान्य द्यावे तरच या कामगाराबाबत पूर्वी काम करीत असलेल्या कामगारांची नोंदणी करणे आवश्यक असल्यास याबाबतची पर्याप्त कारणे व समर्थन देऊन अशा प्रकरणी शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. मात्र या संदर्भात काही प्रकरणात पर्याप्त समर्थन असेल तर अशा प्रकरणी माथाडी कामगारांची नोंदणी करण्यासंदर्भात संबंधित माथाडी मंडळाने अशा नवीन नोंदणी करण्याचा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा व त्याबाबतच्या शासनाच्या मान्यतेनंतरच नवीन कामगारांची नोंदणी करावी.

हे आदेश महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ चे कलम ७ (४) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत असून सर्व मंडळांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(चं.रा.गोंयाळी)
शासनाचे उप सचिव

प्रति,

कामगार आयुक्त, मुंबई
सह कामगार आयुक्त (माथाडी), मुंबई
अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे,
निबंधक सहकारी (कामगार कक्ष)

Annexure 3

2006/09/22 16:27:32

क्र. युडब्ल्युए-१५२००६/[२११/०६]/कामगार-५,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २५.९.२००६

-: आ दे श :- 16 OCT 2006

पहा :- १] शासन आदेश क्र. युडब्ल्यु-१५९५/२९४६/कामगार-५, दि. ३०.९.१९९५.
२] शासन आदेश क्र. युडब्ल्युअ१५९५/२९४६/कामगार-५, दि. २२.१.२००१.

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण] अधिनियम, १९६९ खाली वेगवेगळ्या माथाडी मंडळाच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. या योजनेतील तरतुदीनुसार माथाडी मंडळात नोंदित असलेल्या कामगारांना काम पुरविण्याचे व वाटप करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्याबाबत शासनाने दि. ३०.९.१९९५ च्या आदेशानुसार महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण] अधिनियम, १९६९ च्या कलम ७[४] अन्वये पुढील प्रमाणे आदेश काढलेले आहेत.

"मंडळातील नोंदित कामगार बेकार असताना खाद्या ठिकाणी काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असल्यास प्रथमत: मंडळातील नोंदित बेकार कामगारांना प्राधान्याने काम देणे आवश्यक आहे अशा बेकार असलेल्या कामगारांनी त्या ठिकाणी काम करण्यास नाकारल्या खेरीज नविन कामगारांना नोंदणी करुन काम देण्यात येऊ नये."

संबंधित माथाडी मंडळ नोंदित कामगार बेकार असताना खाद्या ठिकाणी काम वाढले असेल व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असेल तर वरील परिच्छेदाप्रमाणे प्रथमत: मंडळातील नोंदित बेकार कामगारांना प्राधान्यात काम देण्यात यावे. विशिष्ट परिस्थितीत या कामगारांबाबत पूर्वी कामगार कार्यरत असलेल्या कामगारांनी हरकत घेऊन नकार दिल्यास त्या ठिकाणी नवीन कामगारांच्या नोंदणी करण्यास हरकत नाही.

....२

मात्र त्यासाठी पर्याप्त समर्थन देऊन अशा प्रकरणी कामगार आयुक्तांची अगोदर परवानगी घेणे आवश्यक राहिल असेही दि. २२.१.२००१ च्या आदेशान्वये कळविण्यात आले आहे. तथापि या आदेशात बदल करून एखादे काम वाढले असेल तर व तेथे कामगारांची संख्या वाढविणे आवश्यक असेल तर पूर्वी प्रमाणेच प्रथमत: मंडळातील नोंदित बेकार कामगारांना प्राधान्य द्यावे मात्र या कामगारांबाबत पूर्वी काम करीत असलेल्या कामगारांची नोंदणी करणे आवश्यक असल्यास याबाबतची पर्याप्त कारणे; व समर्थन देऊन अशा प्रकरणी शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. मात्र या संदर्भात काही प्रकरणात पर्याप्त समर्थन असेल तर अशा प्रकरणी माथाडी कामगारांची नोंदणी करण्यासंदर्भात संबंधित माथाडी मंडळाने अशा नवीन नोंदणी करण्याचा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा व त्याबाबतच्या शासनाच्या मान्यतेनंतरच नवीन कामगारांची नोंदणी करावी.

हे आदेश महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर अगंतीवी कामगार[नोकरीचे नियमन व कल्याण] अधिनियम,१९६९ च्या कलम ७[४] अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत. सर्व मंडळांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
[चं. रा. गोसावी],
शासनाचे उप सचिव.

प्रति,

कामगार आयुक्त, कॉर्पोरेट सेंटर, ताडदेव, मुंबई.
सह कामगार आयुक्त [माथाडी] कॉर्पोरेट सेंटर, ताडदेव, मुंबई.
अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे.
निवडनस्ती [कामगार-५]
अध्यक्ष,

केसरी रविवार १९९८

खडतर प्रवासातून लौकिक मिळविणारे व्यक्तिमत्त्व

व्यक्तिमत्त्व

दिगंबर बोडखे

आष्टी शहरापासून जवळच असलेल्या भाळवणी या खेड्यामध्ये ११/१/१९३२ रोजी अगदी गरीब कुटुंबामध्ये जन्माला आलेला मुलगा. लहान वयातच पोटाची खळगी भरण्यासाठी १९५२/५३ साली भाळवणी ते नगर असा पायी गेला व तेथे जाऊन हमाली करून पोट भरू लागला. कमी शिकलेला असून सुध्दा तो मुलगा काही वर्षातच नगर जिल्हा हमाल मापाडी संघाचा सचिव ते महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी संघाचा उपाध्यक्ष असा प्रवास करून त्यांनी साहित्यातही उत्तुंग भरारी मारली आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका हा प्रथमपासून दुष्काळी आहे. डोंगर-दऱ्याखोऱ्यांनी वेढलेला हा तालुका पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याच्या कुशीत वसलेला आहे. त्यामुळे या तालुक्याची नाळ अहमदनगर जिल्ह्याशी जोडलेली आहे. या तालुक्यातील लोकांना फक्त शासकीय कामासाठीच बीडला जावे लागते अन्यथा सर्व व्यवहार नगरशीच आहे. अशा या तालुक्याने आजवर अनेक नररत्नांना जन्म दिला आहे. त्यापैकी आप्पा कोरपे हे एक आहेत.

आष्टीपासून अगदी जवळच असलेल्या भाळवणी या खेड्यामध्ये मधुकर गहिनीनाथ कोरपे कर्फे आप्पा कोरपे यांचा गरीब कुटुंबामध्ये जन्म झाला. दुष्काळी भाग असल्यामुळे हाताला काम धंदा मिळणे अवघड होते व शेतामध्ये पिके देखील पाहिजे तशी येत नव्हती त्यामुळे या भागातील शेतकरी डोंगराळ भागात येणारी सीताफळे, आंबा व इतर विकून आपला उदरनिर्वाह करीत असत. ज्या घरात खाणारी जास्त तोंडे होती. त्या घराचा संसार फळावर चालणे अवघड होते म्हणून आप्पा कोरपे यांना येथील एका व्यक्तीने सल्ला देऊन नगर येथे काम करण्यासाठी जाण्याचे सांगितले. त्याप्रमाणे ते नगरला निघाले. परंतु नगरपर्यंत जाण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्यामुळे ते एकटे च. १९५२/१९५३ साली नगरला निघाले. रस्त्याने दोन- तीन मुक्काम करून नगरच्या बसस्थानकापर्यंत पोहोचल्यावर त्यांना समजले की, येथील बसस्थानकावर झोपले तर कोणीही उठ म्हणत नाही हे ऐकून त्यांना वाटले की, आपला एक प्रश्न तर सुटला. आता दुसरा प्रश्न फक्त कामाचा राहिला होता. सकाळी सकाळी बसस्थानकावर मुंबई- नगर ही बस आली आणि ते सहज बसच्या दरवाजाजवळ जावून थांबले तर एका प्रवाशाने विचारले कारे तू हमाल का? त्यावर कोरपे यांनी फक्त मान डोलावली आणि डोक्यावर मोठी पेटी, हातात पिशवी आणि डोक्यावर पेटीवर कपड्यांची वळकटी घेऊन मान अवघडत थेट दोन ते तीन किलोमीटर अंतर असणाऱ्या नालेगावला घेऊन गेल्यावर कोरपे यांना हमाली फक्त पाच नवे पैसे मिळाली. कष्टाची खरी कमाई मिळाल्याचा त्यांना खूप आनंद झाला. व्यापारी वर्गाकडून हमालांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत होती. रात्रंदिवस व्यापाऱ्यांच्या घरी किंवा मालाच्या ठिकाणी त्यांना थांबावे लागत होते. आठ- आठ दिवस घरी पत्नी व मुलांची देखील भेट होत नसे हे सर्व टाळावे म्हणून त्यांनी हमालांना



आप्पा कोरपे

संघटित करण्याचा प्रयत्न केला व पुढे हमाल संघटना स्थापन करून ते १९८० मध्ये नगर जिल्हा हमाल पंचायतीचे जनरल सेक्रेटरी झाले. १९८३ मध्ये महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष झाले. त्यांनी संपूर्ण राज्यातील हमाल संघटित करण्याचा प्रयत्न करून त्यांचे प्रश्न सोडविले. हमाली करून संघटनेत काम करताना त्यांनी मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्य केले. अगदी कमी शिकलेले असून सुध्दा त्यांनी साहित्य क्षेत्रामध्ये आपला चांगला ठसा उमटवला व १० जून १९९२ साली 'मी ती हमाल' हे आत्मकथनपर पुस्तक लिहिले.

२५ ऑक्टोबर १९९५ रोजी 'भारवाही' त्यानंतर 'भाकर' आणि २० डिसेंबर १९९८ रोजी 'जाई' ही त्रिदंबरी लिहिली. 'मी तो हमाल' या पुस्तकाचे नुकतेच 'मै तो ठहरा हमाल' असी हिंदी आवृत्ती प्रकाशित झाली आहे आणि आता 'मेलेलं बरं' हे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे असे त्यांनी सांगितले. 'मी तो हमाल' हे पुस्तक कानडी भाषेत लवकरच प्रकाशित होणार आहे. 'मी तो हमाल' या पुस्तकाला आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. १ जुलै १९९२ रोजी डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते शाम पानगंटी या पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले आहे. २१ फेब्रुवारी १९९२ रोजी अकरा हजार रुपये रोख, स्मृती चिन्ह व महावस्त्र असा, भैरू रतन दामाणी साहित्य पुरस्कार त्यांना विद्याधर ओखले यांच्या हस्ते मिळालेला आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे सोलापूर साहित्य संमेलनात अडीच हजार रुपयांचा रोख स्वरूपाचा पुरस्कार मिळाला आहे. बाबुराव बागूल यांच्या हस्ते महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद पुणे, यशवंत चव्हाण, सहयोद्री कामगार साहित्य पुरस्कार मिळालेला आहे. जामखेड, येथील ज्ञानदीप फौंडेशनचा, नंदलाल धूत फौंडेशनचा ५ हजार रुपयाचा रोख स्वरूपाचा पुरस्कार, समरसता मंचातर्फे संत गाडगेबाबा पुरस्कार, माणूस परिवारातर्फे सामाजिक कार्यकर्ता म्हणून मानचिन्ह देऊन सत्कार, त्याचप्रमाणे अहमदनगरच्या नगराध्यक्षा लता लोढा यांच्यातर्फे नगर परिषदेच्यावतीने सत्कार करण्यात आला आहे. जवळजवळ लहानमोठे पंचवीस पुरस्कार मिळाले आहेत.

लोकमत

शांता गेळके यांना जेव्हा अप्पा कोरपे भेटतात...

(आनच्या प्रतिनिधीकडून)

पुणे, दि. २२ - "शांताबाईंना आम्ही दूरदर्शनवरच सतत पाहिलेलं. त्यांच्या शेजारी बसून बोलायचा योग केव्हा तरी येईल, हे कल्पनेतही नव्हतं. पण तो योग या पुस्तकामुळे आला आहे", या शब्दात 'मी तो हमाल' या सध्या गाजत असलेल्या आत्मचरित्राचे लेखक अप्पा कोरपे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या; तेव्हा सर्वांनाच हेलावल्यासारखे झाले.

येथील सुप्रसिद्ध स्मृतिचिन्हकार शाम पानगंटी यांच्या निवासस्थानी झालेल्या अनौपचारिक कार्यक्रमात वंदाचा 'शाम पानगंटी पुरस्कार' अप्पांना डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते देण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. रुपये एक हजार एक रोख आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. पानगंटी यांनी गेली ११ वर्षे हा उपक्रम सुरू ठेवला असून, आवर्जून नव्या प्रवाहातील पुस्तकांना ते हा पुरस्कार स्वत: देत असतात. अहमदनगरच्या हमाल पंचायतीचे उपाध्यक्ष असलेले अप्पा, अध्यक्ष शंकरराव मुरे, नामवंत कवयित्री व लेखिका शांता शेळके, डॉ. अनिल अवचट, डॉ. सुनंदा अवचट आणि डॉ. आनंद यादव या वेळी उपस्थित होते. हमालांचे नेते डॉ. बाबा आढाव या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

हा सत्कार स्वीकारल्यावर आपल्या आत्मचरित्राबद्दल बोलताना अप्पा म्हणाले की, हमालबांधवांना जगण्याची कहाणी सांगावी म्हणूनच हे लिहिले आहे. एका भाकरीसाठी भयाण भोगावटा वाट्याला आला. पोती वाहून नेता-नेता पाठीचे दोन मणके गेले. 'पगार' 'पगार' म्हणून खूप गोष्टी ऐकायचो. पण बाबांच्या चळवळीमुळे आम्हाला पगार मिळायला लागला. अजून खूप लिहायचंय. चळवळ कशी उभी केली, हमालांच्या प्रभात कसे लक्ष घातले, हे सारं अजून मांडायचंय.

मार्क्सवादी चळवळीने सर्व देशभर चळवळ उभी केली असली तरी अगदी तळाच्या स्तरापर्यंत ती गेली नाही. हमालांच्या चळवळीने तळापर्यंत जाण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन डॉ. मोरे यांनी केले.


वेगवेगळ्या स्तरातील लोक आत्मकथन अथवा आपले अनुभव लिहितील, तेव्हा नवे शब्द, अज्ञातात असलेला नवा समाज यांची माहिती होईल. त्यामुळे नवनव्या वर्गातील, स्तरातील लोकांनी लिहिले पाहिजे, असे मत या वेळी डॉ. यादव, श्रीमती शेळके, डॉ. अवचट आणि डॉ. आढाव यांनी व्यक्त केले.

हे पुस्तक प्रसिद्ध करणारे डोंबिवलीच्या मोरया प्रकाशनचे श्री. दिलीप महाजन हेही या वेळी उपस्थित होते.

पुढील महिन्यात अमेरिका, फ्रान्स येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनासाठी 'मी तो हमाल' या पुस्तकाची निवड झाल्याची माहिती त्यांनी दिली.

या वेळी श्री. पानगंटी आणि त्यांच्या पत्नीचाही सत्कार करण्यात आला.


लोकमत



सामाजिक समरसता मंचातर्फे देण्यात येणारा श्री संत गाडगेबाबा समरसता पुरस्कार येथील अप्पा कोरपे यांना विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. स. फरांदे यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. हमाल मापाडीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव घुले, साहित्यिक प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, प्रा. मोरजे, सौ. कोरपे व सामाजिक समरसता मंचचे प्रमुख भिकुजी इदाते आदी दिसत आहेत. (छाया - लक्ष्मण कावरे, नगर)



प्राचार्य पंडितराव पवार संपादित केलेल्या 'कवी अनिलांची साहित्यदृष्टी' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. गंगाधर मोरजे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी श्री. अप्पा कोरपे उपस्थित होते.



चौथ्या कामगार साहित्य संमेलनाच्या सांगता समारंभात बोलताना संमेलनाचे कार्याध्यक्ष विजय कुवळेकर. बाजूच्या छायाचित्रात श्री. अप्पा कोरपे आणि त्यांच्या सौभाग्यवती विशेष पुरस्काराचा स्वीकार करताना दिसत आहेत. छायाचित्रात सर्वश्री. अरुण मेहता, मोहन घोत्रे, डॉ. सदा कन्हाडे, मोहन जगताप आदी दिसत आहेत. छाया - पटवा

कामगार साहित्य संमेलनाची मोठ्या दिमाखात सांगता

सोलापूर, (विशेष प्रतिनिधी): - दोन दिवसांपासून मोठ्या उत्साहात सुरू असलेल्या चौथ्या कामगार साहित्य संमेलनाची यशोदीप हुतात्मा स्मृति मंदिरात बुधवारी दिमाखात सांगता झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. अजीज नदाफ यांनी शाहीर अमर शेख यांचे गीत गायले. त्यानंतर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ सदस्य मोहन जगताप यांनी कृतज्ञता व्यक्त करून संमेलन यशस्वी करण्यासाठी हातभार लावणाऱ्यांचे आभार मानले.

त्यानंतर चौथ्या कामगार साहित्य संमेलनाच्यानिमित्ताने घेण्यात आलेल्या कथा, कादंबरी, कविता, एकांकिका, वैचारिक लेख, नाटक आणि गृहपत्रिका आदी स्पर्धांमधील पारितोषिक विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष विजय कुवळेकर यांनी केले. ते म्हणाले की, अनेक अंगांनी हे चौथे कामगार साहित्य संमेलन महत्त्वाचे ठरले आहे. विक्रमी सदस्य नोंदणी, मान्यवर साहित्यिकांची उपस्थिती या आणि अशा वैशिष्ट्यांमुळे हे कामगार साहित्य संमेलन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे, असेही ते कन्हाडे, वरिष्ठ उपकल्याण आयुक्त मोहन घोत्रे, स्वागताध्यक्ष अरुण मेहता यांची यावेळी समयोचित भाषणे झाली.

दुसऱ्या कामगार साहित्य संमेलनामध्ये घोषित करण्यात आलेल्या पुरस्कारांचे मानकरी श्री. हरि नरके आणि 'मी तो हमाल' चे लेखक अप्पा कोरपे यांचा यावेळी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अप्पा कोरपे यांचा सत्कार करताना उपस्थित कामगार बंधूंनी उभं राहून टाळ्यांचा कडकडाट करून त्यांना अभिवादन केले.

यावेळी विविध वाङमयीन स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार देण्यात आले ते असे - सर्वोत्कृष्ट कथा - ह. ना. आपटे पुरस्कार व दैनिक लोकमत, सोलापूर पुरस्कार प्रथम - श्री. जुबारक शेख, सोलापूर, द्वितीय -श्री. बाबाराव मुसळे, पार्डी टकमोड, तृतीय - श्री. उद्धव कानडे, पुणे.

सर्वोत्कृष्ट कादंबरी - अण्णाभाऊ साठे पुरस्कार व दैनिक केसरी गर्जने पुरस्कार प्रथम - श्री. बळवंत कांबळे, द्वितीय -श्री. अजितेम जोशी, तृतीय - श्री. मधुसूदन घाणेकर.

सर्वोत्कृष्ट कविता - नारायण सुर्वे पुरस्कार व दैनिक सकाळ पुरस्कार प्रथम -श्री. बळवंत कांबळे, द्वितीय -श्री. भगवान ढगे, तृतीय - श्री. किशोर घोरपडे.

सर्वोत्कृष्ट नाटक- मामासाहेब वरेरकर पुरस्कार व अर्थमंथन पुणे पुरस्कार प्रथम -श्री. आनंद धरणीधर, द्वितीय - श्री. रवींद्र हरिश्चंद्र कंटारे, तृतीय -श्री. रमेश गजानन म्हात्रे.

वैचारिक साहित्य - लोकहितवादी पुरस्कार व दैनिक संचार पुरस्कार प्रथम - श्री. शशीकुमार लक्ष्मणराव लोहकरे, द्वितीय -श्री. बाळकृष्ण लाडू तोरी, तृतीय -श्री. श्रीकांत नारायण कुलकर्णी.

सर्वोत्कृष्ट एकांकिका - ग. ना. गाडखोलकर व महिला प्रबोधिनी पुरस्कार प्रथम - गिरीश पंचवाडकर, सोलापूर. द्वितीय - अरविंद साळवी, मुंबई. तृतीय -गंगाराम राणे, मुंबई.

उत्कृष्ट गृहपत्रिका - १) 'कसब' के.एस.बी. पंप्स (२) 'कलिंग' स्टेट बँक ऑफ इंडिया (३) (विभागून) 'क्षितिज' थरमॅक्स आणि 'प्रतिमा' किर्लोस्कर कमिन्स.

पाहिजेत

सकाळ

बुधवार, ११ डिसेंबर २००२ / ६

ओळखपत्रांमुळे पालिकेकडून श्रमिकांना प्रतिष्ठा : डॉ. आढाव

नगर, ता. १० (बातमीदार) : तळागाळातील शेवटच्या माणसाला सुविधा व प्रतिष्ठा मिळणे हा भारतीय लोकशाहीचा विजय आहे. नगरच्या पालिकेने शहरातील कागद, काच, पत्रा आदी भंगार गोळा करणाऱ्या श्रमिकांना ओळखपत्रे देऊन प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्याबद्दल पालिका धन्यवाद व शाबासकीला पात्र ठरली आहे, असे पुण्याच्या कष्टकरी पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी आज दुपारी नगरपालिका सभागृहात सांगितले.

येथील कागद, काच, पत्रा गोळा करणाऱ्या २०३ महिला श्रमिकांना नगरपालिकेने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाचे औचित्य साधून ओळखपत्रे दिली. त्यातील प्रतीकात्मक दहा महिलांना प्रमाणपत्रे प्रदान करण्याचा कार्यक्रम आज डॉ. आढाव यांच्या हस्ते व माजी नगराध्यक्ष दीप चव्हाण यांच्या हस्ते झाला.

या वेळी डॉ. आढाव म्हणाले, महिलांनी या ओळखपत्रांचा उपयोग रेशनकार्डप्रमाणे करावा. ते जवळ ठेवले, तर त्यांना पोलिस व नगरपालिकेचे लोक त्रास देणार नाहीत. आजवर गरिबांना फक्त मत मिळाले; पण पत नाही. आता ओळखपत्रामुळे त्यांना बँकांकडून व्यवसाय करण्यासाठी कर्जही मिळेल. कचरा चिवडून पोटासाठी कष्ट करणाऱ्यांची सेवा लक्षात घेऊन त्यांना सरकारने घरे आदी सुविधाही द्याव्यात. यापुढे शहरात या कष्टकऱ्यांना बरोबरीच्या नात्याने वागविले जावे, ही माणसेदेखील नवनिर्माणाचे काम करतात, हे म्हणणे आता सरकारला पटविण्यात आम्हाला यश येऊ लागले आहे. कचरा आमच्या हक्काचा, नाही कोणाच्या बापाचा, अशी आमची घोषणा आहे. महिलांनी हे काम करताना रोगराई होणार नाही, याची काळजी घ्यावी."

पुण्याच्या कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतीचे अध्यक्ष मोहन नन्नावरे म्हणाले, "श्रमिकांच्या चळवळीत राजकीय पक्ष योगदान देत नाहीत. त्यांच्या वंजन व वलयांचा उपयोग चळवळींना होत नाही. मतदान, मोर्चा अथवा दहशतीसाठी त्यांची शक्ती वापरली जाते. याउलट आमच्या संघटनेने पुण्यातील साडेचार हजार श्रमिकांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रत्येकी ७५० ते एक हजार रुपये अनुदान दिले, अठरा लाख रुपयांचा निधी जमविला आहे. पतसंस्थेसाठीही १५ लाख रुपये जमविले आहेत. त्या धर्तीवर नगरला काम व्हावे."

माजी नगराध्यक्ष दीप चव्हाण यांनी स्वागत करताना संचालक या नात्याने नगर अर्बन बँकेच्या माध्यमातून कष्टकरी महिलांना दहा ते १५ हजार रुपयांचे व्यावसायिक कर्ज मिळवून देण्याचा आपला प्रयत्न आहे, असे सांगितले.

कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायतीचे जिल्हाध्यक्ष व माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे यांनी प्रास्ताविक केले. नेहरू युवा केंद्राचे संचालक भास्कर कोल्हे यांनी परिचय करून दिला. श्रीकांत ससाणे यांनी सादर केलेल्या गाडगेबाबा स्वच्छता अभियान गीताला वन्समोअर मिळाला. डॉ. आढाव यांनी वयोवृद्ध कष्टकरी महिला कमलाबाई महापुरे व हौसाबाई थोरात यांचा सत्कार करून त्यावदल त्यांना प्रतिक्रिया विचारली, तेव्हा 'फार आनंद वाटला,' असे या महिला म्हणाल्या.

डॉ. आढाव, अप्पा कोरपे, न. ह. देवचके, राम दसरे, श्री. उडाणशिवे, ॲड. अभय आगरकर, जयंत येलूलकर, मुख्याधिकारी मनोहर हिरे, दीपक सूळ, आरोग्याधिकारी डॉ. एन. जी. कुलकर्णी, सखूबाई बोरगे, संजय चव्हाण आदींचा सत्कार सुभद्राबाई सकट, कौसाबाई शिंदे, शीलाबाई भारस्कर, शीलाबाई लोंढे, विमल मंडलिक, मंदाबाई दिवटे, शकुंतला मिसाळ, कृष्णा लोखंडे या महिलांनी केला. सत्काराचे हार व शाली या महिलांनी प्लॅस्टिकच्या गोण्यांतून आणले होते. सत्काराचा हा पहिलाच प्रसंग असल्याने त्या काहीशा गांगरून गेल्या होत्या. नंतर मात्र त्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य दिसत होते.



नगरच्या पालिकेतर्फे शहरातील कागद, काच, पत्रा आदी भंगार गोळा करणाऱ्या कष्टकरी संघटनेच्या सदस्यांना कष्टकरी पंचायतीचे अध्यक्ष बाबा आढाव यांच्या हस्ते ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष अभय आगरकर व दीप चव्हाण, भाऊसाहेब उडाणशिवे, राम दसरे आदींसह ओळखपत्रांसह कष्टकरी संघटनेचे सदस्य. (छायाचित्र : दत्ता इंगळे, नगर)

माथाडी मंडळ पारदर्शकतेसाठी स्वतंत्र आयोग नेमावा : आढाव

राज्यात ३३ माथाडी मंडळे: कामगार ३ लाखावर

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) : राज्यात ३३ माथाडी मंडळे असून, त्यांतर्गत नोंदित कामगारांची संख्या ३ लाखांइतकी आहे. कष्टकऱ्यांची जवळपास १५०० कोटी रुपयांची रक्कम या मंडळांमध्ये आहे. असे असले तरीसुद्धा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास आणि पारदर्शकता दाखविण्यात माथाडी मंडळे कमी पडली आहेत. त्यामुळे कामगारांमध्ये असंतोष खदखदत असून, सर्व मंडळांच्या चौकशीसाठी आणि त्यांना मार्गदर्शक सूचना देणेकामी राज्य सरकारने स्वतंत्र आयोग नेमावा, अशी आमची प्रमुख मागणी असल्याचे ज्येष्ठ कामगार नेते आणि हमाल पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी सांगितले.



दोन दिवसांपूर्वी पुण्यात राज्य हमाल मापाडी महामंडळाची बैठक झाली. त्यामध्ये हा महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आला आहे. कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या माथाडी मंडळांच्या दयनीय स्थितीवर त्यांनी 'लोकमत'ला खास मुलाखत देऊन याविषयी असलेली भूमिका विस्ताराने स्पष्ट केली.

राज्यात माथाडी कायदा १९६९ साली मंजूर झाला आणि अंमलबजावणी १९७४ साली महत्त्वाच्या मुंबई, पुणे आणि नागपूर शहरात सुरू झाली. आता सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू होतो. त्याच धर्तीवर गेल्या ४० वर्षांनंतर माथाडी कायद्याचे पुनर्मूल्यांकन होण्याची गरज निर्माण झाली असल्याचे नमूद करून ते म्हणाले, की कष्टकऱ्यांना आता पेन्शन योजना मंजूर झाली पाहिजे, त्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. माथाडी मंडळे ही स्वायत्त मंडळे आहेत. या मंडळावर प्रभावी नियंत्रण राहिलेले नाही. सरकारी कामगार अधिकारी सचिव आणि कामगार उपायुक्त अध्यक्ष असे दोन अधिकारी प्रामुख्याने काम पाहतात. कोट्यवधी रुपयांची उलाढाल या मंडळांमध्ये होत असते. त्यामुळे जरा तपासण्या करण्याच्या दृष्टीने सरकारने गांभीर्याने विचार करावा. सध्याची मंडळाची अवस्था म्हणजे अब्रू राखत नाही आणि माशी उठत नाही, अशा शेळीच्या शेपटाप्रमाणे झाली आहे."

कायद्याचा विचार केला, तर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची सोय नाही. असे असले तरी मनमानीपणा जास्त वाढलेला आहे. पारदर्शकता कमी झाली आहे. भविष्यनिर्वाह निधीमध्ये कोट्यवधी रुपयांची रक्कम जमा असून, या रकमांबाबत कामगारांमध्ये चिंता व्यक्त होते. कारण मंडळांचे अनेक वर्षांचे लेखापरीक्षण रखडलेले आहे. शिवाय माथाडी मंडळांना विधानसभेला दर वर्षीच्या अहवाल देणे बंधनकारक आहे. असे असतानाही त्यावर पाहिजे तेवढा अंकुश राहिलेला नाही, हीच वस्तुस्थिती आहे. म्हणून कामगारांमधील असंतोष विचारात घेता आणि मंडळाची दयनीय स्थिती पाहता उच्च अधिकार पद असलेला स्वतंत्र आयोग शासनाने तत्काळ नेमला पाहिजे.

शेतकऱ्यांऐवजी खरेदीदारांकडून लेव्ही वसूल करण्याचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने चार वर्षांपूर्वी दिला. त्याच्या अंमलबजावणीचे परिपत्रक पणन खात्यामार्फत गेल्या महिन्यात बाजार समित्यांना पाठविण्यात आले. परंतु, अंमलबजावणी करताना कामगार खात्याचाही संबंध येतो. या दोन्ही खात्यांमध्ये समन्वय नसल्याची स्थिती सध्या निर्माण झाली आहे. सर्व कायदा राबविण्यामध्ये राज्य सरकार आघाडीवर असल्याचे वारंवार सांगितले जाते. परंतु, लेव्हीच्या आदेशाबाबत समन्वय नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सरकारची अवस्था 'नाव सोनूबाई, हाती कतलाचा वाळा' अशी झाली असून, ही बाब स्पृहनीय नाही, असेही ते म्हणाले. त्यामुळे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी. याकामी स्वतंत्र आयोग नेमल्यास मंडळांची स्थिती समोर येण्यास मदत होईल.

नोंदण्यांमध्ये कामगार संघटनेला विश्वासात घ्या!

मंडळांच्या अध्यक्षांची बदली झाली आणि नवीन अध्यक्षांनी कार्यभार स्वीकारला, की कामगारांची नोंदणी थांबते. जुन्या परिपत्रकाचा अर्थ अधिकारी वर्ग हवा तसा सोईनुसार लावतात. वास्तविक जुना अध्यक्ष पदभार सोडेपर्यंत नोंदणी चालू असते व नवीन अध्यक्ष आल्यानंतर नोंदणी थांबते, हा प्रकार समजण्यापलीकडचा आहे. स्थानिक कामगार संघटनेला विश्वासात घेऊन नोंदण्या व्हायला हव्यात. नोंदण्या करण्यात अडचणी येतात आणि अनोंदित कामगार काम करतात. यावरही विचार व्हायला हवा, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील बहुतेक मंडळांवर एक सदस्य मंडळांचा मनमानी कारभार सुरू आहे. प्रत्येक मंडळाची आर्थिक उलाढाल ही कोट्यवधी रुपयांच्या घरात होत असते. पैसा कामगारांचा व व्यवहार मात्र अध्यक्ष व सचिवांच्या हाती, अशी स्थिती असल्याचे सांगून ते म्हणाले, की भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटीच्या मोठमोठ्या रकमा असतात. कष्टकऱ्यांचा हा पैसा योग्य बँकांमध्ये ठेवला आहे काय?, याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. त्यामुळे माथाडी मंडळांना मार्गदर्शक सूचना देणेकामी आयोगाची नितांत गरज आहे. म्हणून मंडळाच्या कामकाजात पारदर्शकता यायला हवी.

पुण्यात लेखापरीक्षण रखडले


पुण्यातील माथाडी मंडळाबाबत बोलताना ते म्हणाले, की या मंडळांवरही शासनाने नुकतेच सर्व संबंधित घटकांचे सदस्य मंडळ नेमले आहे. त्यामध्ये बाजार समिती, दि पूना मर्चंट्स चेंबर, आडते संघटना व संबंधित कामगार संघटना आदींच्या सदस्यांचे हे मंडळ अस्तित्वात आले आहे. वास्तविक गेली चार वर्षे मंडळ नेमण्यात आले नव्हते. नवीन मंडळ अस्तित्वात येईपर्यंत जुन्या मंडळाचे अस्तित्व ठेवायला हवे, अशी तरतूद यायला हवी. येथील मंडळाचे १२ वर्षे लेखापरीक्षण झालेले नाही. त्यामुळे खरंच कायद्याच्या तरतुदींचे पालन होते का? याबाबत पारदर्शकता यायला हवी. हे एक उदाहरण असले, तरी एकूणच माथाडी मंडळांच्या कारभाराची चौकशी व्हायला हवी. सदस्य मंडळ आले आहे. आता आम्ही याबाबत माहिती घेऊ. राज्य माथाडी मंडळाच्या सल्लागार सदस्यपदी मी काम पाहत आहे. येथे सदस्यांच्या सभांमध्ये सातत्य नाही. माथाडी कक्ष निर्माण होऊनही त्याचा विशेष लाभ राज्यपातळीवर झालेला नाही. त्यामुळे येणाऱ्या अनुभवातील अडचणी सोडवून माथाडी कायद्याचे पुनर्मूल्यांकन व्हावे आणि मंडळांना मार्गदर्शक सूचना देण्यासाठी स्वतंत्र आयोग नेमावा, ही आमची मागणी आहे.

दैनिक लोकयुग

विधानपरिषदेवर हमालांना प्रतिनिधीत्व देण्याची सरकारकडे मागणी

हमालांना 'माणूसपण' मिळवून दिल्याचे मोठे समाधान-कोरपे

अहमदनगर : गेली २२ वर्षे हमालांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करताना त्यांना 'माणूसपण' मिळवून दिल्याचे मोठे समाधान आपल्याला आहे. मात्र, असे असले तरी राज्यातील प्रत्येक मार्केट यार्डमध्ये हमालभवन, त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण, दवाखाने आणि विधानपरिषदेवर कष्टकरी जनतेचा म्हणून हमालांचा प्रतिनिधी असावा, या मागणीसाठी कामगार नेते बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली आपला लढा यापुढेही चालूच राहणार आहे, असे महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी संघटनेचे उपाध्यक्ष आणि नगर जिल्हा हमाल पंचायतीचे सरचिटणीस अप्पा कोरपे यांनी 'दै. लोकयुग'शी बोलताना सांगितले.



''मी तो हमाल'' या स्वतःच्या अनुभवावरील पुस्तकामुळे संपूर्ण महाराष्ट्रभर परिचित झालेल्या अप्पा कोरपे यांना मुंबईच्या मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीचा राज्यस्तरीय कामगारांसाठी असणारा यंदाचा 'कलारत्न' पुरस्कार प्राप्त झाला आहे. १९७८ पासून बाबा आढाव आणि शंकरराव धुले यांच्या नेतृत्त्वाखाली हमालांच्या प्रश्नांवर सतत लढा देवून त्यांना 'प्रतिष्ठा' मिळवून देण्याचे काम अप्पांनी केले. त्यांच्या 'मी तो हमाल', 'भारवाही', 'भाकर' आणि 'जाई' या पुस्तकांचे कौतुक झाले. राज्य पातळीवरील अनेक संस्थांचे पुरस्कार त्यांना मिळाले. हमालांच्या जीवनात स्थैर्य यावे यासाठी सतत काम करणाऱ्या अप्पांच्या मते हमालांचे अनेक प्रश्न अद्यापि प्रलंबित आहेत. याबाबत त्यांच्याशी झालेली ही बातचीत.

प्रश्न : हमालांचे कोणते प्रश्न मार्गी लागले ?

आजची मुलाखत

कोरपे : *आपण स्वतः हमाल म्हणून काम केले असल्याने या कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९७८ मध्ये नगरला हमालपंचायतीची स्थापना केली. त्यावेळी हमालांना मानाची वागणूक मिळत नव्हती, एकत्रित आलो तर आहे तेही काम मिळणार नाही, अशी भीती त्यांच्यामध्ये होती. मात्र, ही भीती दूर करण्याचे काम आपण सर्वांच्या मदतीने केले. त्यावेळी हमाल पंचायतीचे ५०० च्या आसपास सभासद होते. आता जिल्हाभर ही संख्या अडीच हजारांवर गेली आहे. हमालांना कोणी वाली नसल्याने त्यांच्यासाठी कायदे करावेत, अशी मागणी सरकारकडे बाबा आढाव यांच्या नेतृत्त्वाखाली झाली. अनेकदा संप पुकारला. कामाच्या प्रमाणात हमालांना मोबदला मिळावा यासाठी संघर्ष केला. हमालांच्या घरकुल वसाहतीसाठी जागा मिळविली. रात्री ८.३० नंतर हमाल काम करणारी नाही, असे ठरविण्यात आले. त्यांना सुट्या मिळू लागल्या. सततच्या मागणीमुळे सरकारने माथाडी बोर्डाची निर्मिती केली. त्यामुळे एका हमालाने दिवसभर शंभर रूपयांचे काम केले तर त्याला २५ रूपये तरी मिळू लागला. माथाडी बोर्डामुळे हमालांच्या जीवनात स्थैर्य आले. नगरला कष्टाची भाकर, रुग्णालय, हमालांसाठी पतसंस्था आदी सुविधा हमाल पंचायतीच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या.*

प्रश्न : *हमालांचे आणखी कोणते प्रश्न आहेत ?*

कोरपे : *हमालांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम झाले असले तरी याबद्दल आपण अद्यापि समाधानी नाही. प्रत्येक मार्केट यार्डमध्ये हमाल भवनाला जागा मिळावी, त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळावे, दवाखान्यासाठी लेव्हीतून एक टक्का रक्कम मिळावी आणि विधानपरिषदेवर हमालांचा प्रतिनिधी असावा या मागण्यांसाठी सरकारकडे पाठपुरावा चालू आहे. मातेऱ्याचे काम करणाऱ्या महिलांना माथाडी बोर्ड लागू व्हावा यासाठीही आपले प्रयत्न आहेत. हमाल उपरा राहू नये, यासाठी एकजुटीने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आपण केला आहे. हमालांच्या खात्यावर दोन पैसे बाजूला पडू लागले आहेत. भविष्यनिर्वाह निधीत लाखांच्या रकमा जमा झाल्या यामध्ये मोठे समाधान आहे. हमालांची दारुची व्यसने कमी व्हावीत यासाठीही आमचे सतत प्रयत्न आहेत आणि त्याला यशही येत आहे.*

– नंदकुमार सांतपुते

लोकसत्ता-अहमदनगर

लोकसत्ता

बुधवार, ७ फ्रे. १९९९

पेक्षितांसाठी लढणारी काच, पत्रा कष्टकरी पंचायत

शहरात औद्योगिक क्षमता संघटित झाल्याच्या घटनेस साठहून अधिक वर्ष लोटली. नंतर सामाजी कर्मचारी संघटित झाले. यांच्या तुलनेमध्ये असंघटनेची मजूर, शेतमजूर पेक्षित येतो. या कारणा पेक्षितांची परिस्थिती बरेच प्रमाणात असंघटित दर्जाप्रमाणेच वर्ग आहे. हे असंघटित कारणाचा गरीब, लहान मुले-मुली फिरताना दिसतात. त्यांचेच ही संघटना आहे. काच, बाद, पत्रा गोळा करून त्यांतून उपजीविका कारणाऱ्या या कष्टकऱ्यांना बरोबर घेवोन आज पेतला आहे. आपल्या परगात ते फिरू लागले की, त्यांच्याकडे संशयाने पहिले जाते. चोरी झाली की, पोलिसही लगेच पकडून नेतात.

संघटनेने अल्प परंतु भक्कम उठावाचे यांना हा आदेश मान्य नाही. ते म्हणतात की, साप बगडून पूर्ण बेशरमाचा हा झाला आहे. आपले उपजीविकेचे साधन जर काच, प्लॅस्टिक, भंगार गोळा करणे आहे, त्यासाठी आम्हाला सतत फिरावे लागते, ता आम्ही चोरी करून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड कशासाठी मारून घेऊ? तात्पुरत एखादी वस्तू घरातली दिसली, ता. बोटाक्षकलक्षकन आपण्याही ती वस्तू उचलण्यात येत असेलच ना?

श्री. उडाणशिवे यांच्यासोबत आजाराम साबळे, रेणाप्पा शिवलिंगे, विमल लोंढे, बौजा गिरि, हिरा भास्कर, सुमन घोरपडे, गिरजा उडाणशिवे ह्रेही संघटनेचे मुख्य पदाधिकारी आहेत. संघटनेचे कार्यालय अलीकडेच सुरू झाले.

संघटन स्थापन करुनि सुमारास दोन वर्षांचा कालखंडी लोटला. पण केले संघटनेने या दोन वर्षांत? श्री. उडाणशिवे सांगतात की, 'नुस

कामगार-वाहिनी

साहत आता पहाटेस कामाची सुरुवात २०० ते २५० लोक आहेत. यातील बहुतेक एसवडी झोपडपट्टीमध्ये राहतात. नगर जिल्हाहत ही संख्या ६०० ते ७०० एवढी जाते. या सर्वांना संघटित करने बरा आहे.

या कष्टकरी भीतला पहाटे चार-साह वजावत पहीला पेरे घेऊन काच, प्लॅस्टिक गोळा करण्यास सुरुवात करतात. दिवसभरात १२-१३ तास वणवा फिरल्यावर साधारणपणे दिवसभरात प्लॅस्टिक, काच, बाद, पार्श्वजोडी वगैरे व्यापाऱ्यांकडे जमा करतात. तेव्हा कोटे त्यांना ३५ ते ४० रुपये मिळतात. हेच पोन हातगाडीस भंगार गोळा करणाऱ्या पुरुषांच्या नीतीची आहेत.

संघटित करण्याच्या कामकाजेतर हा काही आजचा उडीविकेचा मुद्दा मार्ग नाही. याबरहत संघटन या कष्टकऱ्यांची जातूनी करीत आहे. त्यासाठी आपल्या मुलांना शिक्षणाचे महिने, याची जाणीव संघटन करून देत आहे. आर्थकतीत दोन पैसे मिळविण्यासाठी बहो घटनाच्या संघटने त्यांची मुले शाळेकडे वळतील, याबाही प्रयत्न चालविले आहेत. दानशू व्यक्तींच्या भेटून या मुलांना शालेय साहित्य, गणवेश उपलब्ध करून दिले जात आहेत.

संघाचकन पोलिसांनी पकडून नेण्याचा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना नगरची काही लागते. आणी उपेक्षित कष्टकरी असतो, ती योजना करणारे नाहीत, हे पक्कड रेणवार काम कारवे लागते. त्यापलीकडे संघटने आता च कष्टकऱ्यांच्या रास्तापलिषने अंळवण्यास घरे, असे मागणी केली आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महापलिकेने अशी अंळवणने दिली आहेत.

संघटनेच्या माहनुसा साठहोत सुमारे२०० रबरे करण हे कष्टकरी उपलब्ध. त्यापुरते च कष्टकऱ्यांना आयोपयोगिकेचा दर्जा द्यावा, मागही करण्या काच्या तान् द्यावा, तसेच कष्टकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी निवृत्तिवेतन घरे, रहिवासेस्थानीत कार्ड घरे आदी मागण्या संघटनेने केल्या आहेत. दुर्दैवाने साबरी पडलीस च उपेक्षितांसाठी एकही योजना नाही. रहिवासेस्थानीत कार्डाविषयीत त्यांना मिळाले नाही.

वर्षभर ट्रिब्यूतीत १२-१३ तास काम करावेत लागते. वृद्धे कष्टकरी दिवसभर वण केलेला भात, फ्रेशन ज्याची भन पाहून भगतात, रडत बद झालेला त्यामधे भन देत नाहीत, अशी संघटनेची तक्रार आहे. सरकारने भन उपलब्ध द्यावेत, अशी संघटनेची मागणी आहे. कष्टकऱ्यांनी वण केलेल्या भत आपण खोटी बनन हे मोळव व्यापऱ्यांनन मिळा येतेि यावेही वारणी संघटन करीत आहे.

भंगार जमा करण्याचा कष्टकरी आपले उदरनिर्वाहेचे साधन मोनत आहते. तरी कर्ज रेणाऱ्या वित संस्था, बँका त्यांची दखल घेत नाहीत. त्यामुले कर्ज मिळा नाही. परिणामी इतर उद्योग-व्यवसाय करण्यासाठी पतस्था मिळत नाही आणि काच, पत्रा, वण जमा करण्याच्या चक्रातून कष्टकऱ्यांची सुटका होत नाही, अशी खेद संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होते.



डावा, डावा, पत्रा गोळा करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या संघटनेचे कार्यालय नुकतेच नगर सहरजीत हमाल पंचायतमधे स्थापन करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे, आजाराम साबळे, रेणप्पा शिवलिंगे आदी उपस्थित होते.

■ मोहनीराज लहाडे


'मी तो हमाल'
एक जगावेगळे आत्मकथन

कर्मधर्म संयोगाने मी २० जून रोजी अहमदनगर येथे गेलो होतो. पहाटे पावणेपाच वाजताच आमची गाडी तिथे पोहोचल्यामुळे आणि तिथे कोणाच्याही ओळखी नसल्यामुळे मला बसस्टॅण्डजवळीलच पर्यंत नावाच्या लॉजमध्ये थोडा वेळ थांबावे लागले. थोडा वेळ आराम करून सकाळीच चहा घ्यावा व वृत्तपत्रे घ्यावीत, या उद्देशाने मी बाहेर पडलो आणि नियतीने ठरविल्याप्रमाणे आप्पा कोरपे नावाच्या एका नव्वदवृद्ध व्यापाऱ्याची भेट झाली. माणसाशी संवाद साधावयाचा, त्यांचे जीवन समजून घ्यावयाचे आणि जमलेच तर ते आगळे-वेगळे तत्त्वज्ञान वाचकांपर्यंत पोहोचवायचे, अशा प्रकारची साधना गेली २५ वर्षे मी करीत आलो असल्यामुळे स्वाभाविकच आप्पा कोरपे यांनी एक ग्रंथ लिहिला आहे, असे मला समजले आणि त्यांनी पहिल्या भेटीतच मला 'मी तो हमाल' या आत्मचरित्राची एक प्रत दिली आणि यावर चांगले काहीतरी लिहा, असा मला आदेश दिला. त्यांचे वय जवळजवळ ७१ वर्षे असल्यामुळे एक पित्यासमान माणूस आपल्याला काही आज्ञा देतो आहे, असे समजून मी गेले दोन दिवस या ग्रंथाचा अभ्यास केला आणि मला असे वाटले की, जगामध्ये हजारो भाषांमध्ये अशा प्रकारचे आत्मचरित्र केवळ हेच एकमेव असावे. आश्चर्य म्हणजे स्वत: आप्पा कोरपे यांना हा ग्रंथ लिहीपर्यंत लिहिता-वाचता येत नव्हते. ते पूर्णत: निरक्षर होते; परंतु त्यांनी आपले अनुभव कथन केले आणि त्याची कॅसेट तयार केली आणि त्या कॅसेटवरून आश्विनी कावळे या भगिनीने या



आत्मचरित्राच्या लेखनाचे काम केले. मराठीतील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समीक्षक प्रा. डॉ. गंगाधर मोरजे यांनी या ग्रंथाला प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली. महाराष्ट्रातील हमाल मापाडी संघटनेचे अध्यक्ष बाबा आढाव आणि इतर सज्जनांनी सर्वतोपरी सहकार्य केले आणि म्हणूनच हे अद्वितीय आत्मचरित्र आज चार आवृत्त्या होऊन महाराष्ट्रातील सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे. या आत्मचरित्राची पहिली आवृत्ती जून १९९२ मध्ये निघाली आणि त्यानंतर विविध संघटना आणि व्यक्ती यांनी आप्पा कोरपे यांना आजवर जवळजवळ २ लाख रूपयांचा पुरस्कार दिलेला आहे. एका विद्यापीठाने काही काळ हे आत्मचरित्र एका वर्गाला अभ्यासक्रमाला लावले होते, यावरून या ग्रंथाचे महत्त्व आपल्या सहज लक्षात येऊ शकते.

आप्पा कोरपे यांचा जन्म जवळजवळ १९३६ चा. जामखेड आणि आष्टी परिसरामध्ये भालवणी नावाच्या छोट्या खेड्यात आप्पांचा जन्म झाला. ते लिंगायत समाजाचे परंतु भयानक दारिद्र्यामुळे त्यांना वाट्टेल ती कामे करावी लागली, कधी गुरे वळवावयाची, कधी भुसाराचे दुकान चालवायचे तर कधी एस.टी. स्टॅण्डवर चहाचे कँटिन चालवावयाचे. एवढेच नव्हे तर बरासी खोदण्याचे काम देखील त्यांनी केलेले आहे. शेवटी अहमदनगर येथे येऊन त्यांनी हमालीचे काम करून प्रचंड प्रयत्नांनी हमालांची संघटना बांधून आज त्यांचे सुखाचे जीवन घडविलेले आहे. त्यांच्या संपूर्ण जीवनामध्ये प्रयत्नांची पराकाष्ठा दिसते. एक अद्वितीय व्यवहारी शहाणपण त्यांच्याजवळ असल्यामुळे आणि जात्यात वाणी समाजाचे असल्यामुळे ज्या ज्या व्यवहारामध्ये फायदा होईल ते ते व्यवहार करीत गेले आणि आज अहमदनगर येथे सहकार सभागृह मार्ग या मोक्याच्या ठिकाणी कोपऱ्यावरील खूप मोठा प्लॉट घेऊन त्यांनी मोठे घर आणि दुकान बांधलेले आहे. माझ्या समजुतीप्रमाणे या प्लॉटचीच किंमत आज २५ लाखांच्या पुढे जाऊ शकते. त्यावरील त्यांनी केलेले बांधकाम जवळपास १० लाख रूपयांचे असू शकते. प्रचंड परिश्रमातूनच हे साध्य केलेले आहे. आपल्या स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास, प्रचंड आत्मविश्वास, इतर सर्वांबद्दल सहानुभूती आणि प्रेम, जात-पात मानावयाचीच नाही, सर्व


आप्पा कोरपे हमाली करते वेळीचे चित्र.

कष्टकऱ्यांवर प्रेम करायचे, दिलेल्या शब्दाला जागायचे आणि मुख्य म्हणजे पापभिरू जीवन यामुळे आप्पा कोरपे हे आज महाराष्ट्रात सर्वांनाच माहीत असलेले नाव झालेले आहे. बाबा आढाव असोत किंवा प्रसिद्ध सिने आणि नाट्य कलाकार निळू फुले असोत किंवा अण्णा हजारे असोत सर्वांनीच आप्पांच्या सद्गुणांचा आणि त्यांच्या जीवनाचा सत्कार केलेला आहे. त्यांनी लिहिलेल्या या ग्रंथामुळे त्यांच्या जीवनामध्ये खरोखरच आमुलाग्र बदल झालेला आहे. या १३६ पानांच्या ग्रंथाची सर्वांगाने आणि पुरेपूर समीक्षा करावयाची म्हटले तर मला किमान सात-आठशे पानांचा टीका ग्रंथच लिहावा लागेल. पाच-सहा वर्षे माझी प्रकृती चांगली राहिली तर इंग्रजीमधून असा ग्रंथ लिहिण्याची मी योजना आखीत आहे आणि एखाद्या अमेरिकन विद्यापीठाला हा ग्रबंध सादर करण्याची माझी इच्छा आहे. मला पूर्ण खात्री वाटते की, अमेरिकेतील कुठलेही विद्यापीठ अशा समीक्षा ग्रंथाला आनंदाने आणि सर्वसंमतीने डी.लिट् सारखी पदवी देईल. आप्पा कोरपे यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तर भारतातील एका प्रकाशन संस्थेने या ग्रंथाचे हिंदीत भाषांतर प्रकाशित केलेले आहे. भारतातला एखादा सज्जन या ग्रंथाचे इंग्रजीतही भाषांतर करेल, असा मला विश्वास वाटतो. सर्व मराठी भाषिक सज्जनांनी या ग्रंथाचे जरूर अवलोकन करावे आणि आप्पा कोरपे यांच्याशी काही संवाद साधावयाचा असेल तर ०२४१-२४५०९०१ आणि २४५०९९९ या फोन नंबरवर संपर्क साधावा.

– प्राचार्य डॉ. विलास कुमठेकर, नांदेड.
फोन : ०२४६२-२६०००९

अहमदनगर, बुधवार दिनांक ३.३.२०१० अंक नं. १७८

न्यायहक्कांसाठी कष्टकऱ्यांची १० मार्चला शहरातून रॅली

नगर– शहरात फिरून कागद वेचणारे, डबा, बाटलीवाले, भंगार, घंटागाडी, काच, पत्रा इत्यादी कष्टकरी आपल्या न्यायहक्कांसाठी येत्या बुधवारी (दि. १०) रॅली काढून शासनाकडे दाद मागणार आहेत. सकाळी ११ वाजता रामवाडी, सर्जेपुरा येथून ही रॅली निघणार असून, यात शहर व जिल्ह्यातील कष्टकरी सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे यांनी दिली.

रामवाडीपासून निघणारी ही रॅली नगर शहरातून प्रमुख मार्गांवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर जाणार आहे. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी व मनपाचे आयुक्त यांच्याशी चर्चा करून निवेदन देणार आहे. तरी सर्व कष्टकरी बंधू-भगिनींनी रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन उडाणशिवे यांनी केले आहे.

या रॅलीमध्ये कष्टकऱ्यांसाठी दवाखाना सुरू करावा, प्रा. फंड, विमा इत्यादी सामाजिक सुरक्षा देणाऱ्या योजना मिळाव्यात, या कुटुंबांना दारिद्र्यरेषेचे पिवळे रेशनकार्ड मिळावे, कष्टकरी महिलांच्या बचत गटांना प्राधान्य द्यावे, कष्टकऱ्यांना माथाडी कायदा लागू करावा, महापालिकेने त्यांना ओळखपत्र द्यावे, घनकचरा योजनेत या कर्मचाऱ्यांचा समावेश व्हावा, मनपाच्या घंटागाडीवर दोन कष्टकऱ्यांची नेमणूक करावी, गोळा केलेल्या कचऱ्याची विभागणी करण्यासाठी मनपाने औद्योगिक वसाहतीमध्ये २ हजार चौरस फुटांची जागा द्यावी, सरकारने त्यांना घर आदि सुविधाही द्याव्यात आदि मागण्या करण्यात येणार आहेत.

रॅली यशस्वी करण्यासाठी संघटनेचे रंगनाथ लोंढे, आसाराम साबळे, बापू चखाले, विमलबाई मंडलिक, कृष्णाबाई लोखंडे, जगन रणशिंग, मच्छिंद्र शेलार आणि असंख्य कष्टकरी कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

भीड, स्पष्ट प्रबोधनात्मक मराठी वृत्तपत्र
दाङ्गरा
समाज मनाचं प्रतिबिंब
बुधवार दि. ३ मार्च २०१० पाने-४. किंमत १ रुपया

नगरात कागद, काच, पत्रा कष्टकऱ्यांचे १० ला रॅली



अहमदनगर (प्रतिनिधी) – शहरात फिरून कागद वेचणारे, डबा, बाटलीवाले, भंगार, घंटागाडी, काच,पत्रा इत्यादी कष्टकरी आपल्या न्याय हक्कासाठी येत्या बुधवारी (ता.१०) रॅली काढून शासनाकडे दाद मागणार आहेत. सकाळी ११ वाजता रामवाडी, सर्जेपुरा येथून ही रॅली निघणार असून, यात शहर आणि जिल्ह्यातील कष्टकरी सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे यांनी दिली.

श्री. उडाणशिवे पुढे म्हणाले, तळागाळातील शेवटच्या कष्टकरी माणसाला सुविधा व प्रतिष्ठा मिळणे हा भारतीय लोकशाहीचा विजय आहे. पण आजवर कष्टकऱ्यांना बरोबरच्या नात्याने वागविले जात नाही. ही माणसे देखील नवनिर्माणचे काम करतात. हे सरकारला पटवून दिले पाहिजे. यासाठी ही रॅली आहे.

(पान ३ वर)

नगरात कागद,


(पान १ वरुन) रामवाडीपासून निघणारी ही रॅली नगर शहरातून प्रमुख मार्गावरून जिल्हाधिकारी कार्यालयावर जाणार आहे. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी व मनपाचे आयुक्त यांच्याशी चर्चा करून निवेदन देणार आहे. तरी सर्व कष्टकरी बंधु-भगिनींनी रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन श्री उडाणशिवे यांनी केले आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील बहुसंख्य कागद, काच, पत्रा कष्टकरी संघटीत असून, त्याचे संघटन राष्ट्रीय स्तरावर आता होत आहे. जीवापाड कष्ट करूनही जेमतेम रोजच्या भाकरीची सोय करू शकतात. कधीकधी तीही मिळत नाही. सुट्टीचा तर हे कामगार विचार करीत नाही. पण आरोग्याचा प्रश्न आहे. यासाठी ही रॅली आहे. तरी कागद, काच, पत्रा गोळा करणाऱ्या लोकांनी आता आपली ताकद शासनाला दाखवली पाहिजे.

या रॅलीमध्ये कष्टकऱ्यांसाठी दवाखाना सुरु करावा, प्रा. फंड, विमा इत्यादी सामाजिक सुरक्षा देणाऱ्या योजना मिळाव्यात, या कुटुंबांचा दारिद्र्यरेषेचे पिवळे रेशनकार्ड मिळावे. कष्टकरी महिलांच्या बचत गटांना प्राधान्य द्यावे, कष्टकऱ्यांना माथाडी कायदा लागू करावा, महापालिकेने त्यांना ओळखपत्र द्यावे, घनकचरा योजनेत या कर्मचाऱ्यांचा समावेश व्हावा, मनपाच्या घंटागाडीवर दोन कष्टकऱ्यांची नेमणूक करावी, गोळा केलेल्या कचऱ्यांची विभागणी करण्यासाठी मनपाने औद्योगिक वसाहतीमध्ये २ हजार चौरस फूटाची जागा द्यावी, सरकाराने त्यांना घर आदी सुविधांही द्यावेत आदि मागण्या करण्यात आल्या आहेत.

रॅली यशस्वी करण्यासाठी संघटनेचे रंगनाथ लोंढे, आसाराम साबळे, बापू चखाले, विमलबाई मंडलिक, कृष्णाबाई लोंखडे, जगन रणशिंग, मच्छिंद्र शेलार आणि असंख्य कष्टकरी कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

अप्पा कोरपेंच्या 'भाकर' कथासंग्रहास विवेकानंद श्रमसाहित्य पुरस्कार



नगर दि.१३ :- '' मी तो हमाल'' या प्रसिध्द आत्मकथनाचे लेखक श्री. आप्पा कोरपे यांच्या ''भाकर' या कथासंग्रहाला पुणे येथील '' स्वामी विवेकानंद श्रमसाहित्य पुरस्कार जाहीर झालेला आहे.

पुरस्कार समारंभ ३ जानेवारी २००२ रोजी चिंचवड- पुणे येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात ५ वा. होणार आहे.


पुरस्काराचे स्वरुप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि रोख रुपये ५०० असे आहे. पुरस्कार प्रदान प्रसंगी कामगार मंत्री डॉ. हेमंत देशमुख, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आणि कादबंरीकार शिवाजी सावंत उपस्थित राहणार आहेत.

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : संजय गुंदेचा

किंमत १.५० रुपया अहमदनगर, मंगळवार दिनांक ८.६.२०१० अंक नं. २५९ वर्ष ५३ वे

पान नं. ७



लेव्हीमध्ये वाढ झाली पाहिजे या मागणीसाठी जिल्ह्यातील सर्व हमाल मापाडी कामगारांनी आजपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले आहे. हमाल पंचायत येथे जिल्हाध्यक्ष शंकरराव घुले यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करताना हमाल मापाडी कामगार. यावेळी बाबा आरगडे, अप्पा कोरपे, गोविंद सांगळे, झुंबरराव आव्हाड, लक्ष्मीबाई सांगळे, बापू बडे आदि.

हमालांच्या बेमुदत संपामुळे जिल्ह्यात सर्वच बाजारपेठांचे कामकाज 'ठप्प'

कोट्यावधींची उलाढाल थांबली, संपाबाबत तोडगा नाही

नगर– विविध मागण्यांसाठी हमालांनी सोमवारी (दि. ७) सकाळपासून बेमुदत संप पुकारल्याने कृषि उत्पन्न बाजार समित्यांसह जिल्ह्यातील सर्वच बाजारपेठांचे कामकाज ठप्प झाले. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा इशारा हमाल पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव घुले यांनी दिला आहे.

हमाल कामगारांच्या प्रचलित लेव्हीत वाढ करावी, ५० किलो वजनापेक्षा जास्त वजनाची हाताळणी हमालांकडून करू नये, हमालांचे रात्रीचे राखण बंद करावे, शहरातील भुसार व भाजीपाला विभागातील काट्यापुढील हमालीत वाढ करावी आदि मागण्यांबाबत वेळोवेळी पाठपुरावा करूनही त्याबाबत प्रशासनाने दखल न घेतल्याने अखेर हमालांनी सोमवारपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला.

हमाल पंचायतीचे अध्यक्ष घुले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाव्यापी संप सुरू करण्यात आला. सकाळी हमाल पंचायत येथे घुले यांच्या उपस्थित होते. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. मागण्यांबाबत प्रशासनाबरोबर झालेल्या बैठकांना गैरहजर राहून व्यापाऱ्यांनी हमालांची क्रूर चेष्टा चालविल्याचा आरोप घुले यांनी यावेळी केला.

नगरसह जिल्ह्यात सर्वच तालुक्यांच्या ठिकाणी हमालांनी एकत्र येऊन निदर्शने केली. हमालांच्या बेमुदत संपामुळे कृषि उत्पन्न बाजार समित्यांसह सर्वच बाजारपेठांचे कामकाज ठप्प झाले आहे. संपामुळे शेतीमालासह अन्य वस्तूंची आवक न झाल्याने बाजार समित्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. संपामुळे कोट्यावधी रुपयांची उलाढाल थंडावली असून, व्यापाऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्रतिक्रिया व्यापाऱ्यांनी दिली. आडते बाजार, डाळमंडई, मार्केट यार्डसह अन्य बाजारपेठांत संपामुळे दिवसभर शुकशुकाट होता.

दरम्यान, मागण्यांबाबत तोडगा काढून संप मागे घेण्याबाबत प्रशासनाने दुपारपर्यंत

दानक

संस्थापक- स्व. पोपटलालजी मुनोत

नगर टाइम्स

प्रेका- श्रीमती मीना वसंतलाल मुनोत. फोन नं. २३४५२५५,२३४६४३२, नि.:२३४६२५२ कार्यकारी संपादक



हमाल माथाडी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पी. अन्बलगन. समवेत जिल्हा पुरवठा अधिकारी गुलाबराव खरात, हमाल पंचायतचे अध्यक्ष शंकरराव घुले, सल्लागार ॲड. लक्ष्मण वाडेकर, बाबा आरगडे, विष्णूपंत म्हस्के आदी. (छाया/राजू खरपुडे, नगर.)

हमाल माथाडी कामगारांच्या प्रश्नी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न

नगर, दि.२८:- जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने हमाल माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांसंदर्भात बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत हमाल माथाडींच्या विविध मागण्यांबाबत चर्चा करून शासन नियमाप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे ठरविण्यात आले.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पी.अन्बलगन, निवासी उपजिल्हाधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी गुलाबराव खरात, हमाल पंचायतचे अध्यक्ष शंकरराव घुले, सल्लागार ॲड. लक्ष्मण वाडेकर, बाबा आरगडे, विष्णूपंत म्हस्के, माथाडी मंडळाचे कामगार आयुक्त जी.पी. आव्हाड, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे सोनवणे, अप्पा कोरपे, गोविंद सांगळे, पी.एन. लोंढे, हरिभाऊ आजगे, अनुरथ कदम आदींसह हमाल व माथाडी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पी. अन्बलगन म्हणाले की, हमाल माथाडी व इतर श्रमजीवी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त मालाची हाताळणी करण्यात येऊ नये, यासाठी लोकजागृती करावी. जिल्हा उपनिबंधकांनी याबाबत बाजार समितीला कळवून तत्काळ चर्चा करण्यास त्यांनी सांगितले. लेव्हीचा प्रश्न सोडविण्यासाठी कामगार आयुक्तांनी १५ दिवसांत रिपोर्ट सादर करावा. घरकुलाबाबत हमाल पंचायतीने प्रस्ताव दिल्यानंतर त्याच्या तात्काळ अंमलबजावणीसाठी कार्यालयाच्या वतीने प्रयत्न करण्यात येतील. एमआयडीसीमध्ये कामगारांना माथाडी कायदा लागू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी हमाल माथाडींच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून ते सोडविण्याच्या दृष्टीने योग्य पावले उचलण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. कामगारांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचाही यावेळी उहापोह करून याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. एकनाथ कोरडे, सतीश शेळके, मधुकर केकाण, बाबा पठाण, अर्जुन राऊत, रोहिदास ढाकणे, किसन सानप आदी उपस्थित होते.

व्यापाऱ्यांवर करण्यात आलेले सर्व आरोप खोटे

माथाडी कामगारांनी आंदोलन केल्यास जिल्ह्यातील व्यापारी योग्य उत्तर देतील

झुंबरलाल बोथरा

नगर– माथाडी कामगारांनी केलेल्या मागण्या बेकायदेशीर आहेत. त्याचबरोबर व्यापारी संघावर केलेले आरोपही खोटे आहेत. हमालांनी केलेल्या आंदोलनास उत्तर देण्यास व्यापारी संघ समर्थ आहे, अशी माहिती झुंबरलाल बोथरा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हमाल पंचायतीद्वारे आयोजित बैठकीस व्यापारी प्रतिनिधी हजर राहिले नाही हा आरोप खोटा आहे. पंचायतीने बैठक आयोजित केल्याचे पत्र दिले होते, परंतु जिल्ह्यातील प्रतिनिधींशी अल्पवेळेत संपर्क होऊ शकला नाही. तर एका बैठकीच्यावेळी सह. कामगार आयुक्त यांच्यावर झालेल्या कारवाईमुळे बैठक पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे नियोजित मिटींगबाबत साशंकता निर्माण झाल्याने प्रतिनिधी उपस्थित राहू शकले नाही.

हमालीत वाढ झाल्यास लेव्हीत वाढ होते. व्यापाऱ्यास एक रुपयात ३ पैसे मिळतात तर हमालास ३० पैसे मिळतात. असे असताना व्यापाऱ्यांना वेठीस धरणे योग्य नाही, असेही बोथरा म्हणाले.

मुंबई, पुणे सोडता राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये नगरमध्ये सर्वात जास्त लेव्ही आहे. असे असताना लेव्हीत वाढ करण्याचा अधिकार व्यापारी संघाला नाही. लेव्ही पन्नास पेक्षा जास्त असू नये, अशी शासनाने सूचित केलेले आहे.

५० किलोपेक्षा जास्त आधारे जिल्ह्यास वेठीस धरणे योग्य नाही. याबाबत शेतकऱ्याची मानसिकता तयार होऊन हमाल संघटनेने केलेल्या मागणीचा विचार करावा, असे पत्र जिल्हा उपनिबंधकांना देण्यात आलेले आहे. हमालाकडून रात्रीचे राखण करून घेतले जाते असा आरोप केला जातो, परंतु प्रत्यक्षा रात्रीचे राखण कोणी करून घेत नाही. हा आरोपही बिनबुडाचा आहे.

हमालांनी संप केल्यास व्यापारी योग्य उत्तर देतील व या अवास्तव मागण्या मान्य करणार नाही. व्यापाऱ्यांकडून कोणाचीही अडवणूक होणार नाही. हमाल पंचायतीने मात्र दगडफेक व अनैसर्गिक घटना टाळाव्यात असे आवाहन केले. याचबरोबर माथाडी बोर्ड स्थापन करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

याप्रसंगी बापूसाहेब गवळी, संजय गवळी, प्रेमराज पितळे, अशोक गांधी, संतोष गुंदेचा, राजेंद्र डागा, सुरेश झंवर, संजय लोढा, संजय गांधी, शांतीलाल गांधी, नंदकुमार शिंगी, पोपट बोथरा आदि उपस्थित होते.

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : सजय गुदचा

किमत १.५० रुपया अहमदनगर, शनिवार दिनांक ९.१०.२०१० अंक नं. ५९ : वर्ष ५३

हमालांच्या पाठीवर यापुढे ५० किलो वजनाचे पोते

जानेवारी २०११ पासून निर्णयाची अंमलबजावणी होणार : उपनिबंधक कैलास वाबळे

नगर- नगर जिल्हा ाल संघटनेच्यावतीने ्या अनेक दिवसांपासून रू असलेल्या लढ्यास यश ाले असून, हमालांना यापुढे ाता फक्त ५० किलो जनाचे पोते पाठीवर द्यावे, सा निर्णय घेण्यात आला हे. या निर्णयाची १ नेवारी २०११ पासून मलबजावणी करण्यात ईल.

जागतिक श्रम संघटनेने ुलेल्या निर्णयाची मलबजावणी होण्यासाठी ा ा व्यापाऱ्यांमध्ये समेट डवून आणण्यात आला आहे. ाल पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी प्रश्न सोडविण्यासाठी सामंजस्य दाखविले. ामुळेच ५० किलो वजनाचे पोते हमालास वलण्यास देण्यात यावे, हा निर्णय घेणे शक्य ल्याचे जिल्हा उपनिबंधक कैलास वाबळे यांनी गितले.

जिल्हा निबंधक कार्यालयात हमाल व ापाऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात बैठक योजित करण्यात आली होती. याप्रसंगी श्री. ाबळे बोलत होते. याप्रसंगी हमाल पंचायतचे अध्यक्ष शंकरराव घुले, जिल्हा निबंधक कार्यालयाचे शिवाजी बनकर, माथाडी मंडळाचे निरीक्षक पी. एन. लोंढे, एस. सी. देवकर, बाबा आरगडे, अप्पा कोरपे, गोविंद सागळे, ॲड. लक्ष्मण वाडेकर, जिल्ह्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या व व्यापारी संघटनांचे सचिव, पदाधिकारी, शेतकरी प्रतिनिधी, हमाल प्रतिनिधी आदींसह हमाल व व्यापारी उपस्थित होते.

श्री. वाबळे पुढे म्हणाले की, हमालास ५० किलोच्या वर वजन उचलण्यास देऊ नये, याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. सर्व तालुक्यांतील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती, सचिव व पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाच्या जागृतीसाठी समितीच्या आवारात फलक लावावेत, असे ते म्हणाले.

याप्रसंगी बोलताना श्री. घुले म्हणाले की, हमालांना ५० किलोच्या वर वजन उचलणे शक्य होत नाही. बऱ्याच दिवसांपासून सुरू असलेल्या लढ्याला आता यश आले आहे. व्यापारी व हमाल यांच्यामध्ये समन्वय राखण्याचे काम हमाल पंचायतीच्यावतीने सुरू आहे. त्याचाच परिपाक म्हणून एकमेकांच्या संगनमताने वरील निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी, यासाठी हमाल पंचायत आता यापुढे प्रयत्नशील राहणार आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येईल, असे ते म्हणाले.


शेतकरी प्रतिनिधी राजाजी बुधवंत (शेवगाव), व्यापारी प्रतिनिधी बापूसाहेब गवळी, दत्तात्रेय डोंगरे (जामखेड) आदींनी विचार मांडले.



जिल्हा निबंधक कार्यालयात हमाल व व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात आयोजित बैठकीत बोलताना हमाल पंचायतचे अध्यक्ष शंकरराव घुले. समवेत जिल्हा उपनिबंधक कैलास वाबळे, शिवाजी बनकर, माथाडी मंडळाचे निरीक्षक पी. एन. लोंढे, एस. सी. देवकर आदी.

दानक
नगर टाइम्स
संस्थापक -स्व. पापटलालजा मुनोत
संपादिका - श्रीमती मीना वसंतलाल मुनोत. फोन नं. २३४५२५५,२३४६४३२,नि.२३४६३४३. कार्यकारी संपादक - नरहर कोरडे
शुक्रवार, दि.११ फेब्रुवारी २०११ nagar_times@indiatimes.com Regd.No.11457/65/PR/RNP/AN

५० किलोपेक्षा जास्त बोजा देऊ नये आंतरराष्ट्रीय श्रम परिषदेचा ठराव



नगर, दि.१०:- हमालांच्या स्वास्थासाठी १९४८ साली जागतिक श्रम संघटनेने ५० किलोपेक्षा जास्त बोजा माणसाच्या पाठीवर देऊ नये, असा ठराव आंतरराष्ट्रीय श्रम परिषदेत झाला. भारताने १९९९ साली त्याचा स्विकार केला. तसा ठराव ही केंद्राने घेतला. गेली ११ वर्षे आपल्या देशातील भांडवलदारांनी या ठरावाची अंमलबजावणी होवू न दिल्याचा आरोप नगर जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष शंकरराव घुले यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केला आहे.

नगर जिल्हा हमाल पंचायत गेल्या अनेक दिवसांपासून या मागणीचा पाठपुरावा करत आहे. दि.१९ मार्च २०१० ला मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. २८ एप्रिल २०१० च्या बैठकीत आश्वासन दिले. ६ जूनला संप पुकारला. ७ जूनला जिल्हाधिकाऱ्याने २ महिन्यात अंमलबजावणी करू, असे आश्वासन दिल्याने संप मागे घेण्यात आला. त्यानंतर पुन्हा काही न झाल्याने आंदोलनाचे हत्यार उगारतांच जिल्हाधिकाऱ्यांनी व्यापारी, हमाल संघटना, बाजार समिती संघटना व जिल्हा उपनिबंधकांची संयुक्त बैठक घेऊन जिल्हा उपनिबंधकांना कार्यवाहीचे आदेश काढण्याचे सांगत १ जानेवारी २०११ पासून हमालाच्या पाठीवर ५० किलोचेच ओझे असेल, असे लिखित आदेश जिल्ह्यातील बाजार समित्यांना दिले आहेत. (पान नं. ४ वर)

नगर टाइम्स शुक्रवार, दि.११/२/२०११

५० किलोपेक्षा जास्त....

(पान नं.१ वरुन)

१ जानेवारी पासून हमालांनी ५० किलो पेक्षा जास्त बोजा पाठीवर घेण्याचे बंद केले. शेतकऱ्यांची अडवणूक नको म्हणून त्यांचा माल उतरवला. व्यापाऱ्यांनी मात्र पुढील लिलालही केले नाहीत. तसेच ५० किलोचे कट्टेही भरले नाहीत.

जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून आ.राठोड यांनी धनदांडग्यांसोबत मुंबईला जाऊन मंत्र्यांच्या पी.ए.ला भेटण्यापेक्षा गरीब हमालांची कैफियत ऐकून त्यांच्या दु:खात सहभागी व्हायला हवे होते. मात्र तसे घडले नाही. शासनस्तरावर कुठलाही स्थगितीचा निर्णय झालेला नसताना व्यापारी हितासाठी संभ्रम निर्माण करणारी पत्रकबाजी केली. गरीबाच्या जीवनाशी राजकारणाचा खेळ करुन काय मिळाले? असा सवाल शंकरराव घुले यांनी केला आहे.

शासनाच्यावतीने ५० किलोपेक्षा जास्त बोजा उचलण्याच्या निर्णयाविरुद्ध कुठलाही फेर आदेश काढणार नाही, असे सांगण्यात आल्याचे डॉ.बाबा आढाव यांनी कळविले आहे. हमाल बांधवांनी पत्रकबाजीला बळी न पडता ५० किलोपेक्षा जास्त बोजा पाठिवर न घेण्याच्या निर्णयावर ठाम रहावे, असे आवाहन शंकरराव घुले यांनी केले आहे.

प्रगत विज्ञानाच्या युगामध्ये मानवीश्रमाच्या मर्यादा लक्षात घेऊन मानवतेच्या दृष्टीकोनातून कायद्याची रचना होत आहे. जन्मभर १ ते दीड क्विंटलचा बोजा पाठीवर घेऊन मणक्याच्या, पाठीच्या, गुडघ्याच्या आजाराने हमाल बांधव त्रस्त होत आहेत, असे शंकरराव घुले यांनी म्हटले आहे.

बांधकाम कामगारांना दोन लाखाचे आरोग्य विमा कवच



औरंगपदनगर जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार संघटनेच्यावतीने हमाल पंचायत येथे आयोजित कामगारांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ समाजसेवक डॉ.बाबा आढाव. समवेत कार्याध्यक्ष शंकरराव घुले, सहाय्यक कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ, सरचिटणीस नंदू डहाणे, कॉ.बाबा आरगडे, प्रशांत नाईकवाडे, डॉ.वीर, डॉ.शरद जगताप, संजय वालझडे आदी उपस्थित होते. (छाया – साजीद शेख)

नगर – नगर जिल्ह्यातील इमारत बांधकाम कामगार मंडळाचे सभासद असणाऱ्या कामगारांचा मेळावा हमाल पंचायत, मार्केटयार्ड, अ.नगर याठिकाणी संपन्न झाला. प्रारंभी जवखेडे खालसा येथील दलित हत्याकांडातील निघृण हत्या झालेल्या संजय जाधव, जयश्री जाधव, सुनील जाधव यांना तसेच ज्येष्ठ अभिनेते सदाशिव अमरपूरकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

इमारत बांधकाम कामगार मंडळाचे सभासद होऊनही मंडळाचे विविध लाभाबाबत कोणतीही कल्पना नसल्याने या योजनेपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे बांधकाम कामगारांना प्रामुख्याने आरोग्य विमा योजनेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यास अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ समाजसेवक डॉ.बाबा आढाव उपस्थित होते.

देशात शेतमजुरानंतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या जवळपास ४ कोटीच्या आसपास आहे. या सर्व कामगारांसाठी शासनाने कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली असून कोणत्याही इमारतीची मंजुरी होताना शासनाकडे कामगारांच्या कल्याणासाठी नॅ १% सेस कायदा लागू


पडून आहेत त्याचा फायदा सर्व कामगारांनी घ्यावा असे आवाहन डॉ.बाबा आढाव यांनी केले.

मेळाव्यास जिल्ह्याचे साहाय्यक कामगार आयुक्त श्री.बाळासाहेब वाघ उपस्थित होते. त्यांनी सर्व कामगारांना त्यांना लागू असलेल्या लाभाविषयी मार्गदर्शन करून कामगारांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांचे निरसन केले. औरंगाबाद विभागाचे प्रशांत नाईकवाडे यांनी उपस्थित सर्व कामगारांना व उपस्थित असलेल्या डाक्टर्सना मार्गदर्शन केले.

मेळावा यशस्वी करणेकामी संघटनेचे उपाध्यक्ष श्री.भारतभूषण यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संघटनेचे खजिनदार श्री.पावलस भिंगारदिवे यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

संघटनेचे कार्याध्यक्ष श्री.शंकरराव घुले, अध्यक्ष कॉ.बाबा आरगडे, सरचिटणीस नंदू डहाणे, डॉ. गिते हॉस्पिटलकडून आलेल्या प्रतिनिधी म्हणून शेख शहनाज उपस्थित होत्या.

दिनांक १२.६.२०१४



बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या हमाल पंचायत येथे आयोजित मेळाव्याप्रसंगी शासनाच्या कल्याणकारी मंडळाच्या वतीने गृहोपयोगी वस्तू घेण्यासाठी ३ हजारांच्या धनादेशाचे वितरण राज्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष योगीराज खोंडे. समवेत संघटनेचे कार्याध्यक्ष शंकरराव घुले, अध्यक्ष कॉ. बाबा आरगडे, सरचिटणीस नंदू डहाणे, अशोक बाबर, मुन्नाशेठ चमडेवाले, पवन भिंगारदिवे, रमेश गोरे, पैठणकर आदी.

राज्य शासनाने स्थापन केले कल्याणकारी मंडळ

बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना मिळणार ३ हजार रुपये

शंकरराव घुले यांचे प्रतिपादन

नगर - राज्य शासनाने नुकतेच कल्याणकारी मंडळ स्थापन केले असून, या मंडळाच्या माध्यमातून कामगारांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना गृहोपयोगी वस्तू खरेदीसाठी ३ हजार रुपये देण्यात येणार आहेत. हा चांगला उपक्रम आहे, असे प्रतिपादन कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष शंकरराव घुले यांनी केले.


बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या हमाल पंचायत येथे आयोजित मेळाव्याप्रसंगी शासनाच्या कल्याणकारी मंडळाच्या वतीने गृहोपयोगी वस्तू घेण्यासाठी ३ हजारांच्या धनादेशाचे वितरण राज्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष योगीराज खोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. घुले बोलत होते.

याप्रसंगी सहाय्यक कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ, अध्यक्ष कॉ. बाबा आरगडे, सरचिटणीस नंदू डहाणे, अशोक बाबर, मुन्ना चमडेवाले, पवन भिंगारदिवे, रमेश गोरे, पैठणकर आदी उपस्थित होते.

श्री. घुले पुढे म्हणाले की, आपण सुमारे ३५ वर्षांपासून कामगार व हमालांसाठी खर्ची घातले आहेत. येथून पुढे आपले संपूर्ण आयुष्य कष्टकरी कामगारांसाठी देणार आहे. त्यांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्याचे काम करणार आहोत. विविध योजना कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी झटत राहणार आहे, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक नंदू डहाणे यांनी केले. श्री. खोंडे यांनीही कामगार हिताच्या योजनांची माहिती देऊन मार्गदर्शन केले. कॉ. आरगडे यांनी शासनाच्या धोरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. श्री. वाघ यांनी मंडळाच्या योजनांबाबत व पुढील कार्यवाहीबाबत कामगारांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, नगर जिल्ह्यातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी ३० जूनपर्यंत शासनाने १ कोटी ६८ लाख रुपये वाटपाचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे ते म्हणाले.

कामगारांनी ३ हजार रुपये लाभासाठीचे अर्ज भरून दिले. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांनी संघटनेचे नवीन सभासद होण्याकरिता हमाल पंचायत येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.


हमाल पंचायत पतसंस्था
कापड विक्री केंद्र
कष्टाची भाकर
श्रमिक रुग्णालय
श्रमिक बाजार
महिला उद्योग
श्रमिक रुग्णालय
विस्तारीकरण
वसतीगृह
विकासयोजना
शिक्षण संस्था
घरकुल योजना
अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत, अहमदनगर.
हमाल भवन, मार्केट यार्ड, अहमदनगर-४१४००१ दूरध्वनी-(०२४१) ३५८०७८.



कष्टकऱ्यांचे राज्यपातळीवरील नेते डॉ. बाबा आढाव यांचे जिल्हा हमाल पंचायतीला नेहमीच विविध प्रश्नांवर मोलाचे मार्गदर्शन मिळत असते.अशाच एका मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलताना डॉ. आढाव. समवेत शंकररावजी घुले, अप्पा कोरपे, ॲड. लक्ष्मणतात्या वाडेकर, कॉम्रेड बाबा आरगडे व पदाधिकारी.

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकररावजी घुले बोलताना हमालांच्या प्रश्नाबद्दल पोटतिडकीने बोलतात. त्यांचे विचार ऐकण्यासाठी हजारोंची गर्दी नेहमीच जमते.





हमाल पंचायतीतर्फे उभारण्यात येत असलेल्या श्रमिक हॉस्पिटलचे भूमिपूजन करताना तत्कालिन मुख्यमंत्री शरदरावजी पवार.

श्रमिक हॉस्पिटलच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, कॉम्रेड बाबा आरगडे, जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकररावजी घुले यांच्यासह हमाल पंचायतीचे इतर पदाधिकारी.





१२० किलो
६० किलो



५० किलोपेक्षा जास्त ओझे हमालांच्या पाठीवर देऊ नये, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आलेल्या मोर्चासमोर टेम्पोवरून बोलताना हमाल-मापाड्यांचे नेते डॉ. बाबा आढाव, जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकररावजी घुले, कॉम्रेड बाबा आरगडे, इतर पदाधिकारी.


आम्ही हमाल कष्टकरी...
ओझे उचलतो भारी भारी!!
हमाल पंचायतीचा एक हमाल पाठीवरून १०० किलोचे पोते उचलून ट्रकमध्ये टाकत असताना.





जिल्हा हमाल पंचायतीच्या सुरुवातीच्याकाळात एका कामगार मेळाव्याप्रसंगी तत्कालिन मुख्यमंत्री शरदराव पवार, शंकररावजी घुले, दादा कळमकर व इतर नेते.

हमालांच्या पाठीवर ५० किलोपेक्षा जास्त ओझे देऊ नये या मागणीस शासनाची मंजुरी मिळाली. यानिमित्त सहकार सभागृहात झालेल्या प्रबोधन मेळाव्यात मार्गदर्शन करताना कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव.





सुरक्षा रक्षक कामगारांच्या मेळाव्यात जमलेले सुरक्षा रक्षक कामगार.



हमालांच्या पाठीवरील ओझे ५० किलोपेक्षा जास्त असू नये, या मागणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. पी. अन्बलगन यांच्याशी चर्चा करताना हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकररावजी घुले, कॉम्रेड बाबा आरगडे, लक्ष्मणराव उर्फ तात्या वाडेकर आदि.



घरकाम करणाऱ्या महिलांचा मेळावा जिल्हा हमाल पंचायतीत घेण्यात आला. यावेळी उपस्थित डॉ. बाबा आढाव, शंकररावजी घुले, अप्पा कोरपे, लक्ष्मणराव वाडेकर, नंदकुमार पवार, लक्ष्मीबाई कानडे, पै. सहादू गुंजाळ.



शंकरराव घुले यांना महाराष्ट्र कामगार मंडळ, पुणे यांच्याकडून 'दिनबंधू पुरस्कार' मिळाला. त्यावेळी स्टेजवर 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत, पुरुषोत्तम सदाफुले आदि.

हमाल कामगार

१. ट्रान्सपोट विभाग

१. भराटे रामा विठ्ठल

२. जरांगे बबन ज्योतिबा

३. चव्हाण संतोष तुकाराम

४. गिते नामदेव बजाबा

५. बाबर अर्जुन बाबा

६. बाबा सत्यवान अर्जुन

७. भवर सखाराम बापू

८. कोलते मारूती विठोबा

९. कोलते सुनिल दामोधर

१०. महानवर अंकुश आबाजी

११. पवार संजय गंगाराम

१२. कोलते विजय फकिरचंद

१३. चव्हाण अशोक सूर्यभान

१४. भवर अशोक सखाराम

१५. कोलते संतोष बबन

१६. कोलते सोमनाथ गोरख

२. भुसार मार्केट

१. सांगळे हौसाराव निवृत्ती

२. सांगळे भगवान पंढरीनाथ

३. मिसाळ नामदेव विठोबा

४. गायकवाड अशोक निवृत्ती

५. गिते रावसाहेब सुर्यभान

६. सांगळे बबन जगन्नाथ

७. सांगळे दिनकर संतराम

८. लगड विजय सुर्यभान

९. गिते अशोक कोंडिबा

१०. सांगळे गंगाधर तात्याबा

११. मिसाळ बबन एकनाथ

१२. सानप मच्छिंद्र सोपान

१३. काकडे महादेव भाऊराव

१४. सोनवणे राजेंद्र चंद्रकांत

१५. गायकवाड नितीन शाहूराव

१६. वाघमारे प्रकाश दादाबा

१७. गिते राजेंद्र बाळू

१८. जाधव बाळू कुंडलिक

१९. गिते तुकाराम नामदेव

२०. गायकवाड सुभाष सदाशिव

३. लोखंड विभाग

१. वाबळे अशोक देवराम

२. गायकवाड बबन किसन

३. सय्यद बुऱ्हाण शरीफ

४. उगले अर्जुन नारायण

५. गेनप्पा आनंद भिमराव

६. कराड वसंत जयवंत

७. शेख शब्बीर हुसेन

८. कराड बाबासाहेब जयवंत

९. सय्यद लतिफ दादाभाई

१०. शेख हनीफ मोहिद्दीन

११. शेख अमीन मोहद्दीन

१२. घुगे अप्पा भानुदास

१३. दहिफळे रामनाथ भगवान

१४. वल्लाकटी शिवराम

१५. साठे काशिनाथ दत्तू

१६. सय्यद युसूफ दादाभाई

१७. ढगे बाजीराव नारायण

१८. शेख रऊफ बशीर

१९. सय्यद अंबीर छगन

४. आडतेबाजार

१. बनकर नंदू कारभारी

२. राऊत संजय गजानन

३. साबळे गणपत यशवंत

४. शिंदे लक्ष्मण शंकर

५. शेलार गोविंद रामभाऊ

६. कन्हेरकर शिवाजी धोंडिबा

७. धायगुडे तुकाराम मारूती

८. कोळेकर यशवंत बापू

९. भाकरे प्रल्हाद निवृत्ती

१०. वडागळे बाळासाहेब उत्तम

११. नेटके शिवाजी गवाजी

१२. गर्जे मारूती गोविंद

१३. भोजने दत्तात्रय हरिभाऊ

१४. भोजणे ज्ञानदेव दत्तात्रय

५. भाजीपाला मार्केट

१. सानप भैरवनाथ पिराजी

२. अकोलकर बाळासाहेब ज्ञानदेव

३. शेळके प्रल्हाद निवृत्ती

४. सानप सतीश रंगनाथ

५. शिरसाठ मार्तंड शंकर

६. सानप गणेश पिराजी

७. शिरसाठ कृष्णा शंकर

८. धायतडक पोपट कुंडलिक

९. शेळके लहू निवृत्ती

१०. ढोले सोमनाथ भानुदास

११. थोरात सचिन कुंडलिक

१२. पालवे मल्हार साहेबराव

१३. लोखंडे सुनिल निवृत्ती

१४. निंबाळकर शत्रुघ्न विठ्ठल

१५. महाजन भागवत रामदास

१६. सानप अनिल शिवाजी

१७. खेडकर देविदास बबन

१८. बडे संदिप खंडू

१९. ढाकणे अंबादास किसन

२०. ढाकणे रोहिदास पाटिलबा

२१. पाखरे विक्रम नारायण

२२. घुले अंदादास म्हतारदेव

२३. ढाकणे अशोक बाळासाहेब

२४. पगारे संदिप युवराज

६. रेल्वेस्टेशन मालधक्का

१. दानवे संभाजी दिनकर

२. कोतकर भैरू केरू

३. म्हस्के तुळशिराम नबाजी

४. पगारे युवराज भिमराव

५. कोतकर दत्तू बाजीराव

६. कांबळे रमेश पिराजी

७. जगताप अशोक लहानू

८. कार्ले राधाकिसन वामन

९. बुलाखे रामदास अंबादास

१०. वाकडे भरत नाना

११. जगताप परशराम लक्ष्मण

१२. तांबडे शेषराव साहेबराव

१३. अनवणे सुनिल दत्तोबा

१४. जाधव सुनिल दत्तोबा

१५. ठोंबरे रघुनाथ दुल्हा

१६. डांगे बबन दादाभाऊ

१७. गुंड विलास सजन

१८. फरताडे रूपचंद मोहन

१९. सूळ दत्तात्रय बापू

२०. देमुंडे अण्णासाहेब दत्तू

२१. झेंडे शिवाजी देवराम

२२. सूळ रूपेश बापू

२३. गर्जे परशराम गोरखनाथ

२४. सूळ सोमा अण्णा

२५. दारकुंडे रामदास भाऊसाहेब

मुलाखत — प्रश्नावली

मा.श्री. शंकररावजी घुले (आण्णा)

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अध्यक्ष

प्रश्न १. आण्णा आपल्या वाटचालीचा श्रीगणेशा कसा झाला?

उत्तर टिळक रोडवर आमची लाकडाची वखार होती. समोरचं वाडियापार्क तालिम होती. शाळेतील सर्व मित्र तालमीत जाऊ लागलो. तेथे पंढरीनाथ खलीफा असत त्यांनी बरोबर हेरून पैलवान होऊ शकतो असे तो म्हणाला. पुढील काळात पैलवान तयार झालो.

प्रश्न २. आपली एखादी संस्मरणीय कुस्ती ?

उत्तर महाराष्ट्र चॅम्पियन — ७४ किलो वजनगटातून संपूर्ण राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला.

प्रश्न ३. कुस्तीची आवड होती मग राजकारणात कसे काय आलात ?

उत्तर कौठीच्या तालमीत सराव करायला जात होतो. २६ जानुवारी व १५ ऑगस्ट कार्यक्रमात तोडके मोडके भाषण करत होतो. १९७४ साली नगरपालिका निवडणूक लागली. नवनीतभाई बार्शीकरांनी आग्रह करून निवडणूकीत उभे केले. सर्वात कमी वयाचा नगरसेवक म्हणून निवडून आलो. बार्शीकरांनी बांधकाम समितीचा सभापती करून टाकले.

प्रश्न ४. शहराच्या विकासाबाबत आपली भूमिका कोणती?

उत्तर मी नगराध्यक्ष असताना तिसरी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन सावेडी, प्रोफेसर कॉलनी, माळीवाडयात शॉपिंग काम्प्लेक्स योजना राबविली. रावसाहेब पटवर्धन स्मारक, टि.व्ही. सेंटर व आकाशवाणीसाठी जागा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक इ. कामे केली.

प्रश्न ५. हमाल पंचायतमध्ये प्रवेश कसा झाला?

उत्तर मार्केटकमिटयांची स्थापना झाली. सर्व बाजार गंजात भरत होता.

तेथून बाजार नवीन मार्केटयार्डमध्ये स्थलांतरीत झाला. मात्र जुने व्यापारी नवीन मार्केटमध्ये येण्यास तयार नव्हते. त्यासाठी मी उपोषणाला बसलो होतो. कारण मी ही नवीन मार्केटमध्ये आडत सुरू केली होती. हमाल पंचायत स्थापन झाली होती. आमच्या आंदोलनाला अप्पा कोरपे, शंकरराव गायकवाड, गोविंद सांगळे या जेष्ठ हमालांनी पांठिबा दिला होता. हमालांची अवस्था बिकट होती. अगदी मनाला खटकले. सर्व हमालांनी विनंती करून अध्यक्षपद स्वीकारावयास लावले.

प्रश्न ६. हमाल माथाडी बोर्डाच्या स्थापनेची पार्श्वभूमी काय ?

उत्तर युनियन केली तेव्हा बोर्ड नव्हते. मुंबईत अण्णा पाटलांची युनियन होती. १९६९ साली राज्यस्तरावर हमाल माथाडी बोर्ड स्थापन झाले. मात्र मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इ. ठिकाणी बोर्ड स्थापन झाले. अहमदनगर जिल्हयात माथाडी बोर्डाची ४ मे १९९१ स्थापना झाली. महाराष्ट्रात प्रथमच संपूर्ण जिल्हयासाठी माथाडी कायदयाची अंमलबजावणी झाली. पहिले कामगार आयुक्त चोळके साहेब यांची निवड झाली होती. हमाल कामगारांना अनेक फायदे मिळू लागले.

प्रश्न ७. कोणते फायदे झाले ?

उत्तर लेव्हीचा प्रश्न सर्वात महत्वाचा होता. त्यासाठी आम्ही सरकार दरबारी सातत्यानं पाठपुरावा केला. संघटनेची ताकद व एकजुट कामी आली. लेव्हीचा प्रश्न अनेक ठिकाणी चिघळला मात्र अहमदनगर जिल्हयात तो प्रश्न सुरळित सुटला.

प्रश्न ८. लेव्ही म्हणजे काय ?

उत्तर लेव्ही म्हणजे व्यापाऱ्यांनी हमालांसाठी ठराविक रक्कम बोर्डाकडे वर्ग करावयाची. त्यातून सर्व कष्टकऱ्यांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. परंतु अनेक ठिकाणी लेव्ही कोणी दयायची, व्यापारी म्हणत ती शेतकऱ्यांनी दयावी. यावरून अनेक वेळा आंदोलने करावी लागली.

प्रश्न ९. अप्पा कोरपेंची भेट कशी झाली ?

उत्तर अप्पा एक खरोखर चांगला माणूस. शिक्षण नाही परंतु जिद्द भारी. आंदोलनात परिचय झाला. हमालांच्या न्याय हक्कासाठी अप्पांनी लढा देऊनही अपेक्षित यश मिळत नव्हते. त्यामुळे नेतृत्वाची धुरा माझ्या खांदयावर टाकली. माझ्या बरोबरीने अप्पांनी काम केले. साहित्यीक म्हणूनही उदयास आले. अप्पांचा चळवळीत मोलाचा वाटा आहे.

प्रश्न १० डॉ. बाबा आढाव यांच्याविषयी काम सांगाल ?

उत्तर या चळवळीमुळे बाबांचा सहवास लाभला. पुण्यातील बाबांचे हमालांसाठीचे कार्य खरोखरच आदर्श आहे. अनेक आंदोलनात त्यांचे मार्गदर्शन व प्रत्यक्ष सहभाग राहिला आहे. त्यांच्यामुळे मी प्रभावित झालो. यापुढेही खांदयाला खांदा लावून काम करणार आहे.

प्रश्न ११ मार्केट कमिटीबाबत काय ?

उत्तर मार्केट कमिटीच्या सहकार्याशिवाय आमचे काम कसे काय होऊ शकेल. कमिटीत कोणाचीही सत्ता असो. दादा पाटील असो की भानाभाऊ किंवा शिवाजीराव कर्डीले असो. मी कुठल्याही पक्षात असो. विविध योजनांसाठीचा सर्वांनी नेहमीच सहकार्य केले आहे. हॉस्पिटल, पतसंस्था, श्रमिक बाजार, कष्टी भाकर केंद्रे आदि विविध योजनांसाठी जागा देण्यात त्यांनी कायम पुढाकार घेतला आहे.

प्रश्न १२ हमाल मापाडयांसाठी आपण का सल्ला दयाल ?

उत्तर बाबांनो दारू पिऊ नका. नाही तर मला त्यासाठी आंदोलन करावं लागायचं. तुम्ही एवढे कष्ट करता मग व्यसनाधिनतेपासून दूर राहिले पाहिजे. आपल्या कुटुंबाचा विकास केला पाहिजे. मुलांना चांगले शिक्षण दया.

प्रश्न १३ अण्णा हमाल मापाडी व धान्य गोळा करणाऱ्या महिलांचे सर्व प्रश्न सुटले का?

उत्तर प्रश्न हे कधी संपलेत का? पूर्वीच्या मानाने जवळपास चांगले मार्गी लागलेत. हमालांसाठी नुकताच ५० किलोचा भरतीचा प्रश्न मार्गी लागला. जोपर्यंत अंगात ताकद आहे तोपर्यंत ठिक पण म्हतारपणी सगळे गुडघे निकामी होतात. म्हणून ५० किलो वजन असणाऱ्या गोण्यांमधून माल आणला जावा अशी भूमिका आहे.

प्रश्न १४ आपणास राज्य पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली काय वाटते?

उत्तर आजपर्यंत केलेल्या कामाची ही पावती असून डॉ. बाबा आढाव यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे तो आपण आगामी काळात सार्थ करून दाखवू. मुंबईत अण्णा पाटील यांची पूर्वीपासून संघटना आहे. तीच पुढे कार्य करीत आहे. मुंबई वगळता आमचे महामंडळ संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. पुण्यात डॉ. बाबा आढावांचे काम मोठे आहे. अहमदनगरलाही भरीव काम झाले आहे.

कॉ. बाबा आरगडे

प्रश्न १. बाबा आपल्या वाटचालीचा श्रीगणेशा कसा झाला?

उत्तर आरंभीच्या काळात लालनिशाण पक्षात होतो. दत्ता देशमुख, यशवंत चव्हाण व आपल्या जिल्हयातील कॉ. कात्रे, कॉ. भास्कर जाधव व नेवासा तालुक्यातील कॉ. सोन्याबापू काळे यांच्यामुळे लालनिशाण पक्षात आलो. दरम्यानच्या काळात लालनिशाण पक्षात कम्युनिष्ट पक्षाचे राजकारण जोरात होते. त्यामुळे भारतीय कम्युनिष्ठ पक्षात काम करू लागलो. कम्युनिष्टपक्षात असताना किसान सभा नंतर कामगार क्षेत्रात करू लागलो.

प्रश्न २ बाबा कोणत्या कोणत्या कामगार आघाडीत काम केले ?

उत्तर शेतमजूर युनियन, रिक्षा युनियन, मैल कोले, कोतवाल, ग्रामपंचायत कर्मचारी व नंतर इमारत बांधकाम कामगार चळवळीत काम करू लागलो.

प्रश्न ३ आपण हमाल पंचायतीकडे कसे आलात ?

उत्तर संपूर्ण जिल्हाभर माथाडी कामगार कायदा लागू झाला. नेवाशात मात्र खूप संघर्ष झाला. नेवाशाला माथाडी कायदा व्यापारी अंमलबजावणी होऊ देत नव्हते. त्यास खंबीर नेतृत्वाचा अभाव होता. ही घटना अप्पा कोरपेंनी बाबा आढावांना सांगितली. बाबा आढावांनी अप्पांना बाबा आरगडेंकडे जाण्यास सांगितले होते. हरिभाऊ शिंदे, शिवाजी गुंड, अण्णा शिंदे, लतीफ शेख, सुर्यभान कनगरे इ. कामगार बाबांकडे आले व नेतृत्व करण्याची विनंती केली.

प्रश्न ४ नेवाशात नेतृत्व स्वीकारल्यावर आपण काय केले ?

उत्तर राज्यात कायदा लागू झाला आहे तेव्हा नेवाशातही लागू करण्यासाठी संपाची नोटीस दिली. व्यापाऱ्यांनी जबरदस्त विरोध केला. परिणामी व्यापारी—हमाल संघर्ष झाला. संप चिघळला. संप मिटेल यांची शाश्वती नव्हती. व्यापाऱ्यांनी दोन दिवस बाजारबंद राहिला. शेवटी

व्यापाऱ्यांनी बाहेरून हमाल कामगार आणल्या. हाणामारी झाली. पोलीस केसेस झाल्या. संप चालू राहिला. सर्वाधिक काळ संप चार महिने चालला होता. सहाय्यक कामगार आयुक्त चोळके साहेब व यशवंतराव गडाख यांच्या मध्यस्तीने कायदा मंजूर करून कायदा मंजूर झाला. अंमलबजावणी झाली. या चळवळीस अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीची बहुमोल मदत झाली. शंकरराव घुले, अप्पा कोरपे हे चळवळीचे लक्ष ठेवून होते.

प्रश्न ५ नेवासा हमाल पंचायत अध्यक्ष म्हणून केव्हा पासून काम करत आहात? नेवाशात किती कामगार आहेत?

उत्तर १९९२ पासून आजपर्यंत काम करीत आहेत. १५० हमाल मापाडी काम करतात.

प्रश्न ६ जिल्हा हमाल पंचायतमध्ये केव्हा पासून काम करत आहेत?

उत्तर नेवाशात जरी अध्यक्ष असलो तरी जिल्हयांनी आंदोलनात अग्रभागी, संघटना मजबूत करणे. सर्व समावेशक निर्णय घेणे, व्यवसाय कर लढा, ५० किलो बोजा, हमालीची दरवाढीचे लढे यामध्ये सर्व लढयाची दिशा ठरवित होतो.

प्रश्न ७ शंकरराव घुले साहेबांशी संबंध केव्हा आला?

उत्तर १९९२ नेवाशाच्या संपाच्या वेळी घुले साहेबा व अप्पा कोरपेंशी संपर्क आला.

प्रश्न ८ माथाडी कामगार कायदयाविषयी आपले मत काय?

उत्तर माथाडी कायदा खूप चांगला आहे. त्या कायदयान्वये फंड, बोनस, आजारपणातील नुकसान भरपाई आणि दर महिन्याला वेतन हे मिळू लागले. पण कायदयाची अमंलबजावणी करण्यामध्ये शासन उदासीन आहे. आस्थापनाने मजूरीचे पैसे व लेव्ही माथाडी मंडळाकडे भरावी यासाठी सक्ती करण्याऐवजी जुजबी प्रयत्न केले जातात. परिणामी व्यापाऱ्यांची पूर्वीसारखी शोषणाची मानसिकता असल्याने व्यापारी कायदा पाळण्यात पळवाटा शोध आहेत. यासाठी शासनाने दखल

घ्यावी. १९६९ साली झालेल्या कायदा संपूर्ण महाराष्ट्रात लागू नाही. विशेषत: नगर जिल्हयात आजही साखर कारखान्यात माथाडी कायदा लागू नाही ही गंभीर बाब आहे.

प्रश्न ९ बाबा आढावांविषयी काय सांगाल ?

उत्तर महाराष्ट्रात बाबा आढावांचा फार मोलाचा वाटा आहे. बाबा आढाव निरपेक्ष भावनेने वंचित अशा माथाडी कामगारांना अन्याय दूर करण्यासाठी झगडत आहेत.

संदर्भ सूची

१. प्राथमिक साधने

अ) सहकार नियुक्त समित्या व ठराव

१. कालेकर बी.एस.— लोखंडी जथ्था कामगार चौकशी समिती अहवाल दि. १५ डिसेंबर १९६५.

२. जागतिक श्रम संघटनेचा —५० किलो वजन उचलण्याचा ठराव १९४८.

३. पाटील शिवाजीराव — असंरक्षित कामगाराबाबत चौकशी समिती अहवाल १२ जानेवारी १९६५.

४. पोवार के.आर. — माथाडी कामगाराबाबत चौकशी समिती अहवाल १२ जानेवारी १९६५

५. पंतप्रधानांनी नेमलेली अर्जुनसेन गुप्ता समिती (असंघटित कामगार) २००७—२००८

६. महाराष्ट्र माथाडी कामगार अधिनियम १९६९, १३ जून १९६९.

ब) प्रकाशित पुस्तके

१. डॉ. आढाव बाबा, सत्यशोधनाची वाटचाल, मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, १९९९

२. देशमुख कॉ. दत्ता, मी दत्तूचा दत्ता कसा झालो त्याची गोष्ट. वि.म. शेळके, माधव चव्हाण, गुलाब देशमुख, कॉ. देशमुख विचार मंच, सुभाष रोड, कोल्हापुर. दि. ३ नोव्हेंबर १९९६

३. कोरपे अप्पा, मी तो हमाल, मोरया प्रकाशन, पुणे १९९२

४. कोरपे अप्पा, भारवाही, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर १९९५

५. कोरपे अप्पा, भाकर, स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर १९९६

६. कोरपे अप्पा, जाई, रूपाली प्रकाशन, अहमदनगर १९९८

७. कोरपे अप्पा,अरे माणसा माणसा, रूपाली प्रकाशन, अहमदनगर २००२

८. राळेभात रंगनाथ, पहाटची चांदणी, शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर २०१५

९. साळवे आनंदा, 'वेशीबाहेरचं जगणं' अमीनभाई जामगावकर प्रकाशन, औरंगाबाद. ६ डिसेंबर २०१२

१०. साळवे आनंदा, 'टिचभर पोटासाठी' शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर, ३ जानेवारी २०१५.

क) माथाडी मंडळाचे अहवाल व स्मरणिका —

१. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अहवाल, १९८१—८२

२. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत वार्षिक अहवाल—१९८४—८५

३. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत वार्षिक अहवाल—२०००

४. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत वार्षिक अहवाल—२००१

५. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत वार्षिक अहवाल—२००२—०३

६. अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत वार्षिक अहवाल—२००३—०४

७. अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ—२०१०

८. अहमदनगर जिल्हा माथाडी कामगारांची पतसंस्था अहवाल — २०११—१२

९. कॉ. आरगडे बाबा, श्रमज्योती, अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका — २०११.

१०. मा.खा. आठरे पाटील स्मरणिका १९९०

११. कॉ. लंघे वकिलराव, गौरव विशेषांक १९९५

१२. पंडित नेहरू जन्मशताब्दी द्वारा, अहमदनगर वस्तुसंग्रहालय स्मरणिका १९८८—८९.

ड) नियतकालिके :—

१. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता विशेषांक १९९७

२. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता जानेवारी २०११

३. डॉ. आढाव बाबा, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन

४. पथारी व्यावसायिक पंचायत महाराष्ट्र राज्य, २०१४.

इ) लेखसूची :—

१. केरकर भालचंद्र, पेन्शन कामगारांचा हक्क आहे उपकार नव्हे, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन.

२. चव्हाण रामनाथ, श्रमाची प्रतिष्ठा आणि माथाडी कायदा, हमाल माथाडी वार्ता, १९९७.

३. महापूरे संजय, जिल्हा हमाल माथाडी पतसंस्था, श्रमज्योती अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत स्मरणिका २०११

ई) राज्यघटनेतील तरतूदी :—

1- Government of India, Industrial Act – 1947

2- Government of India Act, Building and other construction workers Act 1996.

3- The Maharashtra Mathadi Hamal and other Manual workers (Regulation of employment) and workers Act 1969.

4- National Hockers Act 2009

२) दुय्यम साधने

अ) प्रकाशित पुस्तके

१. डॉ. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

२. अहमदनगर नगरपालिका शतसंवत्सारिक ग्रंथ १८५४—१९५४.

३. भापकर प्रभाकर कोंडाजी, हिराप्रभाची कहानी, प्रकाशन शिंदे सुमन, अ. सुगम साहित्य प्रकाशन, अहमदनगर १९८७.

४. प्रा.डॉ. चव्हाण शंकर, कामगार चळवळ एक राजकीय विश्लेषण, शब्दग्रंथ प्रकाशन, अहमदनगर ३० जून २००८.

५. प्रा.डॉ. दहातोंडे भि.ना., बापुसाहेब भापकर, जीवन व कार्य जन्मशताब्दी ग्रंथ, २००४.

६. धर्माधिकारी स्वप्नील, आपला अहमदनगर जिल्हा वेध प्रकाशन पुणे ४११ ०२७.

७. कॉ. जाधव भास्कर‌राव, मुक्तिवेध गौरव ग्रंथ समिती, ५ मे १९९७.
८. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर २०११
९. म्हस्के सुनिल नाथा, नगर गौरव अहमदनगर प्रथम आवृत्ती २००९.
१०. कॉ. पानसरे गोविंद, अमृत महोत्सवी समिती, संगमनेर अकोल्याची क्रांतिकारी पंरपरा, २०१४.
११. पाटील व्ही.पी., दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन कराड १९९८.

ब) अप्रकाशित प्रबंध —

१. शेंडगे द.भ.— सातारा शहरातील माथाडी कामगारांच्या आर्थिक, सामाजिक जीवनाचा अभ्यास, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक.

क) वर्तमान पत्रे —

१. दैनिक लोकमत
२. दैनिक समाचार
३. दैनिक नवशक्ती
४. दैनिक केसरी
५. दैनिक तरूणभारत
६. दैनिक लोकयुग
७. दैनिक सकाळ
८. दैनिक सार्वमत
९. दैनिक नवामराठा
१०. दैनिक देशदूत
११. दैनिक लोक आवाज
१२. दैनिक नगर टाईम्स्
१३. दैनिक पुण्यनगरी

१४.दैनिक लोकसत्ता

१५.साप्ताहिक ज्ञानधारा

१६.लोकप्रभा.

ड) परिपत्रके :—

१.महाराष्ट्र राज्य उदयोग व विभाग आदेश ३०/०९/९५

२.उदयोग, ऊर्जा, कामगार विभाग, मुंबई २५ सप्टेंबर २००६

३.पथारी व्यावसायीक पंचायत, अहमदनगर १२/२/२०१५

इ) संकेतस्थळ :—

१.www.Marathivishwakash.in

२.www.mahakamgar.in

३.www.History.in

ई) मुलाखती

१. डॉ. बाबा आढाव

२. शंकरराव घुले

३. कॉ. बाबा आरगडे

४. एकनाथ कोरडे

५. मधूकर केकाण

६. संजय महापूरे

७. पी.एन. लोंढे